म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १५

REFBK-0003590

ग्रं. सं. ठाणे
चरित्र
२५

# ग… ांच्या आठवणी

## चरित्र व गर्वनिर्वाण नाटक

संपादक

**गोपाळ गोविंद अधिकारी**

# गडकरी यांच्या आठवणी

## चरित्र व अप्रकाशित गर्वनिर्वाण नाटक

REFBK-0003590

सपादक

**गोपाळ गोविंद अधिकारी**

क्र. 3590

सन १९२८   प्रकाशकः—अधिकारी आणि मंडळी   माहे जानेवारी

प्रकाशक—
गोपाळ गोविंद अधिकारी
सदाशिव पेठ, पुणें शहर.

नाट्याचार्य रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं
लिहिलेली उत्कृष्ट कादंबरी.

**दुटप्पी कीं दुहेरी**

**किंमत एक रुपया. ट. ख. निराळा**

आमच्याकडे सर्व प्रकारचीं पुस्तकें विकत मिळतात.

—**बॉंबे बुक डेपो, गिरगांव मुंबई.**

मुद्रक—
लक्ष्मण भाऊराव कोकाटे,
'हनुमान प्रेस,' सदाशिव पेठ
घ. नं. २०० पुणें शहर.

# प्रस्तावना

खरें म्हटलें तर गडकऱ्यांच्या आठवणी संग्रहीत करून प्रसिद्ध करणें हें गडकऱ्यांचे वारसदार रा. शंकर गणेश गडकरी हायकोर्ट वकील यांचें काम होतें; पण कै. राम गणेश स्वर्गवासी होऊन आज नऊ वर्षे पुरीं झालीं तरी त्यांनीं आठवणींचिशा काय, त्यांचें छोटेंसें चरित्रही प्रसिद्ध केलें नाहीं ! गडकऱ्यांची योग्यता महाराष्ट्राला पटली, आणि त्यांच्या स्मारकाची चळवळ सुरू झाली; रा. भार्गवराम वरेरकर यांनीं भिक्षांदेहीचें कामही पत्करलें आणि चळवळीप्रमाणें बराचसा फंड उभा झाला. महाराष्ट्रीय रसिक आपलेंकर्तव्य अशा प्रकारें करीत आहेत. महाराष्ट्राला गडकऱ्यांची योग्यता जशी पटली तशी त्यांच्या बंधूना—त्यांच्या पाठच्या बंधूना पटली नाहीं असें नव्हे. रा. शंकर गणेश गडकरी यांनाही आपल्या बंधूची योग्यता अगदीं बरोबर पटली आहे. पण स्वतांच्या खिशांतले पैसे खर्च करून गडकऱ्यांचें उत्तम स्मारक कसें करावें या विचारांत महाराष्ट्रीय रसिक असतात तर गडकऱ्यांच्या नाट्यग्रंथापासून स्वतांचा खिसा जास्तींत जास्त किती भरेल,या विचारांत त्यांचे बंधु शंकर गणेश गडकरी गढलेले असतात ! आज थोडेच पैसे आहेत तर त्यांच्या नांवाचा बोर्ड खोलीला देऊन लहानसें स्मारक करावें, फंडाची रक्कम अधिक वाढली म्हणजे मग युनिव्हर्सिटीकडून त्यांच्या नांवाची स्कॉलरशिप ठेऊ असे ‘ प्लॅन्स ’ गडकरी स्मारक कमेटी करीत असते तर ‘ एकच पेला ’ या नाटकाच्या आवृत्तीनें एक खंडीचें उत्पन्न वाढलें, ‘ भावबंधन’च्या पुढील आवृत्तीच्या पैशातून आणखी उत्पन्न वाढवूं असे प्लॅन्स, त्यांचें बंधु करीत असतात ! आज पांच हजार रुपये जमा झाले आहेत, आणखी पांच हजार रुपये कसें वाढतील याची विवंचना वरेरकर कमतनूरकर करीत असतात तर कै. गडकरी यांच्या मागें हयात राहिलेल्या दुर्दैवी व्यक्तींना द्यावयास लागणारी पोटगी ज्या दिवशीं बंद होईल तो सुदीन असें त्यांच्या बंधूना वाटत असावें ! ! नाहींतर ज्यांच्या नाटकांच्या आवृत्त्यावर आवृत्त्या निघून वीस पंचवीस हजार रुपये मिळाले त्यांच्या म्हणजे कै. गडकरी यांच्या धाकट्या पत्निला आपलें शिक्षण कसें पुरें होतें याची

विवंचना पडली नसती ! लोकविख्यात कवि कै. ठोमरे यांच्या पत्निला त्यांचे मागें जगण्यापुरतें शिक्षण मिळविण्यासाठीं सेवासदनांतील डाळ निवडावी लागली त्याचप्रमाणें कै. गडकरी यांच्यासारख्या नाटककारांच्या पत्निलाही सेवा-सदनांतच काबाडकष्ट करावे लागत आहेत, हें पाहिलें म्हणजे अंतःकरणाला चरका बसतो; आणि असें वाटतें कीं कै. राम गणेश यांना आपल्या मागें होणाऱ्या गृहस्थितीची कल्पना झाली असती तर मरणापूर्वीं अवघे दोन तास 'भावबंधन' नाटकांचा लिहावयाचा राहिलेला थोडासा भाग पुरा करण्याऐवजीं त्यांनीं 'मृत्युपत्रच' लिहून ठेवलें असतें. रा. शंकर ग. गडकरी यांना माझ्या या लिहिण्याचा राग येईल हें मी जाणून आहे; पण विषय निघाला आणि थोडेसे तरी लिहिल्याखेरीज समाधान वाटेना म्हणूनच लिहिले. रा. शंकर ग. गडकरी हें कै. रामगणेश यांचे बंधू नसते तर त्यांच्यासंबधीं जाहीरपणें लिहिण्याचें कारण काय ? थोरला भाऊ आयुष्यभर मरमरून हजारों रुपये मिळवतो आणि त्यांच्यामागें आयत्या बिळावरील नागोबाप्रमाणें धाकठा भाऊ खुशाल गादीतक्क्याला टेकून मजा मारातो आणि मयताच्या विधवा पत्नी पोळपाटलाटणें घेऊन दुसऱ्याच्या घरीं मोलमजुरी करते अशीं उदाहरणें एऱ्हवीं थोडीं का आहेत ? मनुष्यानें अंतःकरण आणि बुद्धि यांना सारख्या प्रमाणानें कायद्यांत स्थान देण्याचा कितीही प्रयत्न केला असला तरी शेंकडा पांच या प्रमाणांतहि कायद्यामध्यें अंतःकरणाला जागा मिळाली नाहीं ! त्यांतून रा. शंकर गणेश गडकरी आतां हायकोर्ट वकील झाले आहेत; आणि अपवाद सोडून दिला तर वकील म्हणजे अंतःकरण गमावलेला एक मनुष्यप्राणी असें बहुधा दृष्टीस पडल्याखेरीज रहात नाहीं.

कै. गडकरी यांचा मी अंधभक्त नाहीं किंवा त्यांच्या स्नेहीवर्गांतही माझी गणना होत नाहीं. फार काय, राम गणेश वारले त्यावेळीं मी सतरा वर्षांचा होतो तरी त्यांना एकवार पाहिलेंहि नव्हतें मग त्यांचा माझा थोडासा तरी परिचय कसा असणार ! मी चार वर्षांपूर्वी प्रकाशनाच्या धंद्यांत पडलों आणि अवघ्या एकाच वर्षानंतर म्हणजे गेलीं तीन वर्षें मला नामशेष स्थितींतच काढावी लागली. पहिल्याच वर्षीं गडकरी यांच्या आठवणी संग्रहीत करण्याचें ठरविलें होतें पण तें वर दिलेल्या कारणानें जमवून आलें नाहीं. आतां संधि

मिळतांच मीं हें पुस्तक प्रसिद्ध करीत आहे. तीन वर्षांपूर्वी जी स्थिति होती, ती आज नाहीं हें मी जाणून असलों तरी संकल्पित कार्य शेवटास नेण्यांतच मला समाधान वाटतें. मग त्यामुळें अडचणी उत्पन्न झाल्या तरी त्याची मी पर्वा करीत नाहीं. आतां तर काय गेल्या तीन वर्षांत आलेल्या अडचणींतील आपत्तींचें दुःख सहन करण्याची मला संवय झाली असल्याकारणानें अडचणींची धास्तीच वाटत नाहीं. धास्ती वाटती तर माझ्याकडून कांहींच झालें नसतें व होण्याची अपेक्षा नसती. या आठवणी संग्रहींत करतांना मला किती त्रास पडला याचें पुराण लिहिण्याची माझी इच्छा नाहीं. ज्यांच्याकडून आठवणी घ्यावयाच्या त्यांच्याकडे मला एकदां सोडून दहादां जावें लागलें असतें तरी दहाच वेळ काय पंचवीस वेळाही हेलपाटे घालणें माझें कर्तव्यच होतें. ज्याला कार्य करायचें आहे त्याला त्रास हा सहन केलाच पाहिजे. तेव्हां मला कोणी किती हेलपाटे घालावयास लावलें अशी मी तक्रार करीत नाहीं. मी ज्यांच्याज्यांच्याशीं आठवणी मागितल्या त्यांनीं त्यांनीं मला दिल्या. याबद्दल आठवणी देणाऱ्यांचा मी फार आभारी आहे. अमक्यांनीं आठवणी देण्यासाठीं मला शंभर हेलपाटे घालावयास लावलें व तमक्यांनीं दहा पत्रें पाठविलीं असतां एका पत्राचेंही उत्तर दिलें नाहीं, असें वाचकांना सांगण्यांत मला कमीपणा वाटतो. माझ्या मतें संपादकानें अशा तक्रारी करणें बेहिमतीपणाचें होय. आतां मुद्दाम कोणी ‘ इन्सल्ट ’ करण्याकरितां मला त्रास दिला असतां तर मीसुद्धां त्यांची बरोबर हजेरी घेतली असती. कागदावरच्या लिखाणांत, ज्यांच्याविषयीं लिहावयाचें त्याच्या अंतःकरणामध्यें जन्मभर आठवण राहण्यासारखें आपोआप कोरले जातील असे शब्द मलाही लिहितां येतात.

या आठवणी संग्रहीत करतांना मी शक्य तितकी विविधता व एकच विषय पुन्हां न येण्याबद्दल पूर्ण दक्षता बाळगली असतांही कांहीं बाबतींत पुनरुक्ती झालेली आहे; पण हा एक दोष टाळला तर या पुस्तकांत कांहींच ठळक दोष दाखवितां येणार नाहींत. तरी पण दोषैक दृष्टीनें बघणाऱ्यास गुणही दोषच दिसूं लागतात. गडकऱ्यांच्या आठवणी संग्रहीत करतांना “यावज्जीवहि ‘ काय मी ’ नकळलें आताप्रती नीटसे । मित्रांतेंहि कळे न गूढ—नकळे माझें मलाहि तसें ।।” हें गडकऱ्यांचें आपल्या मृत्यूलेखांतील उद्गार काव्यात्मक नसून वस्तुस्थितीला धरून आहेत असें मला आढळून आलें. यामुळें त्यांच्यासंबंधीं कांहीं गोष्टी अशा दिसल्या

कीं, त्यांचा निर्णय मला करतां आला नाहीं आणि याच कारणासाठीं 'प्रेमसंन्यास' या गडकऱ्यांच्या पहिल्याच नाटकाच्या बाबतींत झालेल्या खेळखंडोबाबद्दल मला या नाटकाशीं निकटचा संबंध असणाऱ्यांच्या आठवणी घेतां आल्या नाहींत. या आठवणी आणि गंधर्व कंपनी व बलवंत कंपनी या दोन कंपन्यांशीं गडकऱ्यांच्या आलेला बरावाईट संबंध कोणत्या प्रकारचा होता त्यासंबंधींची विस्तृत माहिती आठवणीच्या पुढील भागांत देण्याचा मी ठरविले आहे. या आठवणी प्रसिद्ध झाल्यास नाटककारानें कंपनीशीं कसें वागावे व कंपनीच्या मालकानें नाटककाराला किती मानानें वागवावें या विषयावर बराच प्रकाश पडल्याखेरीज रहाणार नाहीं.

ज्यांच्या ज्यांच्याकडे आठवणी मागितल्या त्याना मी खऱ्या आठवणी देण्याबद्दल पुन्हां पुन्हां बजावलें होतें. आठवण नसेल किंवा जी आठवण संशयास्पद वाटत असेल ती बळेंच न देण्याबद्दल मी कळकळीची विनंती केली; याचें कारण असें आहे कीं अशा आठवणींनीं निष्कारण गैरसमज माजतो. पण असें सांगूनही रा. हडप यांनीं मला या बाबतींत फसविलें. वीर वामनराव जोशी यांच्याकडे मी गेलों असतां हडपांच्या आठवणींची गोष्ट निघाली त्यावेळीं हडपांचा खोटेपणा उघडकीस आला. त्यामुळें त्यांच्या आठवणी या पुस्तकांत छापूं नये असें माझ्या मनांत एकवार आलें होतें. पण रा. हडपांचा खोटेपणा जाहीरपणें पुढें मांडण्यांतच फायदा आहे अशा विचारानें मीं त्या आठवणी मुद्दाम घातल्या आहेत. फायदा असा कीं गडकऱ्यांसंबंधीं कांहीं कांहीं बाबतींत कसा निष्कारण गैरसमज माजला आहे हें व कोणाच्याही बाबतींत कसा निष्कारण गैरसमज माजतो हें सर्वांच्या निदर्शनास आपोआप येईल.

असो, माझ्याकडे बऱ्याच आठवणी शिल्लक आहेत. रा. श्रीधर शंकर मुजुमदार यांच्याकडून आलेल्या आठवणींपैकींही बऱ्याच आठवणी स्थलाभावी कमी कराव्या लागल्या. शिवाय अनेकांकडून आठवणी यावयाच्या आहेत. तेव्हां पुढल्या म्हणजे सन १९२९ सालच्या स्मृतिदिनाचें दिवशीं गडकऱ्यांच्या आठवणीचा दुसरा भाग प्रसिद्ध करीन.

गेल्या तीन वर्षांनंतर माझ्याकडून हेंच पहिलें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. गेल्या तीन वर्षांत मला अनेक अनुभव आले. या सर्व अनुभवांचा उपयोग मला पुढें झाल्याखेरीज रहाणार नाहीं. या तीन वर्षांत मला अनेकांनीं मदत

केली त्या सर्वांचे मी आभार मानतो. या तीन वर्षांचें अनुभव मी एका स्वतंत्र पुस्तकांत लिहिणार आहे. तरी पण रा. आप्पासाहेब सोनाळकर, रा. वसंतराव कर्णिक, रा. गजाननराव माडखोलकर, रा. विठ्ठलराव महिंद्रकर, रा. दत्तोपंत सारोळकर यांनीं मला वेळोवेळीं मदत केली नसती तर आजचा दिवस मला दिसला नसतां. त्याचप्रमाणें रा. बाबुराव तुळजापूरकर व रा. परशरामपंत कुलकर्णी यांची मला पुणें मुक्कामांत अतिशय मदत झाली व हल्लीं माझ्या फुरसतींपैकीं बराचसा काळ या दोघांच्या सहवासांतच आनंदात जातो. या सर्व स्नेह्यांच्या मदतीवरच माझा भविष्यकाळ अवलंबून आहे. शेवटीं हनुमान छापखान्याचे मालक रा. लक्ष्मणराव कोकाटे यांनीं पुस्तक वेळेवर व चांगलें छापून दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून ही प्रस्तावना पुरी करतो.

पुणें,
ता. १५।१।२८

गोपाळराव अधिकारी


बंगालमधील क्रांतिकारकांचे पुढारी

व

आजचे राष्ट्रयोगी

**बाबू अरविंद घोष**

**ले०—दत्तात्रय गणेश सारोळकर**

बाबू अरविंद घोस यांचें नांव कोणास माहिती नाहीं असें नाहीं. त्यांच्या बालपणापासून आजपर्यंतच्या सर्व चरित्रविषयक हकिगती या पुस्तकांत दिल्या आहेत. त्यांचप्रमाणें बंगालमध्यें मध्यंतरी जी क्रांतिकारकानी चळवळ केली त्याची हकिगतही या पुस्तकांत समग्र वाचावयास सांपडेल. हें पुस्तकही लौकरच प्रसिद्ध होईल.

प्रकाशकः—अधिकारी आणि मंडळी, पुणें शहर.

# गडकरी यांच्या आठवणी

## लेखक

श्रीयुत भार्गवराम विठ्ठल वरेरकर
,, यशवंत नारायण टीपणीस
,, वासुदेव गोविंद आपटे
,, वीर वामनराव जोशी
,, नरहर गणेश कमतनूरकर
,, विठ्ठल सिताराम गुर्जर
,, केशवराव दाते
,, गोविंदराव टेंभे
,, विठ्ठलराव घाटे
,, अनंततनय
प्रोफेसर गो. म. चिपळूणकर
श्रीयुत वि. स. खांडेकर
,, श्रीधर शंकर मुजुमदार
,, "देवबाबू"
,, विठ्ठलराव मार्हिद्रकर
,, दत्तात्रय गणेश सारोळकर
,, प्रल्हाद केशव अत्रे
,, आठवले, मनोहर संगीत नाटक मंडळी.
,, विठ्ठल वामन हडप
,, गोपाळ गोविंद अधिकारी

याशिवाय 'गडकऱ्यांचें त्रोटक चरित्र' व 'गर्वनिर्वाण' नाटकाचे प्रवेशही या पुस्तकांत छापले आहेत.

राम गणेश गडकरी यांचे गुरु

# रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांस

सविनय समर्पण.

३३२ ३५९०

# राम गणेश गडकरी यांचें चरित्र

( १८८५-१९१९ )

'गोविंदाग्रज' या नांवानें प्रसिद्ध असलेले कवि, 'बालकराम' या नांवानें विनोदी लेख लिहून वाचकांना मनमुराद हंसावयास लावणारे विनोदी लेखक व पुण्यप्रभाव, एकच प्याला, भावबंधन इत्यादि लोकप्रिय नाटकांचे कर्ते यांना परलोकवासी होऊन चालू सालीं बरोबर नऊ वर्षें पुरीं होतात. गडकरी यांच्या मरणानंतर त्यांच्या गौरवाला व नांवलौकिकाला चढती कळा इतकी लागली कीं वाङ्मयप्रांतांत गडकऱ्यांचें नांव लहानापासून थोरांपर्यंत अत्यंत परिचयाचें झालें. ज्यांची वाङ्मयतपस्या व विद्वत्ता गडकऱ्यांपेक्षां खरोखर अधिक अशा इतर शारदोपासकांसही जो लौकिक मिळाला नाहीं, तो राम गणेश गडकरी यांना मरणोत्तर निःसंशय मिळाला. गडकऱ्यांनीं मिळविलेली लोकप्रियता याच कारणामुळें कित्येकांना दुःसह झाली असल्यास नवल नाहीं. लोकांची कुचेष्टा करून स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याचा अट्टाहास शेवटीं ज्याप्रमाणें नाशास कारणीभूत होतो त्याचप्रमाणें दुसऱ्यांचा हेवा करून स्वतांची आत्मप्रौढी गाजविणें खुळेपणाचें ठरतें. गडकऱ्यांचा हेवा करणारे अनेक भीष्म महाभीष्म आहेत व ते संधी येतांच 'गडकऱ्यांच्या चरित्रांत, उदात्त, गंभीर अनुकरणीय काय आहे असा प्रश्न करून टवाळी करण्यास कमी करीत नाहींत. गडकऱ्यांच्या आयुष्यांत जन-

तेनें शिकावें व अनुकरण करावें असें कांहींच नसल्यानें त्यांचें विस्तृत सोडा पण छोटेंसें चरित्रही लिहिण्यांत अर्थ नाहीं असाच त्यांच्या म्हणण्याचा स्पष्ट अर्थ होतो. जनता ही आंधळी असली तरी जन्मांध नाहीं. समोरून येणाऱ्या मोटार-कंदिलाच्या झक प्रकाशांत शाबूत डोळ्यांचा मनुष्यही अंध बनतो; पण तो आंधळेपणा जसा कायमचा असत नाहीं त्याचप्रमाणें जनता ही आंधळी असली तरी सुद्धां तिच्या आंधळेपणांत एक प्रकारचा डोळसपणा आहे. प्रकाशाच्या पहिल्याच झटक्यास कांहीं दिसलें नाहीं तरी थोड्याच वेळांत तिला खरें स्वरूप दिसतें: आणि एकदम अंध बनविणारा प्रकाश काय योग्यतेचा आहे याबद्दल तिला बरोबर कल्पनाही होते. गडकऱ्यांच्या मागें जनता आंधळ्याप्रमाणें लागली असली तरी तो आंधळेपणा आतां ओसरला असून गडकऱ्यांचें खरें स्वरूप तिला कळूं लागलें आहे, व विकारवशता नाहींशी झाल्यावरही गडकरी हे खरोखरच एक मोठे वाङ्मयसेवक होऊन गेले याबद्दल हेवानिष्ठ अशा कांहीं व्यक्तींना न पटलें तरी जनतेला आतां कांहींच शंका उरली नाहीं. अशा स्थितींत गडकऱ्यांच्या चरित्रांत उदात्त व अनुकरणीय कांहींच नाहीं असें म्हणाणारांच्या मेंदूला मत्सराची बाधा झाली आहे असें म्हटल्यास तें वस्तुस्थितीला धरूनच होईल.

तसेंच पाहूं गेलें तर गडकऱ्यांच्या चरित्रांत उदात्त, गंभीर व अनुकरणीय असें कांहींच नाहीं म्हणणाऱ्यांचें आयुष्य तरी उदात्त, गंभीर आणि अनुकरणीय आहे काय असा सवाल टाकतां येतो. बापजाद्यांनीं कमाविलेल्या कीर्तीच्या पार्श्वभूमीवर ज्यांचा आयुष्यचित्रपट रंगला गेला त्यांच्यापेक्षां ज्यांनीं स्वपराक्रमानें वाडवडिलांचीं नांवें प्रकाशांत आणलीं त्यांची योग्यता निःसंशय अधिक ठरते. जुन्याकाळीं मांडवगड किल्ल्याची जबाबदारी राम गणेश गडकरी यांच्या घराण्याकडे होती, व गडकऱ्यांच्या मातोश्री या मावळांतील वारखाचे देशपांडे यांच्या घराण्यांतील आहेत. हा नुसता ऐतिहासिक लौकिक असला तरी तो फारसा महत्त्वाचा नाहीं. त्या काळीं असे गडकरी कित्येक झाले. गडकरी यांचें घराणें अथवा पूर्वज कवड्यापया यांतील नसून चवलीपावलीच्या दर्जाचे होते इतकेंच म्हणतां येतें. पण घराण्याचा हा ऐतिहासिक लौकिक किंवा वडिलांच्या मामलेदारीच्या मानाचें वैभव गडकऱ्यांना कितीसें उपयोगीं पडलें हें कोणास सांगितलें पाहिजे असें नव्हे. गडकऱ्यांचें सर्व आयुष्य दारिद्र्यांत गेलें. लहानपणीं तर

पोटाची खळगी भरण्यासाठीं त्यांना नाना प्रकारचे धंदे करावे लागले. पण मनांत आणलें असतें तर विश्वविद्यालयांतील उच्च शिक्षण संपादन करणें ज्यांना सर्वस्वीं शक्य होतें, व ज्यांची जोपासना लहानपणीं तळहाताच्या फोडाप्रमाणें करण्यांत आली ते आज, गोऱ्या ओंकारेश्वरावर गेल्या तरी मास्तर एके मास्तरच करीत आहेत त्यांनीं तरी गडकऱ्यांच्या चरित्रांत उदात्त अनुकरणीय व गंभीर काय आहे असा सवाल करून मत्सरबुद्धी प्रगट करणें बरें नाहीं. त्यांचा उभा संसार सुखांत गेला व मुलेंमुलीं कर्तृत्ववान् निघालीं पण बिचारे गडकरी! त्यांना मातृसुखाखेरीज कोणतेंच सुख मिळालें नाहीं. गडकऱ्यांच्या चरित्रांत उदात्त, गंभीर व अनुकरणीय काय आहे हें त्यांचें आयुष्य व त्यांच्या स्नेह्यांनीं लिहिलेल्या आठवणींवरून व त्यांनीं केलेल्या तेजस्वी वाङ्मयसेवेवरून कळण्यासारखेंच आहे. मुद्दाम स्वतंत्र उत्तर दिलेंच पाहिजे असें नव्हे. पण मुद्दा निघाला म्हणून त्याचें खंडन केलें इतकेंच.

रामकवींचें घराणें वर दिलेल्या ऐतिहासिक हुद्देदारींपेक्षां प्रसिद्ध नाहीं. गडकऱ्यांचे वडील गणेशपंत हे गायकवाडींत नोकरीस होते. संस्थानची नोकरी म्हणजे आळवावरचें पाणी. घटकेचाहि भरंवसा नसतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांची लहर बिघडली कीं, भाकरीचा चौत कमी झालाच. न्यायान्यायाचा निवाडा सर्वस्वीं अधिकाऱ्यांच्या मर्जीप्रमाणें व्हावयाचा. पगाराच्या दृष्टीनेंही संस्थानी नोकरी संतोषकारक नसते. गणेशपंत शेवटपर्यंत संस्थानी नोकरींत टिकले आणि उत्तरोत्तर चढत गेले यावरूनच त्यांची वर्तणूक किती चोख होती हें कळून येण्यासारखें आहे. त्यांच्या वर्तणुकींत चालढकलपणा असता किंवा इमानदारीची कदर त्यांच्यांत नसती तर गणेशपंत साध्या शिपायापासून तों मामलेदाराच्या मानवैभवी हुद्देदारीपर्यंत चढले नसते. रामकवींचा जन्म सन १८८५ च्या मे महिन्यांत झाला. त्यावेळीं गणेशपंत नवसारी येथें फौजदार होते. गडकरी हे गुजराथेंत जन्मल्यामुळें त्यांना लहानपणापासूनच गुजराथी बोलण्यालिहिण्याचा चांगला सराव होता. गडकऱ्यांच्या घराखेरीज त्यांच्या आसपास कोणतेंच महाराष्ट्रीय ( दक्षिणी ) कुटुंब रहात नसल्यानें शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं बोलावयाचें झालें तरी गुजराथींतच बोलावें लागे. यामुळें गुजराथी ही गडकऱ्यांची मायभाषाच झाली होती. गडकरी हे पांचसहा वर्षांचे असतां त्यांनीं एक गुजराथींत ‘ सुरसुंदरी ’ या नांवाचें नाटक लिहून तें समोरच उतरलेल्या

गुजराथी कंपनीकडे बसवावयासही दिलें. पांच वर्षांच्या मुलानें लिहिलेलें नाटक कितीसें चांगलें असणार ! त्याचा योग्य तोच शेवट करण्यांत आला अशी गोष्ट रा. कमतनूरकर यांनीं प्रसिद्ध केली आहे. ही गोष्ट खुद्द गडकऱ्यांनीं कमतनूरकर यांना सांगितली होती म्हणूनच त्यांच्यावर विश्वास ठेवावयाचा. पांच वर्षांचे मुलानें नाटक लिहिलें हें एऱ्हवीं खरें सुद्धां वाटावयाचे नाहीं. गडकरी हे फार तीक्ष्ण बुद्धीचे असल्यानें वडिलांचे फार लाडके होते. पण प्रेमाच्या भरांत त्यांनीं मुलाचे भलतेच लाड मात्र पुरविलें नाहींत. हा मुलगा पुढें फार हुशार निघेल या जाणीवेनें त्यांच्या बुद्धीचा विकास होईल अशाच प्रकारानें ते त्यांचे लाड पुरवीत. गडकरी हे लहानपणीं काय किंवा मोठेपणीं काय फार हट्टी असत. त्यांनीं एकादी गोष्ट करावयाची ठरविली कीं, ती गोष्ट न करण्याबद्दल कोणी कितीही सांगितलें तरी त्याचा उपयोग होत नसे. वडिलांच्या हातचा मार गडकऱ्यांना याच कारणामुळें लहानपणीं बराच खावा लागला. गडकऱ्यांची लहानपणीं प्रकृती निकोप होती यामुळें त्यांचा, त्यांच्या सवंगड्यांवर दाब असे. गडकऱ्यांनीं एकादी गोष्ट करावयाची ठरविली म्हणजे त्यांचे सवंगड्यांपैकीं कोणीच त्यांच्या विरुद्ध जावयाचा नाहीं.एकाद्याला ती रुचली नाहीं तरी गडकऱ्यापुढें त्याचें कांहींच चालण्यासारखें नसल्यामुळें त्याला निमूटपणें गडकऱ्यांच्या ठरीव बेतास मान्यता द्यावी लागे. गडकरी ज्या गांवीं रहात होते त्या गांवालगतच नदी होती. या नदीवर गडकरी व त्यांचे मित्र डुंबावयास नेहमीं जात. यामुळें त्यांच्यावर वडिलांची बरीच नजर असे. तरीसुद्धां गडकरी वडिलांचा डोळा चुकवून केव्हां जात हें कळत सुद्धां नसे. एक दिवशीं ते असेंच नदीवर गेले असतां त्यांच्या घरच्या मुसलमान नोकरानें ती गोष्ट गणेशपंतांच्या कानावर घातली. नोकरानें केलेल्या चाढीमुळें गणेशपंतांच्या हातचा मार खाण्याची रामकविवर पाळी आली असावी. त्याचा परिणाम असा झाला कीं मुसलमान नोकराचा त्यांनीं बरोबर सूड उगविण्याचें ठरविलें. रात्रीं तो शिपाई गवतावर निजला असतां त्या गवताला काडी लावून त्याला जिवंत जाळण्याचा त्यांचा विचार होता. पण त्याच शिपायाचा मुलगा रामकविचा खेळगडी असल्यानें मित्राकडे पाहून त्यांनीं तसें केलें नाहीं. मित्राच्या भावी पोरपणाची त्यांना कींव आली.

गणेशपंत हे सन १८९१ सालच्या सुमारास आजारी पडले. हा आजार

त्यांना शेवटपर्यंत होता. या दुखण्यामुळें रामकवींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झालें. बरें वाटण्यासाठीं व औषधोपचारासाठीं अमदाबाद, पुणें, मुंबई वगैरे शहरीं गणेशपंतांना जावें लागलें. पण अनेक उपाय करूनही आजाराचा जोर कमी होईना! अखेर त्याच चालू दुखण्यांत गणेशपंत सन १८९३सालीं वारले.गणेशपंतांच्या मृत्यूमुळें सरस्वतीबाईंना आकाशांतील कुऱ्हाडच पडल्यासारखें झालें असल्यास नवल नाहीं. गणपतराव मामलेदारीच्या हुद्द्यापर्यंत जरी चढले तरी मागें पैसा कांहीं ना कांहीं कारणानें त्यांना राखतां आला नाहीं. संस्थानी नोकरीमुळें पगारही आजच्यासारखा त्यावेळीं भरपूर मिळत नव्हता. मिळणाऱ्या पगारांत सुखासमाधानानें त्यांचे दिवस निघत होते. गणेशपंत वारले त्यावेळीं सरस्वतीबाईंचा एकादा मुलगा जरी कर्तासवरता असता तरी भावी कालाची फारशी काळजी करावी लागती ना. पण मुलें लहान व घरचें कांहींच नसल्यामुळें सरस्वतीबाईंना पतिदुःखाबरोबर दारिद्र्याच्या वेदनाही सहन कराव्या लागत. गणेशपंत वारल्याबरोबर पुढें काय करायचें हा त्यांच्यापुढें प्रश्नच पडला. सरस्वतीबाईंचे एक दीर त्यावेळीं गुजराथेंत नोकरीस होते. त्यांनीं सरस्वतीबाईंना धीर देण्याचा बराच प्रयत्न केला. नवसारी येथील बिऱ्हाड मोडून सरस्वतीबाईंना दोन मुलांबरोबर कर्जतला रवाना केले, व विनायकला आपल्याकडे ठेऊन घेतलें. कितीही शोक केला तरी एकदा गेलेला प्राण पुन्हा येत नाहीं. त्यामुळें केवळ शोक करण्यापेक्षां प्राप्त स्थितींतही अब्रूनिशी कसे दिवस काढावयाचे इकडेच लक्ष देणें प्राप्त असतें. पतिच्या अकल्पित मृत्यूमुळें सरस्वतीबाईंना अपरमित दुःख झालें असलें तरी त्या गांगरून गेल्या नाहींत. येऊं नये ती आपात्ति आली, आतां यांतून मार्ग काढलाच पाहिजे असा त्यांनीं निर्धार केला. त्यांच्यावर तीन मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी होती. वडील मुलगा विनायक चुलत्याकडे राहिल्यामुळें त्याच्याबद्दलची काळजी हालकी झाली. रामकवींना कर्जतला आल्याबरोबर शाळेंत घातलें. शंकरराव त्यावेळीं लहान असल्यानें त्यांना शाळेंत जावयास बराच अवधि होता.

कर्जतला ज्यावेळीं गडकरी आपल्या मातोश्रीबरोबर राहावयास आले त्यावेळीं त्यांचें वय अवघें आठ वर्षांचें होतें. गणपतरावांसारखा कळवळ्यानें त्यांच्यावर देखरेख ठेवणारा नाहींसा झाल्याकारणानें रामकवींना सर्व गांव उंडारावयास मोकळें झालें. आईनें लक्ष ठेवण्याची शिकस्त केली, तरी ती

कितीशी पुरी पडणार ? शिवाय आई कितीही कडक स्वभावाची असली तरी मुलें वडिलांइतकीं तिला भीत नाहींत. कर्जतला शाळेंत नांव घातल्यावर रामकवींच्या अभ्यासास पुन्हां सुरवात झाली. शाळेंत जाण्याचा त्यांना कंटाळा असे. शाळेंतील शिक्षक रामकवींची बुद्धिमत्ता पाहून आश्चर्यचकित होत. शाळेचे हेडमास्तर कृष्णाजी भिकाजी जोगळेकर यांचें गडकऱ्यांवर फार प्रेम असे. गडकऱ्यांच्या अभ्यासावर व वर्तणुकीवर त्यांची कडक नजर होती. गडकऱ्यांची हुशार बुद्धि पाहून ते त्यांची वेळोवेळीं प्रशंसा करीत. जोगळेकर मास्तर यांच्याविषयीं गडकरी शेवटपर्यंत विषय निघाला की अत्यंत आदरानें बोलत. आपल्यांतलि गुणविषेशाचें श्रेय जोगळेकर मास्तर यांच्याकडे बरेंच येतें असे उद्गार वेळोवेळीं त्यांच्या मुखांतून निघाले आहेत. इतकेंच नव्हे तर 'जोगळेकरांनींच गडकरी निर्माण केला' असेंही रामकवि आपल्या स्नेह्याशीं एकदां बोलले होते. मनुष्य कितीही मोठेपणाच्या मानास चढला तरी बाळपणांतील अनेक गोष्टी त्याच्या हृदयपटलावर अशा खोदल्या गेल्या असतात कीं, त्यांचें विस्मरण केव्हांच होणें शक्य नसतें. प्राथमिक शाळा काय, हायस्कूल काय, किंवा कॉलेज काय त्यांतील अध्यापकांचें स्मरण मरेपर्यंत रहावें असाच विद्यार्थी आणि शिक्षक यांचा संबंध असतो. गडकऱ्यांना शेवटपर्यंत जोगळेकर यांच्याबद्दल आदर व अभिमान वाटे, यांतलें रहस्य ज्यानें त्यानें स्वतावरून ओळखावें.

कर्जत येथें असतां गडकऱ्यांच्या व्रूडपणास ऊत आला होता. मुलगा व्रूड असणें हा मुलांतील दोष नाहीं. किंबहुना व्रूड मुलें बुद्धीनें तीक्ष्णच असतात. शाळेंतील अभ्यासावर गडकऱ्यांचें लक्ष नसलें तरी जें थोडेसें असें तेवढ्यावरूनही त्यांची चांगल्या विद्यार्थ्यांत गणना होई. रात्रीं किंवा सुटी असेल तर दुपारीं गडकऱ्यांच्या मातुश्री त्यांच्यापासून 'हरिविजय' 'रामविजय' 'पांडवप्रताप' 'शिवलीलामृत' इत्यादि ग्रंथ वाचून घेत. लहानपणीं वांचलेल्या ग्रंथांचा त्यांच्या मनावर चांगला परिणाम झाला होता. वेळप्रसंगीं वरील ग्रंथांतील ओव्या ते न चुकतां म्हणून दाखवीत. अलीकडे हे ग्रंथ वाचण्याची पद्धत बंद पडत चालली आहे. यामुळें लहान मुलांना रामपांडव इत्यादिकांच्या गोष्टी अवगत नसतात. अभ्यासाबरोबर यथाक्रम जें ज्ञान होईल तेवढेंच. गडकऱ्यांनीं लहानपणीं वरील सर्व ग्रंथ वाचून टाकल्यानें त्यांना ते पुन्हां वाचावे लागले नाहींत. असो सरस्वतीबाई कर्जत येथें तीन वर्षे राहिल्या.

सन १८९७ सालीं सरस्वतीबाई पुन्हा नवसारी येथें येऊन राहिल्या. नवसारी येथें बिऱ्हाड केल्यावर रामकवींचे थोरले बंधु विनायकराव हेही चुलत्याकडून आईकडे रहावयास आले. या ठिकाणीं असतां रामकवींची मराठी सहावी यत्ता पास झाली. विनायकरावांनीं घरच्या घरीं त्यांना इंग्रजी शिक्षण देण्यास आरंभ केला. गडकरी यांची बुद्धिमत्ता प्रखर असल्यानें कोणताही धडा त्यांच्या चटकन् लक्षांत भरे. नवसारी येथें आल्यावरही शाळेंतील अभ्यासाकडे त्यांचें विशेष लक्ष लागलें नाहीं. शाळेंत जाऊं नये व घरींच रहावें असें त्यांना वाटे. त्यांच्या शेजारीं एक गुजराथी गृहस्थ रहात. त्यांची 'दुरामन' नांवाची मुलगी शाळेंत जातानां रोज येत असे. दुरामन बोलवावयास आली कीं तिला थाप मारून पुढें चालण्यास सांगतांना गडकऱ्यांना बऱ्याच युक्त्याप्रयुक्त्या योजाव्या लागत. पण ती गुजराथी मुलगीही कांहीं कमी हुशार नव्हती ! लालजीच्या थापा तिच्या तेव्हांच लक्षांत येत, व शेवटीं नाइलाज होऊन तिच्याबरोबर गड- कऱ्यांना शाळेंत जावे लागे अशी एक आठवण प्रसिद्ध आहे. नवसारी येथें दोन वर्षें राहून सरस्वतीबाईंनीं पुन्हा कर्जतला बिऱ्हाड थाटलें. यानंतर मात्र त्यांनीं पुन्हा नवसारीला जाण्याची भानगड केली नाहीं. सन १८९९ मध्यें कर्जतला आल्यावर कर्जत येथें फक्त एकच वर्ष बिऱ्हाड होतें. या एक वर्षाच्या अवधींत येथें गडकऱ्यांच्या मनावर परिणाम करतील अशा कांहीं गोष्टी घडून आल्या. त्याचे धागेदोरे त्यांच्या कांहीं काव्यांत गुंतले आहेत.

रामकवींचे वडील बंधु विनायकराव यांचा अभ्यास यथाक्रम सुरळीतपणें चालला होता. विनायकराव यांनीं रामकवीला घरच्या घरीं शिक्षण देऊन मॅट्रिकची परीक्षा पास होईल इतकी त्यांची तयारी करून दिली व गडकरी सन १९०४ मध्यें मॅट्रिकची परीक्षा पास झाले. यावेळीं गडकऱ्यांचें वय एकोणीस वर्षांचें होतें. घरांतील अडीअडचणी त्यांना पूर्णपणें कळत होत्या. शिवाय तत्कालीन बालविवाहाच्या रूढीप्रमाणें त्यांचें मॅट्रिक परीक्षा पास होण्यापूर्वींच लग्न झाल्यामुळें त्यांच्यावर पडलेली जबाबदारीही त्यांना कळत होती. आपण लवकर बी. ए. होऊन मातोश्रींची काळजी दूर करावी असें त्यांना नेहमीं वाटे; पण अभ्यासांत मात्र त्या मानानें त्यांचें लक्ष कमी लागे. मॅट्रिक परीक्षा देण्यापूर्वीं परीक्षेला सोपें पडावें म्हणून त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूलमध्यें नांव घातलें, व परीक्षा पास झाल्यावर त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें आपला

पुढील अभ्यासक्रम चालू केला. फरग्युसनमधें असतांना त्यांनीं मन लावून अभ्यास केला नसला तरी गडकरी हे हुशार आहेत, बुद्धिमान् आहेत व अभ्यास करतील तर स्कॉलर म्हणून पुढें येणें त्यांना अवघड नाहीं अशी ज्याची त्याची खात्री झाली. शिवाय गडकऱ्यांच्या विनोदी स्वभावानें लवकरच ते सर्वांच्या परिचयाचे झाले. विश्वविद्यालयांतील विद्यार्थीदशा ज्याच्या वांट्यास आली नाहीं तो खरोखर एकप्रकारें भाग्यहीनच होय. कॉलेजांतील विद्यार्थी हा खरोखरच भाग्यवान असतो. गडकऱ्यांच्या वांट्याला हें भाग्य फार काल आलें नसलें तरी वर्षाच्या अनुभवावरून गडकऱ्यांना त्याची बरोबर कल्पना आली होती. रामकवींवर कॉलेजांतील अध्यापकवर्गाचें प्रेम होतें. गडकऱ्यांचा हुशारपणा प्रोफेसरांना तेव्हांच दिसून आल्यामुळें हा विद्यार्थी आपल्या कॉलेजचें नांव काढील असें त्यांना वाटे. पण गडकऱ्यांचें चित्त या सालीं पाहिजे तितकें स्थिर नसल्यानें परीक्षेंत नापास होण्याची त्यांच्यावर पाळी आली. या वर्षीं घरगुती अडचणींच्या विलक्षण पेंचामुळें त्यांचें मन वैतागून गेलें होतें. त्या वैतागाच्या भरांत त्यांनीं कॉलेजला रजा देऊन किर्लोस्कर कंपनींत नोकरी धरली. अपुरें शिक्षण न सोडण्याबद्दल प्रो. भाटे, रँ. परांजपे इत्यादिकांनीं त्यांना बरेंच सांगितलें. पण वैतागानें होरपळलेल्या अंतःकरणावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. इतरांनीं कांहीं सांगितलें तरी स्वतांच्या अडचणी अशा असतात कीं चांगलेंही निरुपायानें लाथाडावें लागतें, व उपदेश करणाऱ्यांचा गैरसमज न व्हावा यासाठीं अडचणींचें स्वरूप बोलून दाखवितां येत नाहीं. रामकवींची स्थिति यावेळीं अशीच झाली. डॉ. परांजपे गडकरी कॉलेज सोडणार म्हणून त्यांच्यावर बरेच रागावले असतांही गडकऱ्यांचा निरुपाय झाला. कॉलेजांतील अध्यापकवर्गाबद्दल गडकऱ्यांना अत्यंत आदर वाटे. फर्ग्युसन कॉलेज व न्यू इंग्लिश स्कूल यांबद्दल ते वेळप्रसंगीं अतिशय अभिमानाचे उद्गार काढीत. प्रोफेसर व डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांबद्दलचें त्यांचें प्रेम 'तोड ही माळ' या नाटकांतील एका पात्राच्या स्वगत भाषणांतून जाहीरपणें व्यक्त करण्याचें ठरविलें होतें. गडकऱ्यांनीं, पहिल्यावहिल्या नाटकाला प्रो. गोविंदराव भाटे यांची प्रस्तावना घेऊन एकप्रकारें आदर व पूज्यभाव व्यक्त केलाच आहे.

गडकरी किर्लोस्कर कंपनींत शिक्षक या नात्यानें नोकरीस राहिले. किर्लोस्कर कंपनींत असतांना त्यांना कामाव्यतिरिक्त बराच वेळ मिळे. हा वेळ गडकरी वाचनांत

घालवीत. अभ्यासाव्यतिरिक्त इतर पुस्तकांचें वाचन करण्याची गोडी त्यांना कॉलेजांत आल्यापासून लागली. या मुदतींत त्यांनीं अतिशय वाचन केलें. कोल्हटकरांचीं नाटकें त्यावेळीं किर्लोस्कर कंपनीकडून रंगभूमीवर एकामागून एक येत, व तीं त्यावेळीं अतिशय लोकप्रिय होत. गडकऱ्यांनीं तात्यासाहेबांचीं नाटकें अनेकवार पाहिलीं व वाचनाच्या दृष्टीनें तर तीं सर्व मुखोद्गत केलीं. गडकऱ्यांच्या मनांवर कोल्हटकर यांच्या नाटकाचा विशेष परिणाम झाला, व त्यांची भेट व्हावी अशी गडकऱ्यांना फार इच्छा होती. किर्लोस्कर कंपनींत गेल्यावर म्हणजे पहिल्याच प्रथम बार्शीच्या मुक्कामांत कोल्हटकर व गडकरी यांची भेट झाली. या पहिल्याच भेटींत गडकऱ्यांची बुद्धिमत्ता, त्यांचें वाचन व मार्मिकपणा हे गुण रा. कोल्हटकर यांच्या तेव्हांच लक्षांत आले. त्यावेळीं किर्लोस्कर कंपनींत बोडस, बालगंधर्व , चिंतोबा, जोगळेकर वगैरे मंडळी असत. गडकऱ्यांचे हे सर्व स्नेही आहेत. बोडस व गडकरी यांचा त्यांतल्या त्यांत अधिक स्नेह असे. किर्लोस्कर कंपनींत असतांना शिक्षकाचें काम सांभाळून ते रात्रीं डोअरकिपर, किंवा असिस्टंट मॅनेजरचें काम पहात. केव्हां केव्हां तर अडव्हान्स मॅनेजरचेंही ते काम करीत. कंपनींत असतांना शंकरराव मुजुमदार ह्यांचें रंगभूमि मासिक चालू होतें. या मासिकांत त्यांनीं लहानमोठे कांहीं लेख लिहिले आहेत. 'वेड्यांचा बाजार' हें प्रहसन याच वेळीं त्यांनीं लिहिलें. हें प्रहसन विनोदी पण अपूर्ण असल्यानें पुरें करून एकाद्या अन्य कंपनीला स्टेजवर आणण्यासाठीं देण्याचा त्यांचा विचार होता. कंपनींत असतां दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनीं लिहिलेलें पण रंगभूमीवर न आलेलें ' गर्वनिर्वाण ' नाटक होय. हें नाटक किर्लोस्कर कंपनीनें रंगभूमीवर आणावयाचें ठरविलें होतें, व त्याप्रमाणें तालमीही चालू झाल्या. पण काय असेल तें असो या नाटकाच्या तालमी चालू झाल्या म्हणजे कंपनीवर कोणतें तरी संकट येई, व तालमी बंद पडत. अखेर मॅनेजरनीं या नाटकाचा नाद सोडून दिला. या नाटकांतील विनोदी पात्रें गडकऱ्यांनीं ' एकच प्याल्यां'त आणलीं आहेत. हें नाटक बोडस, गंधर्व वगैरे नटांना फार आवडलें होतें.

किर्लोस्कर कंपनींत गडकरी फार तर चारपांच वर्षेंच राहिले असतील. या नोकरींत त्यांना नानाप्रकारचे अनुभव आले. जगांत अनेक स्वभावाचे लोक असतात. कंपनीसारख्या संस्थेंत राहिल्यानें तर वेळोवेळीं अशा भिन्न विचाराच्या व भिन्न आचरणाच्या लोकांशीं संबंध येतो. घरच्या आपत्तीमुळें गडकऱ्यांनीं

नोकरी धरली. विद्यासंपन्न होऊन नांवलौकिक वाढविण्याची त्यांना इच्छा असतांही एका नाटककंपनीच्या डोअरवर उभे राहावें लागल. पण इतकी गोष्ट सोडून दिली म्हणजे नाटककंपनींत राहिल्यामुळें त्यांचा अतिशय फायदा झाला. प्रत्यक्ष रंगभूमीचें ज्ञान झालें. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्यासारख्या त्यावेळीं गाजलेल्या नाटककारांशीं परिचय झाला. श्री. जोगळेकर बालगंधर्व, बोडस इत्यादि नामांकित नटांशीं स्नेह झाल्यामुळें नाटकाविषयीं वादविवादांत अनेक गुंतागुंतीचे प्रश्न त्यांना सोडवितां आले. गडकरी किर्लोस्कर कंपनींतून कां निघाले हें समजत नाहीं. किर्लोस्कर कंपनींतील नोकरी सोडल्यावर त्यांनीं ज्ञानप्रकाश दैनिकाकडे बातमीदाराचें काम पत्करलें. पुढेंपुढें गडकरी स्फुटेंही लिहीत असत. ज्ञानप्रकाश आफीसमध्यें साधारणपणें वर्ष दीडवर्ष काढल्यानंतर गडकऱ्यांनीं न्यू इंग्लिशस्कूलमध्यें नोकरी पत्करली.

गडकरी जेव्हां मॅट्रीक पास झाले तेव्हां त्यांना युनिव्हर्सिटींतून संस्कृतची स्कॉलरशिप मिळाली होती. गडकऱ्यांचे संस्कृत व गणित हे दोन विषय फार उत्तम असत. न्यू इंग्लिशस्कूलमध्यें त्यांच्याकडे ४ थी चा वर्ग जरी दिला असला तरी प्रसंगविशेषीं ते सातव्या इयत्तेलाही वरील विषय शिकवावयास जात. गडकऱ्यांच्या ह्या वेळच्या आठवणी फार गमतीदार असून त्या ऐकतांना हसूं आल्याखेरीज रहात नाहीं. गडकऱ्यांची यावेळीं सांपत्तिक स्थिति फारच खालावली होती. किर्लोस्कर थेटरच्या माडीवर पूर्वी एक नाटयमंदिर असे. या नाट्यमंदिरांत गडकरी रहात. खालच्या हाटेलांतून पाव, भाजी किंवा दिडक्या दोन दिडक्यांचे चणे आणून त्यावर रोजचा दिवस गडकऱ्यांना भागवावा लागे. अशा अत्यंत प्रतिकूल स्थितींतही गडकऱ्यांचें लेखनवाचन चालू होतें. यावेळीं त्यांनीं ‘ प्रेमसंन्यास ’ नाटक लिहावयास आरंभ केला होता. या नाटकाचा एक दीड अंक लिहिल्यावर गडकऱ्यांनीं तें नाटक महाराष्ट्र नाटकमंडळीचे त्यावेळचे मालक ‘ राजाचें बंड ’ नाटककर्ते रा. त्र्यंबक सिताराम कारखानीस यांना वाचून दाखविलें. रा. कारखानीस यांना नाटक आवडल्यामुळें लवकर पुरें करण्याबद्दल गडकऱ्यांना सूचना दिली. नाटक संपूर्ण होतांच तें महाराष्ट्र नाटकमंडळीनें रंगभूमीवर आणण्याकरितां तालमी सुरू केल्या. हें नाटक प्रसिद्ध नट कै. भागवत यांना फारच आवडलें होतें, व त्यांच्याच आग्रहावरून हें नाटक महाराष्ट्र नाटकमंडळीच्या मालकांना आणावें लागलें असें म्हणतात. पण दुर्दैवानें ‘ प्रेम-

संन्यास ' रंगभूमीवर येण्यापूर्वीच भागवत यांनीं आत्महत्त्या करून घेतली. के. भागवत यांच्या अकस्मित निधनामुळें प्रेमसंन्यास हें नाटक जितकें तयारीनें यावयास पाहिजे होतें तितकें न आल्यामुळें गडकऱ्यांची निराशा झाली. पण नाटककार रा. कृ. प्र. खाडिलकर यांनीं गडकऱ्यांना बराच धीर देऊन त्यांचें सात्वन केलें. रा. खाडिलकर यांनीं स्वतां तालमी घेऊन नाटकास रंगभूमीच्या दृष्टीनें अधिक पद्धतशीरपणा आणला. हें नाटक रंगभूमीवर येण्यापूर्वींच रा. गडकरी यांनीं न्यूइंग्लिशस्कूलमधील नोकरी सोडली. नोकरी न सोडण्याबद्दल त्यावेळचे सुपरिटेन्डन्ट प्रो. राजवाडे यांनीं गडकऱ्यांना बरेंच सांगून पाहिलें पण त्याचा उपयोग झाला नाहीं. ' प्रेमसंन्यास ' नाटकाबद्दल गडकऱ्यांना पांचशेंपासून सातशें रुपयेपर्यंत मोबदला मिळाला असें ऐकतों.

न्यू इंग्लिश स्कूलमधील शिक्षकाच्या नोकरीनंतर गडकऱ्यांनीं पुन्हां कोठेंच नोकरी केली नाहीं. लेखनव्यवसायावरच त्यांची उपजीविका चाले. घरच्या प्रतिकूल परिस्थितीमुळें लहानपणापासून गडकऱ्यांना कोणता ना कोणता तरी धंदा करावा लागे. नवसारी व कर्जत येथें असतांना दूध, भाजीपाला, लाकडें वगैरे किरकोळ धंदे गडकऱ्यांना करावे लागले. पुण्यास आल्यावर मुंढवा येथील गिरणींतील फिटरची नोकरीही गडकऱ्यांनीं कांहीं दिवस केली. पण त्यांच्याकडून फिटरसारखें अंगमेहनतीचें काम होईना म्हणून थोड्याच दिवसांत या नोकरीस त्यांनीं रामराम ठोकला.

किर्लोस्कर कंपनींत असतांना त्यांच्या वाचनांत अनेकविध ग्रंथांचा समावेश असे. ' मार्कट्वेन ' या अमेरिकन विनोदी लेखकानें तर त्यांना वेडच लाविलें होतें. केव्हांही पहा त्यांच्या हातांत मार्कट्वेनचें पुस्तक असावयाचें. याच वेळीं तात्यासाहेब कोल्हटकर यांचे लेख विवधज्ञान विस्तारांतून प्रसिद्ध होत. त्या लेखांचाही गडकरी यांच्यावर बराच परिणाम होई. कोल्हटकर यांचेहि लेख समाजसुधारणाविषयक असत. रा. गडकरी यांना लहानपणापासून कविता लिहिण्याचा जरी छंद होता तरी त्यांची पहिली कविता १९०९ मध्यें मासिक मनोरंजनांत प्रसिद्ध झाली. ' अल्लड प्रेमास ' हीच त्यांची मनोरंजनांतील पहिली कविता. त्यानंतर १९११ पासून त्यांच्या कविता प्रामुख्यानें प्रसिद्ध होऊं लागल्या. ' मनोरंजन ' मासिकाकडून यांना दरमहा कांहीं रक्कम मिळत असे.

नोकरी सुटल्यानंतर यांचा चरितार्थ कसा भागत असे हें कांहीं समजत नाहीं.

कारण ' प्रेमसंन्यास ' या नाटकापासून झालेली किफायत किती दिवस पुरणार? त्यांचें दुसरें नाटक सन १९१६ सालीं किर्लोस्कर कंपनीकडून मुंबईस रंगभूमीवर आलें. ' पुण्यप्रभाव ' या नाटकाच्या बाबतींतही प्रेमसंन्यास या नाटकासारखाच खेळ झाला. त्याच्या तालमी नीट न बसल्याकारणानें त्याचा पहिला प्रयोग व्हावा तितका चांगला झाला नाहीं. पण पुढें पुढें हें नाटक इतकें रंगत गेलें कीं, या नाटकाची लोकप्रियता फारच वाढली. गडकऱ्यांचें हें नाटक फारच उत्कृष्ट आहे. सध्यां या नाटकाचे खेळ बऱ्याच कंपन्या करीत असल्या तरी ललितकलादर्श नाटक मंडळीचा खेळ सर्वांत अधिक पहाण्यासारखा होतो. गडकऱ्यांच्या अंतःकरणांत अनेक नाटकांचे प्लॉट्स् खेळत असत. गंधर्व नाटक मंडळीकरितां त्यांनीं एकच प्याला हें नाटक लिहून दिलें. हें नाटक व या नाटकानंतरचें ' भावबंधन ' हें नाटक हीं दोन्हीं नाटकें किती लोकप्रिय आहेत याचें वर्णन करून सांगण्याचें कारण नाहीं. ' एकच प्याला ' या नाटकापासून गडकऱ्यांना अदमासें पांच हजार रुपयांची किफायत झाली.

किर्लोस्कर कंपनी वऱ्हाडांत असतांना कंपनींतील त्या वेळचे नट दिनानाथ, कोल्हटकर, भडकमकर व कोल्हापुरे यांनीं फुटून दुसरी कंपनी काढली. या कंपनीची भिस्त गडकऱ्यांच्या नाटकावर होती. गडकऱ्यांचें नाटक मिळालें तर आपल्या कंपनीला, ती नवीन असली तरी कशाचीच वाण पडणार नाहीं असें कंपनीच्या मालकांना वाटे. गडकऱ्यांनीं या कंपनीकरितां ' भावबंधन ' हें नाटक लिहावयास घेतलें. पण मध्यंतरीं कांहीं कारणानें बिनसल्यामुळें हें नाटक बलवंतास न देण्याचें गडकऱ्यांनीं ठरविलें होतें. पण रा. गुर्जर वगैरे स्नेह्यांच्या आग्रहानें व मध्यस्थीनें अखेर तें बलवंताकडून रंगभूमीवर येण्याचा सुयोग आला. या नाटकाचें पहिलें नांव ' चित्रनिधान ' असें होतें. पण पुढें तें बदलून भावबंधन ठेवण्यांत आलें. ह्या नाटकाची कल्पना तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या ' सहचारिणी ' या नाटकाचें वाचन चाललें असतां रा. गडकऱ्यांना सुचली असें रा. वि. सि. गुर्जर यांनीं गडकऱ्यांवरील मृत्युलेखांत म्हटलें आहे. त्या नाटकापासून गडकऱ्यांना आठपासून नऊ हजार रुपयांची किफायत झाली असावी.

' एकच प्याला ' नाटक पुरें करून दिल्यानंतर गडकरी हे ' भावबंधना' च्या मागें लागले. ' राजसंन्यास ' नाटकाचे कांहीं प्रवेश अर्धवट होऊन पडले होते.

गडकरी हे भावबंधन लिहिण्यासाठीं बोरवली येथें असतां त्यांना मलेरियाचा विकार जडला, व याच आजारानें दिवसेंदिवस प्रकृति खालावत जाऊन शेवटीं सन १९१९ च्या जानेवारी महिन्यांत 'सावनूर' येथें वडील भावाच्या घरीं त्यांचा अंत झाला. गडकऱ्यांच्या मृत्यूनें सर्व महाराष्ट्रास वाईट वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. गडकऱ्यांचा स्वभाव स्वतःच्या शरीरप्रकृतीकडे लक्ष देण्याइतका कलदार असता तर ते याहून अधिक काल खात्रीनें जगते. पण 'हट्ट' करण्याची उपजतच खोड लागल्यामुळें अनेक वेळीं व अनेक प्रसंगीं याच स्वभावानें त्यांना संकटांत आणलें. चार दिडक्या मिळूं लागतां व मनाप्रमाणें लेखनस्वातंत्र्य मिळतांच हा हट्टीपणा पूर्वींपेक्षां अधिक जोरावला असल्यास आश्चर्य नव्हे.

गडकरी हे अतिशय लहरी असत. मनाचा चंचलपणा ही त्यांची नेहमींचीच वृत्ति होऊन बसली होती. एकाद्यावर रागवावयास त्यांना मोठेंसें कारण लागत नसे व राग केव्हां नाहींसा होईल हें नक्की सांगतां यावयाचें नाहीं. गडकरी यांची स्थिति शेवटीं शेवटीं बरीच सुधारली होती व ते याहून जगते तर त्यांच्या संकल्पाप्रमाणें त्यांनीं एक लाख रुपये मिळवूनही दाखविले असते. मृत्यूपूर्वी त्यांनीं दोनतीन वर्षें अगोदर पहिली पत्नि हयात असतांही दुसरें लग्न केलें. याच वेळीं त्यांचे धाकटे बंधु शंकरराव कॉलेजमध्यें शिकत होते. हल्लीं ते हायकोर्ट वकील झाले आहेत.

गडकऱ्यांनीं सर्व महाराष्ट्राला आपल्या काव्यांनीं व नाटकांनीं वेड लावलें, व ते जर अधिक जगते तर त्यांच्याकडून महाराष्ट्रशारदेची अपूर्व अशी सेवा घडली असती. ते शाकुंतलनाटकांवर विस्तृत टीका लिहिणार होते. क्रिकेट खेळावर एक लेखही लिहिण्याचा त्यांचा विचार होता. 'रघुवंश'च्या धर्तीवर 'शिववंश' या नांवाचें महाकाव्य लिहिणार असल्याचें त्यांनीं अनेकांशीं बोलून दाखविलें आहे. पांच कादंबऱ्याही लिहिण्याचा त्यांनी संकल्प सोडला होता. त्यापैकीं पहिली 'झेलम' ही कादंबरी त्यांनीं लिहावयास सुरवात केली होती. पण अनेक व्यवसायांमुळें व शेवटच्या दुखण्यामुळें त्यांच्याकडून ती अपुरी राहिली व ठरविलेल्या अठरा नाटकांपैकीं फक्त चारच नाटकें बाहेर पडलीं आहेत.

गडकऱ्यांनीं केलेल्या वाङ्मयसेवेबद्दल दोन शब्द लिहिल्याखेरीज त्यांचें चरित्र पुरेंच होत नाहीं. गडकऱ्यांच्या कामगिरीचे तीन भाग पडतात. एक विनोदी लेखक म्हणून, कवि म्हणून व नाटककार म्हणून. पैकीं त्यांच्या नाटकासंबंधीं

बोलतांनाच त्यांच्या विनोदी लेखांचा विचार होतो. म्हणून मुख्य भेद दोन. कवि म्हणून त्यांची योग्यता आज सर्वांनींच मान्य केली आहे. इतर कवींच्या मानानें गडकऱ्यांनीं लिहिलेली कविता कमी भरेल व त्यांतून त्यांची नामांकित अशी काव्यें पाचपंचवीसांपेक्षां आधिक भरणार नाहींत. पण सरस काव्यांची ही संख्या जरी अल्प असली तरी ती इतकी श्रेष्ठ दर्जाची आहेत कीं रोज एक कविता लिहून व लहान मोठ्या महाराष्ट्रांतील सर्व मासिकांतून प्रसिद्ध करणाऱ्या कविच्या संभारांतही त्यांच्या तोडीची काव्यें आढळणें कठिणच. गडकरी स्वतःला केशवसुतांचा चेले' म्हणवीत. केशवसुतांची काव्यें वाचून काव्याची स्फूर्ति झाली असें उद्गार त्यांच्या तोंडून कोणीच ऐकल्याचें प्रसिद्ध नाहीं. गडकऱ्यांना कविता करण्याचा नाद लहानपणींच लागला होता. कर्जत येथें असतां त्यांनी बरींच काव्यें केलीं होतीं. कविता करण्याचा छंद त्यांना जडला तेव्हां त्यांनीं केशवसुतांचें नांवहि ऐकलें नसेल. पुढें कॉलेजांत असतांना व कॉलेज सोडल्यावर किर्लोस्कर कंपनींतील नोकरीच्या फुरसतींत त्यांना वाचनाची गोडी लागली त्यावेळीं केशवसुतांची कविता त्यांच्या वाचनांत आली. केशवसुत ज्या सालीं वारले त्या सालीं गडकरी विश्वविद्यालयांत शिरले. शिवाय आजच्याप्रमाणें त्या वेळीं काव्याची अभिरुची जनतेंत उत्पन्न झाली नव्हती. केशवसुतांस आज आधुनिक कविकुलगुरूचा मान मिळत असला तरी केशवसुत हे कोण व त्यांनी कोणतीं काव्यें लिहिलीं हें फारसें लोकांना ठाऊकही नव्हतें. हें खुद्द गडकऱ्यांनीं केशवसुतावर लिहिलेल्या कवितेखालीं दिलेल्या टीपेवरून सिद्ध होण्यासारखे आहे. केशवसुतांच्या काव्यांचें वाचन चालू असतां गडकऱ्यांना त्यांची योग्यता पटली; त्यांच्या काव्याबद्दल गडकऱ्यांच्या अंतःकरणांत कमालीचा आदर उत्पन्न झाला, व आपण नांव सांगावे तर यांचेंच अशा इर्षेनें त्यांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें. यापेक्षां गुरुशिष्यपणाचा आधिक संबंध येत नाहीं. केशवसुतांनीं जे लिहिलें तें गडकऱ्यांना पटलें पण त्यांचें अनुकरण त्यांनीं केलें नाहीं म्हणा किंवा दोघांच्याही मनोवृत्तींत जमिनअस्मानाचे अंतर म्हणून म्हणा गडकऱ्यांची कविता केशवसुतांपेक्षां भिन्न स्वरूपाची व भिन्न वळणाची आहे.

नाहीं म्हणायला केशवसुतांच्या ‘ तुतारी ’ या काव्याच्या धर्तीवर गडकऱ्यांनीं दसरा व तत्सम काव्यें लिहिलेलीं दिसतात. पण तुतारीचें अनुकरण करणें इतके सोपें आहे कीं चार वर्षांच्या पोरानेंही उसनी ऐट आणून असला

दिमाख दाखवावा. भाषेच्या बाबतींत मात्र स्वतंत्र वळण दिसून येतें. काव्यांच्या बाबतींत त्यांनीं कोणाचेंच अनुकरण केलें नाहीं. त्यांनीं आपली नवीन पद्धत काढली. या पद्धतींत जसें नाविन्य तसाच चटकदारपणा आहे. गडकऱ्यांचें लक्ष पुढेंपुढें कवितेवरून उडाल्या कारणानें या पद्धतीचा विकास खुंटला. जुन्या शब्दांची निवड करून त्यांनीं आपले भाषेंत चटकदारपणा आणून वाचकांचें लक्ष वेधलें. गडकऱ्यांच्या काव्यांत त्यांचीं प्रेमगीतेंच उत्कृष्ट आहेत याबद्दल दुमत होणार नाहीं. 'कृष्णाकांठीं कुंडल' हें खंडकाव्य जर पुरें होतें तर एका चांगल्या काव्याची मराठींत भर पडली असती. गडकरी हे 'शिववंश' या नांवाचें महाकाव्य लिहिणार होतें असें म्हणतात. गडकऱ्यांच्या कवितेचें अनुकरण करण्याचा अनेकांनीं प्रयत्न केला असला तरी तो कोणालाच साधला नाहीं. याचें कारणही उघडच आहे. नुसती भाषा म्हणजे कविता नव्हे. गडकऱ्यांच्या पद्धतीची भाषा लिहीणें आभ्यासानें कोणासही साध्य होण्यासारखें आहे.

याचा अर्थ गडकऱ्यांनी मराठींतून जुने शब्द काढून त्यांचा आपल्या लेखनांत उपयोग केला. तसे शब्द दुसऱ्या कोणासही शोधून काढतां येतील; जुने ऐतिहासिक कागद जोपर्यंत प्रकाशित आहेत तोपर्यंत शब्द वेचून काढावयास काय श्रम पडतील तितकेंच. पण जुन्या शब्दाचा उपयोग कसा करावा याचे योग्य ज्ञान गडकऱ्यांच्या रासिकतेला जितकें होतें तितकें त्यांचें अनुकरण करणाऱ्यांच्या अंगांत मुळींच नाहीं असें स्पष्ट म्हणावें लागतें. काव्यांतच काय पण गद्यांतही सफाईदार भाषेला फार महत्व आहे. शब्दकोश करावा अशी ज्याची योग्यता त्याची भाषा पहावी तर खाचखळग्यांच्या मार्गाप्रमाणें वाचावयास अवघड असतें; याचे कारण योग्य ठिकाणीं योग्य शब्द घालण्याच्या कलेचा त्यांच्यांत पूर्णपणें अभाव असतो. गडकऱ्यांनीं जें गद्य लिहीलें त्यांतही त्यांनीं नाविन्य दाखविलें. प्रत्येक शब्दापाठीमागें विशेषण घालून व अनुप्रास आणून त्यांनीं आपल्या लिखाणांत विलक्षण गोडी व नाद उत्पन्न केला. काव्यापेक्षां गद्याचें अनुकरण गडकऱ्यांच्या प्रश्चांत् इतकें झालें कीं त्यावेळीं बहुतेक नवीन लेखकांचे लेख गडकऱ्यांच्या भाषा पद्धतीनें लिहीलेले असत. पुढें पुढें या गोष्टीची तर इतकी वाचकांना शिसारी येऊं लागली कीं गडकऱ्यांप्रमाणें लिहीलेली भाषा म्हणजे उपहासाचा विषयच होऊन बसला. गडकऱ्यांच्या भाषापद्धतीचें सर्वांत नादान उदाहरण म्हणजे 'गडकरी चेला'

या नांवाच्या कोल्हापुरच्या कोण्या एका लेखकाचें रंगभूमीवर न आलेलें पण पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेलें नाटक होय. रा. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्यावर प्रथम प्रथम गडकऱ्यांच्या भाषापद्धतीचा परिणाम झाला होता हें त्यांच्या 'आधुनिक कविपंचक' या पुस्तकावरून उघड होतें. पण आनंदाची गोष्ट ही रा. माडखोलकर यांनीं आपली भाषापद्धती इतकी सुधारली कीं त्यांच्या सारखे भारदास्त लिखाण रा. न. चिं. केळकर आणि रा. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या खेरीज दुसऱ्या कोणालाच लिहितां येत नाहीं. 'लग्नमंडप' या नुकत्याच रंगभूमिवर आलेल्या नाटकाचे लेखक रा. वि. ल. बर्वे ( कवि-आनंद ) किंवा रा. शुक्ल यांनींही गडकऱ्यांच्या भाषेचें बरेंच अनुकरण केलें आहे. असें वाटतें कीं हे दोन्ही लेखक भाषेंत सुधारणा करतील. गडकऱ्यांच्या भाषापद्धतीचें अनुकरण करणाऱ्यांना गडकऱ्यांप्रमाणें अनुप्रासांची व विशेषणांची रेलचेल करतां येते, पण गडकऱ्यांच्या भाषेंत जें ओज आहे तें त्यांच्या अनुयायांमधें नाहीं; आणि याच कारणासाठीं त्यांच्या भाषा पद्धतीची टवाळी होते. गडकऱ्यांचे अनुकरण कोणी करूं नये असें नाहीं. करावें, खुशाल करावें; पण त्यांतही नाविन्य पाहिजे; अनुकरण करणाऱ्यांच्या स्वतंत्र बुद्धीची झाक त्यांत उठून दिसली तरच तें अनुकरण कौतुकास्पद म्हणता येईल. गडकऱ्यापेक्षां सवाई गडकरी निर्माण होण्यांत राम गणेश यांचाच उत्कर्ष आहे. खुद्द गडकऱ्यांनीं आपल्या गुरूवर ताण केली यांत त्यांच्या गुरूचा काय अपमान झाला कीं त्यांची योग्यता, त्यांची लोकप्रियता आणि त्यांची वाङ्मय तपस्या कवडी मोल ठरली !

गडकऱ्यांची खरी कामगिरी म्हणजे त्यांनीं लिहिलेलीं नाटकें. गडकऱ्यांच्या नाटकांनीं महाराष्ट्रीय रसिकांस वेड लावलें. भावबंधन आणि एकच पेला या नाटकांचें जनतेनें केलेलें कौतुक पहावयास गडकरी हयात असते तर आपल्या गुणांचें चीज होत आहे व आपल्या कारागिरीची योग्यता महाराष्ट्राला पटली असें पाहून त्यांची नाट्यलेखनाची इर्षा द्विगुणित झाली असती. गडकऱ्यांच्या पूर्वी अनेक नाटककार लोकप्रिय झाले होते. पण या लोकप्रिय नाटककारांच्या नाटकांहून गडकऱ्यांच्या नाटकांत जी स्वतंत्र बुद्धि दिसून येते ती आढळत नाहीं. खरें पाहूं जातां गडकऱ्यांच्या नाट्यकलेची चतुरता 'भावबंधन' या नाटकांत जितकी आढळतें तितकी दुसऱ्या नाटकांत नाहीं. जनतेंत हरघडी

दिसून येणाऱ्या भिन्न प्रकृतींच्या व भिन्न आचरणांच्या लोकांचें चित्र नाटकांत बरोबर रंगविणें हा नाट्यकलेचा बालेकिल्ला आहे. ऐतिहासिक कथाभाग घेऊन अगर रंगूगंगूचा तमाशा उभारून मानापमानाचे धिंडवडे रंगभूमीवर दाखविण्यांत विशेष चातुर्य लागतें असें नाहीं. लोकांना ज्याची कल्पनाच नसतें असें एकादें काल्पनिक राज्य, त्यांतील राजा व त्यांतील प्रजा कल्पून स्वातंत्र्याकरतां रावणशाही गाजविली कीं, नाटककाराचा लौकिक अचूक लाभतो. निदान गडकरी वगैरे अव्वल दर्जाच्या नाटककाराखेरीज इतरांचीं नांवें अशाच नाटककारांच्या यादींत जातात. ज्याची कल्पना नसते व कल्पना करूं म्हटले तरीही ज्याची कल्पना होत नाहीं त्या गोष्टी काल्पित तऱ्हेनें रंगविल्यास प्रेक्षकांना त्या सहज आवडतात. अशा कथानकांतून भावनेचा अभाव असला तरी लोकांची करमणूक होते. पण गडकऱ्यांनीं भावबंधन व एकच पेला हीं नाटकें लिहून जनतेंत दिसून येणारी भिन्न स्वभावाची व प्रकृतीची पात्रें रंगभूमीवर निर्मून महाराष्ट्र नाट्यकलेला अभिनव दिशा दाखविली. गडकऱ्यांच्या नाट्यचातुर्याचा हाच विशेष होय. गडकरी अकालीं मरण पावले हें खरोखरच महाराष्ट्राचें दुर्दैव होय! ते अधिक जगते तर शेक्सपीअर, कालिदास वगैरे जगविख्यात नाटककारांच्या मालिकेंत ते गणिले जाते असें मला तरी खात्रीपूर्वक वाटते. असो हें त्रोटक चरित्र आहे किंवा हें चरित्रच नव्हें असें म्हटलें तरी चालेल. ही केवळ रूपरेखा आहे. याच्यापुढें छापलेल्या आठवणी व इतर अप्रसिद्ध हकीगती यांच्या आधारें कोणाकडून तरी मोठें चरित्र केव्हां लिहिलें जाईल तें जावो.

**गोपाळ गोविंद अधिकारी.**

# गडकऱ्यांच्या आठवणी

## रा. रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. यांजकडून

( १ )

**गडकऱ्यांबरोबर एक रात्र**

वस्तुतां आठवणी देण्याइतकी कै. गडकरी यांची माझी ओळख नाहीं. त्यांच्या सहवासांत एक रात्र काढण्याचा योग मला लाभला होता. ही रात्र इतकी मजेंत गेली कीं कै. गडकरी यांचें नांव निघालें म्हणजे त्या रात्रींचे मला अजूनही स्मरण होतें. गडकरी यांच्याशीं गप्पा मारण्यांत एक निराळ्या प्रकारचा आनंद मिळत असे. बैठकींत ते बहुधा दुसऱ्यांना बोलण्याची संधि देण्याऐवजीं स्वतांच खूप बोलत पण सांगण्यासारखी गोष्ट ही कीं ते कितीही जरी बोलत बसले तरी त्यांचा कंटाळा येत नसे. अनेक कोट्या करून ते दुसऱ्यांना मनमुराद हंसवीत.

( २ )

**सकाळचा अभ्यास**

पूर्वी पुण्यामधें ज्यावेळीं मी नूतनमराठींमधें शिक्षक होतों त्यावेळीं एक सालीं शाळेचें संमेलन होते व त्या संमेलनाची मजकडे व्यवस्था होती. संमेलनास आठदहा दिवस अवधी होता. इतक्यांत मुलांकडून एकादा नाटकाचा प्रयोग करून घ्यावा अशी सूचना आली. पण उरलेल्या दिवसांत चारपांच अंकी नाटक बसावयाचें म्हटलें तरी शक्य नव्हतें. याच वेळीं रस्त्यावर कै. गडकरी यांची आणि माझी गांठ पडली. तेव्हां कै. गडकरी यांचा माझा विशेषसा परिचय नव्हता. ते नाट्यकलेचे व्यासंगी आहेत हें मला ठाऊक होतें त्यामुळें मी त्यांना मुलांना लवकर बसवितां येईल असें लहानसें प्रहसन आहे काय असें विचारलें; माझा प्रश्न ऐकतांच गडकरी एकदम म्हणाले, " आहे देतों मी तुम्हाला " तेव्हां मी म्हणालों कुठें आहे व त्याचें नांव काय ? " " माझ्या डोक्यांत आहे, उद्यां सकाळीं मी तुम्हाला देईन " असें गडकऱ्यांचें उत्तर ऐकून मला जरा आश्चर्य वाटलें व त्यांना आणून देण्याबद्दल पुन्हां आग्रहाची विनंती केली. ठरल्याप्रमाणें गडकऱ्यांनीं दुसरे दिवशीं ' सकाळचा

अभ्यास ' हें विनोदी प्रहसन मला आणून दिलें. ते पाहून मला त्यांच्या बुद्धि-मत्तेचें कौतुक वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. हें प्रहसन मी लवकरच निघणाऱ्या आनंदाचे अंकांत प्रसिद्ध केलें. संमेलनांत मुलांनीं प्रहसन उत्तम बसविलें व तें सर्वांना आवडलें हें मुद्दाम सांगण्याचें कारणच नाहीं.

## श्री. नरहर गणेश कमतनूरकर यांजकडून—

( १ )

### माझी ओळख

शाळेंत कोणताही नवीन शिक्षक गेला म्हणजे वर्गातील मुलांची साधारणतः त्या शिक्षकाला अजमावून पहाण्याची पद्धत असते. पहिले कांहीं दिवस तरी नवीन शिक्षक म्हणजे वर्गातील मुलांच्या कुतूहलाचें केंद्र होऊन बसतो आणि या अल्पावधींत नवीन शिक्षकासंबंधीं बारिकसारिक माहिती प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें जमविण्याची विद्यार्थीवर्गाकडून जारीनें खटपट सुरू असते. निरनिराळ्या तऱ्हेच्या लहानसहान खोड्या, विचारलेल्या प्रश्नांस विक्षिप्तपणाचीं उत्तरें आणि सार्वत्रिक गोंगाट इत्यादि पित्तक्षोभक मात्रांचे वळसेही बिचाऱ्या शिक्षकाला छात्रवर्गाकडून चाटवण्यांत येतच असतात. त्यांतूनहि शिक्षक थोडासा भोळसर आणि बराचसा बावळट असला तर हे उपचार जास्त कालपर्यंतही टिकतात ! पण शिक्षकहि तोडीस तोड, आणि असल्या उपर्यांना बिलकुल न जुमानणारा असा आढळून आला तर मात्र सर्व कारभार सुरळीत चालू होऊन अध्यापनाच्या कामांत कोणत्याहि अडचणी उपस्थित होत नाहींत हें शिक्षकाचा धंदा करणाऱ्या सर्व लोकांना अवगत असेलच. गडकरी मास्तर जेव्हां पहिल्यानें वर्गात संस्कृत शिकविण्याकरितां आले तेव्हां विद्यार्थ्यांच्या पूर्वपरंपरेला अनुसरूनच सर्व गोष्टी होण्यास सुरवात झाली. प्रारंभींचा गोंगाट थोडासा शांत झाल्यावर मास्तरांनीं " किती धडे झाले आहेत तुमचे संस्कृत पुस्तकांतले ? " असा सवाल वर्गाच्या सेक्रेटरीला केला. त्याबरोबर एक समयावच्छेदेंकरून, परंतु अगदीं निरानिराळीं अशीं दहावीस कोलाहलपूर्ण उत्तरें त्यांना मिळालीं. अर्थातच त्यांना या उत्तरांपासून कांहींच बोध होणें संभवनीय नव्हतें. त्यांनीं पुन्हां तोच प्रश्न केल्यावर " सर दहा धडे झाले आहेत फक्त. " असें कांहीं जणांनीं सांगतांच वर्गातील दुसऱ्या एका मुलानें चेहरा गंभीर करून " सर पंधरा धडे झाले आहेत; सोळाव्यापासून

सुरवात करायची आहे " असें सांगितलें. इतक्यांत पुन्हां एकदां " नाहीं सर, नाहीं सर " अशी जोराची ओरड झाली. थोडीशी शांतता होतांच कोपऱ्यांत बसलेल्यां एका विद्यार्थ्यानें जागेवर बसूनच, मुद्दाम अस्ताव्यस्त परंतु पाय पसरून, डोळ्यावर टोपी ओढून व एक हात वर करून उत्तर दिलें " सर, फक्त दहा धडे झाले आहेत, तुम्ही आपले अकराव्या धड्यापासून सुरू करा; यांचें कांहीं ऐकूं नका."

हें ऐकून मास्तर एकदम त्या विद्यार्थ्याजवळ गेले आणि आपल्या खिशांतील नोटबूक काढून अत्यंत लीनतेचा आविर्भाव आणून म्हणाले " काय आज्ञा आहे आपली ? कृपा करून आपलें नांव आणि पत्ता आपण मला द्याल तर सांगाल त्या वेळीं बंगल्यावर येऊन आपल्याला भेटेन आणि मग या झालेल्या अभ्याससंबंधीं उहापोह करून आपण ठरवाल त्याप्रमाणें योजना निश्चित करून धडे घेण्यास सुरवात करीन. यांत आपल्याला मात्र थोडी तसदी पडणार आहे ! " हा एकंदर प्रकार पाहून वर्गांतील सर्वच मुलें थक्क झालीं. आणि नवीन शिक्षकासंबंधीं आपण बांधलेली कल्पना अगदींच खोटी ठरली हें पाहून दुसऱ्याच दिवसापासून वर्गाचें काम व्यवस्थित चालू झालें. हा विद्यार्थी म्हणजे अर्थातच प्रस्तुतचा लेखक होय.

( २ )

## उसनवारीचा आरोप

एकदां त्यांच्याकडे मधून मधून फेरी घालणाऱ्या एका गृहस्थानें " गडकरी, आपल्याला कविता ' कलापी ' नांवाच्या गुजराथी कवीच्या कवितांवरून लिहितात " अशी कंडी उठविली आणि याला प्रमाण म्हणून मास्तरांच्या घरीं कलापीचें पुस्तक आपण डोळ्यांनीं पाहिल्याचें सांगितलें. ही गोष्ट मास्तरांना समजली तेव्हां ते फारच संतापले व म्हणाले "काय गाढव आणि पाजी मनुष्य आहे हा ! उद्यां जर एखाद्या तिऱ्हाईतानें या मनुष्यासंबंधीं अशी कंडी उठविली कीं हा मनुष्य त्याच्या येथें कामाला असलेल्या एका गड्याचा मुलगा आहे, आणि याला प्रमाण विचारतांच, त्या तिऱ्हाइतानें जर त्या गृहस्थाच्या घरीं मी तो गडी डोळ्यांनीं पाहिला असें सांगितलें तर या गाढवाला काय वाटेल ? " स्वतःचें अपार वाग्वैभव असतां जर एकाद्यानें उसनवारीचा नाहक आरोप केला तर कोणता मनुष्य संतापणार नाहीं ?

( ३ )

### खडा गडकरी

एकदां गडकरी मास्तर, श्री. तात्यासाहेब कोल्हटकर व श्री. गुर्जर हे मुंबईत असतां तात्यासाहेबांच्या ओळखीच्या एका गृहस्थाकडे तात्यासाहेबांना जावयाचें होतें. मुंबईत बाहेर पडल्यानंतर बहुतेक हें तिघेही एकत्र असावयाचेंच व त्याप्रमाणें याही प्रसंगीं होते. तात्यासाहेबांना ज्या गृहस्थाकडे जावयाचें होतें त्या गृहस्थांचें घर येण्याचें आधीं निरनिराळया लोकांना भेटतां भेटतां गडकरी मास्तर मुंबईच्या जिन्यांची चढउतार करून अगदीं जेरीला आले होते. त्या गृहस्थांचे घर येतांच मास्तर म्हणाले " तात्या तुम्हीच एकटे वर जाऊन या; मी आणि गुर्जर बाहेर रस्त्यावरच उभे राहतो. पण अगदीं लवकर परत या नाहींतर आम्हीं बाहेर उभे आहोंत हें विसराल. " बराच वेळ झाल्यानंतर तात्यासाहेब खालीं आलें तोंपर्यंत मास्तर उभें राहून अगदीं कंटाळून गेले होते. तात्यासाहेबांना पाहतांच ते म्हणाले " काय तात्या हें ! किती वेळ झाला बरें ? मी इथें रस्त्यांत इतका वेळ उभा राहिलों आहे कीं आणि आणखी कांहीं वेळ जास्त उभा राहिलों असतों तर तुम्ही ज्या गृहस्थांना आंत भेटायला गेला होतात त्यांचा नवा पत्ता " खडा गडकऱ्याजवळ " असा झाला असता.

( ४ )

### चिपळूणकर नांवाचा एक विद्यार्थी

एक वर्षी मॅट्रिकचा निकाल झाल्यावर आम्ही मास्तरांच्या घरीं जमलों होतों. बहुतेक जण नापासच झालों असल्यामुळें त्या ठिकाणीं एक लहानशी " नापास परिषद " च भरली होती असें म्हणावयास हरकत नाहीं. कांहीं उमेदवार " यंदा पेपर्सच फार हार्ड होते " " इंग्रजीचें पेपर्स मुद्दामच हार्ड तपासलें " इत्यादि ठराव मांडीत होतें; तर कांहीं तात्कालिक वैराग्याच्या भरांत Examination is no real test–" असल्या तऱ्हेचीं निवडक वाक्यें प्रमाणभूत धरून " आपल्या युनिव्हर्सिट्या व त्यांच्या परीक्षांचा फोलपणा " असल्या वर्तमानपत्री विषयावर गंभीरपणानें " तत्त्वज्ञानाचें खडें बोल " बोलून राहिले होतें. त्या सर्वांना मास्तरांनीं अध्यक्षांच्या अधिकारवाणीनें सांगितलें. "बेजबाबदार लोक कुठले. पेपर्स हार्ड नव्हतें किंवा मुद्दाम हार्डही तपासलें नाहींत. तुम्हीं नापास झालांत याचें कारण एकच आणि तें म्हणजे तुम्हीं मन लावून

कळकळीनें अभ्यास केला नाहीं हेंच. आत्तां जा आणि दुकानांतून पुढच्या वर्षाचीं टेक्स्टबुकें विकत आणा आणि आज रात्रींपासूनच अभ्यासाला सुरुवात करा म्हणजे असले माथेफिरू विचार पुन्हां डोक्यांत येणार नाहींत." असल्याच एका प्रसंगीं मास्तरांनीं चिपळूणकर नांवाच्या एका विद्यार्थ्याची चौकशी केली. या विद्यार्थ्याची विशेष चौकशी करण्याचें कारण म्हणजे त्याचा अभ्यास करण्याचे पद्धतीबाबत असलेला विक्षिप्तपणा. मॅट्रिकचे परीक्षेंत French Revolution वर एकादा प्रश्न येतो त्याची तयारी करण्याकरतां Carlyle's French Revolution आणि Burke's Reflection's on French Revolution असलीं जाडीं पुस्तकें वाचून काढण्याचा निश्चय या विद्यार्थ्यानें केल्याचें मास्तरांच्या कानीं आलें होतें. त्याचप्रमाणें खूप मोठालें शब्द वापरून इंग्रजी भारदस्त (?) लिहितां यावें म्हणून त्यानें एक इंग्रजी डिक्शनरी पाठ करण्याचा उपक्रम चालू ठेवल्याची बातमीही त्यांना लागली होती. चौकशी करतां असें समजलें कीं, त्यानें निकालासंबंधीं तार मागविली नाहीं. कारण "अभ्यास केल्यावर परीक्षा पास होणारच आणि उद्यां ज्ञानप्रकाशांत नांव येणारच" असें त्यानें दुसऱ्या एका विद्यार्थ्याजवळ बोलून दाखविलें होतें. तें ऐकून मास्तर म्हणाले " सबंध आयुष्यभर महादेव गोविंद रानड्यांची चेष्टा आणि टवाळी करायचें त्या चिपळूणकरानें ठरविलेलें दिसतंय ! ज्या अर्थी रानड्यांचा आत्मविश्वास उराशीं बाळगून तो परीक्षेच्या निकालासंबंधीं बेफिकीरपणा दाखवीत आहे त्या अर्थी त्या गाढवाला नापास झाल्याची दुष्ट बातमी खास अगाऊ कळली आहे. याचें प्रत्यंतर पाहिजे असेल तर उद्यां ज्ञानप्रकाशांत पहा." दुसरें दिवशीं खरोखरच चिपळूणकराचें नांव पास झालेल्या लोकांच्या यादींत नव्हतें.

( ५ )

## विद्यार्थ्याची पारख

निरनिराळ्या प्रकारच्या विद्यार्थ्यांची थोडक्याशा परिचयानें पारख करण्याची त्यांची विलक्षण हातोटी होती इतकेंच नव्हे तर त्यांच्या बाबतींत सूक्ष्म निरीक्षणांनीं त्यांनीं बांधलेलें सिद्धांत जरी बाह्यतः चमत्कारिक वाटणारे असत तरी ते अनुभवानें पटण्यासारखे असत. सन १९१३ सालपर्यंत प्रवेशपरीक्षेस सायन्स हा विषय सध्यांप्रमाणेंच नेमलेला असे. एकदां एका प्रवेशपरी-

क्लेस बसलेल्या विद्यार्थ्याला त्यांनीं सहज " पेपर्स कसे गेले आहेत ? " असें विचारतांच ' पेपर्सना ? अगदीं उत्तम गेले आहेत–पण शेवटचा सायन्सचा पेपर मात्र जरा बेताचा गेला आहे–म्हणजे नापास नाहीं होणार म्हणा पण बाकीच्या विषयांइतके उत्तम मार्क मिळणार नाहींत त्यांत. " असें त्यानें उत्तर दिलें. तो विद्यार्थी गेल्यावर मास्तर म्हणाले " मी खात्रीनें सांगतो कीं याचा अगदीं पहिला–म्हणजे इंग्रजीचाच पेपर वाईट गेलेला आहे आणि ही गोष्ट छपवण्याकरतां सायन्सच्या पेपरच्या नांवानें तो शंख करतो आहे ! " पुढें निकाल लागल्यावर खरोखरच असें आढळून आलें कीं, तो विद्यार्थी इंग्रजींतच नापास झाला होता.

तसेंच " नुक्तयाच बी. ए. ची परीक्षा पास झालेल्या कोठल्याही विद्यार्थ्यानें एकाद्या नाटकावर लिहिलेली टीका वाचून मी त्याच्या बी. ए. च्या अभ्यासाला नेमलेलीं पुस्तकें सांगू शकेन " असें ते म्हणत असत व याचें कारण विचारतां ते म्हणत कीं, " असल्या उच्छृंखल टीकाकारांचें वाचन आणि मनन इतकें मर्यादित आणि कोतें असतें कीं, त्यांना नेमलेल्या अभ्यासक्रमांतल्या पुस्तकांखेरीज इतर पुस्तकांशीं बिलकूल परिचय नसल्यामुळें व लिहिलेली टीका मनाच्या अपक्वावस्थेंत घाइघाईनें लिहिली असल्यामुळें त्यांचे सर्व विचार नुक्तयाच वाचनांत आलेल्या पुस्तकांभोंवतीं घोटाळत असतात.

( ६ )

## ओंकारेश्वरास १०८ दाढ्या

शेवटच्या दुखण्यानें ते आजारी असतां एकदां श्री. शंकरराव मुजुमदार त्यांना भेटण्याकरतां गेले होते. त्यावेळीं त्यांची दाढी बरीच वाढली होती. हें पाहून शंकरराव त्यांना म्हणाले " तुम्ही आजारी असलांत तरी दाढी नेहमीं करीत जा बुवा. नाहींतर त्या दाढीनें सुद्धां ताप वाढत असेल कदाचित्. "

हें ऐकून मास्तर म्हणाले "दाढीमुळें ताप वाढतो की तापामुळें दाढी वाढते हे जरी निश्चित नसलें तरी इतकें मात्र खास कीं, मी श्रीओंकारेश्वराला नवस करून बसलों आहे कीं, या दुखण्यांतून मला उठूंदे म्हणजे तुला १०८ दाढ्या घालीन. नवसाचें उद्यापन होईपर्यंत तरी मला दाढी वाढवलीच पाहिजे. "

त्याचप्रमाणें त्यांच्या या वाढलेल्या दाढी संबंधानें बोलतांना ते म्हणाले जर दुसऱ्याकडून फुकट सेवा करून घेण्याची आपली इच्छा असेल तर

त्याला सर्वांत सोपा उपाय म्हणजे दाढी वाढविणें हाच होय-मग ती दाढी ' बुवा ' म्हणून वाढवा किंवा तापकरी म्हणून वाढवा. "

( ७ )

## जुनी आणि नवी संस्कृति

जुन्या व नव्या संस्कृतिसंबंधानें बोलतां बोलतां ते म्हणाले " जुन्या आणि नव्या संस्कृतींत असलेला अगदीं ढोबळ फरक पहावयाचा असेल तर तो आपल्या लग्न पद्धतींत जास्त दृष्टोत्पत्तीस येतो. पूर्वीचा बाप कन्यादानानंतर शाकुंतल नाटकांतल्या कण्व मुनींप्रमाणें " कन्याधन दुसऱ्याचें देउनि आज ऋणातुनि सुटलों " असें म्हणत असे तर आजचा बाप कन्यादानानंतर " आज ऋणांतचि पडलों " असें म्हणून ढसाढसा रडत असतो. अर्थातच याचा सर्व रोख रूढ असलेल्या " " हुंड्याच्या दुष्ट चालीवर " होता हें निराळें सांगावयास नकोच.

( ८ )

## अरे हो, जोडे राहिले

किर्लोस्कर कंपनी आणि तिची परंपरा याबद्दल त्यांना फारच अभिमान वाटत असे; इतकेंच नव्हे तर कधीं निरानिराळ्या संस्थांसंबंधीं बोलणें निघालें तर " एक नमुनेदार नाट्यसंस्था " असाच त्या कंपनीसंबंधीं ते उल्लेख करीत असत. एक वर्षी जेव्हां कंपनींत बेबनाव सुरू होऊन कंपनी फुटण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं, त्यावेळीं एक नमुनेदार संस्था नष्ट होणार म्हणून त्यांना फार वाईट वाटलें; इतकेंच नव्हे तर ती संस्था मोडूं नये म्हणून त्यांनीं अटो-काट प्रयत्नही केले. तरीपण शेवटीं काय झालें हें पुन्हां सांगण्याची जरूर नाहीं. कंपनी फुटून दुसरी कंपनी निघणार ही कल्पनासुद्धां मास्तरांना असह्य वाटत होती. नवी कंपनी काढण्याच्या हेतूनें बाहेर पडलेल्या लोकांवर त्यांचा तात्पुरता कां होईना, पण कांहीं दिवस फारच राग होता. कंपनी सोडून जाणारे नामांकित नट त्यांचे जिव्हाळ्याच दोस्त होते तरी पण त्यांच्याशीं त्यांनीं कांहीं दिवस तरी अबोला धरला होता. या अबोल्याच्या अमदानींत एक नामांकित नट कंपनीच्या बिऱ्हाडांतून आपलें राहिलेलें सामान घेऊन जाण्याकरितां आले होते. बहुतेक सर्व सामान बांधल्यानंतर व आणखी कांहीं राहिलें अस-

त्यास आठवण करण्याचें हेतूनें कमरेवर हात ठेवून सभोंवार नजर टाकीत ! “ आतां काय राहिलें बरें ?–अरे हो जोडे राहिलेच कीं ” असे शब्द त्या गृहस्थाच्या तोंडून बाहेर पडले. मास्तर एकंदर चाललेला प्रकार मुकाट्यानें पहात होते. परंतु हे त्या गृहस्थांचे शब्द ऐकतांच एकदम उसळून ते म्हणाले, “ राहूं द्या, राहिले तरी. आतां इथून बाहेर पडल्यावर लोक हवे तितके देतील”

( ९ )

## नारळ फुटला पण कंपनी केव्हां फुटणार ?

तसेंच नवी कंपनी निघण्याचें निश्चित झाल्यावर एका सुमुहूर्तावर नवी कंपनी स्थापण्याच्या समारंभादाखल नारळ फोडण्यांत आल्याची बातमी मास्तरांना समजली. दुसरे दिवशीं सदरहू गृहस्थ रस्त्यांत त्यांना दिसले. अबोला होता तरी मुद्दाम खिजवण्याचे हेतूनें मास्तर त्यांचेजवळ गेले आणि त्यांना म्हणाले, “ तुमच्या कंपनीचा काल नारळ फुटला म्हणे ? ” “ फुटला. बरें मग? ” असें त्या गृहस्थानींही जरा रागानेंच उत्तर दिलें. त्यावर मास्तर म्हणाले, “ नाहीं, रागवण्याचें कांहीं कारण नाहीं यांत. नारळ फुटला पण कंपनी केव्हां फुटणार तुमची ? ” असें म्हणून दोघेही दोन्ही दिशेला निघून गेले.

( १० )

## पांडू बापट

मास्तरांनीं कोणतेंही लिहिण्याचें काम हातीं घेतलें ह्मणजे तें अगदीं नियमित वेळेवर पुरें होईलच अशी खात्री नसे. याचें प्रत्यंतर ह्मणजे त्यांनीं लिहिलेलीं ‘ पुण्यप्रभाव ’ ‘ एकच प्याला ’ वगैरे नाटकें व मनोरंजनांत आलेले त्यांचे लेख. नाटकें लिहिण्याला जितक्या उत्साहानें सुरवात होत असे तितक्याच दिरंगाईनें तें पुरे होत असे व आपल्या हातून फारच दिरंगाई होत आहे या गोष्टीची जाणीव होतांच ते कोणाला तरी नाटकाचे प्रवेशच्या प्रवेश तोंडीं सांगून लिहून घ्यायला लावीत असत. तोंडीं सांगितलेला मजकूर लिहून घेण्याचे कामीं पांडू बापट नांवाच्या, त्यांचेच घरीं राहणाऱ्या एका विद्यार्थ्याची योजना होत असे. एकदां असेंच दोन तीन प्रवेश सांगून झाल्यावर बरेच दिवसांनीं त्यांना पुन्हां तें नाटक पुढें लिहिण्याची लहर आली, ह्मणुन त्यांनीं पांडूला बोलावलें व मागें लिहिलेल्या प्रवेशांतील शेवटचे भाग पुन्हां वाचून दाखविण्यास सांगितलें. तो तसें करतांना मास्तर साशंकपणें त्याचेकडे पहात होते.

एकदोन वाक्यें वाचून झाल्यावर ते ह्मणाले "आतां जें तूं वाचून दाखलेंस तसें मी सांगितल्याचें मला तरी आठवत नाहीं." तेव्हां पांडू ह्मणाला "नाहीं मास्तर, तुह्मीं जेव्हां तो प्रवेश पुरा करायचा तसाच ठेवलात आणि पुन्हा त्याच्याकडे पाहिलेंच नाहींत तेव्हां मला वाटलें कीं आपणच प्रवेश पुरा करावा ह्मणजे मास्तरांचें पुढें लिहिण्याचें काम सोपें होईल; ह्मणून मीच तीं एक दोन वाक्यें लिहिलीं आहेत." हें ऐकून मास्तरांना राग येण्याऐवजीं हंसू आलें व ते पांडूला ह्मणाले "मीं लिहिलेल्या एका शब्दांत जरी कोणीं खाडाखोड किंवा अदलाबदल केली तरी तें मला खपत नाहीं आणि तूं तर मला नकळत एका शब्दाऐवजीं दोन घाणेरडीं वाक्यें माझ्या नांवावर दडपून दिलीस! तुझा केवळ नाइलाज होता त्या गोष्टीला; नाहीतर माझ्या परीक्षेच्या पेपरांतसुद्धां तूं माझ्या नांवावर नसती ढवळाढवळ करून ठेवली असतीस खास!"

( ११ )

## सिंधू

एक दिवस श्रीओंकारेश्वराचें दर्शनास मास्तरांचे बरोबर गेलों असतां बोलतां बोलतां सहज सिंधूच्या भूमिकेसंबंधीं त्यांनीं थोडक्यांत कल्पना दिली. त्यावेळीं 'एकच प्याला' नाटक अर्थातच लिहून झालें नव्हतें. त्यांचें बोलणें संपल्यावर मी त्यांना म्हणालों "मास्तर तुम्ही सिंधूची भूमिका अशी रंगविल्यानें हिंदू स्त्रिया म्हणजे नवऱ्याच्या लाथा निमूटपणें सहन करणाऱ्या कमकुवत मनाच्या असतात असाच सार्वत्रिक समज होऊन कांहीं लोकांना तर आपल्या नवरेपणाच्या हक्काचें समर्थन करण्याचें तें एक साधन होईल" त्यावर तें म्हणाले "जे अशा दृष्टीनें त्या भूमिककडे पाहतील त्यांना ती भूमिका नीट समजलीच नाहीं असें मी म्हणेन; उलट 'तुमच्या गृहदेवतांना अशा अमानुष रीतीनें तुम्ही वागवतां म्हणूनच तुमच्या घरादाराची अशी वाताहत होते' असा ध्वनितार्थ त्या भूमिकेपासून लोकांनीं कां घेऊं नये?"

( १२ )

## श्री. तात्यासाहेब कोल्हटकरांबद्दल अभिमान

मास्तर तात्यासाहेबांना गुरुस्थानीं मानीत हें नव्यानें सांगण्याची जरूर नाहीं; तरी पण गुरूबद्दल असलेला अभिमान किती जाज्वल्य स्वरूपाचा होता हें तात्यासाहेबांबद्दल त्यांनीं वेळोवेळीं काढलेल्या लहानसहान उद्गारांवरूनही

लक्षांत येण्यासारखें होतें. एकदां एका कंपनींत एका सुप्रसिद्ध नाटककाराचें नाटक बसत होतें. त्यावेळीं मास्तरांना त्या कंपनिच्या मालकांनीं मुद्दाम तालीम चालू असतां बोलावलें होतें. तालीम झाल्यावर मास्तरांचें नाटकाबद्दल असलेलें मत समजण्याकरतां मालकांनीं त्यासंबंधीं बोलणें काढतांच ते म्हणाले. " कवी; कवी; परंतु हा आमच्या गुरुसारखा ज्ञानी नव्हे ! "

तसेंच त्यांनीं लिहिलेली

तात्या ती तलवार एक तुमची बाकी विळे कोयते ।

ही एकच ओळ त्यांच्या उत्कट गुरुभक्तीची साक्षच आहे.

---

## वीर वामनराव जोशी यांजकडून

### मला भेटण्याचें गडकरी कां टाळीत

कै. राम गणेश गडकरी यांचा व माझा परिचय प्रथम १९१६ सालीं पुणें येथें झाला. पुढें बऱ्याच वेळां त्यांची माझी गांठ पडत असे. परंतु नमस्कार व सामान्य कुशल प्रश्न याशिवाय त्यांचें माझें फारसें बोलणें होत नसे. त्यांच्या त्या वेळच्या एकंदर वागणुकीवरून ते मला टाळींत असावेंत अशी माझी कल्पना आहे. आपल्याला टाकूं पहाणाऱ्या माणसाशीं लगट करण्याचा मलाहि तिटकारा असल्यामुळें मीहि कधीं त्यांच्याशीं सलगी करण्याच्या भरीस पडलों नाहीं. तथापि त्यांच्या लेखनासंबंधानें व कवितेसंबंधानें मला विशेष प्रेम वाटे व तें अद्यापिही नुस्तें कायमच नव्हे तर वाढत्या प्रमाणांत कायम आहे. त्यामुळें त्यांच्याकडून सवड देण्यांत आल्यास त्या बेतानें दोन पावलें पुढें सरकण्यांत मात्र मी सहसा कचरत नसे. ते माझ्याशीं अशा प्रकारें कां वागत हे मला उमगलें नाहीं व तें शोधून काढण्याच्याहि मी कधीं पंचायतींत पडलों नाहीं. परंतु एकदां तें पुण्यास कसबा पेठेंतील आपल्या घरीं आजारी असतां मी मुद्दाम त्यांच्या भेटीस गेलों होतों. त्यावेळीं ललितकलादर्श नाटक मंडळींतलि एकदोन गृहस्थ मजबरोबर होतें. आम्ही तेथें गेल्यावर ते अंथरुणावर उठून बसलें व मोठ्या प्रेमानें त्यांनीं आमचें स्वागत केलें. पुढें मामुली वहिवाटीप्रमाणें चहापानादि आटोपल्यावर सुमारें दोन अडीच तास आम्ही बोलत बसलों होतो. बोलण्यांत अनेक गंमतीचे विषय निघाले होते व संभाषण मोठ्या उत्साहानें चाललें होतें. तेव्हां मी त्यांस सहज हंसत विचारलें " कां हो, तुम्ही

माझ्याशीं नेहमीं तुटक कां वागतां ? " तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें, "मला तुमची भीति वाटत होती. माझा स्वभाव जरासा चेष्टेखोर असल्यामुळें एकादे वेळीं मी कांहीं बोललों आणि तुम्ही ताडकन् माझ्या मुस्कटांत लगावली तर मी काय करणार ? पण आतां तास दोन तास जें आपलें बोलणें चालणें झालें त्यावरून माझा समज चुकीचा होता अशी माझी खात्री झाली. हा सारा गोंधळ तुमच्या राक्षसी महत्त्वाकांक्षा नाटकामुळें झाला. हें नाटक मीं पाहिलें व त्याबरोबर तें रचणारा गृहस्थ पाषाणहृदयी, महत्त्वाकांक्षी राक्षस असला पाहिजे असा माझा ग्रह झाला व तो अद्यापिहि कायम होता." " आतांहि मी तुम्हांला पाषाण हृदयी, महत्त्वाकांक्षी राक्षस वाटतो काय ? " असें मी त्यांस विचारलें. तेव्हां त्यांनीं " नाहीं " असें उत्तर दिलें. त्यांच्या मनांत पाषाणहृदयावर कांहीं कोटी करावी असें होतें असा मला भास झाला. पण पुढें ते या विषयावर कांहींच बोलले नाहींत. त्यांनीं रचिलेल्या " महाराष्ट्राचा संदेश " अशा आशयाच्या कवितेसंबंधानें ओघानें बोलणें निघाले असतां ती कविता छापण्याविषयीं मी त्यांस आग्रह केला. तेव्हां " आपली हिंमत होत नाहीं. तुम्ही वाटल्यास छापा. माझी परवानगी आहे. " असें ते म्हणाले. मराठी नाट्यलेखनासंबंधानें सहज गोष्ट निघाली असतां श्री. कोल्हटकर व खाडिलकर यांच्याच्यासंबंधानें त्यांना विशेष भक्ति दिसून आली. यानंतरहि एकदोनदां त्यांचा माझा भेटीचा योग आला होता. एकदां श्री. हडप हेहि माझ्याबरोबर होते. त्यांचा कै. गडकरी यांना मींच परिचय करून दिला. कै. गडकरी यांचा माझा जो अत्यंत अल्प काल सहवास घडला त्यावरून माझ्या मनांत त्यांच्यासंबंधानें प्रेमादरबुद्धी उत्पन्न झाली. त्यांच्या बोलण्यांत एक प्रकारचा मिठा रुपया असे व त्यांच्याशीं संभाषण करीत असतां वेळेचेंहि भान रहात नसे. सुंदर व सरस कोटी म्हणजे त्यांची सहज लीला असे. त्यांच्या विनोदांत फाजीलपणा बहुतेक नसे. अश्लील कोट्यांचा त्यांनी तिटकाराच असला पाहिजे अशी माझी समजूत आहे. पहिल्या भेटीस जात असतां ते तुमच्याशीं मोकळेपणानें बोलणार नाहींत' असें मला एका गृहस्थानें रस्त्यांत सांगितलें होतें व पूर्वीच्या वागणुकीच्या तऱ्हेवरून कदाचित् त्या गृहस्थाचें म्हणणें खरेंहि ठरेल असें मलाही वाटले होतें. परंतु प्रत्यक्ष अनुभव अगदीं वेगळा आला. आजारी माणसाच्या भेटीस मी

जाऊं शकतो व जातो याचें त्यांना आश्चर्य वाटल्यासारखें दिसलें. त्यांच्या माझ्याशीं झालेल्या वर्तनावरून त्यांचा स्वभाव प्रेमळ होता अशी माझी खात्री पटली. त्यांना आपल्या अंगच्या लोकोत्तर लेखनसामर्थ्यसंबंधानें जाणीव पूर्ण होती; परंतु त्यांच्या ठिकाणीं गर्विष्ठपणा मात्र कधीं दिसून आला नाहीं. इतक्या अल्प परिचयावरून एखाद्याचा स्वभाव पूर्णपणें कळणें शक्य नसतें. त्यामुळें माझे झालेले ग्रह कदाचित् कोणास चुकीचे वाटण्याचाही संभव आहे. परंतु माझ्याशीं वागण्यांत माझे ग्रह चुकीचे असल्याबद्दल मला तरी कांहीं आढळून आलें नाहीं. झाल्यासहवासाच्या अनुभवावरून पहातां अधिक सहवास घडता तर परिचयाचें मित्रत्वांतही रूपांतर घडतें अशी माझी समजूत आहे; परंतु तो योग आला नाहीं. त्यांच्या अत्यंत निकटवर्ती मित्रांच्या तोंडून त्यांच्या संबंधाच्या ज्या अनेक सुरस गोष्टी मी ऐकल्या आहेत त्यांवरून त्यांचा सहवास कोणासहि ज्ञानदायकच झाला असला पाहिजे असें मला वाटतें.

---

## रा. विठ्ठलराव महिंद्रकर यांजकडून

### हा मुलगा व्यापारांत पुढें येईल

सन १९०५ किंवा १९०६ सालीं किर्लोस्कर कंपनीचा मुक्काम बार्शी येथें असतां मी बार्शी येथील प्रसिद्ध नगरशेट दादासाहेब कथले यांच्याकडे होतो. यावेळीं माझें वय लहान होतें व मला गायनाचा बराच नाद होता. किर्लोस्कर कंपनींतील मंडळी दादासाहेब यांच्याकडे येत असत व त्यांच्या गाण्याबजावण्यांत मीही भाग घेत असे. माझा आवाज त्यावेळीं उत्तम असल्यामुळें गडकरी मास्तर दादासाहेबांना सहज म्हणाले, "अहो या मुलाला तुम्ही आमच्या कंपनींत कां घालीत नाहीं ?" त्यावर दादासाहेबांनीं हंसण्यापलीकडे कांहींच उत्तर दिलें नाहीं. पण माझ्या मनांत मात्र नाटक कंपनींत जाण्याचें विचार सारखें घोळूं लागलें व दादासाहेबांच्या मागें मला नाटक कंपनींत घालण्याबद्दल सारखा लागलो. शेवटीं एक दिवस कंपनींत राहण्यासाठीं त्यांनीं मला घेऊन जाण्याचें ठरविलें. आम्ही दोघें जात असतां कंपनीच्या बिऱ्हाडीं दरवाज्यावर गडकरी यांची व आमची भेट झाली असतां या मुलाला कंपनींत ठेवण्यासाठीं आलों आहे असें दादासाहेब म्हणाले. दादासाहेबांचे हे शब्द

ऐकून गडकरी म्हणाले, "दादासाहेब, कशाला घालतां या मुलाला कंपनींत ? मी बोललों तें केवळ थट्टेनें बोललों होतों. हा मुलगा व्यापारांतच पुढें येईल" त्यावेळीं जरी मी कंपनींत गेलो नाहीं तरी पुढें एकदोन वर्षांनीं गेलोच. मी नाटक कंपनींत गेलो तरी माझें लक्ष कोणता व्यापारी कसा पुढें आला इकडेच असे. व मलाही कां पुढें येतां येऊं नये अशा प्रकारचे विचार माझ्या मनांत येत. पुढें मी नाटक कंपनी सोडून व्यापारांत पडलो. आज मला गडकऱ्यांच्या शब्दांची आठवण त्यांचें जेव्हां जेव्हां नांव निघतें तेव्हां तेव्हां झाल्याखेरीज रहात नाहीं. गडकऱ्यांनीं मी लहान असतां माझ्यासंबंधीं कसें अचुक भविष्य वर्तविलें याचें राहून राहून मला आश्चर्य वाटतें.

---


# महाराष्ट्र-रंगभूमीचा इतिहास

## लेखकः—गोपाळ गोविंद अधिकारी

यांत महाराष्ट्रांतील रंगभूमीचा सविस्तर इतिहास दिला आहे. सन १८४२ पासून सन १९२०पर्यंत काय काय चळवळी झाल्या, कोणत्या नाटकांनीं महाराष्ट्र रंगभूमीला उज्वल स्वरूप आणलें याचे समग्र विवेचन केलें असून अनेक नाटक कंपन्यांची, त्यांतील नटांची व नाटककारांची माहिती दिली आहे. पृष्ठ संख्या ६००. लौकरच प्रसिद्ध होईल.

## श्री. विठ्ठलराव घाटे एम्. ए. बी. टी. यांजकडून

### गडकरी व बालकवींचा निर्झर

गडकऱ्यांची 'विरामचिन्हें' ही कविता प्रसिद्ध झाल्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं रा. अनंततनयांबरोबर त्यांना प्रथम भेटावयास त्यांच्या कसब्यांतील घरांत मी गेलों होतों; त्यावेळीं गडकरी रात्रींच्या नाटकाच्या जागरणामुळें नुकतेंच उठून विडी ओढीत बसले होते.

मी कोण हें अनंततनयांकडून समजल्यावर माझे परमपूज्य तीर्थरूप कवि दत्तोपंत घाटे यांवरील त्यांच्या आदरबुद्धीमुळें गडकऱ्यांना पाहून मला आनंद वाटला, व आम्ही सहाजीकपणेंच त्यांच्या काव्याविषयीं बोलूं लागलों.

गडकरी—घाट्यांच्या कवितेंतील करुणरस व नादमाधुर्य (Music) अद्यापि दुसऱ्या कोणासही साधलें नाहीं; त्यांचा करुणरस तर खास नाहीं.

मी:—बालकवींचें नादमाधुर्य कांहीं कमी नाहीं.

गडकरी:—होय, खरी गोष्ट; मला वाटतें बालकवि दत्तोपंतांच्या पुढें जातील या बाबतींत. ( हंसून ) मला त्यांचें फार भय वाटतें. परवांचा मनोरंजनचा अंक तुम्हीं पाहिला का ?

मी:—होय, त्यांत आपली "विरामचिन्हें" व बालकवींचा 'निर्झर' आला आहे.

गडकरी:—'विरामचिन्हें' कशीं काय वाटलीं ?

मी:—साधीं आहेत; एक छोटीशी कल्पना प्रमाणशीर स्वरूपांत आपण काव्यांत गुंफली आहे. "चुंबना" प्रमाणें जरुरीपेक्षां अधिक ओळी खर्च केल्या नाहींत हें बरें केलें.

गडकरी:—साधी कविता आहे म्हणूनच या अंकांत आली. ती मोठी मौज आहे. 'निर्झर' प्रसिद्ध होण्यापूर्वीं मीं ती वाचली होती व मित्रांना निक्षून लिहिलें होतें कीं, बालकवींचा 'निर्झर' ज्या अंकांत येणार असेल त्या अंकांत माझी विशेष महत्त्वाची दुसरी कोणती कविता छापूं नये. साधी 'विरामचिन्हेंच' छापावी. 'निर्झर' फारच सुंदर आहे.

इतर कांहीं विषयांवर बोलणें झाल्यावर अनंततनयांनीं माझ्या वडिलांच्या 'विश्वामित्रीचे कांठीं' या कवितेविषयीं गोष्ट काढली.

तेव्हां गडकरी म्हणाले, 'ती कविता मी कधींही विसरणार नाहीं. इंग्रजी

चवथींत असतांना मीं ती वाचली. त्या कवितेनेंच माझ्यापुढें काव्यसृष्टि निर्माण केली, व मला कवि बनविलें. तो दिवस मला चांगला आठवत आहे.

त्यानंतर गडकऱ्यांचा आम्हीं निरोप घेतला. पुढें कारणपरत्वें पुण्यास गेल्यावर त्यांच्या भेटी होत असत. माझी इच्छा फार होती कीं, त्यांचा अधिक निकटचा परिचय संपादून त्यांच्या हृदयाचें रहस्य जाणून घ्यावें; परंतु सान्निध्याच्या अभावीं तें कधींच जमलें नाहीं. भविष्यकालावर भरंवसा ठेवला होता पण देवाच्या मनांत निराळेंच होतें.

—विठ्ठलराव घाटे

---

## कवि अनंततनय यांजकडून

### गडकरी यांची पहिली कविता

आमचा एक वृद्ध गुजराथी शेजारी रोज दुपारीं जेवण झाल्यावर आमच्या घरीं येऊन गप्पागोष्टी सांगत बसे. त्याचे पुढील आर्येंत वर्णन केलें आहे. माझे वडील बंधु तीं. रा. रा. विनायक गणेश गडकरी यांनीं या आर्येला थोडी मदत केली होती.

**आर्या.**

चष्मा लावुनि डोळ्या, डोकीस पागोटि तांबडी घाली
काठीं टेकित टेकित येऊनि बैसे पथारियाखालीं.

मु॥ गणदेवी, प्रांत नवसारी.

सन १८९६ जून अगर जुलई.

वरील कवितेंत विशेष स्वारस्य आहे अशांतला प्रकार नाहीं. गोविंदाग्रजांची काव्यगंगा कशी व कोठें उगम पावली हें या कवितेवरून व्यक्त होत आहे. शिवाय कवितेच्या मथळ्यावरील गद्य मजकुरांत त्यांनीं आपल्या वडील भावाच्या मदतीचा उल्लेख करून आपल्या मनाचा मोठेपणा व सत्य-प्रीति हीं व्यक्त केलीं आहेत, म्हणून या कवितेला एक प्रकारचें महत्त्व आहे.

### एका विडीकरितां एक कविता

के. गोविंदाग्रज यांची थोडीशी चरित्रविषयक माहिती खालील कवितेशीं निगडित झाली आहे म्हणूनच ती येथें प्रसिद्ध केली आहे. ही कविता लिहिली

त्यावेळीं गोविंदाग्रजांचें वय अवघें १५ वर्षांचें होतें. लोणावळ्यानजीक 'तोरणें' नांवाचें एक लहानसें गांव आहे. तेथें एक दिवशीं संध्याकाळीं दाराशीं पडलेल्या रिकाम्या गाडींत आपल्या ' नारायणराव प्रधान ' नांवाच्या मित्राबरोबर गप्पा गोष्टी करीत बसले असतां स्वारीला विडी ओढण्याची लहर आली. परंतु त्यांच्याजवळ विड्या नव्हत्या व त्या खेडेगांवांत मिळतहि नव्हत्या. अखेर त्यांनीं नारायणराव प्रधानांना त्यांच्या ' विनायक भास्कर वत्सराज ' नांवाच्या गत मित्रावर एका विडीला एक कविता देण्याचें कबूल करून त्याजपासून एक विडी घेऊन त्यांना एक खालील कविता लिहून दिली. गोविंदाग्रजांना विडी ओढण्याची सवय फार लहानपणापासून लागलेली असून ती अगदीं पूर्णावस्थेला पोंचली होती. ते चहा मनमुराद पीत व विड्या मनसोक्त ओढीत.

पदः—[ चाल–मज भीति नसे मरणाची ]

चरणास नमीं मित्र तुझा हे विनायका–वत्सराज सुकुलभवा कुशल गायका ॥धृ०॥
भास्करसुत सुगुणधना, दुर्गुणामला–अति–विमला, पदकमला, दाखवी मला,
स्नेहभाव काय असा नष्ट जाहला ? म्हणुनि मजसि भेटसी न सुहृदनायका ॥१॥

---

## रा. प्र. के. अत्रे (कवि 'केशवकुमार') बी. ए. बी. टी. यांजकडून

(१)

### गडकरी व भाविकता

गडकऱ्यांचा स्वभाव अत्यंत भाविक असे, परमेश्वरावर त्यांचा अढळ विश्वास होता. ह्या त्यांच्या ईश्वरभक्तीची छाया त्यांच्या प्रत्येक लेखावर स्पष्टपणें पडली आहे. ईश्वराविषयींच्या त्यांच्या कल्पना पाश्चात्य पद्धतीच्या नसून अगदीं सांप्रदायिक असत. पुराणांतरीं वर्णन केलेले परमेश्वराचे अद्भुत चमत्कार आपणास एकूणएक खरे वाटतात असे ते म्हणत. पंढरीच्या पांडुरंगावर त्यांची अगदीं भोळीभाबडी भक्ती असें, हें त्यांच्या " अनामिकाचे अभंग " व " धन्य पंढरी ! धन्य भिंवरा ! धन्य चंद्रभागा ! भक्तासाठीं वैकुंठाचा नाथ जिथें जागा ! " या भक्तिरसानें ओथंबलेल्या कवितेमध्यें उघड उघड दिसून येतें. त्यांच्या उशागतीं रात्रंदिवस विठ्ठलाची व शंकराची तसबीर असे. कोठेंही गेले तरी ह्या तसबिरी ते नेहमीं जवळ बाळगीत. नामदेवाच्या व तुकारामाच्या अभंगांवर त्यांचा अतिशय व्यासंग असे. संतकाव्याच्या सतत परिशीलनानेंच त्यांचा

स्वभाव इतका भाविक बनला असावा. देवादिकावरचीं नित्यपाठांतलीं पदें व आरत्या त्यांना अगदीं मुखोद्गत असत. नामदेवांची " युगे अठ्ठाविशी विटेवरी उभा " ही आरती तर त्यांना फारच आवडत असे; आणि त्यांतील " तुळशी-माळा गळा कर ठेवुनि कटीं " हें त्यांचें लाडकें कडवें त्यांच्या ओंठावर हरघडी खेळत असे. ते प्रत्येक एकादशी व उपास नियमानें पाळीत असत व त्या दिवशीं श्री विठ्ठलाचें भक्तिपूर्वक पूजार्चन यथासांग करून पांडुरंगाच्या पायावर एक स्वकृत अभंग अर्पण केल्यावर ते पारणें सोडीत असत. असे वेळोवेळीं केलेले अभंगच " अनामिकाच्या अभंगां"त एकत्र केलेले आहेत. अशा प्रकारचे अडीच हजार अभंग लिहिण्याचा त्यांचा संकल्प होता. गडकऱ्यांच्या सहवासांत असलेल्या मनुष्याला त्यांचा भाविक स्वभाव तेव्हांच उमगून येत असे. घरांतून बाहेर पडतांना प्रत्येक वेळीं ते उशालगतच्या तसबिरींना व घराच्या उंबरठ्याला वंदन करीत असत. त्यानंतर घरासमोरील पिंपळाच्या पारावरील मुंजोबा, त्यापुढें कसब्याचा गणपति व दत्त ह्या देवांना नमस्कार केल्यानंतर ते पुढील व्यवसायाला लागत. पुण्याचा ओंकारेश्वर हें त्यांचें अत्यंत प्रिय दैवत असे आणि तेथें गेल्यावर शंकराची आरती म्हणून व एकाद्या भोळ्या वारकऱ्याप्रमाणें कान उपटून आणि गालावर चापट्या मारून ते साष्टांग नमस्कार घालीत असत.

( २ )

## गडकरी भिऊन पळाले

गडकरी व्यवहारांत अतिशय भित्रे असत. अंधारांत व पावसांत ते घराबाहेर एकटे कधींच पडत नसत. " राजसंन्यास " सारखें राष्ट्रीय रसानें रसरसलेलें जिवंत नाट्यकाव्य लिहिणारा हा मर्द शाहीरगडी व्यवहारांत इतका भित्रा असावा हा विरोध मोठा मौजेचा आहे ! एकदां ते व मी रस्त्यानें जात असतां त्यांच्या अंगावर एक कुत्रें भुंकलें. त्यामुळें घाबरून जाऊन गडकरी इतके पळत सुटले कीं त्यांच्यापाठीमागें धांवत जाऊन मला त्यांना थांबवावें लागलें. शेवटीं तें कुत्रें जेव्हां कुठें दिसेनासें झालें तेव्हां त्यांच्या जिवांत जीव आला ! तरी देखील पुढें जातां जातां साशंक भीतीनें ते वरचेवर मागें वळून पहात होते ! कित्येक वेळां त्यांना आपलें घर हलतें आहे असा भास होई आणि कोणाला तरी बाहेर पाठवून तें नीट आहे अशी खात्री करून घेतल्याशिवाय त्यांना स्वस्थता

वाटत नसे. त्याचप्रमाणें, त्यांना भुताखेतांच्या, एकाद्या अपघाताच्या व खुनाच्या बातम्या कोणीं सांगितल्या म्हणजे त्यावर ते अतिशय संतापत असत ! लो. टिळकांविषयीं त्यांच्या मनांत वागत असलेला उत्कट आदर ते हयात असतां त्यांना व्यक्त करतां आला नाहीं याचें एकच कारण म्हणजे त्यांचा हा अत्यंत भित्रा स्वभाव ! राजकारणाविषयीं ते घरांत देखील अगदीं जपून बोलत असत. लो. टिळकांचा उल्लेख ते 'बी. जी.' ह्या सांकेतिक शब्दानें करीत असत. रा. खाडीलकरांच्या 'कीचकवधा'च्या वेळीं त्यांनीं 'महाराष्ट्र-लक्ष्मी' नांवाचें एक नाटक लिहिलें होतें. पण त्यामध्यें त्यांचे राष्ट्रीय विचार इतके भडकलेले होते कीं, त्या नाटकाची प्रत भयास्तव त्यांना जाळून नामशेष करावी लागली ! अगदीं तरुणपणीं, गडकऱ्यांनीं एका वर्तमानपत्रांत राजकारण-विषयक सणसणीत लेख लिहिले होते. त्या जहाल लेखांमुळें त्या पत्राच्या संपादकाला कारागृहांत जावें लागलें. गडकऱ्यांचें नांव त्यांत उघडकीस आलें नाहीं. त्या गोष्टीची गडकऱ्यांना इतकी विलक्षण दहशत बसली कीं, राज-कारणावर पुन्हां त्यांनीं चुकून कधीं एक अक्षरही लिहिलें नाहीं !

( ३ )

## गडकऱ्यांचा विनयशील स्वभाव

गडकरी अतिशय निगर्वी व विनयशील असत. अगदीं निकटच्या मित्रा-खेरीज स्वतःच्या लेखांविषयीं ते इतराजवळ क्वचितच बोलत. त्यांनीं स्वतःला कधींही कवि म्हणवून घेतलें नाहीं ! "माझ्यापेक्षां चांगल्या कविता कोणी लिहूं लागल्यास मी पुन्हां कविता लिहावयास घेईन !" किंवा "महाराष्ट्र नाट्यकलेला मी नांवारूपाला आणीन !" हे त्यांच्या तोंडून कधीं कधीं निघ-णारे उद्गार गर्वमूलक नसून गंभीर आत्मविश्वासाचे निदर्शक होते ! त्याचप्रमाणें, समाजांत आपला मोठेपणा मिरविण्याचा गडकऱ्यांना मनापासून तिरस्कार असे. ते हयात असतांना त्यांचा इतका नांवलौकिक झाला तरी कांहीं दुर्विलग्ध लेखकबुवाप्रमाणें आपल्या नांवामागें स्वयंनिर्मित पदव्या चिकटविण्याचा किंवा आपल्या चार जिवलग दोस्तांच्या मदतीनें सार्वजनिक सभा भरवून स्वतःचें अभिनंदन करून घेण्याचा किंवा आपल्या कामगिरीबद्दल मानपत्र मिळवून घेण्याचा भ्याड प्रयत्न त्यांनीं कधींही केला नाहीं ! "मला कीर्तीच्या मागें जावयाचें नाहीं, तिला वाटेल तर ती माझ्यामागें येईल !" असें ते म्हणत.

चार कविता लिहिल्या नाहींत तोंच त्यांच्या " मंजिऱ्या " व " माळा " गुंफून गिन्हाइकांच्या पदरांत बळेंच टाकण्याचा अतिप्रसंग त्यांना करितां आला असता आणि तशाबद्दल त्यांच्या कांहीं मित्रांकडून त्यांना आग्रहही झाला होता. पण " महाराष्ट्राला माझी कविता एकत्र वाचण्याची इच्छा आहे अशी मला खात्री झाल्याशिवाय मी ती कधींही पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणार नाहीं !" असा त्यांचा निश्चय होता. गडकऱ्यांच्या हयातींत त्यांनीं आपला फोटो कोण-त्याही मासिकांत प्रसिद्ध करूं दिला नाहीं. ह्याविषयीं त्यांच्या कांहीं मित्रांनीं व संपादकांनीं त्यांना अतिशय आग्रहाची विनवणी करून पाहिली. पण त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. " मला पहावयाचें असेल तर माझ्या लेखांत पहा ! " असें ते म्हणत. " तुम्हांला न कळत आम्ही तुमचा फोटो घेऊं व तो बेलाशक प्रसिद्ध करूं " असा कित्येक मित्रांनीं त्यांना प्रेमळ धाक घातला होता. पण त्यावेळीं " तसें कराल तर मी तुमच्यावर हटकून फिर्याद करीन " असें गडकऱ्यांनीं त्यांना निक्षून बजाविलें.

( ४ )

## व्यक्तिविषयक टीकांचा तिटकारा

गडकरी कोणत्याही लेखकाचा उल्लेख अत्यंत आदरपूर्वक करीत असत. कुत्सित भाषा वापरण्याची त्यांना अतिशय चीड असे. त्यांच्या तोंडून कधींही अपशब्द निघत नसे. टीकेच्या नांवाखालीं व्यक्तिविषयक शिवीगाळ करणाऱ्या कांहीं वर्तमानपत्रांच्या अंकाला ते स्पर्शही करीत नसत. एकदां गडकरी कांहीं विचार करण्यांत गढून गेले असतां बाहेर एक कुत्रें भुंकलें. त्यामुळें त्यांची विचार-मालिका तुटून ते अतिशय संतापले व रागाच्या भरांत त्यांनीं त्या कुत्र्याला चार-पांच शिव्या हसडल्या ! पण कांहीं वेळानें त्यांना त्या गोष्टीचा तीव्र पश्चात्ताप झाला. ते कुत्र्याला उद्देशून म्हणाले, " मी मासिकांचीं पानेंच्या पानें जरी भुंकलों तरी मला चुकून देखील कोणी हड् म्हणत नाहीं. मग तूं एक क्षणभर भुंकलास तर तुला शिव्या देण्याचा मला काय अधिकार आहे ! " ह्या विषयावर ते एक कविता लिहिणार होते.

( ५ )

## न्यू. इ. स्कूलमधील नोकरी कां सोडली ?

गडकऱ्यांचा स्वभाव कांहींसा मानी व हट्टी असे. ' न्यू इंग्लिश स्कूल-मधील शिक्षकाची नोकरी त्यांना ह्याचमुळें सोडावी लागली. एकाद्यावेळीं लह-

रींत आले म्हणजे ती हकीगत गडकरी अतिशय खुलवून सांगत असत. त्यावेळीं प्रो. राजवाडे हे सुपरिंटेंडेंट होते आणि त्यांनींच गडकऱ्यांना शाळेंत लावून घेतलें होतें. प्रथम त्यांना चवथ्या इयत्तेवर शिक्षक नेमण्यांत आलें. गडकऱ्यांची शिकविण्याची व बोलण्याची हातोटी परिणामकारक असल्यामुळें त्यांचा शिष्य-वर्ग त्यांच्यावर अगदीं बहाल असे. त्यावेळीं तेथें एक असिस्टंट सुपरिंटेंडेंट होते. त्यांना स्वतःच्या कार्खेसला एक गृहस्थ गडकऱ्यांच्या ऐवजीं नेमून घ्यावयाचा होता. पण गडकऱ्यांचे गुण प्रो. राजवाडे पूर्ण जाणत असल्यामुळें त्या बाबतींत अ. सु. ची पूर्ण निराशा झाली. ह्या कारणामुळें ह्या अ. सु. च्या मनांत गड-कऱ्यांविषयीं असूया उत्पन्न झाली व गडकऱ्यांना शाळेंतून कांहीं तरी निमित्तानें काढण्याकरितां ते आपल्यापरीनें संधि पाहूं लागले. एकदां गडकरी वर्गांत शिकवत असतां हे अ. सु. साहेब दिमाखानें वर्गांत शिरले व गडकऱ्यांशीं कांहीं एक न बोलतां ते मुलांचीं अभ्यासपत्रकें स्वतः गोळा करूं लागले. तें पहातांच गडकरी वर्गांतील एका खिडकीपाशीं गेले व बाहेर आकाशाकडे पहात उभे राहिले. गडकऱ्यांचा तो विचित्रपणा पाहातांच ह्या अ. सु. चें मस्तक भड-कलें व ते त्यांना रागानें म्हणाले, "गडकरी, मी वर्गांत आहें हें आपण पाहिलें नाहीं वाटतें!" "हो नीट पाहिलें!" गडकऱ्यांनीं शांतपणें उत्तर दिलें. "मग तुम्ही त्या तिकडे बाहेर पहात काय उभे राहिलां?" अ. सु. अधिक जोरानें म्हणाले. पण गडकरी तितक्याच शांतपणें म्हणाले "मी ह्या वर्गाचा शिक्षक आहें. ह्या वर्गांत मी व माझ्या डोक्यावर एक ईश्वर ह्याशिवाय मी तिसऱ्याची सत्ता कबूल करीत नाहीं. असें असतां, वर्गांत एकदम शिरल्याबद्दल शाब्दिक दिलगिरी न दाखवितां व मला न सांगतां मुलांचीं अभ्यासपत्रकें जर परस्पर आपणच गोळा करूं लागलात तर वर्गांत माझ्या असण्याचा कांहींच उपयोग नाहीं!!" हें निर्भीड उत्तर अ. सु. ना झणझणून झोंबलें व ते पाय आपटीत चालते झाले. पुढें, पुण्यांतील सर्व शाळांमधील वार्षिक खेळांचे सामने एंजिनीअरिंगच्या मैदानावर होणार होते. त्या दिवशीं गाड्याघोड्यांची रहदारी फार असल्यामुळें मुलें नीट सुरक्षित जावींत व त्यांनीं रस्त्यांत दंगामस्ती करूं नये म्हणून प्रत्येक वर्गांतील मुलें त्या त्या वर्गाच्या शिक्षकानें आपल्याबरोबर शिस्तीनें न्यावींत असा अ. सु. नीं हुकूम सोडला. इतक्या लांबवर भर उन्हांत मुलांबरोबर पायीं रखडत जाणें गडकऱ्यांना कुठलें मानवावयाला! ते वर्गांत

गेले व मुलांना म्हणाले " मुलांनों, तुह्मी अत्यंत दंगेखोर आहांत असा तुमच्यावर आरोप आहे म्हणून मैदानाकडे जातांना तुमच्यावर देखरेख करण्याचें काम माझ्यावर सोंपविण्यांत आलें आहे. आता सांगा, तुम्हांला कोणी दंगेखोर म्हटलेलें आवडेल काय आणि पोलिसाच्या पाहाऱ्यांत असलेल्या कैद्याप्रमाणें माझ्याबरोबर येण्याची तुमची इच्छा आहे काय ? " मुलें एकमतानें म्हणालीं, " नाहीं, नाहीं, आम्ही मुळींच दंगा करणार नाहीं. आम्ही अगदीं व्यवस्थित रीतीनें जाऊं. आमच्याबरोबर येण्याचा तुम्ही मुळींच त्रास करून घेऊं नका. " ( आणि बोलल्याप्रमाणें मुलें वागलींहि ! ) तेव्हां अ. सु. च्या समोर टांग्यांत बसून गडकरी पुढें चालते झाले. दुसरे दिवशीं हुकमाप्रमाणें मुलांच्या बरोबर कां गेला नाहीं म्हणून गडकऱ्यांना जाब विचारण्यांत आला. ते म्हणाले, " शिक्षक म्हणजे कांहीं शिपाई नाहीं. मुलें सुरक्षित जावींत अशी शाळेच्या मालकाची इच्छा असेल तर त्यांनीं त्याकरितां पगारी शिपाई नेमावयाचा होता ! मी शाळेंत आलों आहे तो मुलांना शिकविण्याकरितां; आलों आहें त्यांच्यावर पाहारा करण्याकरितां नाहीं ! " पुढें, गडकरी एकदा शाळेला थोड्या उशिरानें गेले. पण शिक्षकांच्या हजिरीपटांत आपण किती मिनिटें उशीरानें आलों हें त्यांना नमूद करून ठेविलें ! गडकऱ्यांवर सारखें टपून राहिलेल्या अ. सु. नीं गडकरी नेहमीं उशीरानें येतात असा रिपोर्ट राजवाड्यांकडे केला. तेव्हां त्यांना राजवाड्यांनीं बोलावून नेहेमीं उशिरानें येण्याचें कारण विचारलें. गडकरी म्हणाले, मी केव्हांही उशिरानें आलेलों नाहीं. आज फक्त थोडा उशीर झाला आणि तोहि मी हजिरीपटांत नमूद करून ठेवला आहे ! " गडकरी इतके बारीक वस्ताद असतील अशी अ. सु. ची कल्पना नव्हती. तेव्हां त्यांनीं ' गडकरी नेहेमीं उशीरानें येतात ' हें आपलें विधान तोंडीं परत घेतलें, पण तसें लेखी करण्याचें नाकबूल केलें. परंतु तसें केल्याशिवाय मी शाळेंत येणार नाहीं असा गडकरी आग्रह धरून बसले. किती केलें तरी अ. सु. हे अधिकारी होते ! शेवटीं, ह्या सर्व गोष्टीचा परिणाम गडकऱ्यांनीं शाळा सोडण्यांत झाला !

( ६ )

## मला आतां वेळ नाहीं

गडकऱ्यांचा स्वभाव तुसडा, चिडखोर व माणुसघाण्या होता असा त्यांच्याशीं

मैत्री जोडण्याची व्यर्थ खटपट करून दमलेल्या आगंतुकांचा त्यांच्यावर आक्षेप आहे. परंतु तो अगदीं भ्रममूलक आहे. मूळांत त्यांचा स्वभाव तसा मुळींच नव्हता, हें त्यांच्या निकट सहवासांत असणाऱ्या मित्रांशिवाय इतरांना कळणें शक्य नाहीं ! गडकऱ्यांचें नांव महाराष्ट्रांतील विद्वानांच्या तोंडीं जेव्हां निघूं लागलें तेव्हांपासून त्यांची ओळख करून घेण्यासाठीं पुष्कळ लोक त्यांच्याकडे येरझारा घालूं लागले. होतकरू कवि व लेखक आपल्या लेखांचीं बाडें काखोटीला मारून त्यांच्या जिन्याची चढउतर करूं लागले. या अशा अनाहूत पाहुण्यांचा आदरसत्कार करितां करितांच गडकऱ्यांचा सारा वेळ जाऊं लागला व त्यांना कांहींही लिहिणें अशक्य झालें. कारण, सकाळसंध्याकाळ ह्या निरुद्योगी मंडळीचा ताफा त्यांच्या पडवीला पडलेला असावयाचा. अशी मंडळी आपल्याकडे येण्यासंबंधीं गडकऱ्यांचा मुळींच प्रत्यवाय नव्हता. उलट, कोणी आपला लेख दाखवावयाला आणला तर गडकरी आनंदानें व काळजीपूर्वक तो वाचीत असत व त्याला उत्तेजनपर सूचनाही देत असत. पण ज्यावेळीं अशा गोष्टीनें खुद्द स्वतःच्या लेखनांत त्यांना अडथळे होऊं लागले तेव्हां त्यांना निष्ठुरपणें आपला स्वभाव बाह्यतः बदलणें भाग पडलें व तेव्हांपासून त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांशीं ते तुटकपणें वागूं लागले. " गडकरी कामांत आहेत. संध्याकाळीं या " अशी पाटीदेखील त्यांनीं दारावर लावली, तेव्हां त्यांच्या मागचा हा त्रास थोडा कमी झाला. कांहींही लिहावयाचें झालें तरी त्यावर गडकरी अत्यंत विचार करीत असत. नाटकें लिहूं लागल्यापासून तर ते दिवस दिवस विचाराच्या धुंदींत पडलेले असावयाचे. अशा वेळीं त्यांच्याकडे जाऊन त्यांचा निष्कारण समाधिभंग करण्याचें—विचाराच्या स्वर्गीय वातावरणांतून व्यवहाराच्या रुक्ष सृष्टींत ओढण्याचें पातक करणाऱ्या निरुद्योगी लोकांना, " तुम्ही आतां येऊं नका, मला वेळ नाहीं ! " असें सडेतोड उत्तर मिळालें तर त्यांत गडकऱ्यांचा काय दोष ?

( ७ )

## गडकऱ्यांचें वाचन

गडकरी हे विलक्षण बुद्धिमान् विद्यार्थी होते. त्यांचा वाचनव्यासंग विविध असून जब्बर होता. प्रचलित वाङ्मयवाचनापेक्षां अभियुक्त वाङ्मय वाचण्याकडे त्यांचें अधिक लक्ष्य असे. एकादा लेख लिहिण्यापूर्वीं ते त्या विषयावर शक्य

तेव्हां पुस्तकें काळजीनें वाचत असत! वाचलेल्या पुस्तकांचा उपयोग स्वतःच्या लेखांत कसा कौशल्यानें करून घ्यावयाचा ही कला गडकऱ्यांइतकी इतर लेखकांना क्वचितच साधली असेल! त्यांनीं एखादें पुस्तक वाचावयाला घेतलें म्हणजे इतर सर्व गोष्टी ते विसरून जात व त्या पुस्तकांतील त्यांना आवडणाऱ्या कल्पना अगर विचार आपल्या मित्रांना सांगून ते त्यासंबंधीं त्यांच्याशीं वादविवाद करीत असत! त्यांचें वाचन अगदीं निवडक आणि पक्कें असे! कितीही क्षुल्लक गोष्ट असो; ती एकदां त्यांच्या दृष्टीत आली म्हणजे त्यांच्या स्मरणांतून कधींही जात नसे. त्याचप्रमाणें कसलाही अवघड विषय त्यांनीं वाचावयास घेतला तरी त्यांतील स्वारस्य त्यांच्या तीक्ष्ण बुद्धींतून कधींही निसटत नसे! वाचतांना ते पुस्तकावर खुणा करीत व बाजूला आपले विचार सांकेतिक शब्दांत लिहून ठेवीत असत!

( ८ )

## गणितविषय व गडकरी

गडकऱ्यांची सूक्ष्म बुद्धि त्यांच्या लेखांतच केवळ नाहीं पण त्यांच्या खाजगी वर्तनांत देखील हरघडीं दिसून येत असे. त्यांची दृष्टि कांहीं तरी हुडकून काढण्याकरितां नेहमीं टपलेली असे. अमक्याच्या जिन्याला पायऱ्या किती किंवा बुधवार पेठेंत पाव्या किती हें त्यांना हटकून ठाऊक असावयाचें. "सर्व पुणें शहरांत लहान घर कोणतें?" असा त्यांनीं एकदां मला प्रश्न केला. मीं पुष्कळ विचार केला पण तें माझ्या ध्यानांत येईना. तेव्हां शेवटीं त्यांनीं स्वतः तें सांगितलें. तें घर म्हणजे बुधवार चौकानजीक असलेल्या बालाजीच्या देवळालगत असलेलें एक घर होय! इंग्रजी मासिकांतून येणारीं बुद्धिबळाचीं व इतर कोडीं ते चटकन् सोडवून दाखवीत! त्यांचा गणितविषय फार तयार असे. "मॅट्रिकपर्यंतच्या गणितांत मीं रँगलरनाही दाद देणार नाहीं!" असें ते म्हणत. "तुम्हांला लेखक व्हावयाचें असेल तर 'युक्लिड'चे सिद्धांताचा नीट अभ्यास करा. माझ्या लेखांत जर कांहीं व्यवस्थितपणा आला असेल तर तो 'जॉमेट्री'-च्या अभ्यासामुळें होय!" असें ते एकदां म्हणाले होते.

( ९ )

## मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म निरीक्षण

गडकऱ्यांची अवलोकनशक्ति अत्यंत तीक्ष्ण व मार्मिक असे. सृष्टिसौंदर्याचा

व मानवी स्वभावाचा त्यांच्याइतका सूक्ष्म अभ्यास असलेला प्रतिभावान् लेखक आज तर कांहीं डोळ्यांसमोर दिसत नाहीं. लहानपणीं त्यांचा बहुतेक सर्व काळ सृष्टिविषयक अभ्यास करण्यांत गेला होता. कोंकणमधील आपल्या गांवीं असतांना दिवसचे दिवस जंगलामध्यें फिरून निसर्गसौंदर्याचें विविध व सूक्ष्म ज्ञान त्यांनीं मिळविलें होतें. खेडेगांवांतील भोळ्याभाबड्या लोकांत व शेतकऱ्यांच्या मुलांत मिसळून रानावनांत हिंडत व खेडवळ खेळ खेळत उघड्या भागावर त्यांनीं आपलें बालपण घालविलें होतें. पूर्ववयांतील हे मनोहर संस्कार गडकऱ्यांच्या स्मरणपटावर आजन्म दृढ राहिले होते. त्यामुळें, पुढें सृष्टिविषयक कविता लिहितांना त्यांना आपली बैठक सोडून क्वचितच बाहेर जावें लागत असे. काव्यकल्पना मनांत जागृत करण्यासाठीं सृष्टिसौंदर्य पहावयास चलावयाचा कांहीं कविमित्रांनीं त्यांना आग्रह केला असतां " निसर्गाकडे पायांनीं जाण्याची गडकऱ्याला गरज नाहीं. आपल्या घरामध्यें विश्व निर्माण करण्याइतकी ताकद त्याच्या बुद्धींत आहे ! " असें विलक्षण आत्मविश्वाचें उत्तर त्यांनीं दिलें त्याचें रहस्य हेंच होय. गडकऱ्यांच्या पूर्वचरित्राशीं अपरिचित असलेल्या लोकांना चहा व विड्या पीत घरांत पडलेल्या, ह्या नाटकमंडळींतून त्या नाटकमंडळींत फिरणाऱ्या व प्रकृतीनें क्षीण झालेल्या गडकऱ्यांना इतक्या मनोहर सृष्टिविषयक कविता कशा लिहितां येतात याचें मोठें कोडें पडून राही. गडकऱ्यांइतका मानवी स्वभावाचा मार्मिक अभ्यास महाराष्ट्रामध्यें एकानेंही केला नाहीं असें आम्ही निश्चयानें सांगतों. विविध स्वभावांचीं व दर्जाचीं माणसें सभोंवतीं गोळा करावयाचीं व त्यांच्या स्वभावाचें बारकाईनें निरीक्षण करीत बसावयाचें हा तर गडकऱ्यांचा नित्याचा व्यवसाय झाला होता. हलक्या जातीच्या हीन लोकवस्तींतून श्रेष्ठ दर्जाच्या प्रतिष्ठित प्रांतांपर्यंत सर्व तऱ्हेच्या समाजांत ते स्वतः वावरलेले होते. ह्या त्यांच्या ज्ञानाचा उपयोग त्यांनीं आपल्या नाटकांत योग्य रीतीनें करून घेतला आहे हें कोणास सांगावयास नको. कमलाकर, नूपुर, सुदाम व सुधाकर हीं मानवी स्वभावाचें विलक्षण वैशिष्ट्य दाखविणारीं पात्रें गडकऱ्यांच्या आजूबाजूला नांदणाऱ्या व्यक्तींचीं थोड्या फार प्रमाणांत रंगविलेलीं हुबेहूब चित्रें होत. समाजामध्यें विशिष्ट प्रकारच्या स्वभावाची व्यक्ति अस्तित्वांत आहे हें पाहिल्याशिवाय तशा प्रकारचें पात्र गडकरी आपल्या नाटकांत कधींही योजीत नसत. शेवटच्या बाजीरावावर ते एक नाटक लिहिणार

होते. त्यासाठीं सर्व कथानकयोजना त्यांनीं तयार करून ठेविली. पण त्रिंबकजी डेंगळ्यासारखा मनुष्य त्यांना पहावयास न मिळाल्यामुळें तें नाटक लिहिण्याचें काम तसेंच दिरंगाईवर पडलें. ह्या मनुष्यस्वभावाच्या सूक्ष्म परिशीलनामुळें गड-कऱ्यांना माणसाची पारख फार चटकन् होत असे. कोणता इसम काय किंम-तीचा आहे हें गडकरी तेव्हांच सांगत असत. ठोमऱ्यांनीं आपल्या विख्यात कविता लिहिण्यापूर्वी, त्यांच्या पहिल्या भेटींत, ते महाराष्ट्रवाङ्मयांत आपलें नांव अमर करतील असें गडकऱ्यांनीं भविष्य वर्तविलें होतें.

( १० )

## एका विद्यार्थिनीचें आगमन

इंग्लिश वाङ्मयांत जॉनसन्‌सारखा चित्तवेधक संभाषण करणारा लेखक होऊन गेला नाहीं अशी ख्याती आहे. आपल्या सभोंवतीं नानाप्रकारचे लेखक गोळा करून त्यांच्यावर अधिकारी वाणीनें आपल्या विचाराची व बुद्धिमत्तेची छाप टाकण्यांत जॉनसनचा हातखंडा असे. ह्या गुणांत, गडकरी अगदीं जॉनसन्-प्रमाणें होते असें म्हणणें मुळींच धाडसाचें होणार नाहीं. गडकरी एकदां बोलूं लागले म्हणजे तासचे तास सारख्या दमानें बोलत आणि तेवढ्या वेळांत विविध वाङ्मयविषयक माहिती, थोर पुरुषांच्या चरित्रांतील मर्मस्थानें, सर्वमान्य ग्रंथां-तील उत्कृष्ट कल्पना, प्रचलित विषयावरील आपलीं मतें व दुसऱ्या अनेक मनो-रंजक गोष्टी त्यांच्या भाषणांत येत असत. त्यामुळें त्यांचें भाषण तल्लीन चित्तानें ऐकणाऱ्या त्यांच्या श्रोतृगणाला त्यांचें भाषण ही एक बडी मेजवानीच होती. त्यांत गडकऱ्यांच्या उपजत विनोदी स्वभावामुळें तर त्यांच्या भाषणाला असा रंग चढत असे कीं, कसलाही फत्तर मनाचा मनुष्य त्यांच्यापुढें पाझरल्याशिवाय राहत नसे. गडकऱ्यांनीं एकदां एकाद्या विषयावर विनोद अगर कोटी केली म्हणजे ती पुन्हा त्यांच्या भाषणांत कधींही येत नसे. त्याविषयीं जर कोणी त्यांना म्हटलें, " मास्तर, हा विनोद तुम्हीं आपल्या नाटकांत घाला ! " तर त्यावर " एकदां बोलून उष्टावलेला विनोद नाटकांत वापरण्याइतका हा गडकरी कांहीं कंगाल आहे का ? " असें ते उत्तर देत. विनोद करण्याची कोणतीही संधि गडकरी वाया जाऊं देत नसत. ' फर्ग्यूसन कॉलेज'मध्यें असतांना, एकदां प्रो. द्रविड त्यांना ' मालतीमाधव ' शिकवीत होते. त्यांतील एका प्रवेशांत " ततः प्रविशते कपालकुंडलाघोरघण्टौ

कृतवध्यचिन्हा मालती च ' हे शब्द त्यांच्या वाचण्यांत आले. त्यांनीं " वध्य-चिन्हा " इतकें वाचलें नाहीं तोंच एक विद्यार्थिनी वर्गात शिरली. त्याबरोबर ' मालतीच ' म्हणून गडकरी ओरडले. त्यामुळें वर्गात एकच हंशा माजून राहिला !

( ११ )

## क्रिकेटचा शोक

गडकऱ्यांना स्वत: ' क्रिकेट ' जरी फारसें खेळतां येत नव्हतें तरी तो खेळ त्यांना अतिशय प्रिय असे. कोठें एकादी चांगली ' मॅच ' आहे असें त्यांना कळावयाचा अवकाश, कीं इतर सर्व कामें बाजूला ठेवून हे त्या ठिकाणीं धांवत जावयाचे हें ठरलेलें ! प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें जर कदाचित् त्यांना स्वत: तेथें जातां आलें नाहीं तर कोणाला तरी पाठवून त्या ' मॅच 'चा निकाल शक्य तितक्या लवकर आणविल्याशिवाय त्यांना स्वस्थता वाटत नसे, इतकी क्रिकेटच्याठायीं त्यांची अपरंपार भक्ति होती. मुंबईला एकदां एक मोठी अटीतटीची ' मॅच ' होती. खेळ ऐन रंगांत आला होता. परंतु गडकरी बरेच दूरच्या अंतरावर बसले असल्यामुळें खेळाडूंच्या सूक्ष्म हालचाली स्पष्टपणें पहाणें त्यांना अशक्य झालें. त्याबरोबर त्यांनीं पन्नास रुपयांच्या दोन दुर्बिणी तेथल्या-तेथें खरेदी केल्या. " मास्तर, इतके पैसे कशाला खर्च करितां ? " असा त्यांच्या मित्रानें प्रश्न केला त्यावर ते म्हणाले, " अरे, पैसे वाटेल तेव्हां मिळवितां येतील; पण अशी ' मॅच ' पुन्हां जन्मांत पाहावयास मिळणार नाहीं ! " क्रिकेटच्या खेळाचें गडकऱ्यांनीं अतिशय सूक्ष्म ज्ञान मिळविलें होतें. आणि त्या खेळांतलि महत्वाच्या मुद्यांवरील त्यांचीं मतें क्रिकेटमध्यें कसलेल्या तज्ञाला शोभण्यासारखीं असत ! ह्या खेळावर ते एक विनोदी लेख लिहिणार होते. पण दुर्दैवानें तो योग घडून आला नाहीं. ' फर्ग्यूसन ' कॉलेजच्या ' शील्ड मॅच 'च्या वेळीं दोघा पक्षांतील विद्यार्थ्यांचीं भांडणें होऊं नयेत म्हणून गडकरी मैदानाच्या कांठाकांठानें फिरत असावयाचे.

( १२ )

ग्रं. क्र. ३५८०

## लहान मुलांची आवड

लहान मुलांमध्यें मिसळण्याची गडकऱ्यांना भारी आवड असे. लहान मुलांना आपल्या भोंवतीं कसें गोळा करावें, त्यांना समजेल अशा रीतीनें त्यांच्याशीं

कसें बोलावें ह्याचें त्यांना पूर्ण ज्ञान होतें. आपल्या घराशेजारील मुली जमा करून, त्यांना वर्तमानपत्राचे किंवा मासिकाचे चित्रांचे अंक देऊन त्यांपासून ते गाणीं, उखाणे वगैरे म्हणून घेत असत. कसलाही अवघड विषय असला तरी तो मनोरंजक व सुलभ रीतीनें मुलांना समजावून सांगण्यांत त्यांचा हातखंडा असे. त्यामुळें, वडील माणसाच्या चाहुलीबरोबर भुर्रकन पळून जाणारीं मुलें गडकऱ्यांशीं अगदीं बेधडकपणें व मनमोकळेपणें बोलत असतांना दिसत. लहान मुलांचा स्वभाव गडकऱ्यांनीं किती बरोबर ओळखला होता हें त्यांच्या "सकाळचा अभ्यास" ह्या मनोहर प्रहसनावरून कोणालाही कळून येण्यासारखें आहे. इंग्रजी वाङ्मयांत मुलांसाठीं एक एक स्वतंत्र निराळा भाग आहे त्याप्रमाणें महाराष्ट्रवाङ्मयांत बालबुद्धीला कळेल व पटेल अशा तऱ्हेचें बालवाङ्मय निर्माण व्हावें अशी त्यांची फार इच्छा होती. त्या दिशेनें प्रयत्न करण्याची त्यांना स्वतःला उत्सुकता वाटत होती. पण इतर व्यवसायामुळें शेवटपर्यंत तसें करावयास त्यांना वेळ मिळाला नाहीं. त्याचप्रमाणें बायकांच्या तोंडीं असलेलीं गाणीं, उखाणे एकत्र जमवून प्रसिद्ध करण्याचाही त्यांचा विचार होता.

( १३ )

"धाकट्या सूनबाई"

शक्य तितकीं उत्कृष्ट पुस्तकें स्वतःजवळ जमविण्यासाठीं गडकऱ्यांची नेहमीं खटपट चालू असे. एकादें चांगलें पुस्तक विक्रीला आलें आहे असें त्यांना कळलें तर वाटेल तितके पैसे खर्च करून ते तें विकत घेतल्याशिवाय रहात नसत! त्याचप्रमाणें विकावयास येणाऱ्या जुन्या पुस्तकांच्या रद्दींत एकादें अमोल व दुर्मिळ पुस्तक मिळेल ह्या आशेनें पुण्याच्या जुन्या बाजारांत तें नेहमीं फिरत असत, आणि तेथून त्यांनीं कांहीं उत्कृष्ट पुस्तकें विकतही घेतलीं आहेत. लढाईपूर्वी, 'पूना जिमखान्या'च्या लायब्ररींतील जुनीं पुस्तकें दर शनिवारीं विकावयाला काढीत असत. त्यावेळीं गडकरी हे हटकून तेथें हजर असत. ह्यामुळें गडकऱ्यांचा खाजगी ग्रंथसंग्रह म्हणजे विविधवाङ्मयांतील वेंचून आणलेल्या रत्नांचें एक तेजस्वी भांडारच झालें आहे. "माझ्यासारखा अमोल ग्रंथसंग्रह सबंध महाराष्ट्रांत नाहीं" असें गडकरी अभिमानानें म्हणत असत. पुस्तकें आपल्या मित्रांना देण्याच्या कामांत गडकरी अगदीं सढळ असत. पण त्यांना कांहीं मित्र इतके खमंग मिळाले होतें कीं, त्यांचीं पुस्तकें परत करण्याची गडकऱ्यांच्या हया-

तींतच नव्हे तर अजूनही आठवण होत नाहीं! अशा वेळी गडकरी वैतागून म्हणत, "देवा, माझ्या शत्रूंचा समाचार घ्यावयाला मी समर्थ आहे. पण माझ्या मित्रांपासून तूंच माझें रक्षण कर!" कित्येक पुस्तकांवर गडकऱ्यांची अगदीं आंधळी श्रद्धा असे. तीं पुस्तकें आपणाजवळ नेहमीं असावींत असें त्यांना वाटे. असें एक पुस्तक म्हणजे "धाकट्या सूनबाई" हें होय! मित्रमंडळींत वारंवार गहाळ झाल्यामुळें हें पुस्तक त्यांनीं २९ स वेळां विकत घेतलें होतें! मराठी भाषेचा गडकऱ्यांना फार अभिमान असे; त्याचें एक मोठें निदर्शक म्हणजे ते आपलीं खास गीं पत्रें नेहमीं त्याच भाषेत लिहीत. मराठी भाषेचे शिवाजी निंबधमालाकार आणि महाराष्ट्रीय कवींचे कवि 'केशवसुत' आपलीं पत्रें इंग्रजींतून लिहीत असत हें लक्ष्यांत घेतलें म्हणजे गडकरी हे आंतून बाहेरून पक्के महाराष्ट्रीयच होते असें दिसून येतें. महाराष्ट्रीय पुढारी, विद्वान् आणि सुशिक्षित लोक गडकऱ्यांचें या बाबतींत अनुकरण करतील तर मराठी भाषेची, विचार आणि भावना सूक्ष्मपणें व्यक्त करण्याची शक्ति दिवसेंदिवस वाढल्याशिवाय राहणार नाहीं.

( १४ )

## गडकऱ्यांचे जातभाई

आचारांत व उच्चारांत आपल्या जातीचा अभिमान व्यक्त करणाऱ्या प्रभुज्ञातींत गडकऱ्यांचा जन्म होऊन देखील त्यांच्या ठिकाणीं तसल्या प्रकारचा कोता व हीन जात्यभिमान कधींही दिसून आला नाहीं! गडकरी वारल्यानंतर 'ते आमच्या जातीचे होते म्हणून मोठे' अशा अकुंचित व क्षुद्र अभिमानानें त्यांच्या कांहीं जातवाल्यांनीं त्यांच्या पुण्यतिथीवर कितीही सभा भरवून आपलें ढोंगी दुःख व्यक्त केलें व कितीही गुजराथी गहिंवर आणला तरी गडकरी हयात असतांना त्यांना त्यांच्या ह्या बांधवांनीं (!) अत्यंत वाईट रीतीनें वागविलें होतें असें आम्हांस खुद्द गडकऱ्यांच्याच तोंडून कळलेलें आहे. आपल्या ज्ञातीपासून गडकरी देखील अगदीं फटकून वागत असत. गडकऱ्यांचें बहुतेक मित्रमंडळ त्यांच्या ज्ञातीतरांच आहे ह्याचें रहस्य हेंच आहे!

( १४ )

## टीकेचें भलेंभक्कम बाड

महाराष्ट्रांत हल्लीं प्रचलित असलेली टीकाकारांची प्रवृत्ती गडकऱ्यांना बिल-

कूल संमत नव्हती. लेखकानें विषयावर जितका व्यासंग केला आहे तितका अभ्यास त्या विषयावर असल्याशिवाय टीका करण्याची पात्रता अंगीं येत नाहीं असें त्यांचें मत होतें ! टिळकांचें 'गीतारहस्य' प्रसिद्ध झाल्यावर त्यांच्यावर आपल्या उथळ बुद्धीचे घाणेरडे शिंतोडे उडविणाऱ्या बारभाईकडे ते अशाच दृष्टीनें पहात असत. 'प्रेमसंन्यास' नाटक जेव्हां पुण्यास प्रथम रंगभूमीवर आलें त्याचे दुसरे दिवशीं एक गृहस्थ त्या नाटकावर एक टीकेचें भलेभक्कम बाड लिहून गडकऱ्यांना दाखवावयास आला. गडकऱ्यांनीं तें तसेंच त्याला परत करून म्हटलें, 'गृहस्था, प्रेमसंन्यास नाटकांतील विषयावर मी माझ्या बुद्धीनें सतत तीन वर्षें विचार केला आहे. आणि ज्या अर्थीं तूं एका दिवसांत घाईघाईनें टीका लिहून आणिली आहेस त्याअर्थीं ती अनुकूल आहे किंवा प्रतिकूल आहे हें पहाण्याचीसुद्धां मी तसदी घेत नाहीं !' गडकऱ्यांची बुद्धि अतिशय विवेचक असे.

( १६ )

## महाराष्ट्रवाङ्मय

एकादें पुस्तक वाचून त्यामधील गुणदोष ते झटकन् वेगवेगळे काढून दाखवीत असत. मरणापूर्वीं कांहीं दिवस महाराष्ट्रवाङ्मयावर एक व्यापक व विधायक टीका लिहिण्याचें त्यांच्या मनांत घोळत होतें. याकरितां त्यांनीं एक भव्य योजना करून ठेवली होती. ती अशी; इंग्रजी वाङ्मयांतील उत्कृष्ट तेवढीं पुस्तकें वाचून त्यांमधून त्या त्या विषयावर सर्वसंमत अशी उपपत्ती काढावयाची व ती प्रचलित महाराष्ट्रवाङ्मयाला लावून श्रेष्ठ दर्जाच्या इंग्रजी वाङ्मयापेक्षां महाराष्ट्रवाङ्मय कोणत्या बाबतींत कनिष्ठ ठरतें त्याचें विस्तृत विवेचन करावयाचें व तें इतउत्तर सुधारण्याची इच्छा करणाऱ्या नवीन लेखकांनीं कोणत्या दिशेनें प्रयत्न करावयाला पाहिजे त्याचाही योग्य मार्ग दाखवून ठेवावयाचा. ही व्यापक योजना पूर्ण होण्यास बराच कालावधि लागणार होता आणि तीव्र शारिरीक व्याधींनीं गडकऱ्यांना वारंवार छळण्याचें आपलें दुष्ट कार्य थोडें थांबविलें असतें तर हा महत् संकल्प त्यांच्या हातून सफल झाला असता. हें कार्य जर सिद्धीस गेलें असतें तर गडकरी नुसते प्रतिभावान् कवि नसून ओजस्वी टीकाकारही होते याची रसिकांना खात्री पटली असती !

( १७ )

## भाषांतराचा तिरस्कार

परभाषेंतील कवितेचीं अगर लेखांचीं मराठींत भाषांतरें करून स्वतःच्या नांवावर विकण्याचा गडकऱ्यांना अतिशय तिरस्कार असे. इंग्रजीसारख्या संपन्न भाषेमध्यें पदोपदीं आढळणारे सुंदर विचार व कल्पना मराठी पेहरावांत रसिकांसमोर मांडण्याचा मोह अगदीं स्वतंत्र बुद्धीच्या लेखकाला देखील आवरत नाहीं हें त्यांना कबूल होतें. पण परभाषेच्या भांडारांतील सौंदर्यसंपत्ती स्वभाषेंत उसनवार आणण्यापेक्षां स्वतःच्या बुद्धिबलानें तितक्या तेजाचें सौंदर्यवन आपल्या भाषेंत निर्माण करण्याचें ध्येय प्रत्येक लेखकापुढें असावें असें त्यांचें मत होतें. ‘ परभाषेंतील सर्वोत्कृष्ट पुस्तकें मी वाचतों तीं त्यामधील विचारांचा व कल्पनेचा माझ्या लेखांत उपयोग करण्याकरितां नव्हे; तर माझे विचार व कल्पना त्यांच्या तोडीच्या बनल्या आहेत किंवा नाहीं हें पहाण्यासाठीं ! ’ असें ते नेहमीं बोलून दाखवीत. लहानपणीं वृत्तरचनेसाठीं एक दोन इंग्रजी कवितेच्या केलेल्या भाषांतराव्यतिरिक्त त्यांनीं आजन्म कोणाचेंही व कसलेंही भाषांतर केलें नाहीं किंवा कोणाचे विचार स्वतःच्या लेखांतून घुसडले नाहींत. ‘ मोडकेंतोडकें लिहा पण पण स्वतःचें लिहा व विचार करून लिहा ’ असा त्यांचा प्रत्येक नवख्या लेखकाला पहिला उपदेश असे !

( १८ )

## शिळया कोट्यांची चीड

दोनचार कविता किंवा लेख कोठें लिहिले नाहींत तोंच ते प्रसिद्ध करण्यासाठीं मासिकाच्या दाराकडे धांव घेण्याची महाराष्ट्रांतील बऱ्याचशा लेखकांची प्रवृत्ती पाहून त्यांना कींव वाटे. लेखक या नात्यानें महाराष्ट्रापुढें येण्यापूर्वी कित्येक वर्षें गडकऱ्यांचा खाजगी लेखनाभ्यास चालू होता. त्यांनीं अनेक लेख व सुमारें दोनशें कविता स्वतः हातांनीं फाडून टाकिल्या होत्या. “ वर सुंदर इमारत उठवावयाला खालीं खोल पाया खाणला पाहिजे, ” तसेंच “ लेखन ही कला आहे. ती प्रयत्नसाध्य आहे. स्फूर्तीनें त्यांत सौंदर्य येईल पण पूर्णता येणार नाहीं,” असें ते म्हणत असत. सारासार विचार न करितां वाटेल तसे घाईघाईनें खरडून ते लेख प्रसिद्ध करावयाचें व वाचकांचा व्यर्थ वेळ घ्यावयाचा ह्यासारखें दुसरें पाप नाहीं असें ते म्हणत. त्याविषयीं त्यांचें एक विलक्षण

गणित असे. ते म्हणत “ दहा हजार वर्गणीदार असलेल्या एकाद्या मासिकांत आपण एक लेख प्रसिद्ध केला आणि तो लेख वाचण्यांत प्रत्येक वाचकानें अगदीं पांचच मिनिटें खर्च केलीं तर तीं एकंदर पन्नास हजार मिनिटें व प्रत्येक वर्गणीदाराचे तो लेख वाचणारे पांचच मित्र धरिले तर त्यांचीं एकंदर दोन लक्ष पन्नास हजार मिनिटें मिळून एकूण, आपला एक लेख वाचण्याकरितां कमींत कमी तीन लाख मिनिटें लोक खर्च करितात; आणि तो लेख जर आपण अत्यंत विचार करून व श्रम घेऊन लिहिला नसेल तर जनतेचा इतका काळ फुकट घालविण्याचें घोर पातक केल्यासारखें होतें ! एका लेखासाठीं आपण जेव्हां दिवसचे दिवस खर्च करूं तेव्हां वाचकांकडून पांच मिनिटें हक्कानें मागून घ्यावयाचा आपणास अधिकार येईल ! ” तसेंच, शिळया कोट्या व सांप्रदायिक कल्पना घेऊन आपला लेख सजविण्याची गडकऱ्यांना अतिशय चीड असे. “ मी जें कांहीं लिहितों त्यांत कांहीं तरी नवीन असल्याशिवाय तें मी प्रसिद्ध करीत नाहीं,” असें ते सांगत व तें खरें नाहीं असें कोण म्हणेल ? त्याचप्रमाणें समर्पक शब्दयोजना करण्याकडे त्यांचें नेहमीं लक्ष्य असे. “ माझ्या लेखांत योजलेल्या प्रत्येक शब्दाबद्दल—तो मी तेथें कां योजिला व त्याऐवजीं समानार्थक दुसरा शब्द कां योजिला नाहीं याचें सबळ कारण असतें ! ” असें ते निश्चयानें सांगत.

( १९ )

## ठोमरे गेले ! मलाहि जावें लागणार

समकालीन महाराष्ट्रीय कविमंडळांत विशेषत: ठोमऱ्यांवर गडकऱ्यांचा अतिशय लळा असे. ठोमरे हे गडकऱ्यांचे जीव कीं प्राण होते. त्यांच्यावरील आपलें प्रेम ‘ प्रेमसंन्यास’मध्यें “ आनंदी आनंद गडे ” हें मनोहर अवतरण जयंताच्या तोंडीं घालून, “......तोंच आठवे बालकवीची रसवंती—धीर जरा वाटे चित्तीं ”, व “ जगद्वायका, बालकवे हे, ऊठ ऊठ आतां ! ” या नितांतसुंदर कवितांनीं गडकऱ्यांनीं महाराष्ट्रवाङ्मयांत अमर करून ठेविलें आहे. बालकवींच्या ‘ निर्झरा’ला गडकरी एक सुंदर प्रस्तावना लिहिणार होते. तसेंच ठोमऱ्यांचा ‘ अरुण ’ गडकऱ्यांना इतका आवडला कीं आजन्म कोणाचेंही अनुकरण न करणाऱ्या त्यांच्या मानी बुद्धीला त्यांचें अनुकरण करण्याचा मोह आवरला नाहीं. मात्र त्या आपल्या ‘ अरुण ’ कवितेच्या खासगी प्रतीवर ‘ ते ठोमऱ्यांचे

अनुकरण आहे ' असें प्रामाणिक मोकळेपणानें गडकऱ्यांनीं लिहून ठेविलें आहे. गडकऱ्यांना स्फूर्ति देण्याच्या कामांत कित्येक वेळां ठोमरे कारणीभूत झाले हें कोणाला खोटें वाटण्याचा संभव आहे, पण तें खरें आहे. "ठोमरे जर नसते तर मी फारशा कविता लिहिल्या नसत्या " असें गडकरी कधीं कधीं म्हणत. ठोमरे गडकऱ्यांना गुरुस्थानीं मानीत व गडकरीही आपल्या ह्या तुल्यगुणी शिष्याला बरोबरीचा मान देत असत. ठोमरे गडऱ्यांकडे आले म्हणजे तासचे तास बसत असत आणि त्यावेळीं त्यांच्यामध्यें जीं चित्ताकर्षक भाषणें होत तीं सर्व रसिकांना शब्दांनीं सांगणें अशक्य आहे. अशा कांहीं बेठकीच्या वेळीं प्रेक्षक होण्याचें महद्भाग्य मला लाभलें होतें. एकाद्या इंग्रजी कवितेंतील अगर लेखांतील सौंदर्य कौशल्यानें व मार्मिकपणें सांगणारे गडकरी व रानांतील एकद्या हरिणाप्रमाणें तल्लीन वृत्तीनें ऐकणारे पाणीदार डोळ्यांचे ठोमरे त्यांचें ह्यावेळीं माझ्या स्मृतीसमोर राहिलेलें मनोहर दृश्य रसिकांच्या पुढें रेखाटून दाखविण्यास मी दुबळा आहे. ठोमरे अपघातानें वारले हें ज्या दिवशीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें त्या दिवशीं सकाळीं मी गडकऱ्यांकडे गेलों होतों. त्यावेळीं ते आजारी असून अंथरुणावर पडले होते. मी येण्याच्या अगोदरच गडकऱ्यांना ठोमऱ्यांचें वृत्त कळलें होतें. बराच वेळ झाला तरी ते मजबरोबर बोलले नाहींत. अगदीं सुन्न होऊन ते पडले होतें. नंतर कांहीं वेळानें ते एकदम म्हणाले, " ठोमरे गेले ! मलाही एका वर्षाच्या आंतच त्यांच्याकडे जावें लागणार ! ' एवढया शब्दांत गडकऱ्यांचें हृदय सांठविलें होतें !

( २० )

## कोल्हटकर व खाडिलकर

अर्वाचीन नाटककारांत किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर व खाडिलकर यांचीं नाटकें गडकऱ्यांना आवडत असत. कोल्हटकर हे तर त्यांचे गुरू होत तेव्हां त्यांच्या नाटकांविषयीं गडकऱ्यांचें सविस्तर मत काय होतें हें लिहिण्याची आवश्यकताच नाहीं ! कोल्हटकरांविषयीं गडकऱ्यांच्या मनांत विलक्षण आदर व भक्ति असे. ' आपण कोल्हटकरांना चीत केलें आहे ' असा अलिकडे गडकऱ्यांना गर्व झाला होता असें कांहीं लब्धप्रतिष्ठांनीं उठवून ह्या गुरुशिष्यांच्या अलौकिक भक्तिवर आपल्या कुत्सित विचाराचे शिंतोडे उडविण्याचा निर्लज्ज व अधम प्रयत्न केला आहे. असा गर्व गडकऱ्यांना कधींच झाला नव्हता.

" कृतज्ञतेचे अश्रू " " तात्या, ती तलवार एक तुमची बाकी विळे कोयते, " " श्रीपादाची जिथें नांदते कलावती वाणी " हे गडकऱ्यांचे उद्गार जोंपर्यंत मराठी भाषेंत आहेत तोंपर्यंत ह्या गुरुशिष्याच्या जोडींत वितुष्ट आणण्याचा कोणी कसाही प्रयत्न केला तरी तो नादान ठरेल ! " मी कितीही मोठा झालों तरी तात्यांच्या कडेला मी अगदीं मुलासारखा शोभेन ! " असे गडकरी वारंवार म्हणत. आंग्लवाङ्मयांत जॉनसन्–बॉस्वेल हे वाङ्मयसेवक गुरुशिष्य अजरामर झाले आहेत. कोल्हटकर-गडकरी हे गुरुशिष्य त्याहूनही विख्यात ठरतील; कारण, जॉनसनचें चरित्र लिहिण्यापलीकडे बॉस्वेलचा वाङ्मयांत लौकीक नाहीं. पण इकडे, कोल्हटकर–गडकरी हे तोडीस तोड असे खरे वाग्वीर झालेले आहेत. खाडिलकरांविषयीं गडकऱ्यांचें मत अनुकूल नसावें असा पुष्कळांचा गुप्त तर्क आहे आणि गडकऱ्यांचे सच्चे चेले म्हणून गळ्यांत पाटी अडकवून नाचणारे कांहीं शेंदाड कमलबहाद्दर गडकऱ्यांच्या नाटकांची स्तुति करितांना खाडील-करांच्या नाटकावर अचरट तोंडसुख घेऊन, हा सार्वत्रिक समज वाढविण्याच्या दुष्ट मार्गास लागले आहेत. पण हा सर्व वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. 'केसरी'चे संपादक या नात्यानें जरी गडकऱ्यांना खाडिलकर आवडत नसले तरी नाट्यवाङ्मयांतील खाडिलकरांचें श्रेष्ठ स्थान गडकऱ्यांना मान्य होतें. ' प्रेम-संन्यास ' ची एक प्रत त्यांनीं ' अण्णासाहेबांच्या गादीला ' अर्पण केलेली आहे.'

( २१ )

## एक ऐतिहासिक नाटक

थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीवर एक नाटक लिहिण्याचा त्यांचा विचार होता. त्यांतील पहिल्या प्रवेशाची आखणी त्यांनीं करून ठेविली होती. ती अशी:--पानिपतच्या लढाईत पडलेल्या सैनिकांच्या आत्म्यांना पिंड देण्या-साठीं मराठी दरबारांतले प्रमुख सरदार व मुत्सद्दी ओंकारेश्वरच्या वाळवंटावर बसले आहेत. सर्वांनीं अशौच वस्त्रें परिधान केलेलीं असून त्यांच्या तोंडावर भीषण दुःखाची छाया पसरलेली आहे. मध्यभागीं भाताचा एक मोठा पिंड करून ठेविलेला आहे व त्याशेजारी माधवरावसाहेब त्या पिंडाला कावळा केव्हां शिवेल म्हणून उघडया अंगानें वाट पहात उभे आहेत. बराच वेळ झाला तरी कावळा जेव्हां शिवत नाहीं, तेव्हां " तुमच्या उरलेल्या साऱ्या आशा

तृत करीन व पानिपतच्या आघातामुळें कोसळलेली मराठी दौलत पुन्हा पूर्वीच्या वैभवांत उभी करीन ! तुम्ही शांत असा ! ” असें सद्गदित कंठानें मृताम्यांना उद्देशून माधवरावसाहेब म्हणतात, तेव्हां कावळा शिवतो. किती विलक्षण चित्तवेधक प्रसंग ! एवढयावरूनच हें नाटक पुढें कसें काय वठलें असतें याची रसिकांनीं कल्पना बांधावी. ह्या पहिल्या प्रवेशासंबंधीं सहज बोलतांना गडकरी म्हणालें होतें, “ आजपर्यंत महाराष्ट्रांतील नाटककारांनीं निरनिराळया प्रकारचे प्राणी रंगभूमीवर ओढून आणिले असतील; पण कावळा आणणारा मीच पहिला नाटकार होईन !”

( २२ )

## गडकऱ्यांचें जहालपण

गडकऱ्यांना ऐतिहासिक कविता लिहितां येत नव्हत्या असा त्यांचेवर कांहींचा आक्षेप आहे. मराठी इतिहासाचा अत्यंत सूक्ष्म दृष्टीनें अभ्यास करणाऱ्या गडकऱ्यांमारख्या प्रतिभावान कवीला ऐतिहासिक कविता लिहितां आली नसती असें म्हणणें अरसिकत्वाची कमाल करण्यासारखें आहे. ऐतिहासिक कविता लिहितांना महाराष्ट्रविषयीं मनांत वागत असलेला उत्कट देशाभिमान आपल्या काव्यकल्पना भलतीकडे भडकवील अशी तरुणपणीं गडकऱ्यांना भीति वाटत असल्यामुळें त्यांनीं ऐतिहासिक कविता लिहिण्याकडे मुद्दाम दुर्लक्ष्य केलें. महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासांत ज्यांचीं नांवें अमर होऊन राहिलीं आहेत अशीं अनेक विख्यात स्थळें आपल्यापासून जवळ असतां तीं पहाण्याचें गडकऱ्यांनीं जाणून बुजून टाळलें; ह्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे त्यांचा अत्यंत भावनामय स्वभाव होय. रायगड पहावयाला यावयासाठीं कांहीं मित्रांनीं त्यांना आग्रह केला असतां ते म्हणाले, “ रायगडच्या पहिल्या पायरीवर पाय टाकितांना माझ्या सर्वांगाला थरथरून कांपरें भरेल व मी तेथें बेशुद्ध होऊन पडेन !” पुण्यापासून सिंहगड इतका जवळ असतां तो पहाण्यासाठीं आपण कां गेलों नाहीं याविषयीं अनंततनय व माधव या कविश्रेष्ठांजवळ बोलत असतां ते म्हणाले कीं, “ सिंहगडच्या पठारावर मी एकदां चढलों म्हणजे ‘ इंन्डियन पीनल कोड ’ चीं १२४ अ व ब कलमें मला खालीं ओढून आणावयाला असमर्थ ठरतील ! ” हिंदुमुसलमानांचा पूर्वीचा असलेला द्वेषभाव उकरून न काढतां हिंदुस्थानच्या भावी कल्याणाकडे लक्ष्य ठेवून ऐतिहासिक कविता लिहिली पाहिजे

असें गडकऱ्यांचें मत होतें. गडकऱ्यांनीं वृत्तबद्ध ऐतिहासिक कविता जरी लिहिली नसली तरी महाराष्ट्राच्या दुर्दैवानें अपुरें राहिलेलें त्यांचें 'राजसंन्यास' नाटक जोंवर महाराष्ट्रवाङ्मयांत राहील तोंवर गडकरी हे अलौकिक राष्ट्रीय कवि होते, ज्वलज्जहाल देशभक्त होते असा त्यांचा डंका महाराष्ट्रांत सारखा दुमदुमत राहील! 'राजसंन्यास' नाटकाचें विलक्षण चित्तवेधक कथानक, अंगावर थरारून कांटा उभा करणारे एकेक प्रसंग, छत्रपतींच्या पदरीं केवळ्या लोकोत्तर बुद्धीचे, अलोट राजनिष्ठेचे झुंजार वीर होते त्याचा पूर्ण प्रत्यय पटवून देणारीं पात्रें, महाराष्ट्राचा उज्वल स्वातंत्र्यकाळ मूर्तिमंत डोळ्यासमोर उभा करणारे तेजस्वी विचार, प्रस्तुत परिस्थितीचा विसर पडून स्वराज्याच्या वातावरणांत वाढलेल्या चारशें वर्षांपूर्वींच्या राष्ट्रीय समाजांत रसिक मनाला ओढून नेणारी समर्पक भाषा, ज्या अत्युज्वल राष्ट्रीय तत्वावर छत्रपतींनीं स्वराज्याचें भव्य व पवित्र मंदिर उभारलें त्या तत्वाचें विशदीकरण, आणि ह्या सर्वांमधून स्वच्छंद विहार करणारी गडकऱ्यांची काव्यप्रतिभा, ह्यामुळें 'राजसंन्यास' नाटक हें केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भरतखंडांत अद्वितीय व नाट्य-कलेच्या श्रेष्ठ उत्कर्षाचें द्योतक म्हणून गाजलें जाईल. पण पृथ्वीला स्वर्गाची समता येईल म्हणून जगांतील सौंदर्य अपूर्ण ठेविणाऱ्या कृतांत काळाचा अमंगळ हात ह्या 'राजसंन्यास'वरून फिरला आहे आणि गडकऱ्यांच्या वाढत्या कीर्तीला कांहीं अंशीं कमीपणा आला आहे. 'राजसंन्यास'च्या पहिल्या अंकांतील कांहीं प्रवेश व पांचवा अंक सबंध मिळून सुमारें सत्तर पानांचा मजकूर गडकऱ्यांच्या हातून लिहून झाला आहे. तरीही त्यावरून तें नाटक कशा प्रकारचें आहे व त्याचा उरलेला भाग कशा प्रकारें लिहिला गेला असता ह्याची कल्पना करण्याला पुष्कळच वाव आहे. ह्या नाटकाची खाजगी प्रत वाचून महाराष्ट्रांतील एका रसिकश्रेष्ठ विद्वान् संपादकानें असे उद्गार काढले होते कीं "मला जर मुंबई इलाख्याचा कोणी गव्हर्नर नेमलें तर शाळेमधील सारीं इतिहासाचीं पुस्तकें जाळून त्याऐवजीं 'राजसंन्यास' नेमावयाला मी हुकूम सोडीन!"

( २३ )

## मी एक अर्धवट मनुष्य आहें

एकंदर अठरा नाटकें, पांच कादंबऱ्या, अडीचशें कवितांचे चुटके, पंचवीस विनोदी लेख व अडीच हजार अभंग लिहिण्याचा विठ्लाचे चरणापाशीं गड-

कऱ्यांनीं संकल्प सोडला होता. अठरा नाटकें लिहिण्याचें कारण गडकरी असें विनोदानें सांगत कीं 'शेक्सपीअर' हा पूर्ण बुद्धीचा मनुष्य होता. त्यानें छत्तीस नाटकें लिहिलीं. मी एक अर्धवट मनुष्य आहे म्हणून अठरा नाटकें लिहिणार. त्यांचें शेवटचें नाटक 'वंदे मातरम्' हें होतें. गडकरी कादंबऱ्या देखील लिहिणार होते हें ऐकून कित्येकांस आश्चर्य वाटेल. पण आम्हांस असें वाटतें कीं गडकऱ्यांनीं जर कादंबऱ्या लिहिल्या असत्या तर तो कांहीं अद्भुत रम्य प्रकारच झाला असता! पण, श्रमाचा पुष्कळ व्यय होऊन त्याप्रमाणें पैशाचाही कांहीं फायदा होत नाहीं म्हणूनच केवळ गडकऱ्यांनीं कादंबऱ्या लिहिण्याकडे आपलें लक्ष्य वळविलें नाहीं. मध्यंतरीं, 'झेलम' नांवाची कादंबरी त्यांनीं लिहावयास घेतली होती. तिच्यांत 'प्रेमसंन्यास' मधील जयंताच्या चरित्राचा पुढील भाग येणार होता. वेळाच्या अभावीं ही कादंबरी दोनचार प्रकरणांच्या पुढें गेली नाहीं. एवढा भव्य लेखनसंकल्प पूर्ण झाल्यावर विठ्ठलाचे पायावर लेखणी ठेवून महाराष्ट्रवाङ्मयक्षेत्रांत मनोहर बागाईत करणारा हा वनमाळी कोंकणांत आपल्या गांवीं शेतकी करावयास जाणार होता.

---

## रा. आठवले, मनोहर संगीत मंडळी यांजकडून

### ( १ )

### गडकऱ्यांची किर्लोस्कर कंपनींतील नोकरी

गडकरी मास्तर हे सन १९०७ सालांत किर्लोस्कर कंपनींत मुलांना शिकविण्यास मास्तर म्हणून दाखल झाले. त्यावेळीं सदर मंडळींत शाळा असून त्याकरतां मुद्दाम एक सुशिक्षित इसमास मंडळी, शिक्षकाचे जागेवर ठेवीत असे. याच वेळीं किर्लोस्कर संगीत मंडळीचा मुक्काम बार्शीला असून 'मतिविकार' हें नाटक लिहिण्याकरितां कोल्हटकरमास्तर ( श्री. कृ. कोल्हटकर ) हे पुण्याहून मुद्दाम कंपनींत कांहीं दिवस रहाण्याकरतां येण्याचें ठरलें होतें. आमचे नवीन मास्तर व कोल्हटकरमास्तर यांसह अमुक दिवशीं येतो असें रा. शंकरराव मुजुमदार यांचें कंपनींत पत्र आलें होतें, यामुळें आम्ही सर्वांच्या आगमनाची मोठ्या उत्सुकतेनें मार्गप्रतीक्षा करीत होतों. ठरल्याप्रमाणें कोल्हटकरमास्तर कंपनींत यावयाचे, तेही नवीन नाटक लिहिण्यास यामुळें तर मंडळीस फार

आनंद झाला. ठरल्याप्रमाणें कोल्हटकरमास्तर, त्यांचे बंधु, आणखी एक दोन स्नेहीमंडळी व एक अगदीं तरुण पोरगेलेसे गृहस्थ असे पुण्याहून बार्शीचे मुक्कामीं येऊन दाखल झाले. या मंडळींपैकीं इतर मंडळी कंपनीच्या परिचयाची होती; परंतु हे नवीन आलेले गृहस्थ मंडळीस अगदींच नवीन ! त्यांतून बिऱ्हाडांत आल्यापासून त्यांची लगबग, कोल्हटकरमास्तरांशीं सारखें बोलणें, चंचल वृत्ति व तीव्र नजर व त्या नजरेनें बारीक रीतीनें चाललेलें निरीक्षण हें पाहून या गृहस्थाबद्दल मंडळीस मोठी गम्मत वाटली व हे कोण म्हणून चौकशी झाली. तेव्हां समजलें कीं, हे मुलांस शिकविण्यास आलेले नवीन मास्तर ! आरंभीचे तीनचार दिवस गप्पागोष्टी व जेवणखाण यांत गेल्यावर रा. कोल्हटकर यांनीं आठदहा दिवसांत नाटक लिहून मंडळीस वाचून दाखविण्याकरतां बोलाविलें. श्रोतेजनांत गडकरी मास्तर हे प्रमुख होते. प्रत्येक प्रवेशांत त्यांच्या शंका-कुशंका, तारीफ वगैरेचा वर्षाव चालू होता. 'मतिविकार' हें नाटक पूर्ण लिहून झालें, कोल्हटकरमास्तर व इतर मंडळी आपआपल्या गांवीं निघून गेली व गडकरीमास्तरांचे नेतृत्वाखालीं आमची शाळा सुरू झाली. पूर्वीचे उभयतां शिक्षक पोक्त विचारांचे व वयानें प्रौढ असल्यानें ते वर्ग नियमित व शांतपणें घेत. याचे उलट गडकरीमास्तर यांचा स्वभाव चंचल व पोरकट असल्यानें शाळेचें पहिलें स्वरूप पार बदलून गेलें, व मंडळींत त्यामुळें मास्तरांची चेष्टा सुरू झाली. कोणी मुलगा गैरहजर असला व कोणी अभ्यास केला नसला तर हे त्यास कडक शिक्षा करीत. किंवा त्यांनींच लिहिलेल्या अर्डीच पानें नाटकांतील प्रो. कोटिवुद्धे याप्रमाणें उलट वर्तणूक करून नाटकमंडळींतील एका लहान मुलापुढें पांडित्याच्या गोष्टी झोकत ! असें मास्तरांचें कित्येकदां वर्तन होत असे. गडकरी हे गणित, इतिहास वगैरे जे नेमलेले विषय असत ते फार खुबीनें समजावून देत तर कित्येकदां अभ्यास बाजूला राहून कोल्हटकर यांची नाटकेंही समजावून देत असत. गडकरी यांचा स्वभाव फार लहरी असे. एकदां कंपनींतील दोन मुलांस एका वर्षांत मॅक्ट्रीला बसतां येईल इतकी त्यांची तयारी करून देण्याचें ठरलें. गडकरी यांनीं पहिलीपासून सातवी यत्तेपर्यंतचीं सर्व पुस्तकें दोन्ही मुलास स्वतां खरेदी करून दिली. दोघांपैकीं एक विद्यार्थी कै. जोगळेकर यांचे ताब्यांत देण्याचें ठरलें व दुसरा विद्यार्थी, गडकरी यांनीं शिकविण्यास घेतला. रोज नियमित शिकविण्यास सुरवातही झाली. परंतु जळगांवचा कंपनीचा मुक्काम आटोपल्यावर या अभ्यासाचीही समाप्ती झाली.

( २ )

## गडकरी व मूकनायक

मास्तरांना खरा आनंदाचे पर्वणीचा दिवस म्हणजे ज्या दिवशीं 'मूकनायक' नाटक असेल तो ! या दिवशीं ते खूप मजेंत असत. दिवसां शिक्षणाचें काम व खेळाचे दिवशीं डोअरकीपरचें काम करावें लागे, व त्यांची योजना पहिल्या म्हणजे खुर्चीचे दरवाज्यावर होत असल्यानें तेथून सर्व नाटक गडकऱ्यांना उत्तम प्रकारें दिसे. नाटक चालू असतां गडकरी प्रत्येक खेपेस तें मनापासून पहात. मूकनायक नाटक असलें म्हणजे त्यांचें सर्व लक्ष नाटकाकडे असे ! व त्या भरांत कित्येकदां ते डोअर सोडून सरकत सरकत प्रेक्षकांमध्यें जाऊन तद्रूप होऊन बसत. सुप्रसिद्ध नट बोडस हे त्यावेळीं प्रतोदाची भूमिका करीत. त्यांची ही भूमिका प्रसिद्धच आहे. पण समोर गडकरी काम पहात आहेत असें बोडसांना दिसतांच त्यांच्या कामाला खूपच रंग यावयाचा. सूक्ष्म व मार्मिक अभिनय बोडसांनीं करावयाचा व नाटक चालू असतांना आंत येऊन किंवा पहांटे जेवणाचे वेळीं तुम्ही अमुक प्रसंगीं अमुक ॲक्टिंग केलें वगैरे अगदीं खुलासेवार चर्चा करून सांगावयाचें. बोडस उपजत नट, त्यांतून गडकरीमास्तरांसारख्यांचा त्यांस सहवास यामुळें मतिविकारमधील 'विहार' प्रेमशोधनमधील 'कंदन' या भूमिका त्यांच्या उत्कृष्ट होत असत, आणि या भूमिकांचे गडकरी हे एकनिष्ठ भक्त असत.

( ३ )

## फर्ग्युसन कॉलेज व त्यांतील प्रोफेसर

कंपनींतील मुलांपैकीं निदान बारा मुलें तरी मॅट्रीक पास होऊन कॉलेजांत-तींही फर्ग्युसन कॉलेजांत जावीं अशी मास्तरांची फार इच्छा होती. यासाठीं लहर लागली कीं, ते फार मेहनत घेत. पण तीच लहर फिरली कीं पुन्हां पूर्वी-प्रमाणें बाष्कळपणें काम चाले. बाकी हें जरी कारण होतें तरी त्या वेळच्या मुलां-पैकीं कोणी निग्रह करून चिकाटीनें अभ्यास केला असता तर निदान दोनतीन मुलें तरी खालीनें कॉलेजपर्यंत पोंचलीं असतीं. फर्ग्युसन कॉलेजमधील त्या वेळच्या प्रोफेसरांचे, गडकरी यांच्यावर फार प्रेम होतें. गडकऱ्यांना सर्व अध्या-पकांत प्रि. परांजपे व प्रो. भाटे यांच्याबद्दल फार आदर व अभिमान वाटे. फर्ग्युसन कॉलेजबद्दल तर त्यांना इतकी पूज्यबुद्धि होती कीं एकादां विषय

निघून कॉलेजलाईफबद्दल बोलणें निघालें असतां कॉलेज व त्यांतील शिक्षकवर्ग यांची स्मृति होऊन गडकरी मास्तरांचे नेत्रांत आनंदाश्रु येत व अशा प्रसंगीं कृतज्ञतेनें डोळे मिटून अनेक प्रणिपात केल्याचे प्रस्तुत लेखकानें अनेकदां पाहिलें आहे. "फर्ग्युसन कॉलेज" "फर्ग्युसन कॉलेज" असें नाटकांतील विरही नायकाप्रमाणें ते कित्येकदां उद्गार काढीत असत, हे त्यांच्या अगदीं निकटच्या परिचयाची जी मित्र मंडळीची तुकडी असे तिनें कित्येकदां वरील उद्गार त्यांचे मुखांतून निघाल्याचें ऐकलें असेलच. गडकऱ्यांवर रँग्लर यांचें प्रेम किती असें याचें एक उदाहरण देतां येण्यासारखें आहे. एकदां किर्लोस्कर कंपनीचा मुक्काम असतांना गडकरी मास्तर यांना लहर आली व त्यांनीं नाटकांतील मुलांची परीक्षा घेण्याकरतां रँ. परांजपे यांना बोलाविण्याचें ठरविलें व शंकरराव मुजुमदार, जोगळेकर यांस ही गोष्ट कळविली. रँ. परांजपे कंपनीच्या बिऱ्हाडीं येऊन नाटकांतील मुलांच्या शाळेची परीक्षा घेणार ही कल्पना सर्वांस आवडली, व मंडळींस फार आनंद झाला. परंतु या अगदीं सामान्य विषयाकडे रँग्लर यांचें लक्ष जाऊन ते येतील किंवा नाहीं ही सर्वांस शंकाच होती. परंतु उतावळ्या स्वभावास अनुसरून त्यांनीं ताबडतोब रँग्लर यांची भेट घेऊन अमुक दिवशीं येतों असें त्यांच्याकडून कबूल करून घेतलें. मुलें आपआपलीं पुस्तकें घेऊन रँग्लर यांची मार्गप्रतिक्षा करीत बसलीं. ठरलेल्या वेळीं मास्तर रँग्लरसाहेबांना घेऊन आले. कंपनींतील प्रमुख व्यक्तींनीं त्यांचें स्वागत करून परीक्षा घेण्याचें काम चालू झालें. थोडक्याच वेळांत परीक्षा संपल्यावर मुलांची शिस्त व अभ्यास पाहून रँ. परांजपे यांनीं किर्लोस्कर संगित मंडळींतील चालकांचें अभिनंदन केलें. यानंतर अल्प उपहाराचे वेळीं गडकरी मास्तर यांच्या संबंधानें विनोदानें व कौतुकानें बरेंच बोलणें होऊन त्यांत मास्तरांचे बुद्धीमत्तेची फार तारीफ केली व रँ. साहेबांनीं कंपनीचा निरोप घेतला. ही हकीगत १९०८ सालीं पुणें येथें गणेशपेठेंतील आर्यभूषण थेटरांत घडली. त्यावेळीं किर्लोस्कर थेटर बांधलें नव्हतें.

( ४ )

## गडकरी यांची फजिती झाली

गडकरी मास्तरांचे वास्तव्य किर्लोस्कर कंपनींत पांच सहा वर्षे होते. कंपनींत नाटकांतील इतर मंडळी प्रमाणेंच त्याचा आयुष्यक्रम असे. शाळेची नोकरी,

नाटकाचे दिवशीं डोअरवर बसणें व इतर वेळीं गप्पागोष्टी करीत बसणें असाच त्यांचा क्रम होता. मधूनमधून मात्र त्यास वाचनाची व इंटरचे परीक्षेस बसण्याची हुक्की येई व ते अभ्यासाचा व वाचनाचा तडाका लावीत. नेहमीं अव्यव्यवस्थित वागणूक असलेले गडकरी मास्तर एकदां मनांत घेऊन अभ्यास करण्यास बसले कीं सबंध रात्रभर आसन मांडी हालवीत नसत. हें पाहून मंडळीस आश्चर्य वाटत असे. कंपनींत असतां इंटरला बसण्याची लहर त्यांना दोन तीन वेळां आली. एकदां तर टर्मचे पैसे भरून परीक्षेला कोणती पुस्तकें लागतात तीं विकतही घेऊन आले. अशा वेळीं मास्तरांचे अभ्यासास व्यत्यय न आणण्याचा बोडस वगैरे स्नेही मनापासून प्रयत्न करीत. परंतु चारआठ दिवस मास्तरांचे अभ्यासांत गेल्यावर ते टंगळमंगळ करीत. व नेहमींप्रमाणें पत्तें, क्रिकेट, गप्पा यांत सामील होत. मधून मधून वाचनही चाले परंतु केव्हां केव्हां त्यास उसंळी येऊन वाचनांत बराच वेळही जाई ! बहुतेक गांवच्या लायब्ररींत त्यांचें नांव असे व एकाद्या लायब्ररींत पुस्तकसंग्रह भरपूर असलेला पाहून त्यांना समाधान होई. त्यांचें वाचनही एकांगी नसे. एकदां मराठींतील ग्रंथ वाचावयास सुरवात केली म्हणजे तेंच चालू राही. तुकाराम, मोरोपंत, रामदास, वामनपंडित इत्यादिकांच्या ग्रंथाचे त्यांनीं चांगले परीश्रमपूर्वक परिशीलन केलें होतें. त्याचप्रमाणें इंग्रजी ग्रंथाचेही त्याचे वाचन असे. इंग्रजी ग्रंथातील कांहीं प्रसंग त्याना इतकें आवडत कीं; ते अगदीं लेखकांवर फीदा होत. मास्तर इतरवेळीं इतकें बोलत असत पण एकादे वेळीं आभार मानावयाचा त्यांच्यावर प्रसंग आला तर त्यांची बरीच त्रेधा उडत असे. किर्लोस्कर मंडळींत असताना असे तीन चार वेळां प्रसंग आले होते. अगदीं पहिला प्रसंग प्रस्तुत लेखकास आठवतो तो म्हणजे पुणें आर्यभूषण थिएटरमधला. मला वाटतें त्या दिवशीं ‘ मूकनायक’ खेळ होता. शंकरराव मुजुमदारांनीं गडकऱ्यांना प्रेक्षकांसमोर जाऊन आभार मानावयास सांगितले. त्या सालीं “ मूकनायक ” अत्यंत लोकप्रिय असून या नाटकाचे प्रयोगास सुशिक्षित मंडळी व कॉलेजातील विद्यार्थी यांचा भरणा असे. त्यावेळीं ‘ बालगंधर्व ’ पुण्यातील प्रेक्षकांना नवीन होते. ते सरोजिनी, रा. जोगळेकर विक्रांत, रा. बोडस प्रतोद, चिंतोबा गुरव क्यूर, व रा. हडपे शरश्चंद्र, अशी ज्या त्या कामावर योग्य ती मंडळी होती. यामुळें नाटकाचा प्रयोग कसा होत असे व त्यास अखेर पर्यंत किती रंग भरत असे

-याची कल्पना त्यांवेळच्यां प्रेक्षकानाच होईल. असो, हें नाटकही त्या दिवशीं कोणत्या तरी संस्थेस धर्मार्थ दिलें होतें. नाटकास गर्दी अतिशय होती. गडकरी हुशार विद्यार्थी व संस्कृत स्कॉलर म्हणून विद्यार्थ्यांत परिचित होते; शिवाय ते डोअरवर असल्यानें नाटक कंपनींत गेल्याचेहि त्यांना सहजच समजलें. म्हणून ज्यावेळीं गडकरी स्टेजवर आले त्यावेळीं प्रेक्षकांत मोठें कुतुहल उत्पन्न झालें असल्यास आश्चर्य नाहीं. सुरवातीचीं तनिचार वाक्यें मास्तरांनीं धिटाईनें म्हटल्यावर प्रेक्षकांत समोरच असलेले कॉलेजातील प्रोफेसर व पुढच्या परिचित विद्यार्थ्यांचा घोळका पाहून मास्तरसाहेब गांगरले. मास्तर स्टेजवर जाण्याकरतां जेव्हां बाहेर गेले तेव्हां बोडस वगैरे त्यांचे स्नेहीमंडळीस कल्पना येऊन ती सर्व मंडळी वुइंगमध्यें येऊन मजा पाहात उभी होती. मास्तरानीं भाषण संभाळून नेण्याचा बराच प्रयत्न केला. शेवटीं गोंगाट कमी होत नाहीं असें पाहतांच प्रेक्षकांमधील विद्यार्थ्यांकडे हातवारे करून ' मी भ्यायलों नाहीं. तुमच्या पैकींच मी एक आहे ' वगैरे वगैरे बरेंच सांगितलें तरी प्रेक्षक शांत न होता टाळ्याशिटांचा वर्षाव आधिकच वाढूं लागला. शेवटीं कसेंबसें भाषण पुरें करून प्रेक्षकांचा निरोप घेणें मास्तरास भाग पडलें. दुसरें दिवशीं मंडळींत त्यांचे भाषणाची नक्कल सुरू झाली ! व जो तो मास्तर घरांत तुमचें बोलणें चालूं असतें मग काल रात्रीं प्रेक्षकांसमोर जातांच तुमची त्रेधा कां उडाली. असें म्हणून चिडवूं लागला ! मास्तर एऱ्हवी बोलण्यांत कोणास कधींच हटत नसत. उलट आपल्या भाषणचातुर्यानें प्रतिपक्षास अगदीं चीत करीत असत. विशेषत: बोडसांची व त्यांची बैठक प्रत्येक मुक्कामीं एके ठिकाणीं असे, म्हणून असे हल्ले बोडसावर वरचेवर होत असत आणि गडकऱ्यांच्या कोटीक्रमापुढें ते निरुत्तर होऊन खिजतही. गडकऱ्यांचा कसा वचपा काढावा हा त्यांना नेहमीं विचार पडे ! शेवटीं अनायासानें हा योग आला. एकदा गुप्त मंजूष नाटकाचा प्रयोग होता. त्यांत बोडसाना 'शृंगी ' या पात्राची भूमिका असे. नाटकाचे नादानें बहकलेले असें हें पात्र असून याला ध्यानींमनीं सर्व नाटकांतील प्रसंगच दिसतात. उपमा, उदाहरण द्यावयाचे तेंही नाटकांतील; नेहमींचे बोलण्यांत या नाटकाचे तिसरे अंकांत राजकन्येच्या स्वयंवराकरतां देशोदेशींच्या राजांची राजसभा जमते; त्यांत राजकन्येचा अभिलाष धरणारे शृंगीराजही हजर असतात. राजाचा मुख्य मंत्री कैलासनाथ हा कांहीं अटी सभासदांस सांगतो.

त्यांत तीन प्रश्न असतात. त्यांचीं योग्य उत्तरें देण्यास राजकन्येची प्राप्ती व्हाव-याची अशी अट असते. या राजसभेंत अनेक राजे राजपुत्र जमून प्रश्न सोड-वितांना त्यांच्या अकलेचें प्रदर्शन उत्तम होऊन हास्यरसाचे फवारे सारखे चालू असायचे. हा प्रवेश चालत असतांना गडकरी मास्तर अगदीं सर्वांचे-पुढें येऊन हा प्रवेश मोठ्या आवडीनें पाहूं लागले. कैलासनाथांनीं प्रश्न सांगून त्यांचीं उत्तरें एकदोन राजपुत्रांनीं वेडगळासारखीं दिलीं. शेवटीं शृंगीराजावर पाळी आली. बोडस हे गंभीर मुद्रा करून राजसभेंत उभे राहिले व प्रश्नांचीं उत्तरें विचित्रच देऊं लागले. दरबारांतील मंडळींनीं शृंगीची चेष्टाच करावयास सुरवात केली. तेव्हां ते गांगरून अडखळत भाषण करूं लागले, 'खालीं बसा भाषण पुरें करा.' असे उद्गार निघतांच गडक-ऱ्यांचीं जिरविण्यास ही वेळ बरी आहे असें पाहून व समोर गडकरी मास्तर बसले आहेत हें लक्ष्यांत धरून त्यांचे आभारप्रदर्शनार्थ ठरलेल्या भाषणाची हुबेहुब नक्कल करून त्यांच्याप्रमाणें 'मी घाबरलों नाहीं.' "तुमच्यांपैकींच मी आहें." असें त्यांच्या झालेल्या भाषणाचें अनुकरण केलें. त्यामुळें प्रेक्षकांत व स्टेजवर बसलेल्या पात्रांत व सर्व मंडळींत हशांच हंशा झाला. स्वतांवर झालेला हा अवचित घाला पाहून गडकरी खजील झाले यांत आश्चर्य नाहीं. ते इतकें कीं, खुर्ची सोडून प्रेक्षकांत येणें त्यांना भाग पडले.

( ५ )

## दीड तास अस्खलित भाषण

एकदां प्रो. छत्रे यांच्या सर्कशीचा मुक्काम मलकापूर येथें होता, तेव्हां सर्कशींतील काम करणाऱ्या बायका, मुली व सर्व मंडळी नाटक पहावयास आले असतां गडकरी मास्तर यांच्यावर भाषण करण्याचा पुन्हा प्रसंग आला. त्यावेळींही भाषण करण्याचें त्यांना नीटसें साधलें नाहीं, व त्यांची फजिती झाली. दुसरे दिवशीं मास्तर सर्कस उतरली होती तेथें कांहीं कामा करतां गेले. त्यावेळीं सर्कशींतील लहान मुले व मुलीं आदले दिवशीं गडकरी मास्तरांनीं खिशांत हात घालून घाबरटपणें जसें भाषण केलें होतें त्यांची नक्कल त्यांचे समोर करून दाखविली. परत आल्यावर खुद्द मास्तरांनींच ही हकीगत कंपनींत सांगितली. अशा निरनिराळ्या प्रसंगीं त्यांचे भाषण नीटसे जमले नाहीं. तरी आणखी एका प्रसंगीं त्यांचें स्वतंत्र व्याख्यान विद्वान लोकांच्या समोर

दीड दोन तास पर्यंत झालें व ते अगदीं उत्तम प्रकारें झालें. प्रेमसंन्यास नाटक महाराष्ट्र मंडळीकडून नुकतेंच आलें होतें व त्यांची किती अनुकूल प्रतिकूल टिकेमुळें सर्व महाराष्ट्रभर झाली होती. यावेळीं महाराष्ट्र मंडळीचा मुक्काम कोल्हापुरास होता. 'प्रेमसंन्यास' चे प्रयोग धडाक्यानें चालले होते. हे नाटक तेथें अत्यंत लोकप्रिय झाले. या सुमारांस कोल्हापुरांतील कांहीं रसिकवृंदांनीं तेथील लायब्ररीतर्फे एक व्याख्यान करण्याचें ठरविलें व महाराष्ट्र कंपनीकडून गडकरी मास्तरास अत्यंत आग्रहानें बोलाविले. त्यांनींही कोल्हापूरास 'कवि व काव्य' हा विषय घेऊन व्याख्यान देण्याचें कबूल केलें. सदर व्याख्यानास ना. जाधव हे अध्यक्ष होते. प्रेमसंन्यासामुळें गडकऱ्यांचें नांव सर्वतोमुखीं झाल्यानें त्यांचे व्याख्यान ऐकण्यास व ही व्यक्ती कशी काय आहे तें पहाण्यास कोल्हापुरांतील बराच लोकसमुदाय लोटला होता! या गोष्टीस बराच काळ लोटल्यानंतर गडकरी मास्तरांस आम्ही विचारलें कीं, पूर्वींच्या तीनचार प्रसंगांची आठवण होऊन. यावेळींही तुम्ही घाबरला असाल." त्यावर मास्तर म्हणाले. 'मी थोडासा घाबरलो हें खरें पण पूर्वींचे प्रसंग म्हणजे आभार प्रदर्शनासारखी सामान्य भाषणें होती म्हणून मला तें जमले नाहींत. पण आतांचे हें स्वतंत्र भाषण असून विषयही माझ्या अनुभवाचा असल्यामुळें मला धीर झाला. तरी ऐनवेळीं मी गडबलोंच, परंतु ती चलबिचल इतरांचे मीं लक्षांत येऊं दिली नाहीं. शेवटीं मला तशाच गोष्टीची आठवण झाली, ती म्हणजे सर्व धर्म परिषदेपुढेंही स्वामी विवेकानन्द हे प्रथम उभे राहले त्याची होय! त्यांचे मी स्मरण केले. व देवी सरस्वतीचें चिंतन करून मी भाषणास सुरवात केली. हें माझें भाषण दीडदोन-तास झालें. मधुनमधून संमतीदर्शक टाळ्या व हंशा होतसे त्यामुळें मला धीर येई. मला इतका वेळ एकदम बोलता कसें आले याचें मलाहि आश्चर्य वाटलें. परंतु देवी सरस्वतीनें जशी स्वामिजीस स्फूर्ती दिली तसाच मजवरही अनुग्रह झाला!"

(५)

## नामदार जाधवराव यांनीं केलेला गडकऱ्यांचा अपमान

अक्कासाहेब महाराजांचा विवाह होता. विवाहसमारंभाची कोल्हापुरांत अगदीं गडबड उडून गेली होती. किर्लोस्कर कंपनीनें तेथील श्री. हिम्मत बहा-

इर यांच्या पार्गेतील जागेत टुमदार थेटर बांधून, तें उत्तम प्रकारें शृंगारून त्यांत सरकारी प्रयोग चालू केले होते. मॅरेज कमेटीचे प्रेसिडेन्ट ना. जाधव असल्यानें त्यांची सर्वत्र देखरेख असे. एके दिवशीं सरकारी खेळ नेहमीपेक्षां जरा लवकर सुरूं करण्याबद्दल सूचना आली होती. ज्या त्या डोअरची मंडळी आपआपले ठिकाणीं बसण्याच गडबडींत होती त्याप्रमाणें गडकरी मास्तर आपला नेहमीचा पोषाख–शर्ट कोट व बंगलोरी टोपी–घालून खिशांत हात घालून डोअरचे आसपास फिरत होते. इतक्यांत जाधवरावांची स्वारी दरबारी युनिफॉर्ममध्यें त्या ठिकाणीं येऊन दाखल झाली. निमंत्रित पाहुणे मंडळी नाटक पहाण्यास येणार होती व त्यांचे बसण्याची वगैरे काय सोय केली आहे तें पहाण्याकरतां त्यांचे येणें झालें होतें. जाधवराव यांचा दरारा व शिस्त बरीच कडक असे. त्यामुळे तो मोठ्या डौलानें व ऐटींत इकडे तिकडे फिरून मंडळीस निरनिराळ्या सूचना देत होते. या कामांत बराच वेळ गेल्यानंतर जाधवरावांची स्वारी मास्तर यांचे डोअर नजीक हातावरील काठीवर भार देऊन उभी राहिली. त्यांचें उभे राहणें म्हणजे दरबारी नोकर वर्गांत "मी फिरून व दमून उभा राहिलो आहे तरी खुर्चीची मला जरूरी आहे" अशा आशयाची ती सूचना होती. परंतु त्यांचेजवळ न कळत सूचना घेणार , कोणी नव्हत. पण समोर गडकरी मास्तरांनीं हा सर्व प्रकार ओळखला होता. जरा वेळ गेल्यानंतर गडकरी मास्तरांना आतून एकादी खुर्ची घेऊन येण्यास जाधवरावानीं जोरानें फर्माविले. गडकरी मास्तर यांस जाधवरावांच्या हुकमाचा राग आला. पण तो दाखविला नाहीं त्यांनीं पूर्वीप्रमाणेंच फेऱ्या मारण्याचा क्रम चालू ठेवला. जाधवराव म्हणजे बडे प्रस्थ !! त्याना हा आज्ञेचा उपमर्द कसा सहन होणार ! ते रागारागानें गडकरी मास्तर यांचे जवळ येऊन म्हणाले, 'का हो मी तुम्हांला सांगितलें तें ऐकू नाहीं कां आलें?" मास्तरांनीं नुसते आले असें उत्तर दिलें. तेव्हां जाधवराव तेथें असणाऱ्या एका मनुष्याकडे वळून म्हणाले " हा कोण मग्रूर मनुष्य ? " हें ऐकून मास्तरांनीं त्यांची खरपूस हजेरी घेतली आणि ' मला बिनदिक्कत खुर्ची आणावयास सांगितलें. पण मलाच सन्मार्गपूर्वक खुर्चीवर बसविण्याचा प्रसंग तुमच्यावर येईल " असे गडकरी शेवटीं म्हणाले. आणि सुदैवानें तसें झालेंही या आठवणीचे पूर्वीचे आठवणींत कोल्हापुरांतील गडकऱ्यांच्या व्याख्यानासंबंधींची आठवण दिली आहे. तें व्याख्यान ज्या दिवशीं झालें त्या दिवशीं किंवा त्यानंतर एक

दोन दिवसांनीं ना. जाधव यांनीं गडकऱ्यांना आपल्या घरीं पानसुपारी केली. त्यावेळीं डोअरवर उभे राहणारे गडकरी ' प्रेमसंन्यास ' नाटक व कविता यामुळें बरेंच प्रसिद्धीस आले असल्यानें पहिल्या म्हणजे डोअरवरच्या गडकऱ्यांची व त्यांच्या मगरूरपणा (?) ची ना. जाधव यांना मुळींच आठवण राहिली नव्हती. ज्यावेळीं गडकऱ्यांच्या गळ्यांत ना. जाधव यांनीं फुलांचा मोठा हार घालून गौरव केला त्यावेळीं जाधवांना पूर्वीं केलेल्या अपमानाची जरी आठवण झाली नाहीं तरी गडकऱ्यांना झाली व त्यांनीं ती बोलूनही दाखविली. तेव्हां दोघेही पोटभर हंसले.

( ६ )

## ' गर्व निर्वाण ' नाटकाची कहाणी

किर्लोस्कर कंपनींत असतांना मास्तरांनीं " गर्व निर्वाण " या नांवाचें भक्त प्रल्हाद या कथानकावर नाटक लिहिण्यास प्रारंभ केला. या नाटकाचा बराचसा भाग त्यांनीं आपल्या लहरी स्वभावास अनुसरून सावकाश सावकाश लिहून तयार केला. या नाटकांतील पद्यें सुंदर व रसिक अशी झाली आहेत. मूळ चालीबरहुकूम पद्यांत शब्द योजना करणें म्हणजे त्या योगानें मूळ चालीचे स्वारस्य पदयांत येते. आणि हें काम अत्यंत कुशलतेचें आहे. कित्येक वेळां मूळ चालीतील अक्षरांच्या मात्रा पण मोजून त्याबरहूकूम पद तयार झाले तरी तें शास्त्रोक्त रितीनें तयार होईल. परंतु त्याहीपेक्षां सूक्ष्म नजरेनें फार नाजूक व सफाईदार अशी पदांत शब्दयोजना करण्याचा प्रसंग येतो व मास्तर हे सर्व भेद ध्यानांत ठेवून पद्य रचना करीत असत. गर्वनिर्वाण मधील प्रल्हादाची ' पदे फार गोड झाली आहेत. या नाटकांत राजा हिरण्य कश्यपू याची भूमिका फार जोरदार रितीनें रंगविली होती. आणि बोडसांचें हें काम अत्यंत आवडीचे होते, म्हणून या नाटकाचे तालमीस वगैरे ते फार उत्सुक असत. प्रधान भीष्मपाल या भूमिकेबद्दल मात्र कै० जोगळेकर हे फार नाराज होते. त्याचें कारण ' हिरण्यकश्यपू ' या नाटकांत मुख्य नायक होता. व लोकपाल प्रधान ही दुसऱ्या नंबरच्या दर्जाची भूमिका होती. हे नाटक किर्लोस्कर कंपनीकरितां लिहिलेले असून ते बसविण्याकरितां तीन चार वेळा सुरुवात केली होती. परंतु ते पूर्ण बसविण्याचा योग अनेक कारणामुळें शेवटीं आला नाहीं. तीन अंकापर्यंत हें नाटक उत्तम बसलें. वर्धा मुक्कामीं या नाट-

ाचा दुसरा अंक बसला. यांत हिरण्यकश्यपू हा कयाधूकडून प्रल्हादास विष पाजवितो असा सीन आहे. हा सीन मास्तरांस अप्रतिम साधला होता. यांतील प्रल्हाद व कयाधूचीं भाषणें करुणरसानें परिप्लुत असून तालमीस हा प्रवेश सुरू झाला म्हणजे सर्व मंडळी स्तब्ध बसून प्रत्येक भाषणाचे वेळीं मंडळीचे नेत्र अश्रूंनीं भरून यावयाचे ! रा. बालगंधर्व यांसही हा प्रवेश फार आवडत असे आणि या प्रवेशाची तालीम जेव्हां प्रथम झाली तेव्हांच मंडळीस मास्तरांचें लेखन कशा प्रकारचें आहे याची कल्पना झाली. आणि कांहीं दुढ्ढाचार्य व्यक्तींना या पोरकट शाळामास्तराचे ठिकाणीं बुद्धीची कांहीं विशेष चमक आहे याचा अंदाज येऊन ही मंडळी मास्तरांशीं मास्तरांची योग्यता पाहून वागूं लागली. एकदां वर्ष्यासि या नाटकाचे चार अंकांची रंगीत तालीम झाली. तालमीस कंपनींतील मंडळीखेरीज कांहीं प्रमुख अशा गांवांतील लोकांना मुद्दाम बोलावणें केलें होतें. हें नाटक पाहून सर्व प्रेक्षक थक्क झाले. त्यांतील करुण व हास्यरस प्रेक्षकांना अतिशय आवडला; पण इतकें उत्तम नाटक असूनही किर्लोस्कर कंपनीनें तें कां बसविलें नाहीं अशी शंका येईल व ती बरोबरही आहे. किर्लोस्कर कंपनीनें हें नाटक बसविणें अगदीं योग्य होतें हें खरें पण आमचा असा समज आहे कीं एक तर हें नाटक अपूर्ण व नाटकाचे तालमीस कित्येक वेळा सुरवात होऊन त्या बंद पडत. याचें कारण तालमीस सुरवात झाली म्हणजे कंपनिवर कांहींना कांहीं आपत्ती येई. अशा योगायोगामुळें या नाटकास 'अपेशी' 'अपशकुनी' असा आरोप होता. शिवाय वर लिहिल्याप्रमाणें कै. जोगळेकर यांच्याकडे दुय्यम दर्जाची भूमिका होती. बोडस हे हीरो, व त्यांजपुढें आपण अशा प्रकारें काम करण्यांत जोगळेकरांना वैषम्य वाटत असे म्हणून त्यांनीं नाटक बसविण्यास प्रतिबंध जरी केला नाहीं, तरी नाटक बसावें यासाठीं पाहिजे तितकी मेहनतही त्यांनीं घेतली नाहीं. त्यांचें या नाटकाचें बाबतींत सर्वस्वीं दुर्लक्ष असे. बाकी हें नाटक कंपनीनें प्रयत्न केला असता तर पूर्ण लिहिलें जाऊन मास्तरांचें पहिलें नाटक बसविण्याचा मान किर्लोस्कर मंडळीचे पूर्वपरंपरेस अनुसरून तिला मिळाला असता. मास्तरांची योग्यता व त्यांचें लेखनकौशल्य यांची पूर्णपणें जाणीव

असून मंडळींतील प्रमुख जबाबदार व्यक्तींचे याप्रसंगीं फारच अनुदार व बेपर्वा-ईचें वर्तन झालें असें म्हणावें लागतें.

( ७ )

## कोल्हटकर यांचीं पदें

नगर येथें असतां मास्तरास लहर आली व पुस्तकें मागवून जारीनें अभ्यास करण्यास सुरवात झाली. सभोंवारची मित्रमंडळीही त्यांस त्रास होऊं नये म्हणून बोलण्यांत किंवा इतर गोष्टींत यत्किंचित् गुंतवून न ठेवतां त्यांना एकांत वेळ मिळावा व त्यांच्या अभ्यासांत व्यत्यय येऊं नये म्हणून खबरदारी घेत. एकादे वेळीं आळसानें ते अळंटळं करूं लागले तर बोडस किंवा शंकरराव त्यांस दटा-वून अभ्यास करा, परीक्षा जवळ आली ती पास झाली पाहिजे म्हणून प्रेमळ-पणानें सांगत असत. पण चार दिवस अभ्यास झाल्यावर लहर फिरली व नेहमींप्रमाणें पुस्तकें पेटींत ठेऊन कार्यक्रम सुरू झाला. यावेळीं अभ्यासांतून मन उडण्यास एक निमित्त झालें. कोल्हटकर मास्तरांकडून ‘ मतिविकार ’ मधील पद्यें तयार होऊन आलीं होतीं. त्यांच्या पूर्वीच्या नाटकांच्या मानानें पहातां ही पदें अगदीं सोपीं, साधी व क्वचित प्रसंगीं निरस अशीं झालीं होतीं. मास्तरांनीं हीं पदें वाचून कोल्हटकर यांची फारच थट्टा केली ! “ इतुक्यांत झपाट्यासरशी– पद्यें हीं कैशीं केलीं–मास्तर ” अशा कवितेनें कोल्हटकर यांस मास्तरांनीं आपला अभिप्राय कळविला.

---

# श्री. वि. स. खांडेकर यांजकडून

( १ )

## माझी ओळख

पुण्यांत मी कॉलेजच्या शिक्षणाकरितां पाऊल टाकलें त्यावेळीं सरस्वती-बरोबरच तिच्या एका लाडक्या पुत्राच्या कृपेचा लाभ आपल्याला होणार आहे याची मला कल्पनाही नव्हती. गडकऱ्यांचें प्रेमसंन्यास तत्पूर्वी २ वर्षें रंग-भूमीवर आलें होतें व तें मीं पुण्याला येण्यापूर्वीच वाचलेंही होतें. सृष्टिसौंदर्य पाहून एवढें सौंदर्य निर्माण करणारा ईश्वर कुठें बरें असेल अशी कल्पना मनांत उद्भवून ईश्वरविषयक विचारांना जशी चालना मिळते त्याप्रमाणें प्रतिभाविलास

होन त्या प्रतिभेच्या उगमाविषयींही सादर कुतूहल जागृत होतें. असें कुतूहल असूनही गडकऱ्यांची प्रत्यक्ष भेट मी पुण्यांत गेल्यानंतर सहा महिन्यांनीं झाली. ही भेट सहज रस्त्यांत झाली अगर माझ्या कुतूहलाला उधान ( भरती ) येऊन त्याची लाट गडकऱ्यांच्या घरापर्यंत जाऊन थडकल्यामुळें घडली असें मात्र नव्हे. माझी विरोधभक्तीच त्याला कारणीभूत झाली. मी कोल्हटकरांच्या नाटकांचा जेवढा भोक्ता व भक्त तेवढेंच माझे एक स्नेही गडकऱ्यांच्या लेखनाचे होते. या गुरु–शिष्य–तुलनेंत माझ्या स्नेह्यांनीं, गुरूंनीं लेखन–संन्यास घ्यावा असें सुचवितांच शिष्यांनीं नकलाच काढीत बसावें असा मी टोमणा मारला. हा नकलांचा बाण त्या वाग्युद्धाबाहेर जाईल असें मला वाटलें नव्हतें. पण त्याचा आवाज गडकऱ्यांच्या कानापर्यंत गेला व मला आरोप सिद्ध करून देण्याबद्दल आमंत्रणरूपी आव्हान आलें.

( २ )

## मी गोंधळून गेलों

मास्तरांनीं ( गडकऱ्यांबद्दल त्यांच्या मित्रमंडळींत हाच शब्द त्यावेळीं रूढ होता. ) प्रेमसंन्यासावरील चोरीचा व नकलेचा आरोप सिद्ध करून देण्याकरतां बोलावलें आहे हें ऐकतांच माझी पांचावर धारण बसली. ' बसोनि थिल्लरीं । बेडुक सागरा धि:कारी ' अशांतलें तर माझें बोलणें नाहींना अशी मनाला भीति वाटूं लागली. पण जीभ उचलून टाळ्याला लावली होती खरी; मग पाय उचलून गडकऱ्यांच्या घराला लावण्याचा प्रसंग चुकवणार कसा? गडकरी माझी गणना मूर्खांत करणार, प्रेमसंन्यासावर असलेली कोल्हटकरांच्या नाटकाची छाप त्यांच्यापुढें विशद करण्याऐवजीं त्यांच्या बोलण्याचीच छाप माझ्यावर बसणार, कुणीकडे माझ्यासारखा कूपमण्डूक व कुणीकडे विशाल वाङ्मय-सागरांत अवगाहन करणारा गडकऱ्यांसारखा देवमासा ! असे एक ना दोन अनेक विचार मनांत आले. आज माझी तोंडी परीक्षाच आहे हें ओळखून काय काय बोलायचें हें मनांतल्या मनांत ठरवीत माझ्या स्नेह्यांबरोबर मी त्यांच्या घरीं गेलों ! पण त्यांच्यापुढें जाऊन बसतांच योजलेल्या भाषणाचें वाळूचें घर ढांसळलें व मी गोंधळून गेलों.

( ३ )

## गडकऱ्यांचा स्नेह जमला

तथापि थोड्याच वेळांत भीतीची जागा सलगीनें घेतली. मोठ्या अगर बड्या माणसांना भेटण्यापूर्वी त्यांच्याविषयीं एक प्रकारचा बाऊ वाटत असतो. हिमालयाचें दुरून प्रथम दर्शन झालें म्हणजे त्याचीं तीं गगनचुंबी शिखरें पाहून मन गांगरून जातें; पण त्याच्या पायथ्याशीं जाऊन त्याच्या हृदयांतून वाहणाऱ्या निर्मल गंगाजलाचें प्राशन केल्यानंतर त्याच्या प्रचंडपणाची भीति जाऊन उलट प्रेमळपणाबद्दल कौतुक वाटूं लागतें. गडकऱ्यांनीं 'प्रेमसंन्यास' विषयक बोलण्यांत माझी उलटतपासणी केली; पण त्यांत रागापेक्षां खेळकरपणाचाच भाग जास्ती होता. 'राजा भिकारी, माझी टोपी घेतली' म्हणून राजावर जरी उंदरानें चोरीचा आरोप केला तरी त्याच्यावर स्वारी करण्याकरतां राजा आपलें चतुरंग बळ कधींच सिद्ध करीत नाहीं. माझीं वेडीवांकडीं उत्तरें गडकऱ्यांना कितपत पटलीं हें मला सांगतां येत नाहीं; पण मी कोल्हटकरांचीं नाटकें लक्षपूर्वक वाचलीं आहेत एवढी त्यांची खात्री झाली खास. कुणाही मनुष्याबद्दल स्नेहभाव वाटायला त्यांना एवढें कारण बस्स होतें.

( ४ )

## कोल्हटकर यांचें अनुकरण

समानशीलांचें सख्य सहज व स्वाभाविक आहे. गडकऱ्यांच्या बाबतींत या समानशीलाच्या प्रभावळींत कोल्हटकरांच्या नाटकांचा अभ्यास हीच उत्सवमूर्ति होती. त्यांच्या नवनवोन्मेशशालिनी प्रतिभेबद्दल त्यांच्या कट्ट्या शत्रूलाही चकार उणाशब्द काढतां येणार नाहीं. पण गंगेच्या प्रवाहाचें वळण हिमालयावर जसें अवलंबून आहे तसें गडकऱ्यांच्या नाटकांचें वळणही कोल्हटकरांच्या नाटकांनींच निश्चित केलें आहे. त्यांनीं प्रेमसंन्यास लिहावयाला घेतलें त्यावेळीं 'मतिविकार' हीच कोल्हटकरांची सर्वांत नवी कृति होती. चकोर–जयंत, चंद्रिका–लीला, वेणू–द्रुमन, हरिहरशास्त्री–कमलाकर, मनोहर–सुशीला, वगैरे जोड्यांवरून प्रेमसंन्यासावर मतिविकाराची असलेली छाया स्पष्ट दिसते. मतिविकारानंतर कोल्हटकरांनीं प्रेमशोधन लिहिलें. प्रेमशोधन व पुण्यप्रभाव यांतील मध्यवर्ती कल्पना जवळ जवळ एकच आहे. भावबंधनाची कल्पना त्यांना सहचारिणीवरून सुचली हें त्यांचे स्नेही श्री. गुर्जर यांनींच नमूद करून ठेविलें

आहे. सारांश मनुष्य हा अनुकरणप्रिय प्राणी आहे म्हणून असो वा कोल्हटकरांच्या नाटकांतील उज्ज्वल गुणामुळें असो गडकऱ्यांच्या लेखनांत कोल्हटकरी वळण फार स्पष्टपणें प्रचीत होतें. कोल्हटकरांचा अभ्यास त्यांना आवडे याचें कारण हेंच होतें. आपल्या पहिल्या नाटकांत सुदाम्याच्या पोह्यांतील कितीतरी कोट्या न कळत आल्या होत्या असें ते सांगत. गुरु-ग्रंथांतलि या पाहुण्याची ‘ पोहे ’ हातांत घेऊन त्यांना मोठ्या कसोशीनें उचलबांगडी करावी लागली होती.

( ५ )

## कोल्हटकरांना कालिदास केलें

गडकऱ्यांची नाटकें एकापेक्षां एक अधिक लोकप्रिय झाल्यामुळें व कोटिबाज मनुष्य स्वाभाविकच ज्या अतिशयोक्तीनें बोलत असतो त्या अतिशयोक्तीचे अक्षरशः अर्थ केले गेल्यामुळें कोल्हटकरांविषयीं गडकऱ्यांना फारसा आदर उरला नव्हता असा ग्रह उत्पन्न करणारे पुष्कळ लेख प्रसिद्ध झाले आहेत. प्रस्तुत लेखकांचें वीरतनयापासून वधुपरीक्षेअखेरच्या कोल्हटकरांच्या पहिल्या सहा नाटकांविषयीं गडकऱ्यांशीं वेळोवेळीं बोलणें झालें आहे. वीरतनयाचें महत्त्व नवा मनु निर्माण करणारें नाटक या दृष्टीनें ते मानीत. मूकनायक तर त्यांना न भूतो न भविष्यति असें वाटे. त्यांत कल्पनांचे रंगीबेरंगी पुष्पगुच्छ नसले तरी दर पानावर व पानाआड ज्या मुग्धमधुर गुलाबकलिका हांसत आहेत त्यांचें सौंदर्य अवर्णनीय आहे असें त्यांचें मत होतें. जशी नक्षत्रमंडळांत शुक्राची चांदणी, निसर्गसुंदर भूप्रदेशांत काश्मिरी भूमि किंवा कोमल भावनांत प्रीति तसें आधुनिक नाटकांत मूकनायक अशी त्यांच्या भक्तिपरिप्लुत अंतःकरणाची भावना होती. गुप्तमंजूषांतील विनोदाचा विजय पाहूनच त्यांनीं आपल्या नाटकांतील विनोदाची विशिष्ट रूपरेषा ठरविली असावी असें दिसतें. मतिविकार-प्रेमशोधनाचे त्यांच्या लेखनावर झालेले परिणाम वर लिहिलेच आहेत. प्रेमशोधनमधलि नंदन-इंदिरा यांचा टेंकडीवरील प्रवेश ( अंक ४ प्र. २ ) त्यांचा इतका आवडता होता कीं शाकुंतलाच्या सातव्या अंकाच्या आरंभाशीं त्याची तुलना करून त्यांनीं एकदां कोल्हटकरांना कालिदास केलें होतें. उत्तरोत्तर कोल्हटकरांच्या नाटकांत कल्पना-विलास कमी आढळून येऊं लागल्यामुळें ते एखादेवेळीं त्यांच्यावर रुष्ट झाले असतील. पण वधूपरीक्षेचा

उत्कृष्ट नाटिका ( Light Comedy ) असा त्यांनीं गौरव केल्याचें माझ्या स्मरणांत आहे.

( ६ )

## ' कादंबरी 'वर कोटी

एक वेळ भाविक वारकऱ्याची 'पंढरी' ची वारी चुकेल, कॉलेजांतील विद्यार्थी 'बालगंधर्वां' चें नवें नाटक पहिल्या खेपेला पहावयाला चुकतील, पण कोटीची संधि गडकरी चुकविणार नाहींत असें जर त्यांच्याविषयीं कोणीं म्हटलें असतें तर तें कांहीं खोटें ठरलें नसतें. त्यांची भेदक व विनोदी बुद्धि वाघ जसा सावजासाठीं टपलेला असतो तशी शब्द पकडण्यासाठीं टपून बसलेली असे. प्रीव्हिअस झाल्यापासून दरवर्षी इंटरच्या अभ्यासाचीं पुस्तकें घेणें, एकादे वेळीं त्या पुस्तकांत डोकें खुपसणें व शेवटीं नाटकाच्या संसारासाठीं हें संसाराचें नाटक दूर झुगारून देणें हा त्यांचा नित्यक्रमच झालेला होता. १९१६ सालच्या आरंभीं एक क्रिकेट मॅच पाहण्यासाठीं ते आले असतां 'कादंबरी' चा कोणता भाग यंदां लावला आहे असा त्यांनीं प्रश्न केला. त्याला उत्तर मिळाल्यावर 'ती पोपट-पंचीचना ? असे हंसत हंसत त्यांनीं उद्गार काढले. 'कादंबरी' ची कथा शुकमुखानें वर्णन करण्यांत आली आहे व हा टोला त्या बापड्या पोपटाला आहे हें मग माझ्या लक्षांत आलें !

( ७ )

## बऱ्यांतून वाईट

१९१६ च्या आरंभीं माझ्या मामांची तार आल्यामुळें मला एकाएकीं पुणें सोडावें लागलें व माझ्या स्नेह्यांचा निरोप घेण्यासाठीं ते गडकऱ्यांच्या घरीं होते म्हणून मी तिकडे वळलों. 'तारेंत काय आहे ?' असा गडकऱ्यांनीं प्रश्न केला. 'चुलते आजारी आहेत तेव्हां मामांनीं बोलविलें आहे. कांहीं तरी बरें वाईट असेल' मी उत्तर दिलें. 'ते आजारी आहेत तेव्हां बरें तुमचें व वाईट त्यांचें; होय ना ?' शब्दांचा खेळ करीत त्यांनीं उत्तर दिलें. 'बऱ्यां' तून 'वाईट' कसें निष्पन्न होतें हें त्यावेळीं त्यांना तरी कुठून समजणार ?

( ८ )

## आधुनिक कवींचा संग्रह

आधुनिक कवींचा एक सुंदर काव्यसंग्रह गडकरी तयार करीत होते. अपूर्णावस्थेंत प्रस्तुत लेखकानें तो पाहिला आहे. चंद्रशेखरांची 'कुंजकूजन'

कोल्हटकरांची ‘ तुळशीचें लग्न ’ केशवसुतांची ‘ माझा अंत ’ ह्या कविता त्या संग्रहांत होत्या असें पक्कें स्मरतें. ‘ टिमकीवाला ’ ही कविता त्या संग्रहांत केशवसुतांची म्हणून घेतली होती. ना. म. भिडे यांनीं केशवसुतांच्या निवडक कवितांच्या संग्रहांत ती घेतल्यावर ती आपली आहे असें टिळकांनीं सांगि-तलें. पुढें टिळकही ख्रिस्तवासी झाल्यामुळें ‘ जगन्मित्र ’ ‘ कुणीतरी ’ या टोपण नांवाचीं कोडीं सोडविणेंच कठीण होऊन बसलें आहे. टिमकीवाल्याचें पदांत थोडा फरक करून ‘ नाटकवाला ! घातला कुणीं जन्माला ’ हा चरण गडकरी थट्टेनें म्हणत असत. सदरहू पदापुढें मात्र त्यांनीं कधींही विस्तार केला नसावा ! आपलेच दांत आणि आपलेच ओंठ असल्यावर दांतओंठ खाण्यांत अर्थ काय ?

( ९ )

## लो. टिळक व रँ. परांजपे

गडकऱ्यांना आपल्या बुद्धिमत्तेचा फार अभिमान असे, व प्रतिकूल परि-स्थितींतून पुढें येऊन त्यांनीं साहित्यक्षेत्रांत मिळविलेला विजय पाहिला म्हणजे तो साधारही वाटतो. १९१६ सालच्या आरंभीं लष्करभरतीसंबंधीं किर्लोस्कर थिएटरमध्यें एक सभा झाली होती. त्या सभेंत लो. टिळक व रँग्लर ( सध्यांचे डॉक्टर ) परांजपे या दोघांचींही भाषणें झालीं. गडकरी असल्या टोलेजंग सभे-साठीं जावयाचे हें ठरलेलेंच ! घरीं परत आल्यावर ते म्हणाले ‘आज पुण्यांतील $\frac{2}{3}$ बुद्धिमत्ता बोलली ’ ( टिळक व परांजपे ). उरलेल्या $\frac{1}{3}$ वर आपला हक्क पोंचतो ही त्यांच्या बोलण्याची खोंच चाणाक्ष श्रोत्यांना अर्थात् कळली !

( १० )

## दोन इंग्रजी कविता

वाङ्मयाचा उहापोह करण्याची त्यांना लहर आली म्हणजे अनेक प्रकारची नवी माहिती सहज मिळे. एके दिवशीं त्यांनीं मला ‘Raven’( केशवसुतांच्या ‘ घुबड ’ या सुंदर कवितेला आधारभूत असलेली कविता ) व ‘ Bridge of sighs’ ह्या दोन कविता एका इंग्रजी काव्यसंग्रहांतून वाचून दाखविल्या. ‘ कोणती आवडते ’ असें विचारतांच मी ‘ Bridge of sighs’ चें नांव घेतलें. ‘ मुरली ’पेक्षां ‘ राजहंस ’ लोकांना ह्याच कारणामुळें अधिक आवडतो

उत्कृष्ट नाटिका ( Light Comedy ) असा त्यांनीं गौरव केल्याचें माझ्या स्मरणांत आहे.

( ६ )

## ' कादंबरी 'वर कोटी

एक वेळ भाविक वारकऱ्याची ' पंढरी ' ची वारी चुकेल, कॉलेजांतील विद्यार्थी ' बालगंधर्वा ' चें नवें नाटक पहिल्या खेपेला पहावयाला चुकतील, पण कोटीची संधि गडकरी चुकविणार नाहींत असें जर त्यांच्याविषयीं कोणीं म्हटलें असतें तर तें कांहीं खोटें ठरलें नसतें. त्यांची भेदक व विनोदी बुद्धि वाघ जसा सावजासाठीं टपलेला असतो तशी शब्द पकडण्यासाठीं टपून बसलेली असे. प्रीव्हिअस झाल्यापासून दरवर्षीं इंटरच्या अभ्यासाचीं पुस्तकें घेणें, एकादे वेळीं त्या पुस्तकांत डोकें खुपसणें व शेवटीं नाटकाच्या संसारासाठीं हें संसाराचें नाटक दूर झुगारून देणें हा त्यांचा नित्यक्रमच झालेला होता. १९१६ सालच्या आरंभीं एक क्रिकेट मॅच पाहण्यासाठीं ते आले असतां ' कादंबरी ' चा कोणता भाग यंदां लावला आहे असा त्यांनीं प्रश्न केला. त्याला उत्तर मिळाल्यावर ' ती पोपट-पंचीचना ? असे हंसत हंसत त्यांनीं उद्गार काढले. ' कादंबरी ' ची कथा शुकमुखानें वर्णन करण्यांत आली आहे व हा टोला त्या बापड्या पोपटाला आहे हें मग माझ्या लक्षांत आलें !

( ७ )

## बऱ्यांतून वाईट

१९१६ च्या आरंभीं माझ्या मामांची तार आल्यामुळें मला एकाएकीं पुणें सोडावें लागलें व माझ्या स्नेह्यांचा निरोप घेण्यासाठीं ते गडकऱ्यांच्या घरीं होते म्हणून मी तिकडे वळलों. ' तारेंत काय आहे ? ' असा गडकऱ्यांनीं प्रश्न केला. ' चुलते आजारी आहेत तेव्हां मामांनीं बोलविलें आहे. कांहीं तरी बरें वाईट असेल ' मी उत्तर दिलें. ' ते आजारी आहेत तेव्हां बरें तुमचें व वाईट त्यांचें; होय ना ? ' शब्दांचा खेळ करीत त्यांनीं उत्तर दिलें. ' बऱ्यां ' तून ' वाईट ' कसें निष्पन्न होतें हें त्यावेळीं त्यांना तरी कुठून समजणार ?

( ८ )

## आधुनिक कवींचा संग्रह

आधुनिक कवींचा एक सुंदर काव्यसंग्रह गडकरी तयार करीत होते. अपूर्णावस्थेंत प्रस्तुत लेखकानें तो पाहिला आहे. चंद्रशेखरांची ' कुंजकूजन '

कोल्हटकरांची ' तुळशीचें लग्न ' केशवसुतांची ' माझा अंत ' ह्या कविता त्या संग्रहांत होत्या असें पक्कें स्मरतें. ' टिमकीवाला ' ही कविता त्या संग्रहांत केशवसुतांची म्हणून घेतली होती. ना. म. भिडे यांनीं केशवसुतांच्या निवडक कवितांच्या संग्रहांत ती घेतल्यावर ती आपली आहे असें टिळकांनीं सांगितलें. पुढें टिळकही ख्रिस्तवासी झाल्यामुळें ' जगन्मित्र ' ' कुणीतरी ' या टोपण नांवाचीं कोडीं सोडविणेंच कठीण होऊन बसलें आहे. टिमकीवाल्याचें पदांत थोडा फरक करून ' नाटकवाला ! घातला कुणीं जन्माला ' हा चरण गडकरी थट्टेनें म्हणत असत. सदरहू पदापुढें मात्र त्यांनीं कधींही विस्तार केला नसावा ! आपलेच दांत आणि आपलेच ओंठ असल्यावर दांतओठ खाण्यांत अर्थ काय ?

( ९ )

## लो. टिळक व रँ. परांजपे

गडकऱ्यांना आपल्या बुद्धिमत्तेचा फार अभिमान असे, व प्रतिकूल परिस्थितींतून पुढें येऊन त्यांनीं साहित्यक्षेत्रांत मिळविलेला विजय पाहिला म्हणजे तो साधारही वाटतो. १९१६ सालच्या आरंभीं लष्करभरतीसंबंधीं किर्लोस्कर थिएटरमध्यें एक सभा झाली होती. त्या सभेंत लो. टिळक व रँग्लर ( सध्यांचे डॉक्टर ) परांजपे या दोघांचींही भाषणें झालीं. गडकरी असल्या टोलेजंग सभेसाठीं जावयाचे हें ठरलेलेंच ! घरीं परत आल्यावर ते म्हणाले 'आज पुण्यांतील $\frac{2}{3}$ बुद्धिमत्ता बोलली ' ( टिळक व परांजपे ). उरलेल्या $\frac{1}{3}$ वर आपला हक्क पोंचतो ही त्यांच्या बोलण्याची खोंच चाणाक्ष श्रोत्यांना अर्थात् कळली !

( १० )

## दोन इंग्रजी कविता

वाङ्मयाचा उहापोह करण्याची त्यांना लहर आली म्हणजे अनेक प्रकारची नवी माहिती सहज मिळे. एके दिवशीं त्यांनीं मला 'Raven'( केशवसुतांच्या ' घुबड ' या सुंदर कवितेला आधारभूत असलेली कविता ) व ' Bridge of sighs' ह्या दोन कविता एका इंग्रजी काव्यसंग्रहांतून वाचून दाखविल्या. ' कोणती आवडते ' असें विचारतांच मी ' Bridge of sighs' चें नांव घेतलें. ' मुरली 'पेक्षां ' राजहंस ' लोकांना ह्याच कारणामुळें अधिक आवडतो

असें ते म्हणाले. कविता वाचावयाची एवढें सामान्य वाचकाला माहीत असतें. तुलनेचा प्रश्न काढला तर ' रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति' हेंच खरें !

( ११ )

## गडकऱ्यांनीं लिहिलेली एक गोष्ट

गडकऱ्यांचें नाट्यलेखन अत्यंत यशस्वी झाल्यामुळें कादंबरी अगर कथा असल्या तितक्याच श्रमाच्या परंतु कमी मिळकतीच्या लेखनाकडे त्यांची लेखणी विशेषशी वळली नाहीं. पण नक्की मार्ग ठरवायच्या आधीं वाटसरू ज्याप्रमाणें प्रत्येक वाटेला चार पावलें जाऊन ती वाट इष्टस्थळीं जाईल कीं काय हें पहातो, त्याप्रमाणें १९१२ च्या पूर्वीं त्यांनीं निबंध, कथा इत्यादि प्रांतांत चंचुप्रवेश तरी केला होता. १९०८ सालीं लिहिलेली एक गोष्ट त्यांनीं मला एकदां वाचून दाखविली होती. त्या कथेचा नायक ' हरिहर ' होता एवढेंच काय तें सध्यां आठवतें, 'हरिहर ' पेक्षां झोंपच कथापुराणाला जाणाऱ्या अनेक माणसांना आवडते; व त्या गोष्टींच्या वेळीं आधींचें जाग्रण असल्यामुळें माझीही तीच स्थिति झाली. ' अरसिकेषु कवित्व विवेदनम्। शिरसि मा लिख मा लिख मा लिख ' असेच उद्गार गडकऱ्यांनीं त्यावेळीं काढले असतील !

( १२ )

## नाटकांतील सुंदर उतारे

१९०७ सालीं ' कोल्हटकरांच्या नाटकांतील सुंदर उतारे ' हें त्यांचें छोटें पुस्तक प्रथम प्रसिद्ध झालें. त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या बीजाला त्या दिवशीं अंकुर फुटला. रात्रीचा दिवस व रक्ताचें पाणी करून या अंकुराचा वृक्ष करीन अशी त्यांनीं स्वतःशीं प्रतिज्ञा केली व पुढील तपांत ती सिद्धीला नेली. ' सुंदर उतारे ' प्रसिद्ध झाले त्या दिवशीं डायरींत आपण त्याचा उल्लेख करून ठेवला होता असें ते सांगत. लेखनाचें मंदिर त्यांनीं अल्पावधींत उभारलें असलें तरी पाया भरभक्कम करण्याकरतां अतोनात खटपट केली होती.

( १३ )

## नायिकांचीं नांवें

पुण्यप्रभावाची मूळ प्रत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाहून बरीच मोठी होती. त्यांत ' किंकिणी ' च्या दासी तिला उठवीत आहेत ( गुप्तमंजूषांत नंदिनीला तिच्या मैत्रिणी उठवितात त्याप्रमाणें ) असा एक प्रवेश होता. या दासींचीं

नांवें शालिनी, सरोजिनी, सौदामिनी, भामिनी इत्यादि होतीं. खाडिलकर कोल्हटकरांच्या नायिकांचीं हीं नांवें गडकऱ्यांच्या लेखणींतून सहजच उतरलीं असतील काय ? या नामांकित 'वाग्भटा' च्या तोडीला तोड म्हणून कांहीं आपण लेखणी उचलीत नाहीं असें त्यांनींच पुण्यप्रभावाच्या प्रस्तावनेंत सांगितलें आहे.

( १४ )

## भाषा कमावण्यासाठीं केलेले सायास

नाटककार म्हणून आखाड्यांत उतरण्यापूर्वीं गडकऱ्यांनीं किती बहुविध पूर्व-तयारी केली होती याचें उदाहरण म्हणून एक गोष्ट देतां येईल. ' शारदा ' नाटकांत ' शारदा ' व तिचा मामा यांचा एक संवाद आहे. तो पाटणकरापासून कोल्हटकर खाडिलकरांपर्यंत प्रत्येक नाटककार कसकसा लिहील याचें त्यांनीं विद्यार्थीदशेंत टांचण केलें होतें. पाटणकरांची गुणहीन, कोल्हटकरांची कल्पनापूर्ण पण क्वचित् क्लिष्ट,खाडीलकरांची ओजस्वी पण अस्थानीं आवेशपूर्ण, इत्यादि सर्व भाषांचें मर्म त्यांनीं हस्तगत केलें होतें. गडकऱ्यांनीं भाषा कमावण्यासाठीं केलेले सायास पाहिले म्हणजे अचंबा वाटतो !

( १५ )

## विद्याहरणाचा मार्मिक अभ्यास

युनिव्हर्सिटींत मराठी भाषा सरास सुरू झाली तर कोणतीं नाटकें अभ्यासक्रमांत आपला प्रवेश करूं शकतील ? अशी चर्चा सुरू होती. ' मूकनायक ' 'मतिविकार' ' प्रेमशोधन ' 'शापसंभ्रम ' व 'प्रेमसंन्यास' असें गडकरी म्हणाले. तथापि त्यांचें मत पूर्ण विचारांनीं बनलेलें होतें कीं नाहीं तें देव जाणे !

' निर्मुनि शारदा परि कां तुमची शारदा उगी बसली ? '

असा शारदेविषयीं आदर त्यांनीं देवलांवर लिहिलेल्या आर्यांत प्रगट झाला आहे. ' ट्रॅजेडि ' या दृष्टीनें विद्याहरणाची योग्यता फार मोठी आहे असें ते मानीत व विद्याहरणाच्या मार्मिक अभ्यासाचा एकच प्यालयाच्या लेखनांत त्यांना अतिशय उपयोग झाला असावा.

' कांचनगडची मोहना ' ही त्यांना आवडे.

( १६ )

## हातांत जळती विडी

त्यांचा स्वभाव एककली, अगर लहरी होता यांत संशय नाहीं. १९१४ सालीं ते गंधर्वमंडळींत जात असत; पण मंडळीचें नाटक पहायला मात्र तयार नसत. किर्लोस्कर मंडळींतून त्यावेळीं फुटणाऱ्या मंडळीवर जो त्यांचा घुस्सा होता तो त्यांनीं थोडे दिवस असा फेडून घेतला. रात्रीं ११ वाजतां ' भाऊबंदकी 'ला जाण्याची इच्छा होऊन त्यासाठीं निजलेल्या मित्राच्या घरीं जाऊन त्याला जागें करण्यापर्यंत त्यांची मजल जात असे. एकादे दिवशीं भर दुपारींच रघूचा आठवा सर्ग वाचण्याची त्यांना हुक्की येई. अन्य व्यवसायामुळें त्यांच्या मित्रांना अशा वेळीं ' पुण्यप्रभावां ' तील नूपुराप्रमाणें पेटाऱ्याचा आश्रय घेणें अगर तसल्याच एकाद्या युक्तीचा अवलंब करणें भाग पडे ! त्यांना विडीचें व्यसन इतकें भयंकर होतें कीं तोंडाचा विडीपासून दीर्घकाल वियोग कधींच होत नसे. परंतु कोल्हटकरांविषयींच्या आदरामुळें त्यांच्यासमोर जळती विडी ओढण्याऐवजीं हात भाजला तरी ती हातांत धरणेंच आपणांला एकदां प्राप्त झालें होतें असें ते सांगत असत.

( १७ )

काव्य, नाटकें व विनोद या सारस्वताच्या तीन भागांत गडकऱ्यांनीं बहुमोल भर घातली. त्यांच्या भावनामय हृदयाची नौका दारुण आशाभंगामुळें व्यवहारसागरांत वाटेल तशी हेलकावे खात असें हे खरें. पण इंग्लंडला ' England, with all thy faults, I love thee still ' असें एक देशभक्त कवि ज्याप्रमाणें म्हणतो त्याप्रमाणें ' Gadkari, with all thy faults, I love thee still ' असेंच आजचा व भावी महाराष्ट्र म्हणेल. बोध व आनंद याची खाण म्हणून जनता व प्रतिभासंपन्न लेखन म्हणून लेखक त्यांच्या ग्रंथाविषयीं नेहमीं आदरच बाळगितील.

' गडगडणें, काळोख, विजाही गेलीं वळवाच्या मागें '
' अन्न ब्रह्मचि साक्ष तयाची द्याया हें राही जागें ॥ '

( १८ )

गडकऱ्यांच्या जीविताचें सार Sullivan च्या भाषेंत सांगावयाचें तर

' to wait for an inspiration would be as absurd as it would be for a miner to sit at the pits ' mouth, waiting for the coal to come bubbling up to the surface ' हें आहे. स्फूर्तीचे क्षण नसतात असें नाहीं; पण स्फूर्तीची वाट पहात बसण्यांत अर्थ नसतो. बुद्धि म्हणजे सतत उद्योग करण्याची चिकाटी; त्याप्रमाणें स्फूर्ति म्हणजे अविरत श्रमाच्या पाण्यापासून उत्पन्न होणारी वीजच आहे. पुण्यप्रभावाकरितां तयार केलेल्या त्यांच्या याद्या ज्यांनीं पाहिल्या असतील त्यांना गडकऱ्यांना नाटक म्हणजे एक मोठी लढाई वाटे कीं काय असा भास खास झाला असेल. ' जातीच्या सुंदरा 'प्रमाणें जातीचे लेखकही थोडेच असतात. गडकऱ्यांनीं प्रतिभेची दैवी देणगी लाधली असूनही, व्यासंगाचा जो उत्कृष्ट धडा घालून दिला तोच महाराष्ट्रसाहित्याला कधीं ना कधीं स्पृहणीय स्वरूप प्राप्त करून देईल अशी आम्हांला खात्री आहे.

वि. स. खांडेकर.

---

## श्री. " देवबाबु " यांजकडून

### (१)

### शिकवितांना गडकरी खुर्चीवर बसत नसत

कै. गडकरी यांचा व माझा परिचय सन १९१० सालीं झाला, व तोही आमचे संस्कृतचे शिक्षक या नात्यानें. अध्यापक या दृष्टीनें त्यांची योग्यता खरोखरच मोठी होती. परंतु मनमिळाऊ स्वभाव आणि विनोदप्रियता यांच्या योगानें त्यांनीं आपल्या सर्व विद्यार्थ्यांवर अतिशय छाप बसविली होती. गडकरी मास्तरांचा तास म्हणजे शिक्षणाबरोबर करमणूक असा असे. शाळेचे नियम न मोडतां पद्धतशीरपणें केलेल्या लहानमोठ्या खोड्यांबद्दल मास्तरांकडून शासन होण्याची बिलकुल भीति नसल्यामुळें त्यांच्या तासाला सर्व वर्ग सचेतन असे. वर्गांत शिकवीत असतां ते कधींही खुर्चीवर बसत नसत. यासंबंधीं एकदां एका विद्यार्थ्यानें त्यांना विचारलें असतां ते म्हणाले. " एके काळीं टिळक, आपटे आणि आगरकर यांच्यासारखे तेजोभास्कर विराजमान होऊन ज्या खुर्च्या पुनीत झाल्या त्या माझ्यासारख्या पामरानें बसून भ्रष्ट होतील याची मला वारंवार भीति वाटते म्हणून मी शिकवीत असतां कोणत्याही खुर्चीवर कधींच बसत नाहीं.

( २ )

## शिक्षकांना टांगेवाल्याचीं लायसेन्सें द्यावींत

शाळेंत छडीचा उपयोग करण्याच्या ते मनापासून विरुद्ध असत. ते स्वतः तर छडीचा उपयोग कधींच करीत नसत; इतकेंच नव्हे तर कोणी शिक्षकानें छडीचा दुरुपयोग केल्याचें त्यांच्या कानीं आलें तर ते त्या शिक्षकाबद्दल फारच वाईट उद्गार काढीत. नूतन मराठींतल्या एका मुलाला क्षुल्लक खोडीबद्दल एका शिक्षकानें बेदम झोडपल्याची हकीगत एकदां त्यांच्या कानीं आली तेव्हां ते म्हणाले " विनायकराव आपल्यांनीं शाळेंत शिक्षकांऐवजीं टांगेवाले तरी नेमावेत किंवा ज्या शिक्षकांना मुलांना मारण्याची खुमखुम असेल त्या शिक्षकांना टांग्यांचीं लायसेन्सें तरी काढून द्यावींत. "

( ३ )

## लव्ह ऑफ गॉड

भोपळे या नांवाच्या विद्यार्थ्यानें एकदां Love of God is called devotion " या वाक्याचें भाषांतर " मदनः भक्तिः अभिधीयते " असें केलें. Love of God आणि God of love या शब्दांत केलेला हा घोंटाळा पाहून गडकरी मास्तरांना हंसें आवरेना. तरी पण गंभीर चेहरा करून ते म्हणाले, " भोपळ्या! देऊं कां आतां तुला तिसऱ्या मजल्यावरून चौकांत भिर-कावून? म्हणजे टाळकें फुटून आंतल्या बिया चौकभर पसरून जे भोपळे उग-वतील त्यांचा तरी कांहीं उपयोग होऊन तुझें निर्बुद्ध टाळकें सार्थकीं लागेल ! "

( ४ )

## कर्णिक नांवाचा एक विद्यार्थी

तसेंच एकदां कर्णिक या नांवाच्या एका विद्यार्थ्याला गम् with प्रति या क्रियापदाचें Imperfect 3rd person singular रूप विचारलें असतां ' प्रत्यागच्छत् ' याऐवजीं त्यानें ' अप्रतिगच्छत् ' असें रूप सांगितलें. मास्त-रांनीं त्याच्या पाठिवर मोठ्या प्रेमळपणानें हात फिरविला आणि ते त्याला म्हणाले, " वाः, जातभाई, खूप गंमत केलीत बुवा ! खिडकींत येतां का जरा? बाहेर आभाळाकडे पहा काय चमत्कार होऊन राहिला आहे तो. या तुमच्या मंत्रोच्चारानें आमच्या आणि तुमच्या बापजाद्याच्या विमानांचा ताफा वर तरंगून राहिला असून सगळेच या अद्वितीय गुरु-चेल्यांच्या जोडीचें कौतुक करीत आहेत ! "

( ५ )

### खाजगी शिकवण्या

खाजगी शिकवण्यांच्या ते मनापासून विरुद्ध असत. एकदां, एकाच वर्गांत तीन वर्षें "वन्स मोअर" खाल्लेला, एक कॉलेजांतला विद्यार्थी, एकादी खाजगी शिकवणी त्यांच्या मार्फत मिळेल तर पहावी या हेतूनें, त्यांच्याकडे आला. तेव्हां ते त्याला म्हणाले, "तूंच स्वतः नीट अभ्यास करून अगोदर पास होण्याच्या तयारीला लाग आणि पैसे घेऊन दुसऱ्यांचीं पोरें हमखास बिघडवून देण्याचा मक्ता घेण्याचें हें टाळक्यांत शिरलेलें वेड काढून टाक."

( ६ )

### गडकऱ्यांनीं शाळेंत मार कसा चुकविला !

ते स्वतः न्यू इंग्लिशस्कूलमध्यें विद्यार्थी असतां त्यांना प्रो.——केमिस्ट्री शिकवीत असत, व त्यावेळीं रास्कोचें केमिस्ट्रीचें प्रायमर सातवीचे विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तक म्हणून शिकविलें जात असे. प्रो. मजकूर सर्वसाधारण शिस्ती-संबंधीं अत्यंत कडक असत; व केमिस्ट्रीचे तासाला विद्यार्थी वर्गांत घेण्याचे वेळीं ते स्वतः दारांत उभे राहून प्रत्येक विद्यार्थ्याला दरखेपेस "Lesson or cane?" (अभ्यास केला आहेस कीं छडी खाऊन आंत जाणार ?) असा रोकडा सवाल करीत असत. अभ्यासाचे बाबतींत, आणि विशेषतः केमिस्ट्री-सारख्या शास्त्रीय विषयांत, स्वभावतःच हूड असलेले गडकरी, छातीठोकपणें "cane" असें सांगून व ताबडतोब गुरुप्रसाद ग्रहण करून बिनधोकपणें वर्गांत जाऊन बसत. परंतु नित्यपरंपरेंत थारेपालट करण्याचे हेतूनें, पुस्तकांतील एक अक्षरही न वाचतां, एक दिवस नेहमींच्या सवालाला "Lesson" असें उत्तर देऊन त्यांनीं आपला शिरकाव वर्गांत करून घेतला. दररोज तिकीट काढून जाणारा इसम एकादे दिवशीं "पास" म्हणून सटकतांच कोणत्याही तिकीट कलेक्टराची वृत्ती साशंक होतेच. वर्ग सुरू होतांच त्या दिवशीं नेमून दिलेल्या अभ्यासासंबंधीं सर्व प्रश्नांचा भडिमार अकस्मात् गडकऱ्यांच्यावर सुरू झाला. आपल्यावर ही संकटपरंपरा कोसळणार याची जाणीव त्यांना होतीच. त्यांनीं स्वतःच लिहिलेल्या एका दीडपानी नाटकांतील मूकनायकाप्रमाणें ते स्तब्ध होते. संतापानें लाल झालेल्या त्यांच्या गुरुजींनीं अधिकच संतापून त्यांना विचारलें "Well Gadkari, will you tell me anything which

you claim to know from Chemistry ? " गडकऱ्यांनीं शांतपणें उत्तर दिलें " Nothing is lost when a candle burns. " ज्यांनीं रास्कोचें प्रायमर वाचलें असेल त्यांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, सदरहू वाक्य त्या पुस्तकाच्या अगदीं पहिल्या पानावर जाड टाइपांत छापलेलें आहे ! या अनपेक्षित उत्तरानें गुरुजींच्या संतापाचा पारा एकदम शून्यावर आला आणि गडकऱ्यांवरची " प्रवेशपट्टी " कायम माफ झाली.

( ७ )

## एका देशभक्ताची हजेरी

कै. आचार्य टिळक हे १९०८ सालीं मंदलें मुक्कामीं असतां पुण्यांत तर देशभक्तांचें पेंव फुटल्यासारखें झालें होतें. कोणीही उठावें, एक अंगरखा चढवावा डोक्याला पगडीवजा एक पागोटें घालावें, हातांत एक वेडीवांकडी काठी घ्यावी आणि सुपारीचीं खांडें खात कोठल्यातरी गणपतीपुढें, त्याच " गणपतीची अध्यक्षस्थानीं योजना करून " एक व्याख्यान द्यावें. असा प्रकार वारंवार दृष्टीस पडत असे. हें पाहून गडकरी अतिशय संतापत असत. त्यांतून एका असल्याच अल्तुफाल्तु देशभक्तानें एका गणपतीपुढें " माझ्यांत आणि लोकमान्यांत तसें पाहूं गेलें असतां फारसें अंतर नाहीं " असें एक निर्लज्ज विधान केलें तेव्हां तर ते फारच संतापले. कर्मधर्मसंयोगानें एका व्याख्यानाच्या प्रसंगीं त्याच देशभक्ताचा पाय चुकून गडकऱ्यांना लागला. शाब्दिक सहानुभूति अथवा औपचारिक नमस्कार असल्या सर्वसामान्य शिष्टाचाराचा अवलंबही न करतां मशारनिल्हे देशभक्त " अर्रर्र, पाय लागला वाटतं " इतकेंच स्वगत पुटपुटून पुढें जाऊं लागले. सामावलेला संताप मुक्तद्वार करण्याची बरेच दिवस संधि पहात असलेले गडकरी तात्रडतोब त्यांच्यापुढें उभे राहून केविलवाण्या स्वरानें त्यांना म्हणाले " हॅं: हॅं: त्यांत काय ! पायच तो, लागायचाच. आपण इतकें वाईट वाटून घेऊं नका. लोकमान्यांत आणि आपल्यांत कांहींच अंतर नाहीं असें आपणच नाहीं कां त्या दिवशीं सांगितलेंत ? झालें तर मग आपल्यासारख्यांना जाज्वल्य देशभक्तांना असेच आणखी दोन पाय फुटावेत आणि आमच्यासारख्यांना ते नेहमीं असेच लागावेत हेंच आमचें देवगजाननाजवळ मागणें आहे. दुसरें काय ? " देशभक्त अर्थातच नऊशें फुटांवरून खालीं कोसळले.

( ८ )

### इसम व असामी

कॉलेजमध्यें असतां संमेलन प्रसंगीं होणाऱ्या नाटकांचें धुरीणत्व गडकऱ्यांकडेच असे. अशाच एका प्रसंगीं अभिनयाच्या बाबतींत एका गृहस्थांचा व गडकऱ्यांचा मतभेद झाल्यामुळें ते गृहस्थ रागावले आणि गडकरी तेथून निघून गेल्यावर दुसऱ्या एका गृहस्थांना म्हणाले " अहो हे मधांचे इसम जर इथें पुन्हा येणार असतील तर आपण नाहीं काम करणार बुवा.. " ही हकीगत दुसरे दिवशीं गडकऱ्यांना समजतांच त्या गृहस्थांची थोडीशी गंमत करण्याचे हेतूनें ते त्यांजकडे गेले व चेहऱ्यावर रागाचा अविर्भाव आणून त्यांना म्हणाले " कां हो काल तुम्ही माझ्यासंबंधीं बोलतांना मला " इसम म्हणालात म्हणे. एकाद्या माणसाला " इसम" म्हणणें म्हणजे काय ! काल " इसम " म्हणालात उद्यां " असामी " म्हणाल–म्हणजे हें काय आम्हीं ऐकून घ्यायचें कीं काय ? " हें ऐकून ते गृहस्थ फारच ओशाळले व " इसम " हा शब्द वापरण्यांत आपण फारच भयंकर चूक केली असें वाटून त्यांनीं गडकऱ्यांची माफी मागितली आणि तालमीला येण्याचें कबूल केलें.

( ९ )

### तोंडीस तोड उत्तर

तसेंच एकदां एका मुद्यावर एका गृहस्थांशीं वादविवाद करीत असतां ते गृहस्थ इतके चिडले कीं, ' शेषं कोपेन पूरयेत् ' या तत्वाचा अवलंब करून ते गडकऱ्यांना म्हणाले " बस्स झालें; आजपासून मीं निश्चय केला कीं, मूर्ख माणसाशीं बोलावयाचेंच नाहीं." ते गृहस्थ जितक्या संतापातिरेकानें बोलत होते, तितक्याच शांतपणानें गडकऱ्यांनीं त्यांना उत्तर दिलें " पण मी कुठें अजून असा निश्चय केला आहे ? मघांपासून मी बोलतोंच आहे कीं ! "

---

## सुप्रसिद्ध नट रा. केशवराव दाते यांजकडून

( १ )

### महाराष्ट्र कंपनांत येण्यापूर्वीं

कै. गडकरी मास्तरांची योग्यता महाराष्ट्राच्या रसिक मंडळीच्या निदर्शनास त्यांची प्रसिद्धि झाल्यानंतर आलेली आहे. पण

त्यांची वास्तविक योग्यता ते अगदीं अप्रसिद्ध स्थितींत असतांना जर कोणी प्रथम ओळखली असेल तर ती महाराष्ट्र नाटक मंडळीच्या माजी चालकांनींच होय. आरंभीं पांच वर्षे ते किर्लोस्कर मंडळींत मास्तर म्हणून होते. तेथें असतांना त्यांनीं " गर्व निर्वाण " नांवाचें नाटकहि लिहिलें होतें, पण त्यांच्या त्या वेळच्या अगदीं जिवलग स्नेह्यांवांचून त्यांची खरी पारख फारशी कोणालाच झाली नाहीं. इतकेंच नव्हे तर कांहीं कांहीं मंडळी त्यांची त्यावेळीं चेष्टाच करीत असल्याचें खुद्द गडकऱ्यांनीं अगदीं चिडून जाऊन महाराष्ट्र मंडळींत सांगितलें आहे.

( २ )

## 'प्रेमसंन्यासाचें' पहिलें वाचन

गडकरी महाराष्ट्र नाटक मंडळींत प्रथम आले ते त्यांचे मामेभाऊ श्री. बापुराव देशपांडे यांचे बरोबर एका नाटकाचे पाहिले तीन प्रवेश दाखविण्यासाठीं आले. तें नाटक म्हणजे हल्लींचें प्रेमसंन्यास पण त्यावेळीं कै. गडकरी मास्तरांचे त्या नाटकाचें नांव ' संधि-साधन ' असें होतें. ते प्रवेश व नाटकाचें एकंदर कथानक मास्तरांचें तोंडून त्यावेळीं ऐकून मंडळीचे चालक श्री. आण्णासाहेब कारखानीस यांना इतका आनंद झाला कीं त्यांनीं कै. गडकरी मास्तरांना " आम्ही तें नाटक बसवितों, तुम्ही तें ताबडतोब पुरें करून द्या, असा आग्रह केला. मास्तरांना त्यामुळें इतका हुरूप आला कीं, त्यानंतर तीनचार महिन्यांचें अवधींतच त्यांनीं तें नाटक बहुतेक पुरें केलें. पुरें केल्यानंतर त्या नाटकाचें पहिले वाचन पुणें मुक्कामीं महाराष्ट्र नाटक मंडळींत चालकांनी ज्या समारंभानें केलें, तसला समारंभ कंपनीचे इतिहासांत कोणाही नाटककाराच्या पहिल्या कृतीला खास लाभला नसेल-गुरुवर्य भाजू, खाडिलकर, पानशे, श्री. तात्यासाहेब केळकर, तात्यासाहेब कोल्हटकर, शंकरराव मुजुमदार, कै. नानासाहेब जोगळेकर, वगैरे प्रमुख मंडळी त्या 'वाचन' समारंभाला हजर होती. व मास्तरांचे स्नेही नटवर्य बोडस यांची मुद्दाम वाचक म्हणून योजना केली होती, आणि त्यावेळीं वाचनसमारंभानिमित्त जमविलेल्या सर्व मंडळीला महाराष्ट्र नाटक मंडळीच्या चालकांनीं खास मेजवानी दिली. श्री. तात्यासाहेब कोल्हटकरांना त्यावेळीं आपल्या सत्‌शिष्याची ही पहिली करामत व तिचा यथायोग्य झालेला गौरव पाहून परमावधीचा आनंद झाला व त्यांच्या डोळ्यांतून खरोखरच आनंदाश्रू आले.

# गडकऱ्यांच्या 'गर्वनिर्वाण' नाटकांतील प्रवेश

कै. गडकरी यांनीं किर्लोस्कर कंपनींत असतांना ' गर्वनिर्वाण ' या नांवाचें एक नाटक लिहीलें होतें. पण तें नाटक रंगभूमीवर आलें नाहीं. या नाटकांतील पुढील प्रवेश आजपर्यंत अप्रकाशित होते. हे प्रवेश रा. शंकरराव मुजुमदार व त्यांचे चिरंजीव रा. श्रीधर शंकर मुजुमदार यांच्या मेहेरबानीनें मला मिळाले.

—संपादक

**( वाग्भट व चरक येतात )**

**वाग्भट**—झालेल्या प्रकाराबद्दल मी सुद्धां दिलगीरच आहें. कारण अशा-मुळें दोघांचाही तोटाच होतो.

**चरक**—पण एका अर्थी झालें तें बेश झालें; या तात्पुरत्या तोट्यामुळें तुमचा आमचा कायमचा स्नेह जमला.

**वाग्भट**—हो, तेंही खरेंच ! आतां पहिल्यापासूनच असा स्नेह असता तर आपण एकमेकांच्या औषधांची अशी नालस्ती मुळींच केली नसती.

**चरक**—खचित् नसती केली. तुमच्या औषधांबद्दल माझ्या मनांत विकल्प मुळींच नव्हता ! अहो, त्यांचे दोष कळायला मीं तीं पाहिलीं होतीं कधीं ?

**वाग्भट**—माझाही तोच प्रकार ! इतकेंच नाहीं, पण माझ्यावरच प्रसंग आला असता तर मीं तुमचींच औषधें घेतलीं असतीं; कारण माझ्या औष-धांची खरी योग्यता मला पक्की माहिती होती. तुमच्याबद्दल अनोळखीमुळें संश-याला तरी जागा होती !

**चरक**—अगदीं माझ्या मनांतलें बोललांत. अहो ! आपलीं औषधें आप-णच कोण घेईल ?

**वाग्भट**—आतां त्यावेळीं तुमच्या औषधांची निंदा केली ती केवळ स्वतःच्या फायद्यासाठीं. माझ्या औषधांच्या गुणाबद्दल स्तुति नीट करितां येईना तेव्हां तुमच्या औषधांची निंदा सुरू केली न् काय ?

**चरक**—गुणांची स्तुति नीट करणार कशी? स्तुति करायला गुणांची पारख पाहिजे आणि पारख व्हायला औषधांत गुण पाहिजे. तेव्हां आपल्यांतला गुणांचा कमीपणा दुसऱ्यांच्या दोषांनीं भरून काढला.

**वाग्भट**—दुसऱ्याचे दोषांनीं कशाला? मी तर माझ्या औषधांतले अनुभवानें पटलेले दोष दुसऱ्याच्या औषधावर लादतों झालें! वैद्यकांत हें असें करावेंच लागतें!

**चरक**—वैद्यकांतच काय—कोणत्याही बाबतींतला चुरशीचा सामना शेवटीं याच धारावर यावयाचा. दुसऱ्याच्या नसत्या नालस्तीचा पडदा जगाच्या डोळ्यावर बांधिला म्हणजे आपली तपासणी आंधळेपणानें व्हावयाची हें उघडच आहे!

**वाग्भट**—जाऊं द्या तें आतां. आजपासून ठरलें कीं, एकमेकांची सारखी स्तुतीच करावयाची; काय होईल तें होवो.

**चरक**—काय व्हावयाचें आहे! संवय नसल्यामुळें पहिल्यानें थोडें जड जाईल येवढेंच! वाईट गोष्ट सहज करतां येते. चांगलें करावयाला वेळ लागतो. एकादें वाईट औषध हां हां म्हणतां करितां येईल. पण चांगलें औषध करायला दिवस घालवावे लागतील.

**वाग्भट**—सत्य आहे! महाराजांनीं मैत्रेयाला बरा करण्याला सांगितलें तें आपल्याच्यानें होईना! पण आज जर एकाद्याचा प्राण घेण्यासाठीं एकादें उत्तम विष तयार करण्यास सांगितलें तर—( शुंभ व निशुंभ येतात. )

**शुंभ**—तेवढ्यासाठींच आम्ही तुमच्याकडे—

**चरक**—आलांत कां पुन्हां तुम्ही?

**वाग्भट**—त्या पाजी मैत्रेयासाठीं जर आलां असाल तर असेंच चालते व्हा!

**चरक**—त्याच्या घरींच आम्ही सांपडलों म्हणूनच आम्ही मघांशीं त्याचें बोलणें ऐकून घेतलें!

**वाग्भट**—नाहीं तर त्याची काय छाती होती असें बोलायची?

**चरक**—आणि तुमची तरी काय छाती होती असें बोलायची?

**वाग्भट**—तो बोलभांड कुणीकडे, अन् यांच्यासारखा थोर वैद्य कुणीकडे?

**चरक**—वाग्भटांच्या औषधांची योग्यता केवढी!

**वाग्भट**—यांच्या खात्रीच्या औषधांची किंमत ठरविणार तुम्ही कोण?

**चरक**—आज यांच्या तीन पिढ्या वैद्यकांत गेल्या आहेत, रोग्याचा हात पहाणें म्हणजे यांच्या हातचा मळ आहे !

**वाग्भट**--आज चिकित्सा म्हणजे यांचे घरीं पाणी भरते आहे पाणी! सात पिढ्यांचा यांचा अनुभव आहे!

**चरक**--आणि तो दारूबाज मैत्रेय यांची थट्टा करणार !

**वा०**—आणि तुम्ही यांची टवाळकी करणार !

**च०**—लाज नाहीं वाटली त्याला ?

**वा०**--आणि लाज नाहीं वाटत तुम्हांला ?

**च०**--चला निघा येथून; त्याच्यासाठीं मुळींच औषध देणार नाहीं !

**वा०**--आणि हे तुमच्यासाठींही कधीं औषध देणार नाहींत !

**नि०**--अहो वैद्यराज, तुमच्या हातांत औषधांचा बटवा नसला म्हणजे किती मोठ्यानें ओरडलां तरी आम्ही भिणार नाहीं ! मग उगीच कां घसा फोडून घेतां ? आमचें म्हणणें ऐकून तर घ्या !

**वा०**--पुन्हां बजाऊन सांगतों कीं तुम्हांलासुद्धां आम्ही औषध देणार नाहीं.

**च०**—इतकेंच नाहीं पण कोठल्याही दानवाला सुद्धां आम्ही औषध देणार नाहीं !

**वा०**--कशाला ? मी तर म्हणतों कीं, तसाच प्रसंग आला तर आम्ही साऱ्या जगाला औषधें देण्याचें बंद करूं.

**नि०**--वः हा तर जगावर मोठाच उपकार होईल.

**शुं०**--हें पहा वाग्भट, मैत्रेयाचा सध्यां कांहीं संबंध नाहीं. आत्तांचें काम फारच महत्त्वाचें आहे.

**वा०**—बरं मग या चरकशास्त्र्यांना सांगा; यांचा अधिकार फार मोठा आहे. मी आपला नुसता ऐकेन !

**च०**—कांहीं नाहीं; यांचीही योग्यता मोठीच आहे. दोघांनाही बरोबरीच्या नात्यानेंच सांगा.

**नि०**—बरें. आधीं तुमचा उपजत तंटा कसा काय मोडला हें तर सांगा ?

**वा०**—त्यांत कांहीं विशेष नाहीं म्हगा. दोघांच्याही फायद्यासाठीं ठरवून टाकिलें कीं, आतां एकमेकांनीं एकमेकांची स्तुतीच करावयाची म्हणून ! बरें, काम सांगा तुमचें आमच्या या चरकशास्त्र्यांना !

**च०**—नाहीं. दोघांनाही !

**शुं०**—युवराजांना पर्वतावरून लोटूनही मरण आलें नाहीं हें तुम्हांला ठाऊक झालें असेलच ! आतां त्यांना मारण्याची कामगिरी तुमच्याकडे आली आहे. आतांच्या आतां असें जलाल विष तयार करून द्या कीं, त्यानें युवराज तांबड-तोब गतप्राण झालेच पाहिजेत !

**वा०**—कांहीं हरकत नाहीं. वैद्यशास्त्रांत आमचे हे चरकशास्त्री असे निष्णात आहेत म्हणतां ! यांनीं तयार केलेलें विष पिऊन कैक लोक मेले आहेत !

**च०**—वाग्भटशास्त्री सुद्धां कांहीं कमी नाहींत ! अशा मोठ्या कामाला असा राजवैद्यच पाहिजे ! आज गांवांतलीं सारीं लहानमोठीं विषारीं कामें यांच्याच हातून होतात !

**वा०**—गांवांतलीं कामें तर राहूं द्या ! यांचे तर घरच्याघरीं सुद्धां विष-प्रयोग चालतात. यांच्या वडिलोपार्जित मिळकतीला आधीं हे चौघे भाऊ वारस होते; पण आज मितीला हे एकटेच आहेत !

**च०**—विषप्रयोगाच्या बाबतींत यांच्या घराण्याचा अगदीं पूर्वापार लौकिक आहे ! यांच्या वाडवडिलांचें नांव ऐकूनच धन्वंतरीनें समुद्रांत उडी मारिली होती. तो परवां कुठें चौदा रत्नांबरोबर बाहेर आला !

**वा०**—पण पुन्हां त्याला पळावें लागलेंच. यांच्या वडिलांच्या औषधां-च्याच प्रभावानें त्यानें तडक स्वर्गाचा रस्ता पकडला !

**च०**—अहो, त्यांच्याजवळ एकेक असें जालीम विष आहे कीं त्यानें नुसते युवराजचसे काय पण तुमचा सारा राजवाडा जमीनदोस्त होईल.

**वा०**—आतां यांच्या विषांची तारीफ काय करावी ! अहो, त्रैलोक्याला जाळणारें प्रत्यक्ष कालकूट आहे यांच्या जवळ कालकूट ! श्रीशंकरांनीं लोकांच्या कल्याणासाठीं जो कालकूटाचा पेला झोंकला, त्याच्या बुडाचा गाळ पेल्या-सकट यांच्या वडिलांनीं उचलला ! बोला आतां !

**नि०**—बरी बोलायला सवड दिली एकदां तरी ! आजपर्यंत दोघे एकमे-कांची निंदाच करीत होतां. आतां स्तुति करीत आहां ती सुद्धां अशा बाब-तींत कीं तिनेंही एकमेकांना बदनामच करीत आहां. बरें, चला लौकर आंत आणि द्या तें विष तयार करून चला आंत !

**शुं०**—यांचा हा घातुक स्नेह फार दिवस टिकला तर लोकांचें दुर्दैवच म्हणायचें.

---

गडकऱ्यांच्या हस्तलिखिताचें शहात्तराव्या पानापासून पुढील मजकूर सुरू होतो. " लोकपाल " हा महाराजांचा अमात्य, महाराजांना प्रल्हादाला पर्वताच्या कड्यावरून जरी लोटून दिलें तरी तो न मरतां जिवंतच राहिला ही वार्ता सांगण्यासाठीं आला आहे. शहात्तराव्या पानावरील पहिल्या शब्दापासूनचा मजकूर जशाचे तसा दिला आहे. —संपादक

विचार यावेळीं महाराजांच्या मनांत चालला असेल! मला आज महाराजांशीं अगदीं निराळ्या रीतीनें बोलावें लागणार आहे; परमेश्वरा, या प्रसंगीं ( याठिकाणीं पदाची जागा सोडली आहे ) काय वाटेल तें होवो! आजपर्यंत नसलेलें धैर्य मी आज आंगीं आणणार. ( राजा येतो. )

**राजा**--( स्वगत ) नियाच्या दुर्दैवी अश्रूंनों, आपला ओघ आवरून धरा, तुमचा वेग कितीही प्रचंड असला तरी राजाच्या निश्चयाला वाहून नेण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं खास नाहीं! आणि कदाचित् असलें तरी आतां त्याचा काय उपयोग? प्रल्हादाला मृत्यूच्या दारापर्यंत पोंचवावयास गेलेल्या लोकपालानें यावेळीं इतकी मजल मारिली असेल कीं प्रेमाची तीव्र किंकाळी सुद्धां त्याला ऐकूं जाणार नाहीं. कदाचित् धवलगिरीवरून त्यानें माझ्या लाडक्याला यावेळीं लोटूनही दिलें असेल! असेल कशाला–ही पहा त्या कल्पनेनें छाती धडधड करूं लागली. जणूं काय धवलगिरीच्या तटावरून आदळत खालीं पडतांनां माझ्या लाडक्याच्या शरीराला जे आघात होत असतील त्यांचा माझ्या दगडासारख्याच कठिण हृदयावर हा प्रतिशब्दच होत आहे! त्याच्या प्राणाबरोबर माझाही प्राण या जोराच्या निश्वासानें बाहेर येऊं पहात आहे! कंठसुद्धां इतका सद्गदित झाला आहे कीं, लोकपाल जर इतक्या जवळ–( लोकपाल मुजरा करतो ) काय खरोखरीच तुम्ही इतक्या जवळ आहां?

**लोक०**–आपल्या दृष्टिप्रसादाची वाट पहात होतों!

**राजा**--( स्वगत ) स्वगत भाषण दुसऱ्याला ऐकूं जात नाहीं म्हणून ठीक; नाहीं तर माझ्या मनाची लज्जास्पद खळबळ यांना खास कळली असती. (उघड) तर मग यावेळीं तुह्मी कोठें असाल याबद्दल केलेली माझी कल्पना अगदींच चुकली! इतक्या लौकर परत आलांत यावरून असें वाटतें–पण असें वाटण्याचें कारणच नाहीं. तुमच्या मुद्रेतली चलबिचलच सांगते कीं तुम्ही आपली कामगिरी करून आलांत!

**लोकपाल**—माझ्या वास्तव्याप्रमाणें माझ्या कामगिरीबद्दलची आपली कल्पनाही चुकली आहे. सरकार—

**राजा**—तर काय पर्वतावरून लोटूनसुद्धां तो कुलांगार नाहींसा झाला नाहीं ?

**लोक०**—नाहीं; पण पर्वत मात्र तें पातक लपविण्यासाठीं भूगर्भात लपून पार नाहींसा झाला !

**राजा**—लोकपाल, आतां या लपंडावांत तुम्हांलाच नाहींसें व्हावें लागेल हें लक्षांत ठेऊन मग असल्या अशक्य गोष्टी सांगावयाचें साहस करा !

**लोक०**—महाराज, सर्वशक्ती परमेश्वराला अशक्य असें काय आहे ?

**राजा**—सर्वशक्तिमान ईश्वर ! तर काय ईश्वरभक्तीची लाट आमच्या सिंहासनाच्या इतक्या जवळ येऊन पोंचली आहे ?

**लोक०**—होय महाराज, आणि अजूनही दानवांनीं तिच्यावर विश्वास ठेवला नाहीं तर अभिमानाच्या कच्च्या पायावर रचलेलें दानवी सिंहासनही तिच्या ओघांत वाहून गेल्याखेरीज रहाणार नाहीं. !

**राजा**—लोकपाल, पूज्य सिंहासनाच्या स्थापनेच्या कार्यांत जर तुमच्या शरीरावर पूर्वींच जखमा झाल्या नसत्या तर आतांच्या अनादराच्या उद्गारांबद्दल दर शब्दास त्यावर एक एक जखम झाली असती ! पण गतकालीन सेवा यापुढें मात्र तुमचें रक्षण करणार नाहीं !

**लोक०**—महाराज, प्रश्न माझ्या रक्षणाचा नाहीं. पण आपला आहे ! माझ्या शब्दावर विश्वास ठेवा. अमात्य राजाचा नेत्र आहे असें म्हणतात म्हणून त्यानें पाहिलें तें राजानेंही पाहिलें !

**राजा**—पण जिथें अमात्याच्या नेत्रांचीच फसवणूक झाली असेल तिथें राजानेंही तोच आंधळेपणा पत्करावा काय ?

**लोकपालः**—दानवाधीश, हा आंधळेपणा नाहीं. शक्तीच्या जोरावर वेद चोरणाऱ्या शंकासुराचा परिणाम ऐकून आणि पृथ्वीचा नाश करूं पहाणाऱ्या हिरण्याक्षाच्या महाराजांचा परिणाम प्रत्यक्ष पाहून आपल्याला माहीत आहे !

**राजाः**—हें कांहीं आज नव्यानें कळत नाहीं !

**लोकपालः**—पण आज त्यांच्यावर विश्वास ठेवण्याची वेळ मात्र आहे. भगवान् श्रीविष्णु—

**राजाः**—पुरे, अमात्य ! केवळ एका माशानें शंकासुराचा आणि एक

डुकरानें हिरण्याक्षाचा वध केला एवढ्यावरून विष्णु तोच ईश्वर असें मी मानीत नाहीं. सर्वांत बलवान् म्हणून विष्णु जर ईश्वरपदास रूढ झाला असेल तर त्याच कारणामुळें माझी पदवी त्याच्यापेक्षांही वर आहे !

**लोक०**:—विष्णु तोच ईश्वर असा सांगण्याचा माझाही आग्रह नाहीं. पण आज जो प्रकार झाला–आणि त्याच्या खरेपणाबद्दल हें माझें मस्तक जामीन आहे–त्यावरून त्या शक्तीला विष्णु म्हणा अगर ईश्वर म्हणा.

**राजा**:—पंचेंद्रियांना गोचर असलेल्या पंचभूतांच्या आटोक्याबाहेर कोणतीही शक्ती मला मान्य नाहीं. असल्या शक्तीला भिणें म्हणजे रात्रींच्या स्वप्नांच्या आठवणीनें दिवसा भिण्यापेक्षांही हास्यास्पद आहे !

**लोकपाल**:—पण पंचेंद्रियांचें नियमन करणाऱ्या अदृश्य मनाप्रमाणेंच पंचभूतांची ही नियामक शक्तीही अदृश्य आहे ! ती न दिसली तरी तिचीं कार्यें दिसत नाहींत कां ?

**राजा**:--असल्या कल्पनेच्या खेळांत काय जीव आहे ! स्पष्ट चमत्कार पाहून भांबावलेल्या ऋषींच्या ईश्वरावर माझा–माझाच काय, पण कोणत्याही दानवाचा विश्वास नाहीं ! आणि तशांतून असा ईश्वर असलाच तरी त्याची आम्हांला परवाच नाहीं. दृश्यशक्ति पाहून आणि अदृश्यशक्तीचें अनुमान बांधूनच दानवांनीं आपली प्रतिज्ञा केली आहे ! ईश्वर म्हणून कोणी असेल तर हा पहा मी त्याच्याशीं दोन हात करावयास तयार आहे.

**लोक०**:—महाराज, ही प्रतिज्ञा विसरण्याचाच आतां आम्हीं अभ्यास केला पाहिजे ! नाहीं तर, प्रतिज्ञा शेवटास नेण्याच्या नादांत आमचाच शेवट होईल. ( या ठिकाणीं पद घालावयाचें होतें. ) आज अनन्य भावानें भगवंताला शरण जाऊन दुराग्रहाचाच शेवट केला पाहिजे; आणि या कामांत आमच्या युवराजांनाच आमचे मार्गदर्शक केलें पाहिजे.

**राजा**:—लोकपाल, काय सांगतां हें तुम्ही ! तुमच्या प्रत्येक शब्दानें तिरस्काराची परमावधी होत आहे. रणांगणीं मेलेल्या दानवांच्या छिन्नविछिन्न प्रेतांनीं सुद्धां अजून आपल्या हातांतलीं शस्त्रें टाकलीं नाहींत, उभय पक्षांतल्या वीरांच्या पायांखालीं चुरलेल्या त्यांच्या हाडांच्या प्रत्येक कणानेंसुद्धां अजून सूडाची ओरड सोडली नाहीं; अगदीं कुजत पडलेल्या आतड्यांचा पीळसुद्धां अजून उलगडला नाहीं; मातींत मिसळलेलें काळें ठिक्कर रक्तसुद्धां अजून थंड पडलें

नाहीं, गिधडांनीं फोडलेल्या डोळ्यांच्या खाचांतूनही अजून रागाच्या विषारी वाफा निघावयाच्या थांबल्या नाहींत; फार काय मृतांचा प्राणवायूनेंसुद्धां रणोन्मुखांच्या शेवटच्या किंकाळ्यांचा ध्वनि वातावरणांत तसाच थोपचून धरून त्याचा कर्कशपणा अजून जराही कमी होऊं दिला नाहीं; आणि तुम्ही असला निर्जीव उपदेश करितां ! धि:कार असो तुमच्या स्वाभिमानाला ! अगदीं आमच्या प्रेतांनींसुद्धां जिवंत रहावें आणि आम्ही नामर्दाप्रमाणें जिवंतपणींच मरावें ! मर्दपणाचा दानवांनीं असा उपमर्द केला तर अशा षंढांचा निर्वंश करण्यासाठीं आमच्या बायका आपल्या कोवळ्या बालकांना–आजच्या चिमुकल्या दानवांना–आपल्याच हातानीं ठेचून टाकतील ! प्रल्हाद आमचा मार्गदर्शक होण्यापूर्वीं आम्हीच त्याला त्याच्या स्वर्गाचा मार्ग दाखवूं ! माझ्यापासून ईश्वर प्रल्हादाला कसा वांचवितो हेंच मला पहावयाचें आहे ! आतां ही स्पर्धा प्रल्हादाशीं नाहीं, ईश्वराशीं आहे.

**लोक०**:—ईश्वराशीं धरलेला अभिमान कधींही शेवटास जाणार नाहीं.म्हणून महाराज ( येथें पद घालावयाचें होतें ) अशा मदांधपणानें आमच्या पापांचा पर्वत अधिकाधिक उंच करण्यांत काय अर्थ ! अध:पात जितका अधिक उंचून तितकाच अधिक खोल ! मृत्यूशीं याहून अधिक परिचय आम्हां दानवांच्या दु:खाला कारण होईल ! आपण लावलेला अग्नि शेवटीं प्रदीप्त करणारांचाही [illegible] !

**राजा**:—लोकपाल, दानवांना तुमच्या असल्या बेहिंमती उपदेशाची मुळींच जरूरी नाहीं.

**लोक०**:—काय बेहिमती ! राजा,ज्या या लोकपालाच्या पराक्रमानें तुझ्या–

**राजा**:—त्या पराक्रमाची आठवण नको. अवयवांची सारी कर्तबगारी आत्म्याच्या जोरावरच चालते.

**लोक०**:—राजा, अशा स्वजनांचा त्याग करूं नकोस ! पक्कफल आधारभूत वृक्षकराशी बेपर्वाईनें वागतांच अध:पात पावतें ! इतर तटांना सोडून पुढें पुढें जाणारें गिरिशिखर नेहमीं कोसळून पडतें ! भलत्याच अभिमानाच्या भाराखालीं सांपडून मरणें हा सुज्ञांचा मार्ग नाहीं.

**राजा**:—अभिमानाचा भार टाकून मान वांकविण्यापेक्षां दानवांना अभिमानाच्या भारानें मान ताठ ठेवणेंच अधिक आवडेल !

**लोक०:**—पण अशा वागण्यांत धाका आहे.

**राजा:**—त्याची कोणी पर्वा केली आहे! ज्याला मोठेपणा पाहिजे त्यानें आपत्ती सोसलीच पाहिजे. भरतीओहटीचा त्रास समुद्राप्रमाणें भिकारड्या सरोवरांना नसतो! तेजस्वी चंद्र-सूर्यांच्या मागची ग्रहणाची उपाधी ताऱ्यांना नसते!

**लोकपाल:**—महाराज, माझें कर्तव्यकर्म मीं केलें! आतां मला आज्ञा असावी. मात्र माझ्या उपदेशाचा अपमान केल्याबद्दल पश्चाताप करण्याची पाळी परमेश्वर आपल्यावर--

**राजा:**—चला, निघा. मात्र आपला भेकडपणा असा चोहींकडे दाखवूं नका. तुमच्या राजाच्या मोठ्या मनानें जसें तुमच्या गतसेवेकडे लक्ष दिलें तसेंच इतर दानवांचीं हलकीं मनेंही देतील अशी आशा धरूं नका! आपल्या उच्च पदवीपासून ढळलेला कडा अधोगतीला पोंचण्यापूर्वी खालच्या कड्याच्या आघातानेंच त्याच्या ठिकऱ्या होतात हें लक्षांत ठेवा! नको, शत्रूलाही मिळालेला हा सन्मान मला नको! ( लोकपाल जातो ). गोष्ट या थाराला येऊन पोंचली काय? मोठा चमत्कार आहे म्हणायचा! कदाचित् पुत्रप्रेमामुळें राणीनें प्रल्हादासारखा दुसरा मुलगा--पण, छे, हा नुसत्या कल्पनेचा खेळ आहे! कांहीं असो. दानवांचा पराक्रमी राजा, आपल्या मनाला या आश्चर्यामुळें चकित होऊं देऊं नकोस! नाहीं तर एक तुझा आणि तुझ्याबरोबर सर्व दानवांचा चुराडा झालाच म्हणून समज! ( जातो. )

**पहिला प्रवेश समाप्त**

---

# अंक पांचवा

## प्रवेश दुसरा

( अंतःपुरांतील एक महाल. प्रल्हाद बसला आहे. )

**प्रल्हाद:**—( स्वगत ) परमेश्वरा! भक्तांच्या भक्तीचें फल देण्यापेक्षां आधीं पतितांच्या पापांची क्षमा कर! पापांचा पराजय आमच्या क्षुद्र दृष्टीला कितीही मनोहर वाटत असला तरी तुझ्या दयाळुपणाला शोभत नाहीं. संसार-

सागरांतल्या अमृतरत्नांचा लाभ दुर्जनांना होऊं दे म्हणजे ते त्याच्या उपभोगात मग्न होऊन पापांपासून दूर राहतील! तुझ्या नांवाचे अधिकारी सज्जन आपल्या पतित बांधवांच्या सुखासाठीं कालकूट विषाचा पेला मोठ्या आनंदानें घेतील आणि जीवन्मृतासाठीं मरून मरणाचें मूळच काढून टाकतील.

**राजा:**—जें एकदां तेंच सर्वदां! आतां ही गोष्ट वज्रलेप झाली आहे.

( राजा व राणी येतात. )

**राणी:**—महाराज, प्रखर अग्नि एकदम विझून गेला आणि प्रचंड पर्वत नाहींसा झाला.

**राजा:**—एवढ्यानें मी आपला निश्चय सोडीन असें समजूं नकोस! माझा क्रोध अग्नीपेक्षांही प्रखर आहे आणि माझा निश्चय पर्वतांपेक्षांही अढळ आहे प्रल्हादाला माझ्या रागापासून वांचविणारा कोण आहे?

**राणी:**—महाराज, प्रत्यक्ष परमेश्वरच त्याचा पाठीराखा झाला नाहीं काय?

**राजा:**—परमेश्वर? परमेश्वर तो कोणता? ब्रह्मा, विष्णु कीं महेश्वर? यांपैकीं वाटेल त्याचें नांव घे म्हणजे वेदांचीं पानें चाळणाऱ्या त्या भटाला, सापाशीं खेळणाऱ्या त्या गारुड्याला किंवा राखेंत लोळणाऱ्या त्या नंदिकेश्वर नंदिबैलाला एका क्षणांत पायाखालीं ठेंचून ही वसुंधरा निर्वीर करतो! आदिवराहाची विक्राळ दाढा उपटून तिनें या पृथ्वीचा किंवा अवतारी मानलेल्या कुर्माच्या अभेद्य पृष्टावर ही पृथ्वी एकाद्या चेंडूसारखी आपटून तिचाही चुराडा करून टाकतों.

**राणी:**—महाराज, आपल्याला सर्वेश्वराची भीति वाटत नसेल तर माझ्यासाठीं निदान त्याची निंदा तरी करूं नका! पुन्हा परमेश्वराचें नांवही काढणार नाहीं अशी मी पाहिजे तर शपथही घेतें!

**राजा:**— केवळ तूंच नाहीं तर तुझ्या या कुलकलंक मुलालाही तीच शपथ घ्यावी लागेल.

**प्र०:**—महाराज, असें मात्र कधींही व्हावयाचें नाहीं! महाराणी असा उपदेश कधींच करणार नाहीं आणि माझ्या दुर्दैवानें केलाच तर—

**राजा:**—तर काय?

**प्र०:**—तर आपल्या आज्ञेप्रमाणें तिच्याही—

**राजा:**—उन्मत्त राजपुत्रा! आज्ञाभंगाची मला आठवण करून देऊन—

( स्वगत ) पण मला तें वचन नडणार-( उघड ) राजा हिरण्यकश्यपूला अशीं उद्दाम उत्तरें ऐकण्याची संवय नाहीं ! राणी, तुलाही असेंच वाटतें काय ? ( ती बोलत नाहीं ) काय माझ्या प्रश्नाला उत्तरही नाहीं. तर मग अर्थपाल, आण तो पेला इकडे. ( अर्थपाल पेला आणून देतो व जातो ) हे घे आणि दे आपल्या लाडक्या मुलाला!

**राणीः**—महाराज, काय हें ?

**राजाः**—जालीम जहर ! राजाच्या रागाचा परिपाक समजलीस ! हें त्याला दे. दानवांच्या कीर्तीला लागलेला हा काळाकुट्ट कलंक या काळासारख्या काळविषांत बुडवून टाक !

**राणीः**--मी काय ऐकतें हें मला समजत नाहीं. आपल्या विषारी शब्दांनीं माझें मस्तक सारखें भ्रमण करूं लागलें आहे ! महाराज, असें निर्दय होऊं नका! माझ्या बाळाकडे,आपल्या दोघांच्याही लाडक्यांकडे,पित्याच्या प्रेमळ दृष्टीनें पहा. प्रत्यक्ष पोटचा गोळा, काळाच्या तोंडांत मी कसा लोटूं ! मातेचें प्रेम कसें असतें याची कल्पना करा !

**राजाः**--जसा याला जन्म दिलास तसें मरणहि दे !

**राणीः**—महाराज, नाहीं--माझे प्रेमळ नाथ, प्रत्यक्ष आईच्या हातून असें अघोर कृत्य कसें घडेल ? साक्षात् विषारी नागिणीसुद्धां आपल्या पिलांना दूधच पाजतात. महाराज, आपल्या हातांत हें नाजूक फूल आहे तसेंच तें सुकुमार मुल ! केवळ श्वासानेंही कोमेजून जाणारे प्रेमाच्या नाजूकपणानेंच हातावर खेळविलें पाहिजे. त्याची एकादी पाकळी जरी तोडली तरी आपल्याला तें पहावेल काय ?

**राजाः**—पण या नाजूक फुलांची परवा तरी किती वेळ ? त्यांचा मधुर सुवास येईपर्यंतच ! अथवा, सुवास तरी कशाला पाहिजे ! नुसती मनाची लहर फिरल्याबरोबर हें नाजूक फूलसुद्धां असें पायांखालीं चिरडून टाकायला किती उशीर ! आणखी जी या फुलाची दशा तीच या मुलाची दशा !

**राणीः**--हाय हाय ! कोण हा निष्ठुरपणा! महाराज, आपणाला माझी दया येत नसेल तर निदान आपल्या न्यायीपणाला तरी सोडूं नका ! महाराज, ( या ठिकाणीं पद घालावयाचें होतें) म्हणून माझा प्राण घ्या व प्रल्हादाला सोडून द्या.

**राजाः**--आज मला तुझ्या प्राणांची गरज नाहीं. प्रल्हादाप्रमाणें तुझा परमे-

-श्वर जेव्हां तुझ्याही प्राणांचें रक्षण करण्याचा प्रयत्न करील त्यावेळीं तुझीही हीच दशा होईल!

**राणीः**—महाराज, खरोखरीच आपल्या हृदयांत दयेचा लेशही उरला नसेल तर हा आपला लाडका आपल्यापुढें उभा आहे. आपणच हें अघोर कृत्य करून नंतर माझा प्राण घ्यावा.

**राजाः**—ही पहा साक्षात् कृतांताची कराळ जिव्हा! (तलवार दाखवितो). केवळ रक्तासाठीं हापापलेली नागीण! कितुरी कुलकलंकाच्या रक्ताचा घोट घेण्यासाठीं उसळीसरशी बाहेर येत आहे! आणि म्हणूनच हें काम तुला करावें लागत आहे. अविचारानें दिलेल्या वचनामुळें जसा मला त्रास झाला आहे तसा अविचारानें वचन घेतल्यामुळें तुलाही झाला पाहिजे!

**राणीः**—जीवितेश्वर, तें वचन मी माझ्यासाठीं घेतलें नव्हतें. माझ्या लाडक्यासाठींही नव्हतें! केवळ आपल्याच भावी कल्याणाच्या इच्छेनेंच मीं आपल्याजवळ त्या वचनाची याचना केली होती.

**राजाः**—काय माझ्या कल्याणासाठीं?

**राणीः**—होय प्राणेश्वर, प्रल्हादाचा प्राण घ्यावयाला आपण तयार होणार नाहीं तोंपर्यंत आपल्याला कसली भीति नाहीं असें भगवान् नारदांनीं मला सांगितलें होतें.

**राजाः**—अशा नामर्द रीतीनें जीव जगविण्यासाठीं या दानवेश्वराचा हा अवतार नाहीं! हें ऐकल्यामुळें तर तुझें वचन झुगारून देऊन प्रल्हादाला मारण्याकरितां आमची उत्कंठा क्षणोक्षणीं वाढत आहे. आतां तर माझी विनवणी करण्यांत कांहींच अर्थ नाहीं!

**राणीः**—सर्वेश्वर, आपली नको तर कोणाची विनवणी करूं? आपल्यावांचून मला दुसरें कोण आहे?

**राजाः**—ज्याच्यासाठीं माझा, आपल्या प्रेमळ पतीचा, आपल्या रक्षणकर्त्या राजाचा अनादर करीत आहेस, त्या विष्णूची विनवणी कर! त्या सर्वेश्वराची कर!

**राणीः**—शिव, शिव, आपला अनादर! आधींच पुत्रनाशाच्या भीतीनें छिन्नविछिन्न झालेल्या या हतभागी हृदयावर या विषारी शब्दांचा वर्षाव करूं नका! नाथ, माझे विष्णु, माझे वैकुंठेश्वर, माझे कैलासनाथ, माझे सर्वेश्वर आप-

णच ! माझ्या सर्वस्वाच्या सर्वेश्वराला, जीविताच्या जीविताला सोडून मी कोणाची याचना करूं [ येथें पद घालावयाचें होतें. ]

**राजाः**—कयाधू ! या प्रेमळ शब्दांनीं भरलेली असली प्रीतीचीं रडगाणीं मला नको आहेत ! प्रत्यक्ष कृतीनें माझी खात्री कर ! उचल तो पेला, एरव्हीं मला तुझी दया मुळींच येणार नाहीं.

**राणीः**—माझी नाहीं आली तरी नाहीं पण आपल्या लाडक्याची तरी येऊं द्या. एक वेळ आपल याच्यावर किती प्रेम होतें याची नुसती कल्पना तरी करा ! त्यावेळच्या प्रेमाकडे नजर देऊन आतांचा हा एवढा अपराध त्याला क्षमा करा. एकदां आमचा हा तान्हुला दूध पिऊन निजला होता. त्याच्याकडे पुष्कळ वेळ सारखें पहात बसल्यामुळें आम्हां दोघानांही आपच्या अल्लडपणाच्या दिवसांची आठ-वण होऊन--आपण माझ्या हनुवटीला हात लावून -त्या प्रसंगाची आठवण आप-ल्याला असेलच ! इतक्यांत--[ दिंडी ] तेव्हां आपल्याला कौतुक वाटून त्यालाही तेंच बक्षिस देण्यासाठीं आपण अनिवार प्रेमानें त्याचें चुंबन घेतलें. त्यामुळें आमचा हा लाडका झोपेंतून दचकून जागा झाला. त्यावेळीं तुझ्यासारखाच हा भित्रा आहे असें आपण म्हटलें होतें तें आठवतें कां ?

**राजाः**—कयाधू ! गतसुखाच्या दुःखदायक आठवणीनें माझ्या मनाला द्रव येईल हा समजून काढून टाक !

**राणीः**—आणखी महाराज, असेंच आम्ही दोघे एकदां स्वच्छ चांदण्याचे वेळीं लतामंडपांत प्रेमानें बाळपणींच्या गोष्टी बोलत बसलों होतों; जव-ळच आमचा लाडका मातीवर अंग टाकून एकाग्रदृष्टीनें चंद्राकडे टक लावून पहात होता. बोलतां बोलतां त्याचा तोंडवळा माझ्यासारखा दिसतो कीं आपल्या-सारखा दिसतो याबद्दल आपल्यांत प्रेमकलह सुरूं झाला. म्हणून प्रत्यक्ष पाहून खात्री करून घेण्यासाठीं मी त्याला उचलून जवळ घेतला! पण आपल्या खेळाचा हिरमोड झाला म्हणून हा लबाड रडूं लागला तेव्हां आम्हीं दोघांनीं चुंबनें घेऊन त्याचें समाधान केलें. तो प्रसंग आठवतो कां ? (या ठिकाणीं पद यावयाचें होतें)

**राजाः** —पण आतां त्यांची आठवण करून काय उपयोग ? आज तो काळ-निघून गेला आहे आणि त्याच्याबरोबर तें प्रेमही नाहींसें झालें आहे !

**राणीः**—नाहीं नाहीं ! महाराज, त्या प्रेमाचा धनी इथें उभा असतांना तें नाहींसें कसें होईल ? हेंच कुरळकेश किती तरी प्रेमानें आम्ही कुरवाळिलें आहेत;

याच कोमल गालावर आम्हीं किती तरी वेळां चुंबनाची वृष्टि केली आहे.लहानपणची माझ्या डोळ्यांतली सारी चंचलता याच्या डोळ्यांत उतरली आहे असें म्हणून किती तरी वेळ आपण त्याच्याकडे एकाग्रतेनें पहात होता. आणि आज तेंच मुखकमल, आपल्या रागाच्या भीतीनें सुकून जाऊन पाण्यानें डबडबलेल्या विशाल नेत्रांनीं अनाथासारखें अशाळभूत मुद्रेनें आपल्याजवळ त्यावेळच्या प्रेमाची याचना करीत असून आपल्याला कांहींच कां दया येत नाहीं. प्रेमाच्या दृष्टीला अजूनही त्यावेळच्या हजारों मूर्ती दिसत नाहींत कां ?

**राजाः**—हजारों मूर्ती दिसतात खऱ्या, पण माझी दृष्टि प्रेमाची नाहीं, सूडाची आहे. म्हणून प्रल्हादाच्या प्रत्येक मूर्तीप्रमाणें हिरण्याक्षाची एकएक छिन्नविछिन्न मूर्ति आणि त्याच्या रक्तानें भरलेली आदिवराहाची विकाळ मूर्ति दिसत आहे, त्यामुळें हृदयांत पेटणाऱ्या क्रोधाग्नीच्या ज्वालेंत तुझ्या प्रेमाची राखरांगोळी होत आहे.

**राणीः**—बाळा प्रल्हादा, ऊठ, महाराजांच्या पायावर लोळण घे आणि त्यांच्याजवळ प्रेमाची भिक्षा मांग ( प्र. उठतो )

**राजाः**—कुलांगारा, लाज नाहीं वाटत पुढें यायला. ( या ठिकाणीं पद यावयाचें होतें. )

**राणीः**—नाथ, प्रेमाच्या उत्कंठेनें धांव घेणाऱ्या आपल्या बाळाला दूर करूं नका ( या ठिकाणीं पद येणार होतें. )

**राजाः**—राणी, बजावून सांगतों कीं हा साहसाचा आग्रह करूं नकोस; नाहीं तर तुझ्या वचनासह प्रल्हादाच्या कोमल मस्तकाला पायाखालीं तुडवून ठेचून टाकीन.

**राणीः**—त्रिभुवनपालक, आपल्या पायाचा आश्रय घेणाऱ्याला आपण हेंच बक्षिस देणार असाल तर ही पहा मी आपले पाय धरितें. ती दया आधीं माझ्यावर करा.

**राजाः**—राणी चल हो दूर ! अशानें माझा निश्चय ढळणार नाहीं !

**राणीः**—मी आपले पाय सोडणार नाहीं. नाथ, प्रेमळ नाथ, मी आपली लाडकी अर्धांगी, आपल्या पायांची दासी, आपल्यापुढें पदर पसरतें. मला पुत्रदानाची भिक्षा घाला.

**राजाः**—कयाधू, आपल्या हट्टाबरोबर माझे पाय सोड. प्रतीसारख्या

बायकी मनोवृत्तीनें सूडासारख्या मर्दानी विकाराला घालविणें म्हणजे तुझ्या सारख्या अक्लेनें माझ्यासारख्या वीराला जिकण्यासारखेंच आहे. चल सोड माझे पाय !

**राणीः**—महाराज पूर्वप्रेमला एकदम विसरूं नका ! एक वेळ, या हतभागिनीला, आपल्या चरणरजांच्या दासीला, उदार मनानें, हृदयमंदिरांतली देवी म्हणून —

**राजाः**—अजूनही म्हणतो ! आणि खरोखरीच आज मी तुझी अघोर पूजा करणार आहे ! पण देवी, प्रल्हादाला मारून त्याच्या आतड्यांच्या माळा तुझ्या गळयांत घालून, त्यांच्या रक्तानें तुला स्नान घालून, त्याच्या बटबटीत डोळ्यांनीं, तुझ्या लाडक्या नेत्रकमलानीं तुझी पूजा केली तर तुझें नाजूक हृदय दुःखानें फाटून जाईल ! म्हणून म्हणतो कीं माझे पाय सोड, माझ्या सहनशीलतेचा अंत पाहूं नकोस.

**राणीः**—आपण कांहीं केलें तरी मी हें माझ्या प्रेमाचें सर्वस्व सोडणार नाहीं. आपल्या हातून आपल्या पायांवर मृत्यु आला तर याहून आधिक मला काय पाहिजे ? आपल्या प्रेमाची मला खात्री आहे.

**राजाः**—तर मग, तुझ्या खात्रीसह एका लाथेनें तुला दूर करतों; ही पहा मी तुझ्या प्रेमाला अशी लाथ मारतो ! ( तिला लाथेनें दूर लोटतो )

**प्रल्हादः**—परमेश्वरा, या हतभाग्यासाठीं या साध्वीला काय त्रास होत आहे हा ! यापेक्षां मी दुर्दैवी जन्माला आलों नसतों तर किती चांगलें झालें असतें. आई, ऊठ, कशाला या पाप्यासाठीं हा त्रास भोगतेस ? यापेक्षां ( या ठिकाणीं पद येणार होतें )

**राणीः**—(उठून राजाचे पाय धरून) आपण मला दूर लोटून दिली तरी मी आपल्या पायांचा आसरा सोडणार नाहीं. आपल्यावर माझा तसाच अधिकार आहे !

**राजाः**—अधिकार ! सर्वेश्वरावर अधिकार चालविणारी तूं कोण ?

**राणीः**—एक अनाथ माता ! पुत्रप्रेमानें आंधळी होऊन—

**राजाः**—पतिधर्माला विसरणारी ढोंगी पतिव्रता—

**राणीः**—( उठून ) काय म्हणालात ? ढोंगी पतिव्रता ! नाहीं, महाराज, असें मात्र म्हणूं नका ! आपल्यासाठीं एकच काय पण हजार प्रल्हाद असते तर



3460

त्या सर्वांनाही आपल्या हातानें मी वीष दिलें असतें ! पतीची आज्ञा पत्नीला शिरसावंद्य आहे ! बाळा, चल ये असा पुढें ! तुला कुमार्गाला लावण्यापेक्षां ही पहा. मी तुला आपल्या हातानें मारून टाकते ! ढोंगी पतिव्रता म्हणवून घेण्यापेक्षां निर्दय माता असा कलंक माझ्या नांवाला लागला तरी चालेल !

**प्रल्हादः**—शाबास आई, धन्य आहे तुझ्या धैर्याची ! जगांतली प्रत्येक माता जर असें धैर्य दाखवील तर साक्षात् स्वर्गसुद्धां आपल्या या भूलोकाचा हेवा करलि. आई, दे मला तें वीष तुझ्या प्रेमळ हातांनीं दे.

**राणीः**—नको तो प्रेमळ हात ! बाळा, आतां मला आई कशाला म्हणतोस ( या ठिकाणीं पद )

**प्रल्हादः**—आई काय हा मोह ! आताच तूं जें धैर्य दाखविलस तें इतक्यांत नाहींस झालें.

**राणीः**—बाळा, असलें राक्षसी धैर्य प्रत्यक्ष प्रसंगीं कसें टिकेल. याच हातांनीं आजपर्यंत तुला दूध पाजलें आणि आज प्रत्यक्ष विष ! भगवंता एकनिष्ठभक्तिच हेंच कां रे फळ ?

**प्रल्हादः**—आई, असा धीर सोडूं नकोस. ऊठ आपल्या दृढनिश्चयानें आपणहीं महाराजांना शोभण्यासारखींच आहों असें त्यांना दाखवूं. तूं त्याची महाराणी आहेस आणि मी त्यांचा युवराज आहे. असे करूं नकोस ! मन दगडासारखे करून आलेल्या प्रसंगाला पाठ दे ! नाहीतर महाराज काय म्हणतील.

**राणीः**—बाळा, पुत्रमोह मोठा कठीण आहे ! आजपर्यंत कोणत्याही आईनें आपल्या पोटच्या गोळ्याचा घात केला नसेल. पण ही चांडाळीण मात्र तयार झाली आहे ! ( या ठिकाणीं पद घालावयाचें होतें ) बाळा, व्यर्थ रे व्यर्थ ! या काळसर्पिणीच्या पोटीं आलास.

**प्रल्हादः**—आई कां बरें असें बोलून माझ्या हृदयाला त्रास देतेस ? या ठिकाणीं पद यावयाचें होतें !

**राणीः**—निर्दय कृतांता ! मोठमोठ्या वीरांना तूं मातीला मिळवितोस असा तुझा लौकिक आहे; आणि आज माझ्या कोंवळ्या बाळावर शस्त्रं उगारतोस. हाच का रे तुझ्या पुरुषार्थ !

**प्रल्हादः**—आई, काळ बिचारा कोण शस्त्रं उगारणार ? ही सारी भगवंताची लीला आहे !

**राणीः**--तर मग भगवंता ! आपण तरी असें निर्दय कसें हो झालां ! देवा, आपल्या वक्षस्थलावरचा कौस्तुभमाणि दैत्यांनीं चोरून नेला त्यावेळीं आपण त्यांना शासन केलें आणि आज आपणच माझ्या हृदयांतला हा माझा कौस्तुभ माणि काढून नेत आहां ! तेव्हां आपलें गाऱ्हाणें आतां कोणाकडे नेऊं ! हें कठिण हृदय दुःखानें दुभंग कां होत नाहीं ? म्हणजे, माझ्या लाडक्या, तुला या हृदयांत पुन्हां लपवून ठेवला असता !

**प्रल्हादः**--आई, असें धैर्य सोडून कसें चालेल ! ही कसोटी आहे. हिला उतरलों तरच आपण देवाच्या दयेला पात्र होऊं ! दोन वेळां ज्या भगवंतानें आपल्याला साह्य केलें तो आतां तरी स्वस्थ कसा बसेल ? मला तर वाटतें कीं तुझ्या पवित्र हातानें दिलेलें हें विष-पण याला विष कोण म्हणेल-हें साक्षांत अमृत पिऊन मी चिरंजीव मात्र होईन ! तुझ्या पवित्र चरणांची पुण्याईच तशी आहे !

**राणीः**--आपल्या पोटच्या गोळयाला विष देऊन काळाच्या तोंडांत त्याचा घांस देणें हीच माझी पुण्याई ! पूर्वजन्मींच्या पातकांबद्दल अशा रीतींनें मला शासन करण्यासाठींच भगवंतानें दोन वेळां तुला वांचविलें असावें !

**प्रल्हादः**--बरें, मग अशा रीतीनें मरण आलें तर त्यांत काय वाईट होणार आहे ! असें मंगल मरण मिळविण्यासाठीं मोठमोठे महात्मे सुद्धां एकदांच काय पण हजारों जन्म घ्यावयाला तयार होतील ! छे; आई, आतां मुळींच उशीर करूं नकोस ( पद )

**राणीः**--लाडक्या, आपल्या प्रत्येक शब्दानें माझ्या हृदयाला कसा पीळ पाडीत आहेस याची तुला कल्पनाही नाहीं रे !

**प्रल्हादः**--आई, यांत दुःख करण्याचें कारणच नाहीं ! तूं माझ्या जन्माचें सार्थक करीत आहेस ! यांत दुःख मानावयाचें कीं आनंद ! ऊठ, मोठ्या आनंदानें आजपर्यंत मला जसें दूध पाजलेंस तसेंच आज हें मंगल विष पाजून आपल्या मांडीवर थोपटून निजीव म्हणजे तुझ्या मांडीवर पडून मी चिरनिद्रेचा अनुभव घेइन ! अहाहा, केवढा भाग्यवान् मी ! अनंतकाळपर्यंत या सुखनिद्रेंतून मला कोणीही जागविणार नाहीं. पण आई, मला अक्षय निद्रा लागेपर्यंत माझें लहानपणींचें तें आवडतें गाणें म्हणायला मात्र विसरूं नकोस.

**राणीः**--नकोरे असे कठोर शब्द बोलूं ! ( पद यावयाचें होतें. )

**प्रल्हाद**—अजून कठोर शब्द मात्र तूं म्हणत आहेस !

**राणी**--आमच्यासारख्या पाप्यांच्या नशिबीं येणारा पुढल्या जन्माचा व्याप तुला कसा होईल ?

**प्रल्हाद**--अशा मंगल मरणाची आशा असल्यावर पुन्हां जन्म घेण्यालासुद्धां कोण माघार घेईल ! माझी पुण्याई बळकट असली तर हें मरणाचें सुख, अगदीं असेंच, पुन्हांही मिरविण्यासाठीं मी तुझ्या पोटीं जन्म घेईन! पण आई, पुढच्या जन्मीं असें मात्र कर–( पद यावयाचें होतें )

**राणी**—बाळा, कशाला पुन्हा पापिणीच्या पोटीं येण्याची इच्छा करतोस ? या एकाच जन्मानें सुखाचे सारे सोहळे सरले नाहींत कां ?

**प्रल्हाद**--छे, छे, माझा तर अगदीं त्याच्या उलट निश्चय झाला आहे ! पुन्हां तुझ्या पोटीं जन्म घेण्याचें सुख माझ्या दैवीं नसलें तर निदान देवाच्या पायांजवळ हट्ट घेऊन मी आकाशांत चमकणारा एकादा तेजोमय तारा होऊन प्रेमाच्या एकाग्रतेनें सारखा तुझ्याकडे पहात बसेन !

**राजा**--राजपुत्रा ! परजन्माच्या वाटाघाटींत या जन्माचा ठरलेला शेवट लांबवूं नकोस. राणी कयाधू ! आटोप लौकर. सूर्यास्तापूर्वी प्रल्हाद गतप्राण झालाच पाहिजे. नाहींतर शत्रूच्या गुलामाच्या मरणकाळच्या तीव्र यातना पहाण्याचें समाधान मात्र मिळणार नाहीं.

**राणी**—महाराज, एकवार मला पुत्रमुखाचा शेवटचा अनुभव घेऊं द्या ! यापुढें माझा बाळ मला आणखी आपल्याला तरी पुन्हां दिसणार आहे कां ? भगवंता सूर्यनारायणा, अस्तचलावरून अपार सागरांत उडी टाकायला आतां उशीर करूं नकोस. आज अजून कधींही न घडलेलें–आणि देवा, पुन्हा मात्र असा प्रसंग कोणावर आणूं नकोस–कृत्य घडणार आहे ! आई म्हणविणारी ही कृत्या, साक्षात् राक्षसी आपल्या हातानें आपल्या एकुलत्या एका मुलाचा नाश करणार आहे. या अघोर कृत्याच्या दर्शनानें आपल्या पुण्य किरणांना विटाळूं नकोस. म्हणून ( या ठिकाणीं पद घालावयाचें होतें ) भगवती, काळरात्री आजच प्रलयकाळचें उग्र रूप धारण कर आणि माझ्या काळ्याकुट्ट कर्मावर तुझ्या काळ्या अंधाराचा पडदा टाकण्यासाठीं रोजच्यापेक्षां लौकर धावून ये ! पण आपल्या सुंदर चंद्राला आणि तरल तारकांना मात्र इतक्यांत आणूं नकोस. नाहीं तर निदान काळ्याभोर मेघांच्या पडद्याआड त्यांना झाकून टाक. नाहीं तर

माझ्या बाळाचा आपल्यापेक्षांही सुंदर मुखचंद्र, विषपानानें काळाठिक्कर पड-लेला पाहून तुझा चंद्र आणि आपल्यापेक्षांही चमकदार डोळे तारवटलेले पाहून तुझ्या तारका भयानें काळवंडून जातील: आणि मग अनंत अंधकाराच्या राशीं-तून स्वर्गमार्गाचा प्रवास एकटाच करितांना माझ्या बाळाला मार्ग
( यापुढें मजकूर सांपडला नाहीं ).

---

## रा. श्री. शं. मुजुमदार यांजकडून

### ( १ )

### गडकऱ्यांच्या अभ्यासाची रीत

प्रस्तुत लेखकाचा आणि कै. गडकरी यांचा स्नेह सन १९०१।०२ पासू-नचा म्हणजे विद्यार्थी दशेपासूनचा होता. आम्हां उभयतांचें वास्तव्य अहोरात्र अभ्यासामुळें एकत्रच असे व सुमारें चारपांच वर्षें त्यांचा व माझा परिचय ते नाटकाच्या धंद्यांत शिरण्यापूर्वींचा असल्यामुळें त्यांच्या स्वभावाची ओळख मला पूर्ण अवगत झाली होती. विद्यार्थीदशेचा काळ हा मानसिक दृष्टीनें विचार करतां उच्छृंखलपणाचाच असतो, व या लहान वयांतच सभोंवारच्या अनुकूल किंवा प्रतिकूल परिस्थितीचा पगडा मनावर ठसून त्या कोमल बुद्धीचे अंकूर वाढीला लागतात अगर अजिबात खुडले जातात. कै. गडकरी अशा परि-स्थितींत आपला अभ्यासक्रम चालवीत होते. अभ्यास करण्याची तऱ्हा अशी असे कीं, अंथरूण तसेंच पसरलेलें महिनामहिना रहावयाचें; त्याचें भोंवतालीं विड्याकाड्यांच्या पेट्यांचा पहारा, जागतीज्योत म्हणून सज्ज रहावयाचा; उशाशीं अभ्यासांच्या पुस्तकांचा व त्यांच्याबरोबरच इतर कांहीं नाटकांच्या पुस्तकांचा, कांहीं हस्तलिखित चोपड्यांचा ढिगारा असावयाचा; जवळच धुर-कटलेला-मळकटलेला स्टोव्ह व त्यावर सकाळीं त्यांच्या " मा " कडून तयार होऊन आलेल्या चहाची किटली इतकी सामुग्री असे. थकवा आला म्हणजे तोच भरून आलेला किटलींतला चहा वरचेवर गरम करून प्यावयाचा हीच त्यांची रीत होती. चहा तर ते इतका घेत कीं, त्यापुढें कित्येक वेळां जेवणाची सुद्धां आठवण होत नसे. त्यांचें राहणें आमच्या घरासमोरच ठकारांच्या वाड्यांत,

नंतर जुनें रंगभूमींत, कांहीं दिवस रविवारांतील फडक्यांचे वाड्यांत असे व सतत चारपांच वर्षे आम्ही समवयस्क विद्यार्थी या ठिकाणीं रात्रंदिवस जमत असूं. गडकरी न्यू इं. स्कू० चे विद्यार्थी असले तरी त्यांनीं शाळा सोडलेली असून ते आपला सर्व अभ्यास घरींच करीत व अभ्यासाबरोबरच इतर नाटकविषया-वरील आवडीचें वाचन करीत असत. मधूनमधून अभ्यास करावा, कंटाळा आला कीं, नाटकें वाचावींत व त्यावरची लहर फिरली कीं कविता अथवा त्रुटित प्रकरणें लिहीत बसावें.

( २ )

## असाहि एक दिवस उगवेल

याच सुमारास नाट्यकला प्रवर्तक मंडळीचा मुक्काम फडक्यांच्या वाड्यांत होता. गडकरी यांनीं कंपनीच्या मालकांचा स्नेह संपादन करून त्यांच्यामार्फत कै. शंकरराव पाटकर यांचेजवळ शेक्सपिअर आणि त्याचीं नाटकें यासंबंधानें चर्चा करण्यास प्रारंभ केला: नाट्यकला प्रवर्तक मंडळी शेक्सपिअरचींच भाषां-तरित नाटकें करीत असे व शंकरराव पाटकर तालीम देण्यास जात असत. शेक्सपिअरचीं नाटकें हा कै. शंकरराव पाटकरांचा अगदीं आवडता विषय! तेव्हां गडकरी यांनीं आपल्या ज्ञानांत भर घालण्याकरितां पाटकर यांचा सहवास पत्करला हें योग्यच होतें. या वेळेपासून गडकरी यांनीं सरसहा नाटकें पहाण्याचा उपक्रम सुरूं केला. तोंपर्यंत नाट्यकला प्र० सं० मंडळी, त्रिवर्ग मालक व शंकरराव पाटकर हींच गडकऱ्याचीं दैवतें होतीं. याच सुमारास पुण्यांतील जुन्या आर्यभूषण थिएटरमध्यें किर्लोस्कर मंडळीचे प्रयोग सुरूं होते, व गडकरी यांनीं आपला मोर्चा आतां तिकडे वळविला होता. नाट्यकला प्रवर्तक मंडळी आणि किर्लोस्कर संगीत मंडळी या दोन्ही कंपन्या योग्यतेच्या दृष्टीनें आपापल्यापरी श्रेष्ठ असूनही चुरशींच्या बाबतींत अहमह-मिका बाळगून होत्या. गडकरी यांच्या बुद्धीला असलें खाद्य हवेंच होतें. दोन्हीं नाटक मंडळ्यांच्या गुणावगुणांच्या बाबतींत आमच्या 'समीर गच्ची-क्लबांत' खल होऊन गडकरी किर्लोस्कर सं० मंडळीचे पूर्ण अभिमानी व रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे अकृत्रिम भक्त बनले. नाट्यकला प्रवर्तक मंड-ळीचे प्रयोग पहाण्यास गडकरी यांना फारशी यातायात पडली नाहीं. परंतु किर्लोस्कर मंडळीचा दर्जा, शिस्त व रुबाब इ० गोष्टीमुळें गडकरी यांना जरा

प्रयास पडले. एका कंपनीकडे ओळख करून घेतली तरी त्यांना तीं नाटकें विद्यार्थी-दर्शेत फुकट पहाण्याचा मोह पडला नाहीं. परंतु किर्लोस्कर मंडळीचे दर अधिक, जागा मिळण्याची मारामार, नाटकें पहाण्याची उत्कंठा अधिक या गोष्टीं कशा व्हावयाच्या ? अखेरीस ही पर्वणी साधून घेण्याकरितां त्यांनीं ज्ञानप्रकाश (आर्य-भूषण) छापखान्यांत दुय्यम संपादकाचें काम पत्करून महिना रु. २० चें वेतन घेऊन आपली हौस पुरवून घेतली. प्रस्तुत लेखकाचा व गडकरी यांचा नित्य सहवास होता. तेव्हां त्यांना सक्तदर्शनीं तिकीटें काढून नाटकें पहाण्याची पाळी येणें हें चमत्कारिकच वाटले. परंतु विद्यार्थीदर्शेतले गडकरी केवळ इतरेजनांप्रमाणें वशिलें लावून नाटकें पहाण्यास तयार नव्हते इतकें सांगितलें म्हणजे बस्स आहे. ते नेहमीं आर्यभूषण थिएटरमध्यें तळमजल्यावर दहा आण्याच्या जागेंत बसत – नव्हे – गर्दीत एका कोपऱ्यांत उभे राहत असत. “ कोल्हटकरांच्या नाटकांतील सुंदर उतारे ” म्हणून पुढें जें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें, त्याचें टांचण तें या दर्ज्यांत बसून किंवा कधीं कधीं उभें राहून लिहून ठेवीत होते. यावरून श्री. कोल्हटकरांना गुरुस्थानीं स्थापण्याची कोणत्या काळांत कल्पना खरी उद्भवली हें सहज लक्षांत येईल. यावेळीं वीरतनय, मूकनायक व गुप्तमंजूष येवढ्याच नाटकांची सामुग्री गडकरी यांना त्यांचीं पारायणें करण्यास पुरेशीं होतीं. त्याप्रसंगीं ते नेहमीं म्हणत कीं, “ असाहि एखादा केव्हां तरी दिवस खास उगवेल कीं माझ्या नाटकांचीं टिपणें प्रेक्षकलोक लिहून घेत बसलेले मला पहावयास सांपडतील. ”

( ३ )

## देवल श्रेष्ठ कीं कोल्हटकर श्रेष्ठ

श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या या तिन्हीं नाटकांतील पदांच्या चाली, अर्थाचा सुबोधपणा, कविकल्पना, भाषासौष्ठव, संविधानकांतील रचना-चातुर्य इत्यादि गोष्टींचा रात्रंदिवस खल करण्यांत व या ग्रंथांचें सूक्ष्म पर्यालोचन करण्यांत गडकरींना धन्यता वाटत असे. श्री० कोल्हटकर श्रेष्ठ कीं देवल श्रेष्ठ हा वाद एके दिवशीं आम्हां मंडळींत निघाला होता. गडकरी यांनीं दोघांनाहि पाहिलें नव्हतें, मग ओळख कुठून असणार ? परंतु विषयाचा ओघ वहावत वहावत इतक्या विकोपाला गेला कीं त्यांनीं मंडळींना स्पष्ट सांगितलें कीं “ देवल व त्यांचीं नाटकें यांची योग्यता कमी करावी असा माझा हेतु मुळींच

सुद्धां ते अनेकवेळां भांडले व अनेकवेळां परत आले आहेत. तरी त्यांच्या लहरी व छांदिष्ट स्वभावाची सर्वांस माहिती असल्यामुळें, त्यांच्याबद्दल अनादर किंवा अप्रीति कोणास वाटत नसे. कारण त्यांच्या भांडणांचीं कारणें अगदीं क्षुल्लक असत.

( ७ )

## आठ दिवसांत दोन नाटकें

पुण्यप्रभाव नाटक बसविल्यानंतर किर्लोस्कर मंडळींचा व त्यांचा नाटककार या नात्याचा संबंध सुटला तरी स्नेह या नात्याचा संबंध कायमचा होता. त्यांचेकडून वेळेवर नाटक मिळणें हें त्यांच्याशीं संबंध असलेल्या काळांत, कधींच शक्य नाहीं. असा मंडळीस अनुभव आल्यावरून त्यांच्याकडून नाटक मिळविण्याचा मंडळीनें नाद सोडला; व त्यांच्याशीं नुसतें मित्रत्व ठेवलें. शेवटचीं जीं दोन नाटकें त्यांनीं लिहिलीं तीं मोठ्या शिकस्तीनें त्या त्या मंडळींच्या हातांत पडलीं आहेत. कोणतींहि नाटकें लिहिण्यास त्यांना पुरेसा वेळ मिळत नव्हता असें नाहीं परंतु केवळ लहरीनें ते जेव्हां लिहिण्यास बसतील तेव्हां बसतील. असा प्रकार त्यांच्या स्वभावाचा असल्यामुळें त्या नाटकांची पूर्णता दुसऱ्याकडून करून घेणें त्या त्या मंडळींना भाग पडलें. एकदा आक्टोबरमध्यें मंडळी पुणें मुक्कामीं असतांना तुम्हांला एक नाटक देतो, लिहिण्याकरितां उद्यां मनुष्य पाठवून द्या, म्हणून सांगण्याची त्यांची लहर लागली; परंतु ती लहरच होती. दुसरे दिवशीं त्यांच्याकडे दौतलेखणी घेऊन इसम गेला; परंतु त्यांची लहर फिरली. असले लहरीचे झटके त्यांना वरचेवर येत असत. एक नाटक लिहिण्यास उशीर लागला म्हणजे आतां तुम्हांस आठ दिवसांत एकदम दोन नाटकें लिहून देतों, म्हणून त्यांनीं सांगावें. परंतु जें कार्य दोन दोन वर्षं मंडळीबरोबर राहून पूर्ण झालें नाहीं, तें असें आठपंधरा दिवसांत थोडेंच होण्यासारखें असतें? अशा तऱ्हेच्या गडकऱ्यांच्या स्वभावाच्या गंमती म्हणून सांगण्याचा विचार केला तर करमणुकीचा एक मोठा ग्रंथ होईल.

( ८ )

## किर्लोस्कर कंपनीचा अभिमान

पुण्यप्रभाव नाटक रंगभूमीवर येण्याला एकदोन आठवड्यांचाच अवकाश होता. इतक्यांत कशानेंशीं त्यांची लहर फिरली, व तुम्हांला नाटक द्यावयाचें

नाहीं असें ते म्हणाले. परंतु तसें होणें कोणत्याहि मार्गानें शक्य नव्हतें. म्हणून ते कायद्याचें एक भलें मोठें पुस्तक चारपांच दिवस हातांत बाळगून फिरत होते. मंडळींत राहणें वगैरे सर्व होतेंच. याच नाटकाचा आरंभ सुमुहूर्तानें त्यापूर्वी पणजी मुक्कामीं सकाळीं झाला. मंगलाचरणाचें पद म्हणण्यांत आलें, इतक्यांत जो नेहमींचा पेटीवाला होता, तो ते नको म्हणाले; दुसऱ्यासच त्यांनीं बसावयास सांगितलें. परंतु त्याला तसें बसणें योग्य दिसेना. लगेच लहर फिरली व डोक्यांत राख घातली. तें नाटक पुढें त्याच मुक्कामाला किर्लोस्कर मंडळीकडून निघालें व दुसरीकडे गेलें व तेथून पुन्हा दोन वर्षांनीं मंडळीकडे परत आलें. परंतु या लहरी त्यांच्या ठिकाणीं जे इतर अद्वितिय गुण होते त्यांना शोभण्यासारख्या होत्या. त्यांच्यासारखे नाटककार कोणाही नवीन नाटक मंडळींना पाहिजेत, असें वाटणारच. म्हणून कोणी-हि नाटकफोडे लोक " अपरिहार्य कारणांनीं " पहिल्या नाटक मंडळींतून निघाले कीं, " आमच्या आमच्या नाटककारांची आम्हांस सहानुभूति आहे " म्हणून जी प्रथम मालिका लावीत तिच्यांत गडकऱ्यांचें नांव असे. अशा मंड-ळ्यांच्या अंतरंगांतही गडकरी असत. अशा मंडळींपैकीं एकीचें बारसें व्हावयाचें होतें व त्या बारशाचें जेवण जेवण्याला गडकरी होते. नांव ठेवण्याच्या वेळेला एक गृहस्थ " स्पीच " करतांना किर्लोस्कर मंडळीबद्दल बहकूं लागले, तेव्हां गडकऱ्यांनीं त्यांना–" नांव ठेवतांना मुलाची गर्भधारणा कशी झाली ही उत्पत्ति सांगण्याची वहिवाट नाहीं. " असें सांगितलें. सारांश, किर्लोस्कर मंड-ळींची आपल्यासमक्ष निंदा करणारांना ते कधींहि उत्तेजन देत नसत.

( ९ )

## पुण्यप्रभाव नाटक

सन १९१३ सालांत गडकऱ्यांनीं पुण्यप्रभाव नाटक लिहिण्यास प्रारंभ केला. हा काळ म्हणजे किर्लोस्कर मंडळीच्या फाटाफुटीचा काळ होय. नव्या नाटकाची मंडळीला आवश्यकता होतीच. गडकऱ्यांचा किर्लोस्कर मंडळींशीं नोकर या नात्याचा संबंध मध्यंतरीं सुटला होता, तो या सालांत आतां ग्रंथकार –नाटकावर म्हणून जडला गेला. नोकराचें नातें जाऊन ग्रंथकाराचें नातें आलें. पूर्वी गर्वनिर्वाण नाटक, मंडळीकरितां लिहिलें होतें तरी तें नोकरीपेश्यांत अस-तांना लिहिलें गेलें होतें. ती रंगभूमीवर आणण्याची संधि कशी वाया गेली

याचा उल्लेख वर आला आहे. पुन्हां दुसऱ्या संधीचा फायदा घ्यावा असें त्यांनीं ठरविलें व पुणें येथेंच कसबा पेठेंत अक्कलकोटकरांच्या वाड्यांत पुण्य-प्रभाव नाटक लिहिण्याच्या तयारीस ते लागले. तथापि हें सर्व पदरांत लिहून पडेपर्यंत यांची लहर केव्हां व कोठें फिरेल आणि कसे आडथळे येतील ही धास्ती होती. शेवटीं अनुभवानें ही शंका खोटी ठरली नाहीं.

( १० )

## ताट भिरकावून दिलें

त्यांच्या लहरी पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें क्षणिक असत. बाबी अगदीं क्षुल्लक असत परंतु त्यामुळें इतरांना होणाऱ्या यातना मात्र जाचक झाल्यावांचून रहात नसत. एकदां दुपारीं १२–३० वाजतांच यांना चहा घेण्याची लहर आली. तेव्हां मुदपाकखान्यांत वर्दी दिली. ही वेळ सर्व मंडळींची पंगत बसण्याची असल्यानें कोठीवाल्यानें सांगून पाठविलें कीं " आंधण ठेवलें आहे, पहिलें वाढप करून चहा पाठवून देतों." पांच मिनिटांत निरोप आला " आधण ठेवाच; पण मी पंक्तींत जेवणास येतों." त्याप्रमाणें ते आले व बसलेहि. येथपर्यंत सर्व ठीक होतें. परंतु कंपनींत सर्वांत वडील थोर व जुने असलेले कै. काशिनाथपंत परचुरे यांनीं सहज विनोदानें म्हटलें कीं " मास्तर, जेवतांना पाण्याचें ऐवजीं चहा घेण्याचा हि अभ्यास केलात कीं काय ?" त्या बरोबर त्याच वाक्यांचा विपर्यास करून " माझ्या चहाची चेष्टा चार चौघांत करून माझी किंमत–ग्रंथकाराची–नालस्ती करतां" वगैरे नानाप्रकारानें बोलून पुढचें ताट भिरकावून दिलें व चालते झाले. याच दिवशीं शंकरराव ( लेखकाचें वडील ) सकाळीं पुण्यास जाण्यासाठीं निघून गेले होते. अर्थातच त्यांच्या गैर-हजेरींत मला बोलावून नेलें. तेथें त्यांची कशीबशी समजूत घातली, व बाजार मास्तरास ताकीद देवून ताबडतोब एक स्टोव्ह, चहा, साखऱ्या व स्वतंत्र दूध आणि त्यांचे सरबराईसाठीं त्यांच्याच पसंतीचा एक मुलगा स्वतंत्र ताब्यांत दिला. हाच मुलगा पांडुरंग बापट अखेरपर्यंत त्यांच्या तैनातींत होता.

( ११ )

## नजरबंदीचा प्रसंग.

त्याच दिवशीं संध्याकाळीं एकदम एका मुलाला तातडीने बोलाविलें तेव्हां पुन्हां कोणाची तरी आणखी चांदरात झडते कीं काय अशी शंकाही

उत्पन्न झाली. परंतु निरोपासरशीं त्याला जाणें भागच पडलें. तो समोर उभा राहिला तेव्हां खुणेनें त्याला बसावयास सांगून एक दोन मिनिटांत त्याच्या चर्येकडे नजर टाकून त्याला लगेच जाण्यास सांगितलें. या नजरबंदीच्या प्रसंगाचा कांहीं उलगडा होईना; म्हणून मी त्यांचेकडे जाऊन खुलासा विचारला तेव्हां त्याचें उत्तर त्यांनीं एक प्रवेश वाचून दाखवूनच दिलें:--वृंदावन:--" हिच्या या विस्तीर्ण ललाटप्रदेशाकडे, निश्चयाच्या करारी नजरेकडे, आत्मविश्वासाच्या बेमुर्वत चेहऱ्याकडे आणि वैभवशाली वाणीकडे लक्ष जातांच हिच्या बोलण्यांत कांहीं तथ्य नसलें तरी तें ऐकावेंसें वाटण्याची इच्छा व्हावी हा मोठा चमत्कार आहे." यांवरून त्यांच्या लहरीपणाची व त्याबरोबरच नाटक लिहीत असतांना ते किती दूरदृष्टीनें विचार करीत होते यांची जाणीव होईल.

(१२)

## अग्निकुंडाच्या प्रवेशाची कल्पना कशी सुचली

एकदां आम्ही उभयतां याच नाटकांतले कांहीं सीन्स वाचीत असतांनाच एक नाटककार गडकरींना नाटक वाचून दाखविण्यास आलें होते. शिष्टाचाराच्या थोड्याबहुत संभाषणानंतर त्यांनीं त्या नाटककाराचें नाटक समग्र ऐकलें. अभिप्राय विचारतां दोनचार दिवसांनीं भेटावयास या म्हणून सांगितलें व निरोप दिला. नंतर म्हणाले कीं, हें नाटक ऐकल्यावरून मला एक आणखी कल्पना सुचली व तिचा फायदा मी हास्यरस उत्पन्न करण्यासाठीं स्वतंत्र प्रवेश लिहिणार " त्याप्रमाणें त्यांनीं 'पुण्यप्रभाव' मध्यें अग्निकुंडाचा नवा प्रवेश लिहून काढला. या प्रवेशाचा उठाव हास्यरसाचें प्रसंगीं कसा होतो याची कल्पना प्रेक्षकांना आहेच. ठरल्याप्रमाणें नाटककार भेटीस आले वेळीं हाच अग्निकुंडाचा प्रवेश त्यांनीं वाचून दाखवून अभिप्राय विचारला. त्यावर या नाटककारांनीं प्रवेशाची वाखाणणी तर केलीच. परंतु त्याबरोबर क्लिष्टतेचा, दुर्बोधपणाचा व अप्रासंगिकतेचा शिक्का मारला. कै. गडकरी यांनींहि त्यांच्या नाटकावर अभिप्राय असाच दिला कीं, " आपलें सबंध नाटक ऐकल्यावरच मला ही कल्पना सुचली व तिचा उपयोग मी हास्यरस उत्पन्न करण्याकडे करून घेतला. अग्निकुंडाच्या प्रवेशांतील कंकणाचीं भाषणें ' ताकडतोम, तडाडथोम, चंडमुंड, उद्दंड ' वगैरे वगैरे अर्थशून्य आहेत. तरी आपलें सबंध नाटकानें जो परिणाम

मनांवर होणार नाहीं तो माझा एकच प्रवेश वेळ मारून नेईल." यावरून गडकऱ्यांची समयसूचकता, प्रसंगावधान आणि प्रतिपक्षावर मात करण्याची हातोटी कशी होती याची कल्पना होते.

( १३ )

## राजसंन्यास नाटक किर्लोस्कर कंपनीकरितां लिहिलें

त्यांच्या मृत्यूनंतर इतरत्र त्यांचीं विस्तृत चरित्र बरींच प्रसिद्ध झालीं आहेत. म्हणून ठराविक मर्यादेपलीकडे आपण जाऊं नये असें वाटतें. त्यांचा मंडळीशीं झालेला पत्रव्यवहार बराच आहे परंतु तो त्यांच्या लहरी स्वभावाचा द्योतक आहे व तो आज प्रसिद्ध करण्याचें कारणहि नाहीं. राजसंन्यास नाटक कि० सं० मंडळीस द्यावयाचें असें त्यांचें आश्वासन होतें; इतकेंच नव्हे तर कांहीं मोबदला नघेतां द्यावयाचें असें त्यांनीं उद्गार काढले होतें. मोबदला न घेण्याचें आश्वासन अशा करितां कीं कि० सं० मंडळींत राहून पुण्यप्रभाव या गद्य नाटकाची खेळ करण्याची परवानगी महाराष्ट्र नाटक मंडळीस दिली. ही गोष्ट त्यांना अंतर्यामीं जाचत होती. त्या चुकीची दुरुस्ती अशा रीतीनें करणार ते होते. परंतु कोणत्याही बाबतींत पूर्वी आपण काय बोललों होतों, याचें स्मरण ठेवून पुढें ते बोलत नसल्यानें कांहीं कांहीं गोष्टींत त्यांचा विक्षिप्तपणा मात्र दिसून येत असे. त्यांतलाच हाही एक प्रकार होता. या राजसंन्यास नाटकाचे बहुतेक प्रवेश त्यांनीं किर्लोस्कर मंडळीबरोबर असतांनाच लिहीले होते. परंतु त्या नाटकाची वासलात निराळ्याच प्रकारानें लागावयाची होती व तसें झालेंही.

( १४ )

## वडील मंडळींचा मान

धूम्रपानाचें व्यसन गडकरी यांना त्यांच्या बाल्यावस्थेपासूनच जडलेलें होतें. तथापि ज्या व्यक्तींबद्दल त्यांच्या अंतःकरणांत पूज्यबुद्धि व आदर वसत असे, त्यांच्या समोर त्यांनीं धूम्रपान केव्हांच केलें नाहीं. अशा ज्या व्यक्ति असत त्यांत ( आमच्या वडिलांची ) शंकरराव यांचीहि प्रमुखत्वानें गणना होती. यांचें उभयतांचें भाषण प्रसंग कंपनीबरोबर असतांना, व इतर वेळीं पुणें मुक्कामीं जेव्हां गडकरी स्थाईक होऊन राहिले होते तेव्हां दोनदोन, चारचार तास होत असत. अशावेळीं कांहीं तरी निमित्तानें ते बाहेर जाऊन धूम्रपान

करून यावयाचें. शंकरराव यांनीं त्यांना अनेकवेळां सांगितलें कीं, "आतां—तुम्हांला समक्ष विडी ओढण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां तुम्हीं योग्यतेनें, गुणानें थोर असून सर्वांना वंद्य आहांत, शिवाय कंपनीचे नाटककार असल्यानें नोकराचें नातें सुटून बरोबरीचें झाला आहांत" परंतु गडकऱ्यांनीं अखेरपर्यंत शंकरराव यांचा मान अबाधित राखला.

(१५)

## कै. श्रीमंत भाऊसाहेब जमखिंडीकर

एकदां कै. श्रीमंत भाऊसाहेब जमखिंडीकर हे पुण्यप्रभाव नाटक पहाण्यास आले होते. ते हें नाटक पाहून फारच खूष झाले. त्यांनींहि आपले संस्थानांत एक स्वतःची नाटक कंपनी स्थापन केली होती. तेव्हां गडकऱ्यांसारख्या ग्रंथकारांकडून एखादें नाटक मिळाल्यास पहावें म्हणून प्रस्तुत लेखकाजवळ विचारपूसही केली; त्याप्रमाणें श्रीमंतांची व गडकरी यांची भेट मी करवून दिली. थोड्या दिवसांसाठीं गडकरी श्रीमंतांबरोबर जमखंडीस पाहुणे म्हणून गेले होते. निरनिराळ्या विषयांवरील गडकऱ्यांची विचारसरणी व प्रमाणबद्ध माहिती पाहून श्रीमंत फारच प्रसन्न झाले. गडकऱ्यांनीं संस्थानांतच रहावें; त्यांच्या नाटकाबद्दल योग्य तो मोबदला मिळून शिवाय एखादी मानाची जागाहि देण्याची श्रीमंतांची मनीषा होती. पण पुढें प्रकर्ण कोठें थांबलें तें बरोबर समजलें नाहीं. त्याचवेळीं पाहिजे त्या विषयावर तुम्हीं कविता करूं शकतां कां असा सहज प्रश्न टाकतांच गडकऱ्यांकडून होकारार्थी जबाब मिळाला. त्यावर : श्रीमंतानीं समोर असलेल्या बंदुकीवर कविता करण्यास सांगितलें. गडकऱ्यांनीं ती कविता सुमारें अर्ध्या तासांत फारच सुंदर लिहिली व श्रीमंतांना दाखविली. ती अप्रकाशित कविता आज प्रस्तुत लेखकाजवळ नाहीं तरी ती मागेंपुढें प्रसिद्ध होईल. अशी खटपट आहे. वरील हकीकत खुद्द श्रीमंतांनीं, स्वतः गडकऱ्यांनीं, व नंतर त्यांच्या चहात्या मंडळींनीं सांगितली यावरून त्यांच्या कवित्वस्फूर्तीचें कौतुक वाटतें.

(१६)

## अप्रकाशित पदें

गर्वनिर्वाण नाटकांत घालण्यासाठीं थोडीशीं पदेंहि केलेहीं होतीं त्यांपैकीं नमुन्यादाखल एक देत आहे:—

( नरा नारीसम० ही चाल )

दिपे दीपें वाटे तारकावली ।। अतुल शोभाही बघुनि
फार लाजली ।। म्हणुनि पडुनियाजलीं । जात भूतलीं ।। ध्रु० ।।
अथवा नगरी तनुलता नटवाया झटली ।
सरिता कांची ही नवी घालुनियां नटली ।।
जडविलीं तिजलागिं सुरेखशीं ।।
गगनिचीं पहा सर्व रत्नें कशीं ।।
तरि भरे नुसतीच न मानसीं ।। बघुनि तोषली ।।

जहाल मवाळांबद्दल अप्रकाशित परंतु त्रुटित पद्य:—

२

हा हा फिरला कैसा काळ ।। हा हा ! उलटा आला काळ ।। हो ।।
जहाल कोणी, मवाळ कोणी, तिसरा कोणि जलाल ।।
मधेंच कोणी गचाळ निघतो, असे हरीचे लाल ।। १ ।।

कांहीं वर्षांपासून राजकारणाचें बाबतींत वाद माजला आहे व प्रस्तुत काळीं तर त्या वादाला ऊत आला आहे, परंतु कै. गडकऱ्यांचे विचार काय होते ते त्यांनीं एका पद्यांत ग्रथित करून ठेवले आहेत. त्यावरून बराचसा त्यांच्या विचाराचे बाबतींत प्रकाश पडेल अशी समजूत असल्यामुळें तिसरें एक पद्य देत आहे:—

( गणराया वंदा० ही चाल )

नको ही परक्यांची सेवा । हांजी हांजी करण्यापेक्षां देह तरी ठेवा ।। १ ।।
नको ही सोनेरी बेडी । देशहितास्तव इजहुनि शतपट बरवी लोखंडी ।। २ ।।
जळो ती पदवीमानाची । श्वानदशा जी करवी आपुल्या या नरदेहाची ।। ३ ।।
नको हा आपसांतिल तंटा । त्या योगानें स्वातंत्र्यावरि फिरला वरवंटा ।। ४ ।।
नको हा देशद्रोह नको । अंजुनि तरी तो तेज आमुचें कधिंही नच झांको ।।५।।
नको ही भिक्षेची झोळी । भिक्षा मागुनि परवशतेची उतरत कां मोळी ।। ६ ।।
" स्वदेशी " एकचि शस्त्र खरें । देशाचें हित होईल केवळ एक बहिष्कारें ।।७।।
सदोदितसेवा निजदेशा । उन्नति यावी त्यातें म्हणुनी अळवा परमेशा ।। ८ ।।

'गर्वनिर्वाण' नाटकांतील आणखी एक पद्य:—

प्यारी चोली० ही चाल )

नगरी सारी । नट्ठनी, थट्ठनी । सकला भरणी ।
सारिता, मुकुरी । पाही कांहीं । वदना रमणी ॥
दीपनयनिं बघतां पतिला । लाजुनि लपवाया-
तनुला ॥ कृष्णतमाची शालकरी ॥ नगरी० ॥
तुषार नच जलयंत्रजलीं । स्पर्शे आलिंगन कांहीं ॥
सगळी ॥ खेदबिंदुनीं तनु भिजली ॥
होति न हे ध्वनिपट हे, धडधड हें हृदय करी ॥
ध्वनि पट हीं, नच मुळिंहि, धडधडही हृदयिं परि ॥

( १७ )

## गडकऱ्यांचे पांच संन्यास

महाराष्ट्र नाटक मंडळी, किर्लोस्कर संगीत मं०, नाट्यकला प्रवर्तक संगीत नाटक मंडळी यांमध्यें एकामागून एक शकलें होऊन जेव्हां निरनिराळ्या शाखा सुरू झाल्या, नटवर्गामध्यें आपलीं डळमळीत असलेलीं सिंहासनें स्थिर करण्याचे प्रयत्न होऊं लागले, व त्या जुन्या नव्या नाटकमंडळ्यांना नाटककारांचेहि शुभाशिर्वाद मिळूं लागले, तेव्हां गडकरी यांनींहि एकंदर पांच संन्यासांवर अगदीं स्वतंत्र नाटकें लिहिण्याचें योजिलें होतें. पैकीं ' प्रेमसंन्यास ' लिहिलेंच गेलें. ' पुण्यप्रभाव ' याला कर्मसंन्यास असें नांव देण्याचा त्यांचा मानस होता; तिसरें–राजसंन्यास, चवथें–शस्त्रसंन्यास; हें पौराणिक कथानक घेणार होतें. " न धरी शस्त्र करीं मी गोष्टी सांगेन युक्तिच्या चार " या सूत्रावर सबंध कथानकाची उभारणी करावयाचें त्यांनीं ठरविलें होतें, आणि या सर्व संन्यासानंतर अखेरचा भोगसंन्यास. पैकीं आमच्या कल्पनेप्रमाणें तीन संन्यास तर त्यांनीं शेवटास नेलेंच. पुढें त्यांच्या विचारांना निराळीच गति मिळाल्यामुळें राहिलेलें दोन संन्यास गुलदस्तांत राहिले व आतां तर काय, सर्वच गोष्टी कालाच्या उदरांत गडप झाल्या.

( १८ )

## दोनच पात्रांचें नाटक

या कविकल्पनेच्या महत्त्वाकांक्षेच्या भरारींत आणखीहि एक और गोष्ट करण्याचें ठरविलें होतें. ती म्हणजे एकच पुरुषपात्र व एकच स्त्रीपात्र

या दोनच दोन पात्रांवर सूत्रधार नटीचे प्रवेश घालून पांच अंक लिहावयाचे. चार तासांचें नाटक करावयाचें, प्रत्येक अंकांत एकच प्रेक्षणीय आणि उठावदार सीन मांडावयाचा, आणि त्यांत हास्यरस, करुणरस, शृंगाररस–व तोहि विप्रलंभ शृंगार–येवढ्याच रसांच्या सामुग्रीवर पांच अंकांत हीं दोन पात्रें संगीताच्या आधारावर खेळवावयाचीं. मनोरम कल्पना खरी. " या माझ्या नाटकांवर प्रेक्षकांच्या उड्या पडल्या नाहींत तर पुन्हां हातांत लेखणी धरणार नाहीं " असें ते अशा प्रकारच्या नाटकासंबंधीं प्रतिज्ञेनें म्हणत असत.

## श्री. भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांजकडून —

(१)

### रंगभूमीचे संपादक गडकरी

गडकरी यांचा आणि माझा प्रत्यक्ष सहवास फारच थोडा झालेला होता. गडकरी पुण्याला रहात असत, मी कोकणांत रहात होतों; पोस्टखात्यांतील सरकारी नोकर होतों. गडकऱ्यांची आणि माझी प्रत्यक्ष भेट होण्यापूर्वी त्यांचा व माझा पत्रव्यवहार मात्र बराच झालेला होता. प्रत्यक्ष भेट पहिल्यानें पणजी ( गोवे ) येथें झाली.

गडकऱ्यांच्या आठवणी सांगण्यासाठीं त्यांच्या निकटसहवासांतील व्यक्तींचा जितका उपयोग होईल तितका माझ्यासारख्या क्वचित प्रसंगीं, विषेशतः संकटप्रसंगीं भेटी होणाऱ्या व्यक्तीचा होणार नाहीं. गडकऱ्यांचा आणि माझा जो संबंध आला त्या त्या कालांत त्यांची आनंदी वृत्ती, त्यांची कोटीबाज भाषणशैली किंवा त्यांच्या प्रखर बुद्धीच्या तेजाचे फवारे पहाण्याची संधि मला फारच अल्प प्रमाणांत लाभली. तो तो भेटीचा काळ रडण्याचा होता, हंसण्याचा नव्हता; अतःकरण उघड करून सुखदुःखाच्या गोष्टी मुक्तकंठानें बोलण्याचा तो संकटांचा काल होता !

गडकऱ्यांची माहिती मला पहिल्यानें गुरुवर्य तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या तोंडून कळली. मी स्वदेशहितचिंतक नाटक मंडळीबरोबर हिंडत असतांना तात्यांना भेटावयास गेलों होतों त्यावेळीं गडकऱ्यांची त्यांनीं माझ्याजवळ खूप तारीफ केली. ते म्हणाले "हा मुलगा वाङ्मयक्षेत्रांत एका कालीं विलक्षण झळकेल अशी मला अपेक्षा आहे" असें सांगून गडकऱ्यांनीं लिहिलेल्या "सुंदर उताऱ्यांचें" पुस्तक आपल्या सहीनें त्यांनीं बक्षिस दिलें होतें. रंगभूमि मासिक

बहुतेक गडकरीच चालवितात असें त्यावेळीं त्यांनीं मला सांगितलें. गडकऱ्यांचा 'सिंहावलोकन' हा लेख जरूर वाचा असेंही ते म्हणाले. त्यावेळीं गडकऱ्यांचें कोणतेंही नाटक रंगभूमीवर आलें नव्हतें. कोल्हटकर यांच्या 'नाटकांतील सुंदर उतारे' हेंच त्यांचें छापून प्रसिद्ध झालेलें पहिलें पुस्तक होय. हें पुस्तक आज जरी दुर्मिळ असलें, गडकऱ्यांचीं निरनिराळीं पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या प्रकाशकांनीं जरी या पुस्तकाचा त्यांच्या ग्रंथावलींत समावेश केला नसला तरीही गडकऱ्यांची खरी सहृयता, खरी काव्याविष्करणशक्ती यांच पुस्तकांत पहिल्यानें महाराष्ट्र वाङ्मयांत मांडली गेली असावी असें माझें मत आहे.

( २ )

## गडकऱ्यांची पहिली भेट

नाट्यविनोद नाटकमंडळीबरोबर मी सन १९१४ सालीं मालवण मुक्कामीं जालों होतों. त्यावेळीं कांहीं कामाकरतां मला कोल्हापुरास जाण्याचा योग आला. जातांना अर्थातच पणजी येथें मुक्काम करावा लागला. किर्लोस्कर मंडळींचा मुक्काम त्यावेळीं तेथेंच होता. मीं माझे मित्र रामभाऊ नाईक यांचे घरीं उतरलों होतों. त्यांनीं गडकरी किर्लोस्करमंडळीबरोबर आले असल्याचें मला सांगितलें. मी किर्लोस्कर मंडळीचें बिऱ्हाडीं गेलों त्यावेळीं गडकरी बिऱ्हाडीं नव्हते; त्यांच्यासाठीं निरोप ठेऊन मा नाईक यांच्या घरीं परत आलों. नाईकांचा व गडकरी यांचाहि पणजी मुक्कामींच परिचय झाला होता. त्यामुळें नाईकांच्या घरीं येणें त्यांना संकोचदायक झालें नाहीं. घटकाभरानें गडकरी तेथें आले. पत्रोपत्रींचा परिचय असल्यामुळें प्रत्यक्ष तोंडओळख होण्याचेंच काय तें राहिलें होतें. हीच त्यांची माझी पहिली भेट. गडकऱ्यांची प्रकृति त्यावेळीं अगदीं खालावलेली होती. डोळे खोल गेले होते, गाल बसले होते, आणि चेहेऱ्यावर कोणतीच कळा दिसून येत नव्हती. तुम्ही आजारी आहांत कां असें मी त्यांना विचारतांच त्यांनी मला उत्तर दिलें; " देहानें नाहीं, मनानें आहे. " मी त्यांना विचारलें ' ही मानसिक व्यथा तुम्ही मला सांगाल काय ? ' ' यावेळीं नको; कोल्हापुराहून परत आल्यावर आपण मनसोक्त बोलूं ' असें ते म्हणाले; माझीहि निघण्याची वेळ झाली होती. मीहि तसाच निघालों, आणि ते धक्क्यापर्यंत मला पोंचवावयास आले.

( ३ )

## गडकऱ्यांची किर्लोस्करकंपनी

कोल्हापुराहून परत येतांना पुन्हां गडकऱ्यांची गांठ घेतली आणि माझ्या बरोबर मालवणला येण्याचा आग्रह केला. तेव्हां ते म्हणाले ' नाटकमंडळींत मी येणार नाहीं. ' मालवणला माझें घरच असल्याचें सांगितल्यावर त्यांनीं येण्याचें कबूल केलें; इतकेंच नव्हे तर मालवणला येण्यासाठीं आपण तळमळत असल्याचेंहि मला सांगितलें. ते म्हणाले, " मालवणला यावयाची मला स्फूर्ति व्हावी आणि तुम्हीच यावेळीं बोलवावयास यावें यांत ईश्वराचा कांहीं तरी हेतु दिसतो. "

या भेटीच्या वेळीं कंपनीच्या बिऱ्हाडीं आमची बैठक होऊं नये याची ते विशेष काळजी घेत होते. याचें कारण त्यावेळीं माझे लक्षांत आलें नाहीं. ' मी कंपनीच्या बिऱ्हाडीं जाऊन परत येतो व नंतर आपण जाण्याचें ठरवूं असें ते म्हणाले;' कांहीं वेळानें परत आल्यावर ते अगदीं भयानक चेहरा करून म्हणाले, " मला जरूरीचें काम आहे. तुम्ही आज जा. मी दोन दिवसांनीं येतों. दोन दिवसांनीं जर मी न आलों तर कोणीं तरी मनुष्य पाठवा म्हणजे मी येईन. मला बोटीच्या प्रवासाची भीति वाटते म्हणून मनुष्य पाठवा एवढेंच. " हीं वाक्यें बोलत असतां ते माझ्यापासून कांहींतरी लपवीत आहेत असें वाटल्यावरून मी विचारले, "तुमची कांहीं अडचण असल्यास मला सांगा; मी ती निवारण करण्याचा प्रयत्न करीन. " माझ्या या प्रश्नास उत्तर देण्याचें त्यांनीं बहुतेक टाळलें. नाटक लिहिण्याची आपणाला फार घाई आहे वगैरे लंगडीलुळीं कारणें सांगून माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. यावेळीं मोकळ्या मनानें किंवा उल्हासानें कोणत्याही विषयाची उघड चर्चा करण्याची त्यांची मनःस्थिति मला न दिसल्यानें मी वाङ्मयविषयक चर्चा केली नाहीं. ज्या गोष्टी निघाल्या त्या किर्लोस्करकंपनीच्या फाटाफुटीबद्दल होत्या. गंधर्व नाटकमंडळी नुकतीच निघाली होती आणि किर्लोस्कर मंडळी बिकट परिस्थितींत पडली होती. किर्लोस्कर मंडळीचें सर्व भवितव्य गडकऱ्यांच्या नाटकावर अवलंबून होतें. या जबाबदारीच्या जोखमीमुळें गडकरी चूर झाले होते. ' माझ्या पुण्यप्रभावानें किर्लोस्कर मंडळी तरणार ' अशी गडकऱ्यांनीं छाती ठोकली होती. सुदैवानें गोव्याच्या मुक्कामांत कंपनीला चांगलेंच उत्पन्न झालें

होतें; पण हें चांगलें उत्पन्न झाल्याचा परिणाम 'पुण्यप्रभाव' नाटक बसवण्याचे कामीं ढिलाई होण्यांत झाला असें त्यांनीं त्यावेळीं सांगितलें. बराच वेळ कंपनीच्या हितसंबंधाच्या गप्पा झाल्यावर आम्ही निरोप घेतला. किर्लोस्कर कंपनीच्या भावितव्यतेची गडकऱ्यांची तीव्र कळकळ पाहून मला अतिशय आनंद झाला आणि या कळकळीमुळेंच इतर कोणत्याहि विषयाची चर्चा करतां आली नाहीं याबद्दल वाईट वाटलें.

( ४ )

## सव्वाशें रुपयांस गडकरी गहाण

मालवणला गेल्यावर दोन दिवस वाट पाहून मी त्यांनीं सांगितल्याप्रमाणें माझे मित्र रा. माधवराव दळी यांना पाठविलें. ते दुसरे दिवशीं एकटेच परत आले आणि त्यांनीं गडकऱ्यांची हकीगत सांगितली; ती अशी—"कंपनीच्या चालकांचा आणि गडकऱ्यांचा कांहींतरी खटका उडालेला आहे. ते गडकऱ्यांना मालवण येथें जाऊं देत नाहींत. मालवण येथें गेल्यास कदाचित् ते नाट्यविनोद नाटक मंडळीस नाटक देतील असा त्यांना संशय आला आहे. गडकऱ्यांच्या अंगावर कंपनीचे सुमारें सव्वाशें रुपये आहेत. नाटक पुरें करून द्या अगर रुपये परत द्या आणि मग वाटेल तिकडे जा अशी अट त्यांनीं गडकऱ्यांना घातली असून या सर्व भानगडीमुळें आज ते बरेंच दिवस अन्नाखेरीज आहेत. गोव्यांत ओळख नसल्यानें त्यांना पैसे मिळणें अशक्य आहे, व सव्वाशें रुपयांसाठीं मी येथें गहाण पडलों आहे, पैसे भरून मला सोडून न्या असा त्यांचा तुम्हाला निरोप आहे. तरी आज ही रकम व इतर किरकोळ मिळून एकशें चाळीस रुपयांची त्यांना जरूरी आहे !!" हें म्हणणें ऐकल्यानंतर याच्यापुढील व्यवस्था कशी करावयाची हा मला विचार पडला. नाट्यविनोद नाटक मंडळीची व्यवस्था त्यावेळीं कै. राजारामपंत सोहनी यांच्या हातांत होती. पण ते स्वतांचे मुखत्यार असते तर त्यांनीं ही रकम कशी तरी उभी केली असती. कंपनीचे मालक त्यावेळीं कंपनी बरोबर होते. तेही एका कंपनीचेच मालक ! गडकऱ्यांची अडचण त्यांना काय होय ! गडकऱ्यांची योग्यता त्यावेळीं सर्वत्र झाली नव्हती, निदान ती कोंकणपर्यंत पोंचली नव्हती. माझ्याजवळ एवढी मोठी रकम असणें अशक्यच होतें. राजारामपंत सोहनी यांच्याजवळ स्वतांची अशी तेवढी रकम नव्हती; त्यामुळें गडकऱ्यांचे उपयोगी

पडण्याची त्यांची इच्छा असूनही त्यांचा नाइलाज झाला. या विषयाची वाटाघाट चालली असतांना माझे बालमित्र रा. बळवंतराव परुळेकर हे तेथें आले आणि त्यांनीं प्रसंगाचें महत्व जाणून त्यावेळीं आपल्या आईला न कळत बँकेंतून एकशें चाळीस रुपये काढून माझ्या हवाली केले. त्यांच्या बँकबुकांतही एकशें चाळीस रुपयांपेक्षां अधिक रक्कम नव्हती. ही रक्कम घेऊन माधवराव दळी हे पुन्हां पणजीस गेले आणि गोव्याच्या नोटा करून गडकऱ्यांच्या सांगण्याप्रमाणें ती रक्कम त्यांच्या हवाली केली. गडकरी अशा रीतीनें गोव्यांतच आपल्याला रक्कम मिळाली असें दाखवून ते दळी यांच्याबरोबर मालवणास आले.

(५)

## नकटी गीता

ज्या दिवशीं गडकरी मालवणास आले त्या दिवशीं माझ्या 'सरस्वती' नाटकाचा प्रयोग होता. दोन प्रहरीं गह्राण सोडविण्याच्या विषयावर गडकऱ्यांनीं बऱ्याच कोट्या केल्या; पण किर्लोस्कर कंपनीचा व त्यांचा कोणत्या बाबतींत खटका उडाला याचा थांग लागू दिला नाहीं. ते म्हणाले 'तुमची माझी पहिली भेट झाली त्याच्या पूर्वीपासूनच माझ्या उपासमारीस आरंभ झाला होता आणि त्याचमुळें मी तुम्हाला आजाऱ्यासारखा दिसलो. आतां कांहीं होवो किर्लोस्कर कंपनीला मी पुण्यप्रभाव नाटक देणार नाहीं.' गडकऱ्यांच्या या उद्गारांचा फायदा घेण्यासाठीं राजारामपंत सोहनी म्हणाले,'तर मग आम्हाला द्या' त्यावर गडकऱ्यांनीं उत्तर दिलें, "दिलं असतं, पण हें नाटक तुम्हांला दिलं तर माझ्या 'पुण्यप्रभावानं' किर्लोस्कर कंपनी कशी जगणार? जमल्यास माझं दुसरं एखादं नाटक मी तुम्हांस देईन" असें सांगून त्यांनीं 'एकच प्याला' या नाटकाचें कथानक सांगण्यास आरंभ केला. त्यावेळीं नाट्यविनोद नाटक मंडळींत असलेले व हल्लीं यशवंत संगीत नाटक मंडळींत असलेले नट बाळकृष्णपंत साठे म्हणाले, "तुमच्या 'पुण्यप्रभावानें' किर्लोस्कर कंपनी खुशाल जगो, पण तुमच्या हातचा हा 'एकच प्याला' तरी आम्हांला द्या ना." त्यावर गडकरी एकदम म्हणाले, "ठीक आहे. तुम्ही उत्तम सिंधु व्हाल, राजारामपंत हिरो होतील" आणि नंतर माझ्याकडे वळून म्हणाले, "या तुमच्या मुलीचें नांव आपण चोरणार बुवा आणि तें'एकच प्याला'तच घालणार."त्या वेळीं एक वर्षाच्या असलेल्या माझ्या या मुलीचें नांव गीता असें आहे. मी म्हटलें, "नुसतें नांवच

काय मुलगी घेऊन जा." गडकरी म्हणाले, "नांव चांगलें आहे पण मुलगी नकटी आहे. मार्केटेबल नाहीं. ही नकटी हुंडी कोणत्या बाजारांत पटणार."

( ६ )

## राजसंन्यासाचें पुण्याहवाचन

दुसरे दिवशीं मी, गडकरी व बाळकृष्णपंत साठे असे तिघेही होडी करून मालवणचा किल्ला पहावयास गेलों. किल्ल्याच्या तटावरून हिंडत असतां न्हाणीजवळच्या बुरुजावर जातांच ते थबकले. त्यांनीं लगेच समुद्राकडे पाहिलें आणि एकदम मोठ्यानें ओरडून व मला घट्ट धरून म्हणाले, " बस्स ठरलं. " मीं काय ठरलं म्हणून विचारल्यावर त्यांनीं उत्तर दिलें, " याच जागीं ' राज-संन्यासा'चा आरंभ. पूर्वीं गोव्यांत सुरुवात करावी असें गोवें पाहिल्यामुळें मला वाटत होतें. पण ही जागा पहातांच आतां पटलें कीं गोव्यांतली सुरुवात ओढून ताणून झाली असती. मालवणची सुरुवात अगदीं स्वाभाविक आहे" आणि तिथेंच बसून प्रवेशाची कशी सुरवात करणार हें सांगावयास त्यांनीं आरंभ केला. आज प्रसिद्ध असलेल्या ' राजसंन्यास ' नाटकांतलीं बहुतेक वाक्यें त्यावेळीं त्यांनीं अक्षरशः बोलून दाखविलीं होतीं.

( ७ )

## एकच प्याल्याचें गर्व निर्वाण

संध्याकाळीं परत आल्यावर राजसंन्यासाचा विषय सुरूं झाला आणि ओघाओघानेंच " एकच प्याला " या नाटकासंबंधीं बोलणें निघालें. त्यावेळीं गडकरी म्हणाले ' एकच पेला ' राजाराम बापूंना देईन असें. मीं म्हटलें खरें पण त्या नाटकाबद्दल आजच खात्रीनें सांगतां येत नाहीं. कदाचित् तें नाटक लिहिणें लांबणीवर पडण्याचा संभव आहे. मला वाटतें 'गर्वनिर्वाण' नाटक पुन्हां हातीं घ्यावें. त्यांतले कांहीं प्रवेश मी 'पुण्यप्रभाव' नाटकांत घेत आहें तरीहि त्यांत थोडी उलटापालट करून तेंच नाटक त्यांना देईन. राजाराम बापू हिरण्यकश्यपु उत्तम होतील, साठे कयाधु; लोकपालक कोणीही असला तरी चालेल, आणि शंकर मोहिते उत्तम प्रल्हाद होईल." सर्वांनाच ही कल्पना आवडली. पुणें येथें जातांच ' गर्वनिर्वाण ' नाटकाचे अंक दुरुस्त करून पाठवि-विण्याचें ठरलें पण दुर्दैवानें राजारामबापूंची उत्सुकता फळास आली नाहीं.

( ८ )

## काळजाचें गाणें

दुसरे दिवशीं आम्ही सबंध मालवणभर हिंडत होतों. देऊळवाड्याच्या पलीकडे डोंगरावर फिरावयास गेलों असतांना कोंकणांत कोठेंहि दिसून येणाऱ्या एका निसर्गसुंदर जागीं आम्ही बैठक मारली आणि नाटकाच्या आवडीनिवडीबद्दल चर्चेला सुरवात झाली. साठे यांनीं विचारलें, तुमचें सर्वांत आवडतें नाटक कोणतें ? गडकरी म्हणाले 'मूकनायक.' साठे यांचें तेंच आवडतें नाटक होतें. गडकरी म्हणाले 'मूकनायक नाटकांतील तुम्हांला अतिशय आवडतें असेल तें पद म्हणा.' साठे यांनीं 'अष्टमीचा चंद्र शोभे' हें पद म्हणावयास सुरवात केली. गडकरी माझ्याकडे वळून म्हणाले, "पोराला कांळीज आहे." साठे यांनीं त्या वेळेला फारच उत्तम पद म्हटलें. साठे पद म्हणत असतांना गडकरी अगदीं एक चित्तानें ऐकत होते. पद संपतांच ते म्हणाले, 'अतां दुसरें एकादें म्हणा बघूं.' त्यावेळीं "निराशा व्यापि जीवाला" हें पद त्यांनीं गाऊन दाखविलें. त्यावेळीं गडकरी अगदीं तटस्थच होते. हें पद संपल्यावर ते म्हणाले "मी पुष्कळांच्या तोंडून हीं पदें ऐकलीं आहेत. गाण्याच्या दृष्टीनें याच्यापेक्षां किती तरी पटीनें उच्च :दर्जाच्या गायकांनीं म्हटलेलीं ऐकलीं आहेत, पण ते गळ्यानें गातात आणि साठे काळजानें गातात.

( ९ )

## वधूपरिक्षेचा कर्ता कोण !

गडकरी दुसऱ्या दिवशीं पुण्यास जाण्यासाठीं मडगांवला जाणार होते. ते जाण्याच्या सुमारासच राजारामबापूंनीं गडकऱ्यांची माधवरावांनीं एकशें चाळीस रुपये देण्याबद्दल घेतलेली प्रॉमेसरी नोट मला दाखविली. ती पाहून मला माधवरावांचा फार राग आला, व त्यांच्या फाजील व्यवहारदक्षतेबद्दल मी त्यांना बराच बोललोंहि. लागलीच मीं ती प्रॉमेसरी राजारामबापूंजवळून घेतली व तावडतोब फाडून ती तशीच गडकऱ्यांच्या स्वाधीन केली. तेव्हां गडकरी म्हणाले, "प्रॉमेसरी फाडली तरी ऋण कांहीं फिटत नाहीं. आणि रुपयापेक्षां वेळेला महत्त्व जास्त आहे." पुढें मी, ते व तात्यासाहेब कोल्हटकर एकें दिवशीं बसलों असतां गडकऱ्यांनीं

तीच फाडलेली प्रॉमेसरी नोट तात्यांना दाखवून मागचा सर्व इतिहास सांगि-तला. या वेळीं मी तात्यासाहेबांनीं सांगितल्यावरून शंकर मोहिते यांना दाखविण्यासाठीं घेऊन आलों होतों. नाट्यविनोद मंडळीसाठीं तात्यांनीं एक नाटक द्यावें अशी माझी इच्छा होती व गडकरी यांनींहि त्या इच्छेला आपल्या वतीनें दुजोरा दिला. मीं तात्यांना सांगितलें ‘ नाटक वधुपरीक्षेसारखें झालें पाहिजे.’ गडकरी म्हणाले, “ वधुपरीक्षा काय म्हणतां ‘मूकनायक’ म्हणा, ‘ मतिविकार ’ म्हणा ” त्यानंतर मी या उद्गाराचें कारण विचारतांच गडकरी म्हणाले ‘वधूपरीक्षा’ नाटक तात्यांचें आहे कुठें ? तें बाबानें ( बाबा हें तात्यांच्या वडिल मुलाचें नांव ) लिहिलें व तात्यांच्या नांवावर प्रसिद्ध केलें. ’ गडक-ऱ्यांचें उत्तर ऐकून तात्या गालांत जीभ घालून नुसते हंसले. मी ‘ वधूपरीक्षे-सारखेंच नाटक मला पाहिजे असें म्हणूं लागलों. कारण मला तें फार आवडतें. तेव्हां तात्या म्हणाले ‘ वधूपरीक्षेसारखें कां ? वधूपरीक्षाच संगीत करून करा ना. ’ त्यानंतर ‘ मग द्या तर पदें करून ’ असें मी म्हणालों. तात्या म्हणाले ‘ पदेंही तुम्हीच करा. तुमचीं पदें माझ्या नाटकांत शोभतील.’ गडकरी म्हणाले, ‘अशी तोंडीं बोली नको’ लेखी परवानगी घ्या. अशी भाग्याची संधी पुन्हां मिळणार नाहीं.’ ही तात्यांनीं दिलेली लेखी परवानगी अजूनही माझेजवळ आहे. गडकऱ्यांच्या सांगण्याप्रमाणें तात्यांच्या नाटकांत माझीं पदें येण्याऐवजीं गडकऱ्यांच्याच नाटकांत तात्यांचीं पदें येण्याचा योग होता !

( १० )

## आतां मी श्रीमंत झालों

लोकमान्य नाटक मंडळीचा ‘ हाच मुलाचा बाप ’ या नाटकाचा प्रयोग पहाण्यासाठीं मी रजा घेऊन पुणें, येथें आलें होतों. स्टेशनवर गडकरी मला घेण्यासाठीं आले होते. त्यावेळीं मी त्यांचा पोशाख पाहून थक्क झालों आणि त्यांच्याकडे पहात राहिलों. त्यावेळीं ते म्हणाले “ पहातां काय ? मी हल्लीं श्रीमंत माणूस झालों आहे. माझा जरीचा रुमाल तर पहा. याहीपेक्षां घरीं तर चला, मी गम्मत दाखवितों ” दुसरें दिवशीं घरीं गेल्यानंतर त्यांनीं मला एक खुर्ची दाखविली आणि मला म्हणाले“या खुर्चीवर बसा;फार दिवसांची इच्छा होती; चाळीस रुपयांला ही खुर्ची घेतली आणि जीवाची मुंबई केली. ” गडकऱ्यांच्या

खोलीच्या अस्ताव्यस्त कारभारांत ती खुर्ची उकिरड्यांत पडलेल्या चिंतामणी-सारखी एकटीच झळकत होती.

( ११ )

## ऑथरचें थोबाड

याच मुक्कामांत कै. नानबा गोखले यांनीं लोकमान्य नाटक मंडळीचा एक ग्रूप फोटो काढण्याचें ठरविलें. फोटो काढण्यासाठीं सर्व मंडळी गोखले यांच्या स्टुडिओंत आली. ग्रूप अरेंज करतांना गडकऱ्यांनीं मला मध्यभागीं बसविलें. पण फोटोग्राफरना काय वाटलें कोणास ठाऊक त्यांनीं माझ्या अंगावर खेकसून उठवून दुसरीकडे बसविलें. त्यांनीं मला बाजूला बसवावें आणि गडकऱ्यांनीं मधें बसवावें असें दोनतीनदां झालें. नानबा नुसती गम्मत पहात होते आणि गणपतराव कुलकर्णी फिलॉसफरसारखा चेहरा करून गंभीर झाले होते. फोटो घेऊन झाल्यावर 'अंधारांतल्या गोष्टी' करण्यासाठीं कांचा घेऊन फोटोग्राफर डार्करूममध्यें गेले त्यावेळीं आपला उसना गंभीरपणा सोडून गणपतराव म्हणाले 'ह्या फोटोग्राफरना माणसांच्या चेहऱ्याची परीक्षा नाहीं.' त्यावर गडकरी म्हणाले 'तुम्ही चुकतां. मी ओळखीचा होतो म्हणूनच त्यांनीं मला बसूं दिलें. नाहीं तर मलाही असेंच बाजूला उठवून लावलें असतें. या फोटोग्राफरला काय माहीत कीं ऑथरचें थोबाड जोडा मारल्यासारखें असतें! मला पहा, यांना पहा आणि खाडीलकर यांचा चेहरा डोळ्यापुढें आणा!'

( १२ )

## नूपुर व सुदाम

चालकाशीं कितीही तंटे आणि मतभेद झाले तरी किर्लोस्कर मंडळीबद्दलचा गडकऱ्यांचा अभिमान जाज्वल्य होता. गोव्यांतून परत आल्यावर ज्या वेळीं मी त्यांना भेटावयास आलों त्यावेळीं श्री. टिपणीस यांची भारत नाटक मंडळी तेथेंच होती. गडकऱ्यांची मातोश्री बाहेरगांवीं गेल्यामुळें आम्ही दोघे भारत मंडळींतच जेवावयास जात असूं. पुण्यप्रभाव नाटक आतां मी किर्लोस्कर कंपनीस देणार नाहीं असें त्यांचे वारंवार उद्गार ऐकून आप्पानीं भारत मंडळी-साठीं तें नाटक मागितलें पण ती सूचना गडकऱ्यांनीं अमान्य केली. किर्लोस्कर कंपनीला देणार नाहीं मग आप्पाना देण्यास काय हरकत आहे असें मी म्हणालों; त्यावेळीं गडकऱ्यांनीं उत्तर दिलें कीं, 'मी कांहीं जरी म्हटलें तरी हें

नाटक किर्लोस्कर कंपनीकरतांच आहे. माझ्या पुण्यप्रभावानेंच किर्लोस्कर कंपनी जगणार व माझें भविष्य कधींही खरें झाल्याखेरीज रहाणार नाहीं.' त्याच रात्रीं पुण्यप्रभावाच्या लिहून झालेल्या मजकुराचें वाचन झालें. वाचनाचें काम त्यावेळीं भारत नाटक मंडळींत असलेले नट दत्तोपंत रानडे यांनीं केलें. श्रोते मी, गडकरी व बालकवि ठोमरे असे होतों. या वाचनाचें वेळीं सुदाम आणि नूपुर यांच्यांतून लोकप्रिय पात्र कोणतें होईल याबद्दल आमच्यांत बराच वाद-विवाद झाला. सुदाम लोकांचा आवडता होईल असें गडकऱ्यांचें म्हणणें होतें व तशा अर्थाचें त्यांनीं नाटकांत वाक्यहि घातलें आहे. बालकवि व मी नूपुराची तरफदारी करणारे होतों. वस्तुस्थिति काय झाली ती सर्वांच्या समोर आहेच.

असो, गडकऱ्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या दिवसांतील आणखी बऱ्याच आठवणी सांगण्याजोग्या आहेत; त्या स्थलसंकोचास्तव पुढील भागासाठीं राखून ठेवतों.

---

## श्री. दत्तात्रय गणेश सारोळकर यांजकडून

(१)

### कोल्हापुरकरांचा प्रल्हाद

कोल्हापूरकर नाटक मंडळीचा मुक्काम पुणें येथें असतांना त्यांच्या कै. बर्वे यांनीं लिहिलेल्या 'प्रल्हाद' नाटकाला मास्तरना नाटककारांनीं मोठ्या आग्रहानें पाचारण केलें. मास्तरनीं नाटकाला यायचें कबूल केलें. मास्तर येणार म्हणून नाटककार बर्वे त्यांची वाट पहात नूतन आर्यभूषण नाटकगृहाच्या प्रवेशद्वारांत उभे राहिले. नाटकाचा एक अंक संपला तरी मास्तरांचा पत्ता नाहीं. पण मौज अशी झाली कीं, अंक सुटल्यावर मास्तर रा. बर्वे यांना भेटायला गेले. बर्वे यांना वाटलें कीं, मास्तर आतांच नाटकाला आले असावेत. पण तो त्यांचा समज पुढील संवादावरून दूर झाला.

रा. बर्वे आणि मास्तर यांची नजरानजर होतांच मास्तरनीं विचारलें 'कायहो अनंतराव, पहिल्या अंकांत मायावी राक्षसाची विनोदी भूमिका घेणाऱ्या नटाची जात कोणती ?

बर्वे म्हणाले ' ते तुमच्याच जातीचे आहेत. '

मास्तर लगेच आपल्या जवळच्या मित्राला म्हणाले, ' जातीला जातीची ओळख बरोबरच पटते. '

बर्वे यांना मास्तरांच्या म्हणण्यांतला अर्थ कळेना. तेव्हां ते घोटाळ्यांत पडले.

लगेच मास्तर त्यांना म्हणाले, ' अहो, मायावी राक्षसाची विनोदी भूमिका घेणारे नट ' प्रभू 'च असले पाहिजेत असें मी छाती वर करून यांना सांगितलें. ( जवळच्या गृहस्थाकडे बोट दाखवून मास्तरनीं म्हटलें. )

' हें तुम्ही कशावरून म्हणालात ' बर्वे यांनीं त्यांना विचारलें.

' अहो त्या नटांनीं ' त्यांनीं ' या शब्दाऐवजीं ' त्याही ' असें म्हटलें. माझ्या जातीचा हा ' नी ' ' ही ' चा पिढीजाद फरक या वेळीं माझ्या साक्षीला उभा राहिला आणि मीं माझ्या 'भाई'बंदाला चटकन ओळखलें. [ ही भूमिका भाई देशमूख या नांवाचे नट करीत असत. मास्तरांची व त्यांची यावेळीं मुळींच ओळख नव्हती. ]

( २ )

## रा. टिपणीसांचा पुनर्विवाह

सुप्रसिद्ध नाटककार अप्पा टिपणीस यांच्या पुनर्विवाहाला ज्या लोकांना आमंत्रण होतें त्यांत मास्तरांचें नांव होतें. मास्तर, मी व आणखी कांहीं लोक असें पुनर्विवाहाला निघालों. जातां जातां मास्तर मध्येंच एका ' सॅलून 'मध्यें शिरले, व शिरतांना म्हणाले कीं, आपण पुनर्विवाहाला चाललों आहोंत. रस्त्यांत कोणी एखादा ' जिन्सीवाला ' भेटला तर आपली फुकट हजामत करायचा तेव्हां ती संधि त्याला देऊं नये म्हणून विकत हजामत करवूनच गेलेलें बरें. '

( ३ )

## नागपूरवर स्वारी

एकदां पुण्यास माझा मुक्काम होता. मी किर्लोस्कर नाटकगृहांत माझे मित्र रा. शिवरामपंत पानसे यांचेबरोबर रहात असे. ते प्लेगचे दिवस होते. पुण्यांत प्लेग फारच वाढल्यामुळें मास्तरनीं नागपूरला जाण्याचें ठरविलें. दुपारीं नागपूरला जावयाचें म्हणून ते सकाळीं जाण्याच्या तयारीनें थिएटरसमोरच्या ' सिझन शॉप ' मध्यें आले. डोक्याला जरीचा रुमाल, हातांत एक बॅग वगैरे पाहून मीं त्यांना म्हटलें ' काय मास्तरसाहेब कुठल्या स्वारीची तयारी ?'

'नागपूरवर स्वारी करायला निघालों आहे,' मास्तर उद्गारले. सामान वगैरे दुकानांत ठेवून तें तेथेंच बसले. नागपूरला जाण्याकरतां गाडी दुपारची. आणि मास्तर सकाळीं ९ वाजतां सामानसुमान घेऊन आलेले. मला त्याचा कांहींच उलगडा होईना. बराच वेळ गेल्यावर पोस्टमन आला. पोस्टमनला पाहतांच मास्तरनीं त्याला हांक मारली आणि म्हणाले 'अरे, गडकरी येथें आहे. लौकर मनिऑर्डर दे.'

पोस्टमननें मनीऑर्डरऐवजीं एक पत्र त्यांच्या हातीं दिलें. पत्रांत एका मासिकाच्या संपादकांनीं कविता पाठविण्याविषयीं विनंती केली होती. पत्र खिशांत ठेवून मास्तर सामानासह घरीं जायला निघाले तेव्हां त्यांना विचारलें 'कायहो मास्तर, झाली का मोहीम तहकूब?'

'त्या गाढवानें मला आज सकाळीं ९ वाजतां पैसे मिळतील असें पत्र पाठविलें आणि पैसे नाहींत नी कांहीं नाहीं. पैशाशिवाय स्वारी कशी करायची? टांगेवाला स्वारी भरूं देणार नाहीं!'

(४)

## भिकारणीची गोष्ट

एकदां संध्याकाळीं मी मास्तरांच्या बरोबर फिरायला चाललों होतों. आम्हीं कसब्याच्या गणपतीजवळ आलो तेव्हां एक भिकारीण मास्तरांकडे पाहून गयावया करून पोटाला मागूं लागली. मास्तरनीं आपल्या खिशांत हात घातले पण एकही पैसा त्यांच्याजवळ नव्हता. तेव्हां ते तिला म्हणाले 'बाई, आज माझ्याजवळ पैसा नाहीं. मला तुला धर्म करायची मनापासून इच्छा आहे तेव्हां तूं आपला पत्ता मला सांग. पैसे आले कीं तुझ्या घरीं पोंहचते करीन.'

(५)

## दक्षिणी सुबोधची मागणी

राजापूरकर नाटक मंडळींतून फुटून निघालेली दक्षिणी सुबोध नाटक मंडळी एक उर्दू नाटक घेऊन मुंबईस आली होती. तिचा मुकाम व्हिक्टोरिया थिएटरांत होता व मास्तरांचा मुकाम किर्लोस्कर मंडळींत होता. यावेळीं 'पुण्यप्रभाव' जोरांत होतें. मास्तर दक्षिणी सुबोधचें नाटक पाहण्यास गेले असतांना त्यांची व बसाप्पांची भेट झाली. बसाप्पा डोळे मिचकावीत मास्तरना म्हणालें

'आपलें पुण्यप्रभाव नाटक फारच चांगलें झालें बुवा ! आम्हांला जर एखादें असेंच नाटक द्याल तर बरें होईल !'

मास्तर म्हणाले 'तुम्ही मला मागणी घातली हेंच बरें केलेंत ! एका नाटकासारखें दुसरें नाटक मला लिहितां आलें तर मी तुम्हांला खात्रीनें नाटक देईन.'

( ६ )

## अण्णासाहेबांनीं चोरी केली आहे

महाराष्ट्र नाटक मंडळींतून फूटून भारत नाटक मंडळी नुकतीच पुण्यास स्थापन झाली होती. माझे मित्र रा. श्रीधरपंत कर्णीक या मंडळींत होते. मी त्यांच्याकडे जात येत असे. एकदां मास्तरांची व माझी कंपनींत गांठ पडली. मला पाहतांच ते म्हणाले 'कुणाला बगलेंत मारलें आहे ?' मीं उत्तर दिलें 'थॉम्स आट्वेंला !' मास्तरांनीं माझ्या जवळचें 'व्हेनीस प्रिझव्हर्ड' हें पुस्तक घेऊन चाळलें व ते म्हणालें 'याचें भाषांतर करून नाटककार होता कीं काय ? पण लक्षांत ठेवा अं ! ही चोरी काळकर्त्या अण्णानीं केली आहे. ही चोरलेली 'लक्ष्मी' नाट्यकला प्रवर्तक महाराष्ट्रांत दाखवून 'महाराष्ट्राची लक्ष्मी' बळकावणार आहे." मला स्पष्ट उलगडा होईना म्हणून मी मास्तरांना पुन्हां विचारलें 'याचा अर्थ काय ?' तेव्हां त्यांनीं असें स्पष्टीकरण केलें कीं, प्रो० अण्णासाहेब परांजपे यांनीं 'व्हेनीस प्रिझव्हर्ड' वरून 'महाराष्ट्र लक्ष्मी' नांवाचें नाटक लिहिलें आहे व तें नाट्यकला प्रवर्तक मंडळीकडून रंगभूमीवर येणार होतें.

( ७ )

## उदबत्तीचें लग्न लावलें

एकदां एका सुगंधी सामानाच्या दुकानांत मास्तर गप्पा मारीत बसले होते. मास्तरांचा कधींमधीं तो गप्पा मारण्याचा अड्डाच होता. तेथें बसले असतांना सुगंध्यानें एक उत्तम उदबत्ती लावली. तिचा वास फारच चांगला होता. मास्तर म्हणाले या 'सुगंधी' वर आपण फारच फिदा झालों आहोंत. तेव्हां हिला बक्षीस म्हणून कांहीं तरी दिलें पाहिजे.

असें म्हणून लगेच मास्तरांनीं कापूर मागवून उदबत्ती जवळ पेटवली व त्याच्यावर विडी पेटवीत ते म्हणालें 'मी हें उदबत्तीचें लग्न या कापराशीं लावलें आहे.'

श्री ग्रंथ संग्रहालय

( ८ )

**गरीब निसबत श्रीमंत**

एकदां एका धनिक मित्राबरोबर मास्तर फिरायला गेले होते. बुधवारांत टांगे नव्हते. हें पाहून मास्तर म्हणाले टांगेवाल्यांनीं बुधवारांतच संप केला आहे कीं काय ?' इतक्यांत एक टांगा आला. टांगेवाल्यानें मास्तरांकडे पाहून म्हटलें ' रावसाहेब कोठें जायचें आहे. ' मास्तरनीं उत्तर दिलें कीं हे रावसाहेब असून मी त्यांच्या निसबत गरीब आहे. ते ज्या सार्वजनिक ठिकाणीं जातील तेथें मी त्यांच्याबरोबर त्यांच्याच खर्चानें जाणार आहे.

( ९ )

**इंदुप्रकाश आहे तो !**

मी एकदां मास्तरांच्याकडे गेलों होतों. मास्तर त्यावेळीं आपलें लेखन आटपून मोकळे झाले होते. मी त्यांच्याकडे कांहीं कामाकरतां गेलों होतों. तें काम म्हणजे इंदुप्रकाशांतल्या नोकरीचें होय. मास्तरांची व रा. यंदे यांची बरीच ओळख होती. मी इंदुप्रकाशांत नोकरीला जाणार असें मास्तरनीं ऐकतांच ते म्हणाले ' अहो सारोळकर, तो परप्रकाशित इंदुप्रकाश आहे. त्यांत स्वंयप्रकाशित लेखकांना वाव नाहीं.'

( १० )

**ललितकलेचें व्रतपालन**

कै. केशवराव भोसले यांचीं नाटकें किर्लोस्कर नाटकगृहांत चालू होतीं. त्यावेळीं 'हाच मुलाचा बाप' वगैरे नाटकें ललितकलेच्या रंगभूमीवर नव्हतीं. नवें नाटक म्हणजे 'व्रतपालन' होय. हें 'व्रतपालन' नाटक फेल्युअरच झालें होतें. मी तें नाटक पहावयास गेलों होतों. दुसऱ्या अंकाचे वेळीं मास्तर तेथें आले. नाटक वगैरे संपल्यावर मी केशवरावांच्याकडे मास्तरबरोबर गेलों. केशवरावांनीं मास्तरांना नाटकाबद्दल मत विचारलें. मास्तर एकदम म्हणाले 'नाटकांत एकादशीवर्णन आहे तेव्हां त्याला एकादशी भागविण्यापुरतें उत्पन्न व्हायला कांहींच अडचण पडणार नाहीं.'

केशवराव व जवळची मंडळी पोटभर हंसली !

---

(१)

## श्री. यशवंत नारायण टिपणीस यांजकडून—

### माझी पहिली भेट

गडकरी यांची आणि माझी ओळख प्रथम सन १९०५ मध्यें झाली. त्यावेळीं मी मुंबईस होतों. एके दिवशीं माझे स्नेही बाळासाहेब इनामदार यांच्याबरोबर त्यांचे सासरे रा. ताम्हणे यांच्याकडे जेवावयास गेलों असतां त्यांच्या घरीं मीं गडकऱ्यांना प्रथम पाहिलें. शरीरानें कृश पण बोलण्यांत पटाईत असलेला हा मुलगा आमच्या गप्पाष्टकांत भाग घेई. आमच्या बोलण्यांत कोणताही विषय निघाला तरी त्यासंबंधीं गडकरी माहिती सांगत. गडकऱ्यांचें बोलणें ऐकून या मुलाला 'आपणांस सर्व कांहीं समजतें असा अभिमान वाटत असावा' असें दिसलें; म्हणून हा कोणाचा मुलगा व त्याचें नांव काय अशी मीं चौकशी करतां मॅट्रीकच्या परीक्षेसाठीं गडकरी मुंबईस आले होते असें समजलें. गडकरी बोलावयाला लागले म्हणजे दुसऱ्यास कांहीं बोलावयास सवडच देत नसत, सारखे आपणच बोलत रहात असें त्यांच्यासंबंधीं मला ते चांगल्या नांव लौकिकास चढल्यावर आढळून आलें तेंच याहीवेळीं म्हणजे गडकरी विद्यार्थी असतां माझ्या पहाण्यांत आलें.

(२)

### 'प्रेमसंन्यासा'चें वाचन

त्यानंतरची सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे सन १९१० सालची. या सालीं आमच्या महाराष्ट्र कंपनीचा मुक्काम पुण्यास होता व किर्लोस्कर कंपनीही पुण्यास आली होती. किर्लोस्कर कंपनी पुण्यास असतां सुप्रसिद्ध नाटककार तात्यासाहेब कोल्हटकर हेही पुण्यास आले होते. किर्लोस्कर कंपनीचे जरी ते ऑथर असले तरी त्यांना सर्व कंपन्यांबद्दल आदर वाटे. वेळ काढून प्रत्येक कंपनींत जाऊन एकदां तरी सर्वांची भेट घेण्याची त्यांची पद्धत असे. तात्यासाहेब असेच एकदां माझ्याकडे आले असतां तात्यासाहेबांचें एकादें तरी नाटक आमच्या कंपनीकरितां मिळावें असें मला फार वाटे म्हणून त्याच वेळीं मी महाराष्ट्र कंपनीकरितां एकादें तरी नाटक लिहिण्याबद्दल त्यांना विनंती केली. त्यावर ते म्हणाले, "अप्पा, तुम्ही माझ्याजवळ नाटक मागतां हें ठीक आहे. पण तुमच्यासारख्यांनीं नाटक लिहून रंगभूमीवर आणलें पाहिजे. तुम्ही, कारखानीस

वगैरे मंडळी मनांत आणाल तर चांगलें नाटक लिहाल. तुमच्यासारख्यांनीं नाटक लिहावें व तें रंगभूमिवर यावें अशी आमची अपेक्षा आहे. " तात्यासाहेबांच्या बोलण्याचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. माझ्याकडून नाटक लिहून होणें शक्य नाहीं असें जरी मला वाटत होतें तरी प्रयत्न करून पाहण्याचें मीं ठरविलें. त्याच सुमारास थेल्मा ही इंग्रजी कादंबरी माझ्या वाचण्यांत आली होती. या कादंबरीपैकीं 'लँड ऑफ मॉकरी' या चॅप्टरवरून 'कमला' नाटक लिहिण्याचें माझ्या मनानें घेतलें व त्याप्रमाणें आरंभही केला. या नाटकांपैकीं मी प्रथम लिहिलेला एक प्रवेश भाषांतरच होता. प्रवेश लिहून झाल्यावर जेव्हां मी तो समग्र वाचला त्यावेळीं तो मला न आवडल्या कारणानें मी फाडून टाकून स्वतंत्र लिहिण्याचें ठरविलें. अशा रीतीनें मी लिहीत असतां नाटक लिहीत असल्याची बातमी गुप्त ठेवण्यासाठीं जपत असें. नाटक लिहावयाचें असलें म्हणजे खोलीचें दार मी प्रथम लावून घेई. एक दिवशीं मी अशा तऱ्हेनें नाटक लिहीत असतां गडकरी माझ्याकडे आले व त्यांनीं दारावर थाप मारली. दार उघडतो असें सांगून मी नाटकाचे कागद बसावयाच्या गादीखालीं घालून दार उघडलें. आंत आल्यावर काय करीत होतां असा गडकऱ्यांनीं प्रश्न केला. अर्थात् नेहमींच्या रीतीप्रमाणें कांहीं नाहीं असें मी उत्तर दिलें. इतक्यांत घाईघाईनें कागद गादीखालीं घातल्यामुळें त्याचा थोडासा भाग बाहेर दिसता राहिला होता तो गडकऱ्यांनीं पाहिला व कागद बाहेर काढले. 'नाटक लिहितां वाटतं' असें म्हणून त्यांनीं लिहिलेला भाग वाचला व 'नाटक छान आहे,' जरूर लिहा असें मला प्रोत्साहन देऊन 'तुम्हालाही मी कांहीं तरी दाखवीन; माझ्याकडे या ' असें ते म्हणाले. त्यानंतर मी त्यांच्याकडे गेल्यावर त्यांनीं मला प्रेमसंन्यासाचे पहिले दोन किंवा तीन असावेत, नक्की आतां आठवत नाहीं, प्रवेश वाचून दाखविले. ते प्रवेश ऐकून त्यांच्याबद्दल मला फारच आश्चर्य वाटलें व मी थक्क झालों. माझ्या नाटकापेक्षां तुमचें नाटक फार सरस आहे असें मी बोललोही. पुढें आम्ही एकमेकांना आपले लिहून झालेले प्रवेश वाचून दाखवीत असूं. हें नाटक ज्यावेळीं त्यांनीं लिहावयास घेतलें होतें त्याच वेळीं तें महाराष्ट्र कंपनीस द्यावयाचा त्यांचा विचार होता. पुढें त्यांच्या इच्छेप्रमाणें हें नाटक आमच्या महाराष्ट्र कंपनीकडूनच रंगभूमीवर आलें हें सर्वांनाच माहीत आहे.

( ३ )

## नारायणराव पेशव्यांचें भूत

याच वेळीं रा. खाडिलकर यांचें ' भाऊबंदकी ' हें नाटक रंगभूमीवर आलें होतें. गडकऱ्यांनीं या नाटकाचा पहिला प्रयोग पाहिला होता. पण पुन्हां एकदां म्हणजे बहुधा तिसऱ्या प्रयोगाला ते फिरून आले. शनवारवाड्यांत नारायणराव पेशवे यांचा खून झाला व त्यांचें भूत अद्याप शनवारवाड्याचें आसपास फिरत असतें अशा प्रकारचा लोकप्रवाद अद्यापही पुण्यांत ऐकूं येतो. गडकरी त्या दिवशीं सबंध नाटक न पाहतां दोन अंक झाल्यावर घरीं जावयास निघाले. नाटकाचा त्यांच्या मनावर थोडासा परिणाम झाला होता. व वरील वादामुळें त्यांना जातांना भीति वाटूं लागली. गडकरी त्यावेळीं काळ्यांच्या वाड्यांत म्हणजे हल्लीं ज्या बाजूला नवापूल बांधला आहे त्या बाजूला रहात असत. गडकरी थेटरांतून निघून शनिवारवाड्याच्या गणेश दरवाजाशीं येतांच त्यांना ज्यास्त भीति वाटूं लागली. त्यावेळीं या रस्त्यांत हल्लींसारखी रहदारी नसे. त्यांतून ते अर्ध्याच नाटकांतून उठल्यामुळें एकादी सोबतही मिळण्याचा संभव नव्हता. गडकऱ्यांना भुताची भीति वाटूं लागतांच त्यांनीं ' रामराम रामराम ' असें मनांतल्या मनांत म्हणावयास सुरुवात केली व भयभीत अंतःकरणानें ते पुढें जाऊं लागले. दिल्ली दरवाज्याकडे जिथें रस्ता वळतो त्या ठिकाणीं एक पार असून जवळच वडाचें झाड आहे. गडकरी ज्यावेळीं या वळणाशीं आलें त्यावेळीं सहज त्यांचें वडाकडे लक्ष गेलें. तेव्हां या वडाच्या पारावर त्यांना एक मनुष्याची आकृती दिसली. गडकऱ्यांना वाटलें कीं नारायणरावांचे भूत म्हणतात तें हेंच असेल. ही भुताची कल्पना मनांत येतांच गडकरी पळूं लागले. वडाच्या पारावर जी आकृती होती ती भुताची नसून तेथें एक पोलिस उभा होता. नारायणराव पेशव्यांचें भूत आहे या कल्पनेनें ते पळूं लागले. गडकऱ्यांना पळतांना पाहून हा कोणीतरी चोर असावा अशी कल्पना येऊन तोही त्यांना धरण्यासाठीं त्यांच्यामागून पळूं लागला. त्यावेळीं गडकऱ्यांची फारच त्रेधा उडाली व मुठींत जीव घेऊन ते एकदांचे आपल्या घरांत शिरले. घरांत शिरल्यावर त्यांनीं मागें वळून पाहतांच भुताच्या ऐवजीं त्यांना पोलीस दिसला व त्यांचे त्यांनाच हसूं आलें. सोबत नसल्यामुळें आपण पळत सुटलो असें सांगून त्यांनीं पोलिसची समज घातली. दुसऱ्या दिवशीं गडकऱ्यांनीं ही सर्व हकीगत सांगितली तेव्हां सर्वांना पोट धरधरून हसूं आलें.

( ४ )

## माझी निराशा

माझी कंपनी–भारत नाटक मंडळी वऱ्हाडांत होती. कंपनीच्या म्हणजेच पर्यायानें माझ्या स्थितीसंबंधानें सांगावयाचें तर ती यावेळीं फारच खाला-वली होती. मी चिंतेत होतो. कंपनीची स्थिति कशी सुधारेल व तिची भर-भराट कशी होईल याची मला फार काळजी वाटे आणि रात्रंदिवस माझे हेंच विचार चालत. मी कंपनीच्या कामासाठीं मुंबईस आलों होतों. गडकऱ्यांचे ‘ प्रेमसंन्यास ’ नाटक यापूर्वींच रंगभूमिवर येऊन जुनें नवें झालें होतें. व नाटककार म्हणून त्यांचा महाराष्ट्राला चांगलाच परिचय झाला होता. कवि म्हणूनही तें चांगल्या लौकिकाला चढलें होतें. मी ज्यावेळीं मुंबईस आलों त्यावेळीं किर्लोस्कर कंपनी मुंबईस नाटकें करीत होती. तिनें गडकऱ्यांचें ‘ पुण्य-प्रभाव ’ नाटक बसविलें होतें. या नाटकांच्या रंगीत तालमीला मी गेलों होतों. ही रंगीत तालीम फार चांगली झाली व हें नाटक चांगला पैसा देईल असें माझ्या मनानें घेतलें.गडकऱ्यांचा व माझा चांगला स्नेह होता. भारत नाटक मंडळी मुंबईस असतांना काय किंवा पुण्यास असतांना काय गडकरी बहुधा आमच्याच कंपनींत असत. तेव्हां गडकऱ्यांजवळ नाटक मागितल्यास ते खात्रीनें देतील असा माझा खात्रीचा भरंवसा होता. माझ्या कंपनीची खालावलेली स्थिति सुधारावयाची म्हणजे लोकप्रिय होईल असें नाटक रंगभूमीवर आणणें मला जरूर होतें. पुण्यप्र-भावाची जेव्हां मी रंगीत तालीम पाहिली त्यावेळीं हें नाटक आपल्यास मिळालें तर बरें होईल असें माझ्या मनानें घेतलें आणि मी गडकऱ्यांना नाटकाची मोनापली तुम्ही किर्लोस्कर कंपनीला दिली आहे काय असा प्रश्न केला. तेव्हां गडकरी नाहीं म्हणतांच मला धीर आला. ज्याअर्थीं गडकऱ्यांनीं पुण्यप्रभाव सर्वस्वी किर्लोस्कर कंपनीला दिलें नाहीं त्याअर्थीं प्रोज नाटक करण्याचा हक्क माझ्या कंपनीसाठीं घ्यावयाचें मीं ठरविलें व तो मला मिळणार नाहीं असें त्यावेळीं तरी मला वाटलें नाहीं. नाटक संपल्यावर गडकऱ्यांना प्रोज खेळ करण्याचा हक्क मला देण्याबद्दल मीं विचारलें. तेव्हां माझी कल्पना खोटी ठरली. गडकऱ्यांच्याबद्दल मला जी खात्री वाटत होती ती चुकीची ठरली. माझी एक प्रकारें निराशा झाली. गडकऱ्यांनीं माझा प्रश्न ऐकतांच एकदम ‘ नाहीं ’ असा जबाब दिला. स्वतः मी व माझ्या कंपनींतील नटवर्ग यांचा

विचार करतां मला हक्क न देण्यासारखी उणीव आमच्यांत नव्हती. यामुळें तर गडकऱ्यांच्या नकाराचें मला अधिक वाईट वाटलें. पण आपल्या पडत्या काळांत ज्याच्याबद्दल अधिक खात्री असते तोच निराशा करतो असें अनुभव माझ्याप्रमाणें अनेकांना आले असतील. गडकऱ्यांनीं मला नाहीं हें उत्तर देतांच त्यांचा मला राग आला असल्यास नवल नाहीं. पण त्यांच्या नकाराला वेगळेंच कारण होतें हें मला पुढें त्यांनीं सांगितलें.

## माझ्यासाठीं ' सुरती शिक्का '

पुढें म्हणजे सन १९१८ सालीं. यावेळीं मी भारत नाटक मंडळी मोडून आर्यावर्त नाटक मंडळी काढली होती. या मंडळीकडून माझें ' चंद्रग्रहण ' हें ऐतिहासिक नाटक १९१७ त रंगभूमीवर आलें होतें. या नाटकाच्या रंगीत तालमीस गडकरी हजर होते. खाडिलकर, केळकर वगैरे बरीच मंडळी हजर होती. रंगीत तालीम पाहून सर्वांनाच नाटकाच्या यशस्वीतेबद्दल खात्री वाटली. त्यानंतर म्हणजे आरंभीं दिलेल्या सालीं पुण्यास या नाटकानें खळबळ उडवून दिली होती. हे खेळ पाहण्यास गडकरी येत असत. याच सुमारास गडकरी बरेच आजारी पडले. एक रात्र तर अतिशय आजाराची गेली. दुसऱ्याच दिवशीं गडकरी आजारी असल्याचें समजतांच मी त्यांना भेटण्यासाठीं गेलों. या वेळीं त्यांच्या अंगांत बराच ताप होता व त्यांना बोलण्याची शक्ती उरली नव्हती. मी गेल्यावर गडकऱ्यांच्या प्रकृतीची चौकशी करतां गेली रात्र फार वाईट गेली असें म्हणून त्या रात्रीच्या स्थितीचें ज्यांत वर्णन केलें होतें अशी एक कविता त्यांनीं मला वाचून दाखविली. ' कविता मी वाचतों, तुम्ही वाचण्याचें श्रम कशाला घेतां ' असें म्हणालों असतांही त्यांनीं ऐकलें नाहीं. त्यानंतर मी त्यांचा निरोप मागितला. कारण त्यांचा अधिक वेळ घेऊन त्यांना श्रम देणें बरें नव्हतें. पण गडकरी मला जाऊं देईनात. तें म्हणालें, "थांबा, तुम्हांला मी एक गोष्ट सांगणार आहे. म्हणजे माझ्याविषयींचा तुमचा गैरसमज दूर होईल." गडकऱ्यांचें हें बोलणें ऐकून मी जरासा बुचकळ्यांत पडलों. त्या दिवसाच्या पूर्वीच्याच खेळाला ते आले होते, त्यानंतर गेलेल्या दोनतीन दिवसांत गैरसमज होण्यासारखें असें कांहीं झाल्याचें माझ्या लक्षांत येईना ! आणि खरोखरच तसा कांहीं प्रकार झाला नव्हता. तेव्हां गडकऱ्यांच्या म्हणण्याचा मला कांहींच अर्थ कळेना ! थोड्या

वेळानें गडकरी म्हणाले, "अप्पा, 'पुण्यप्रभाव' नाटकाच्या प्रोज खेळाचा हक्क तुम्ही माझ्यापाशीं मागितला असतां मी तुम्हांला नाहीं म्हणालों. खरें पाहिलें तर ज्या ज्या कंपन्यांनीं माझी व्यवस्था ठेविली होती, त्या प्रत्येक कंपनीला मी आपलें एक एक नाटक दिलें आहे. पण तुम्हांला एकही नाटक मीं दिलें नसतां वेळोवेळीं तुम्ही माझी व्यवस्था ठेवलीत. इतर मंडळ्यांनीं माझी व्यवस्था नीट ठेविली तरी माझ्यापासून त्यांचा थोडाफार फायदाहि झाला आहे. पण माझ्यापासून तुमचा कोणताच फायदा झाला नसतांहि तुम्ही माझी व्यवस्था ठेविलीत हें ध्यानांत आणून तरी मीं तुम्हांला नाटक द्यावयास पाहिजे होतें. निदान 'पुण्यप्रभावा'चा तुम्ही होऊन मागितलेला हक्क तरी मी तुम्हांस देणें जरूर होतें. पण मी तुम्हांस नाटक न देण्याचें मुख्य कारण म्हणजे माझ्याजवळ तुम्हांला देण्यासारखें नाटक नाहीं. तुम्ही स्वतां नाटककार आहांत व तुमच्या नाटकाला भरपूर लोकाश्रय मिळतो. कांहीं झालें तरी माझ्या नाटकांपेक्षां तुमचींच नाटकें उत्पन्नाच्या दृष्टीनें सरस आहेत. तेव्हां तुम्हांला नाटक द्यावयाचें म्हणजे तें नाटक असें असलें पाहिजे कीं, तुमच्या नाटकापेक्षां माझ्या नाटकाला अधिक उत्पन्न होईल. माझ्या या महत्त्वाकांक्षेमुळेंच मी तुम्हांला नाटक दिलें नाहीं. आतां तुमच्या कंपनीकरितां 'सुरती शिक्का' हें नाटक देणार आहें आणि माझ्या आकांक्षेप्रमाणें तें नाटक उतरेल अशी माझी खात्री आहे. तुम्हांला नाटक कां दिलें नाहीं याचें हें असें कारण आहे. एवढ्यावरून तुमच्या मनांतील गैरसमज नाहींसा होईल असें मला वाटतें." गडकऱ्यांचें बोलणें ऐकून त्यांच्याबद्दलच्या मला वाटणाऱ्या आदरांत अधिकच भर पडली.

( ६ )

## गैरसमज न होण्याविषयीं दक्षता

गडकरी हे आपल्याबद्दल कोणाचा गैरसमज होऊं नये यासाठीं शक्य तितके जपत असत. भारत नाटक मंडळीचा मुक्काम पुण्यास असतांना माझें 'मत्स्यगंधा' हें नाटक नुकतेंच रंगभूमिवर आलें होतें. या नाटकावर अनुकूळ प्रतिकूल टीका त्यावेळीं वर्तमानपत्रांतून होत होत्या. याच सुमारास गडकऱ्यांचें माझ्याकडे येणेंजाणें कांहीं कारणानें कमी झालें होतें व मी त्यांच्याकडे जात नव्हतों. एके दिवशीं गडकऱ्यांकडे येणाऱ्या मंडळींत 'मत्स्यगंधा' नाटकावर टीका चालली असतां मला लागूं पडेल अशी मत्स्यगंधेवर गडकऱ्यांनीं कोटी केली. ही कोटी

त्याच मंडळींत बसणाऱ्या एका गृहस्थानें मला सांगितली. लौकरच ज्ञानप्रकाशच्या एका अंकांत प्रसिद्ध झालेल्या टीकेंत टीकाकार लेखकानें गडकऱ्यांच्या कोटीचा जशाचा तसाच अनुवाद केला होता. ही टीका जशी माझ्या वाचनांत आली तशी गडकऱ्यांनींही वांचली. टीकाकार लेखकानें आपलें समग्र नांव दिलें नव्हतें. त्यामुळें ही टीका गडकऱ्यांनीं लिहिली असावी असा गैरसमज होणें शक्य होतें. खुद्द गडकऱ्यांना तसें वाटलें व आपल्याबद्दल माझा निष्कारण गैरसमज होईल असेंही त्यांच्या मनांत आलें. टीका प्रसिद्ध झाली त्याचे दुसरे दिवशीं मी गडकऱ्यांच्या दारावरून जात असतांना गडकऱ्यांनीं मला हांक मारली. पण मुद्दामच मी वर गेलों नाहीं. तेव्हां गडकरी चोडके खालीं आले. यावेळीं थोडासा पाऊस पडत होता. खालीं आल्यावर आम्ही बोलतबोलत आमच्या मुक्कामीं म्हणजे किर्लोस्कर थिएटरांत आलों. गडकरी म्हणाले, ' अहो काल जी टीका प्रसिद्ध झाली आहे ती मीं लिहिली नाहीं हें तुम्हांला मी सांगण्यासाठीं तुमच्याकडे येणार होतों. निष्कारण गैरसमज करून घेऊं नका. मी कांहीं कोट्या केल्या तरी त्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करून त्यांना सार्वजनिक स्वरूप देत नाहीं. तेव्हां टीका माझी आहे असें समजून तुम्ही माझ्यावर रागावला असलांत तर तो राग सोडून द्या. " गडकऱ्यांनीं असा खुलासा केल्यावर मला त्यांचें फार कौतुक वाटलें. गडकरी माझ्याबरोबर बोलतबोलत आमच्या मुक्कामीं आले ते दुसऱ्या दिवशीं घरीं गेले.

( ७ )

## 'सुरती शिक्या'चा शेवटचा प्रवेश

गडकऱ्यांनीं माझ्या कंपनीकरतां ' सुरती शिक्का ' हें नाटक लिहावयाचें ठरविलें होतें. या नाटकापूर्वी ' तोड ही माळ ' हें नाटकही ते आमच्याचकरतां लिहीणार होते व त्या नाटकाचीं पहिलीं पांचसहा पानेंही त्यांनीं लिहिलीं होतीं. पण त्यापुढें तें नाटक जें मागें पडलें तें पडलेंच. ' तोड ही माळ ' हें नाटक सामाजिक असून त्यांतील नायक मराठा जातीचा व नायिका ब्राह्मण जातीची होती. सुरती शिक्का हें नाटक शेवटल्या बाजीरावावर म्हणजे ऐतिहासिक होतें. गडकऱ्यांनीं या नाटकाचा शेवटचा प्रवेश मला जसा सांगितला तसा मी देत आहे:—शनवारवाड्याच्या समोरचे पटांगणांत एक सुंदर शामियाना उभारला असून त्यासमोर मोठी बैठक घातली आहे. या शामियान्यांत दोन

हमालांनीं टेबल आणि खुर्चि आणून मांडली. तेव्हां देखरेखीवर असलेल्या युरोपिअन अम्मलदारानीं हमालाच्या हातावर बक्षिस म्हणून 'सुरती शिक्याचें' नाणें दिलें. तें नाणें पाहून हमाल बुचकळ्यांत पडले. त्यांनीं छत्रपति शिक्याचें नाणें मागितलें तेव्हां तो युरोपिअन अम्मलदार म्हणाला "आजपासून छत्रपति शिक्याचें नाणें बंद झालें असून हा सुरती शिक्काच चालू झाला आहे" हे ऐकून हमाल सर्वांना 'सुरती शिक्का' दाखवीत निघून गेलें. पुढें कांहीं वेळानें एल्फिस्टन साहेब तेथें येऊन बसले. त्यानंतर बाजीरावसाहेब पुढें पाठीमागें युरोपियन शिपायांच्या पहाऱ्यांत शनिवार वाड्याच्या दिल्लीदरवाज्यांतून बाहेर पडले व त्यांच्यासाठीं मुद्दाम मांडलेल्या खुर्चीवर बसलें. बाजीरावसाहेब बसल्यावर एल्फिस्टन साहेबांनीं खिशांतून एक लिहीलेला कागद काढला व त्या कागदावर बाजीरावसाहेबांनीं खिन्न अंतःकरणानें सही केली. सही करतांना बाजीरावांच्या डोळ्यांतून अश्रू गळत होते. सही केल्यावर त्यांनीं टेबलावर डोकें टेकलें इतक्यांत दोन्ही बाजूला उभारलेलीं जरिपटका व भगवा झेंडा हीं निशाणें आपोआप कोसळून पडलीं. येथें नाटक संपतें. 'सुरती शिक्का' नाटकाचा हा शेवटचा प्रवेश किती हृदयस्पर्शी व करुणाजनक आहे त्याची कल्पना कोणासही न सांगतांना होईल. दुर्दैवानें गडकरी आकस्मिक वारल्यामुळें सर्वच कारभार अपुरा व कल्पनेंतच राहिला.

( ८ )

## जातीचा अभिमान

पुण्यास सन १९१८ सालीं रा. विठ्ठलराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखालीं एक मोठी सभा झाली. या सभेंत सर्व जातीचे प्रतिनिधी हजर होते. मी याच वेळीं पुण्यास होतों. या सभेच्या दिवशीं रा. बाळासाहेब घोरपडे माझ्याकडे आले. त्यांच्या आग्रहावरून आम्ही–ते आणि मी–दोघे सभेस गेलों.या सभेस लो.टिळक हजर होते. सभेच्या ठिकाणीं गेल्यावर सभेंत येणाऱ्या ठरावास प्रभू ज्ञातीतर्फे अनुमोदन देण्याची कामगिरी रा.केळकर यांनीं माझ्याकडे सोंपविली.मी बोलणार असल्यामुळें प्लॅटफॉर्मवरच बसलों होतों. वेळ येतांच माझें भाषण झालें. त्यानंतर अर्धा तासाचें अवधींतच सभा बरखास्त झाली. लोक जाऊं लागले इतक्यांत गर्दीतून मार्ग काढीत काढीत गडकरी माझ्याजवळ येऊन भाषण केल्याबद्दल त्यांनीं माझी प्रशंसा केली. ते म्हणाले 'आपल्या जातीतर्फे आजच्या ठरावास अनुमो-

दन देण्याची माझी इच्छा होती म्हणून मी प्लॅटफार्मवर येण्याचा बराच प्रयत्न केला, परंतु गर्दीतून येणें शक्य झाले नाहीं. त्यामुळें आपल्या जातीतर्फे कोणींच अनुमोदन देणार नाहीं याबद्दल मला एक प्रकारचा विषाद वाटला होता. पण ज्या वेळीं तुम्ही भाषण करण्यास उभे राहिलांत त्यावेळीं मला आनंद झाला. आजच्या सभेंत तुम्ही ठरावास अनुमोदन देऊन आपल्या प्रभु जातीची बांजू राखलीत व तुमचें भाषणही उत्तम झालें." आपल्या जातीचा पाठिंबा लोकमान्य टिळकांच्या कार्याला असावा असें कै० गडकऱ्यांना फार वाटत असे. खुद्द लोकमान्यांसंबंधीं त्यांना किती आदर व अभिमान होता हें महशूरच आहे.

( ९ )

### सहभोजनांस गडकरी

मी पुण्यास असतांना एक सहभोजनाचा समारंभ झाला. माझीं स्वतांचीं मतें किती सुधारलेलीं आहेत हे सर्वांना विश्रुत आहे. मी या समारंभास माझे स्नेही बाळासाहेब सहस्रबुद्धे यांच्याबरोबर गेलों होतों. या सहभोजनास फारच थोडी मंडळी हजर होती पण या थोड्या मंडळींत गडकरी हें एक होते. गडकऱ्यांना या समारंभांत पाहून मला आश्चर्य तर वाटलेंच पण समाधानही झालें. कै. गडकरी हे पूर्ण सुधारक आहेत हें त्यांच्या बोलण्यावरून व लिहिण्यावरून मला ठाऊक होते, पण सहभोजनासारख्या समारंभास ते येतील अशी मात्र माझीं कल्पना नव्हती. मला पाहून कै० गडकरी जरासे चपापले व म्हणाले "माझीं मतें तुम्हांला ठाऊक आहेत." मीही समारंभास हजर राहिल्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें. ही आठवण देण्याचा उद्देश इतकाच कीं, कै. गडकरी यांच्या सामाजिक मतांसंबंधीं जास्त कल्पना यावी.

---

## रा. वि. वा. हडप यांजकडून

( १ )

### गडकरी 'माणूस' कसे होते.

माझा व प. ना. गडकरी यांचा परिचय फारच थोडा, केवळ चारपांच दिवसांचा होता. तर त्याला परिचय म्हणण्यापेक्षां तोंड ओळख म्हणणेंच

जास्त शोभेल. इ. स. १९१७।१८ सालची ती गोष्ट. गडकऱ्यांचा कीर्तिदुंदुभि तेव्हां उत्तम कवि, उत्तम नाटककार व उत्तम विनोदी लेखक म्हणून दशदिशांनीं दुमदुमत होता, व मी तेव्हां वर्तमानपत्रांतून वगैरे लेखक होऊं घातलेला अजाण व अप्रसिद्ध असा बचडा होतों. इतक्या पोरपणांत, इतक्या योग्यताशून्य व प्रसिद्धीशून्य स्थितींत गडकऱ्यांसारख्या सुप्रसिद्ध साहित्यसेवकाचें दर्शन व त्यांच्याशीं संभाषण यांचा लाभ घडला, तो माझे गुरुतुल्य स्नेही सुप्रसिद्ध वीरवामनराव जोशी यांच्यामुळें घडला. वीरवामनरावांचा परिचयही तेव्हां नुकाच लोकमान्यांच्या कृपेनें घडला. लोकमान्यांनीं विलायतेला जाण्यापूर्वी होमरूलफंड जमविण्यासाठीं वऱ्हाडांत दौरा काढला, त्यावेळीं मुंबईंतील माझे हितचिंतक डॉ. वेलकर यांच्या कृपेनें मला लोकमान्यांचें दर्शन घडलें व त्याला कारण माझें तेव्हांचें ' लोकमान्य तिलांजलि ' हें काव्य झालें. त्यांच्याच कृपेनें माझी व लोकमान्यांची ओळख झाली. तेव्हां मीं वऱ्हाडांत लोकमान्यांच्या दौऱ्याबरोबर केवळ त्या होमरूल-बादशहाच्या वैभवाचें व चरित्राचें अवलोकन करण्यासाठीं जाण्याची इच्छा दर्शविली व श्री. दामोदर विश्वनाथ गोखले यांच्या कृपेनें त्यांनीं डॉ. वेलकरांची भीड पाळली म्हणून होमरूलच्या खर्चानें ती वऱ्हाडची यात्रा करण्यांत आली. त्या प्रसंगाचें येथें कांहींसें अप्रस्तुत असें दिग्दर्शन करण्याचें कारण माझ्या सार्वजनिक आयुष्याला खरा आरंभ तेव्हां झाला व ह्या यात्रेंतच वीरवामन-राव जोशी वगैरे वऱ्हाड–मध्यप्रांतांतील पुढाऱ्यांची व श्री. दा. वि. गोखले, श्री. कृष्णाजीपंत खाडीलकर वगैरे महाराष्ट्रीय पुढाऱ्यांची ओळख झाली.

पुढें गंधर्व नाटक मंडळी मुंबईला होती; गडकऱ्यांचा ' एकच प्याला ' नाटक त्या मंडळीमार्फत लौकरच रंगभूमीवर यावयाचें असल्यानें गडकऱ्यांचा मुक्काम मही मुंबईत मंडळीच्या बिऱ्हाडीं नानाशंकरशेटच्या देवळांत होता व वीर-वामनराव तेथें पाहुणे म्हणून आलेले होते. त्यांच्याकडे मी जात येत असे. तेव्हां मी वीरवामनरावांना गडकऱ्यांची ओळख करून देण्याची विनंति केली व त्यांनीं ओळख करून दिली.

मी एक होतकरू साहित्यसेवक आहें असें वीरवामनरावांच्या तोंडून गड-कऱ्यांना कळतांच त्यांनीं आनंद व्यक्त केला. इतर कांहीं गप्पा झाल्या. त्या

दिवशीं मी बिन्हार्डी यावयाला निघालों तेव्हां गडकरी मला म्हणाले, "हडप! असेच नेहमीं येत जा. मात्र एक गोष्ट लक्षांत ठेवा, एखादे वेळीं मी माझ्या विचारांत असलों व तुमच्याशीं नीटसा बोललों नाहीं तर राग मानूं नका."

नंतर मी आणखी दोन वेळां लागोपाठ गडकऱ्यांकडे गेलों. माझी दृष्टि लहानपणापासून माणसाच्या बोलण्याचालण्यावरून त्याचा स्वभाव ओळखण्याचा प्रयत्न करण्याकडे असल्यानें मी त्या दृष्टीनें गडकऱ्यांचें माझ्याशीं किंवा इतरांशीं झालेलें संभाषण लक्ष्यपूर्वक ऐकत असें. त्या तीनचार दिवसांत मला असें स्पष्टपणें आढळून आलें कीं, गडकऱ्यांना श्री. खाडिलकर व श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांची नाट्यसेवा आवडत नाहीं. कोल्हटकरांचें 'सहचारिणी' नाटक तेव्हां रंगभूमीवर येऊन गतप्राणही झालें होतें; पण खाडिलकरांचें 'स्वयंवर' नाटक तेव्हां देखील जोमांत चाललें होतें. कोल्हटकरांच्या नाटकांचें तेव्हां मीं मुळींच परिशीलन केलें नसल्यानें त्यांच्याविरुद्ध गडकऱ्यांचे जे उद्गार निघालेले मी ऐकले, ते 'टीका' व 'निंदा' यांपैकीं कोणत्या सदरांत जमा करावें हें माझें मलाच तेव्हां कळलें नाहीं. पण खाडिलकरांचीं तेव्हांपर्यंतचीं अनेक नाटकें मीं वाचलीं होतीं, कांहीं पाहिलींही होतीं व त्यावरून मी त्यांना फार मानीत होतों. (व आतांही माझा असा समज आहे कीं, अर्वाचीन नाटककारांत खरे महाराष्ट्रीय नाटककार असे तीनच. प. वा. अण्णासाहेब किर्लोस्कर, प. वा देवल, व श्री. खाडिलकर.) त्यामुळें खाडिलकरांवर गडकऱ्यांनीं जी टीका केलेली मी ऐकली, त्यावरून माझा समज झाला कीं, गडकरी खाडीलकरांचा वृथा द्वेष करतात व परनिंदेच्या योगानें आपलें महत्त्व वाढवूं पहातात.

हा माझा समज झाला, पण तो पडताळून पहाण्याचें ठरवून दुसऱ्या दिवशीं मी जो गडकऱ्यांकडे गेलों, तो प्रथमपासूनच खाडिलकरांच्या विरुद्ध बोलूं लागलों, खाडिलकरांचें 'स्वयंवर' म्हणजे केवळ बालगंधर्वांचा गायनाचा जलसा आहे. लोक तो जलसा ऐकावयास येतात; खाडिलकरांचें नाटक पहावयाला येत नाहींत."

मीं हे शब्द जरी केवळ कावेबाजपणानें, गडकऱ्यांना खाडिलकरांची निंदा आवडते किंवा नाहीं हें अजमावण्यासाठीं उच्चारले होते, तरी ते गडकऱ्यांना खरोखरच फार आवडले. माझी अटकळ व अपेक्षा होती कीं जर गडकरी हे

खरोखरच निस्पृह व जबाबदार टीकाकार असतील, तर ते माझ्या–एका यःकश्चित कोंवळ्या विद्यार्थ्याच्या अशा प्रकारच्या अधिकारातिक्रमाबद्दल माझी खाशी कानउघाडणी करतील व जर त्यांना खाडिलकरांची निर्भेळ निंदा करणेंच प्रिय वाटत असेल तर ते मला तशा प्रकारची निंदा करण्याला प्रोत्साहन देतील. यांपैकीं माझा दुसरा तर्कच खरा ठरला. ' वा: ! वा: ! कसें पण अगदीं बरोबर बोललांत ! ' असें म्हणून गडकऱ्यांनीं मला खाडीलकरांची निंदा करण्याला प्रोत्साहन दिलें, व त्यापूर्वीच्या तीन भेटींत त्यांच्याकडून जरी मला एकदांही चहा* मिळाला नव्हता, तरी त्या दिवशीं हें निंदापुराण पुढें चालविण्यापूर्वींच त्यांनीं प्रथम एका नोकराला हांक मारून प्रथम चहा आणण्याला सांगितलें.

माझा हा प्रत्यक्ष अनुभव गडकऱ्यांविषयींच्या इतर ऐकींव अनुभवांशीं मुळींच विसंगत नाहीं.

( २ )

## रा· गुर्जरांचा नाटकी स्नेह

वरच्याच प्रसंगीं गडकरी तापानें आजारी होते. गंधर्व नाटक मंडळी लगेच दुसऱ्या मुक्कामाला–मला वाटतें, पुण्याला निघून गेली, व गडकरी तेथें एकटेच राहिले. कदाचित् त्यांचा परिवारही तेव्हां त्यांच्या बरोबर असेल; मला माहीत नाहीं. पण तेव्हां मग ते ग्रँटरोडला बळवंत संगीत मंडळीचें बिऱ्हाड होतें तेथें जाणार होते. गडकऱ्यांचें औषध डॉक्टरकडून आणावयाचें होतें, व जवळ नोकर वगैरे कोणीही नव्हता. तेव्हां ते मला म्हणाले, " हडप ! माझें तेवढें औषध आणून द्याल का ? "

मी म्हणालों, " हो ! जरूर आणून देईन. "

मला तेव्हां ऐकून माहीत होतें कीं श्री. वि. सी. गुर्जर हे गडकऱ्यांचे परमस्नेही आहेत. त्यांनीं अशा वेळीं गडकऱ्यांना कां मदत करूं नये असें माझ्या मनांत आलें. मीं त्यांना लगेच विचारलेंही, " गुर्जर आपले स्नेही आहेत ना ? ते सध्यां मुंबईत नाहींत कीं काय ? "

यावर गडकरी मला म्हणाले, " हो ! ते माझे स्नेही आहेत व ते मुंबईत

---

* हे सर्वस्वी खोटे असल्याचे वीरवामनराव जोशी यांनीं सांगितले हेंही वाचकांनीं लक्षांत ठेवावें—गोपाळराव अधिकारी. संपादक.

आहेतही. पण अशा वेळीं त्यांचा उपयोग मला सहसा कधीं होत नाहीं! चालावयाचेंच. स्नेही कुणाचे व कोण कुणाचें!"

त्याच दिवशीं गडकऱ्यांचा मुक्काम बळवंत संगीत मंडळींत गेला. त्यांना फक्त एक वेळ मीं औषध आणून दिलें, व तीच त्यांची आणि माझी शेवटची भेट!

\+ \+ \+

प्रत्येक सुप्रसिद्ध व्यक्तीची 'माणूस' ह्या दृष्टीनें खरी किंमत काय आहे हें जाणण्याची मला संवय अथवा खोड असल्यानें मी वरील आठवणी लिहिल्या आहेत. गडकऱ्यांच्या कलेविषयीं बोलावयाचें झालें तर मला तें बोलण्यापूर्वी तेवढी माझी योग्यता आहे किंवा नाहीं याचाही मला विचार करावा लागले, इतके श्रेष्ठप्रतीचे कलावंत मी त्यांना मानतों. आतां, त्यांच्यातही दोष असतील-लच. पण ते चंद्रावरचे डाग आहेत असेंच मी म्हणेन.

# प्रोफेसर गो. म. चिपळूणकर यांजकडून

## (१)

### सुधारणावादी गडकरी

सन १९०४सालीं श्री.गडकरी हे प्रिव्हीयसचे वर्गात असतांना त्यांची व माझी ओळख पहिल्याप्रथम झाली. त्यावेळीं माझे मित्र सध्यां अमेरिकेत असलेले डॉ. वा. रा. कोकटनूर व मुंबईचे सोशलसर्व्हिस लीगमध्यें काम करणारे श्री. सहस्रबुद्धे –या सर्वांचा एक सुधारणावादी क्लब म्हणजे गप्पा मारण्याचा व निरानिराळ्या प्रश्नांचा विचार करणारांची एक मित्रमंडळीची खाजगी सभाच असे. ह्या सभेंत बरीच निरनिराळी मंडळी असत व ती आज सर्व मोठमोठ्या कामावर व हुद्यावर आहेत. त्यांपैकीं श्री. सत्यबोध हुदलीकर व बडोद्याचे नायब सुभे श्री. भाटे व कलेक्टरचे कामावर असलेले श्री. भिडे ह्यांचीं मला नांवें आठवत आहेत. श्री. गडकरी हे आमचे मंडळींत येऊन प्रत्येक विषयावर चर्चा करीत व आपलीं मतें मोकळ्या मनानें सांगत. प्रो.पटवर्धन यांचेकडे ते कित्येक वेळीं जात असत. त्या ठिकाणीं माझी व त्यांची अनेकवेळा गांठ पडत असे व आह्मा दोघांनाही प्रो. पटवर्धन चांगले ओळखीत असत व त्यांनीं कविता करणारे वेडे

कवी व सुधारणावादी गडकरी यांचेमधें विशेष अंतर नाहीं असें ह्मणतांना ऐक- ल्याचें मला स्मरतें.

२ )

**बी. ए. ची तयारी**

अमेरिकेंत जाण्यापूर्वी भूतमहालांत मी त्यांचेकडे अनेक वेळीं भेटावयास जात असे. त्यावेळीं अनेक विषयांवर त्यांचेजवळ बोलत असे. त्यावेळीं परीक्षेला केव्हां बसणार? एकदां बी. ए. होऊन घ्या असें मी त्यांना म्हटलें असतां ते मला विनोदानें म्हणाले कीं कॉलेजांत काव्यप्रकाश व नाटकें शिकविणारे प्रोफे- सर जसा अभ्यास करतात व टीकात्मक बुद्धी जागृत ठेवतात त्याप्रमाणेंच निर- निराळ्या नाटकांचा व काव्यांचा अभ्यास मी चालू ठेवला आहे व मजजवळ तीन चार प्रोफेसरांच्या दोन तीन वर्षे होणाऱ्या लेक्चरांची सामुग्री जमा झाली आहे. आतां ह्या दृष्टया मी बी. ए. च्या परीक्षेची तयारीच करीत आहे पण मला प्रत्यक्ष परीक्षेला बसावयाची वेळ केव्हां येईल तो सुदिन !

( ३ )

**कुकर क्लब**

कालेजांत असतांना मी एक कुकर क्लब काढला होता व कुकरच्या उपयु- क्ततेवर अनेक व्याख्यानें व लेख लिहिले होते. मला स्त्रीशिक्षणासंबंधीं त्यावेळी बरीच कळकळ असे हें पाहून त्यांनी मला विनोदानें “ तुम्ही पुढेंमागें एखाद्या स्त्रीक्षिण संस्थेंत कुकरीचे प्रोफेसर व्हाल ” असें म्हटल्याचे स्मरतें.

( ४ )

**बायको कशी पाहिजे**

एका प्रसंगीं मी त्यांना त्यांचा विवाह करण्याचा विचार चालू असलेला पाहून तुम्हाला बायको कशी पाहिजे म्हणून विचारलें; त्यावर ते म्हणाले मला बायको स्वयंपाकाकरतां व चहा तयार करण्याकरतां नको आहे. ते काम खाणा- वळीनेंसुद्धां भागण्यासारखें आहे. मी अर्धी केलेली कविता पुरी करील, मी अर्धा लिहिलेला लेख पुरा करील, अर्धे लिहिलेले नाटक पुरें करील, अशी बायको मला हवी आहे असें ते विनोदाने म्हणाले. अशी बायको आपण शोधून कशी काढणार असे विचारलें असतां एखाद्या चांगल्या सुशिक्षित मुलीबरोबर लग्न करून तिची तयारी मी वरीलप्रमाणें करणार असें ते मला म्हणाले व

तुमच्या बायकोची तयारी काय केली आहेत असे त्यांनी मला विचारले.

( ५ )

### हिंदुस्थानचा चिवडा

अमेरिकेंत प्रयाण करण्यापूर्वी गडकरी यांनी मला एकदां भेटून जावयास सांगितले होतें व त्याप्रमाणें मी भूतमहालांत जाण्यापूर्वी गेलो होतो. त्यावेळीं ते चिवडा खात बसले होते व त्यांनी मला चिवडा खावयास दिला व अमेरिकेंत पुष्कळ गोष्टी तुम्हाला मिळतील पण हिंदुस्थानचा चिवडा मिळणार नाहीं असें सांगितलें. हिंदुसमाजाचा सध्यां चिवडा बनला आहे " एकाचा पायपोस एकाच्या पायांत नाहीं; सुधारकांनीं अशा समाजाला सुधारण्याचें काम करावयाचे आहे व अमेरिकेतून परत येणाऱ्या हिंदी विद्यार्थी वर्गावर फार जबाबजबाबदारी आहे असें त्यांनी मला सांगितले.

श्री. गडकरी यांचा माझा जरी अल्प परिचय असला तरी त्यांची निष्कपटवृत्ति, दिलदार स्वभाव, विद्यादेवीची आराधना करण्याची तीव्र महत्त्वाकांक्षा, जगावर व जगांतील बऱ्यावाईट व्यक्तिविषयीं वाटत असलेले त्यांचे अलोट प्रेम व हिंदी राष्ट्र, हिंदीसमाज यांची खरी सुधारणा व्हावी याविषयीं त्यांचे उत्कट विचार मी कधींही विसरणार नाहीं.

## श्री. गोविंदराव टेंबे यांजकडून

( १ )

### गडकऱ्यांचा माझ्यावरील राग

गडकऱ्यांचा व माझा परिचय प्रथम किर्लोस्कर कंपनींतच झाला. पण तें कंपनींत असतांना त्यांच्या स्नेहीवर्गांत मात्र मी मोडत नव्हतो. पुढें जेंव्हां किर्लोस्कर कंपनी प्रथम फुटली त्यावेळीं ती न फुटण्याबद्दल गडकऱ्यांनीं पराकाष्ठेचें श्रम घेतलें. इतकेंच नव्हे तर कंपनींतून फुटणाऱ्या नटांशीं पहिले कांहीं दिवस ते बोलतही नसत. वरील कारणांमुळे ज्यांच्या ज्यांच्याशीं त्यांचा अबोला असे त्यांपैकीं मी एक होतो. किंबहुना बालगंधर्व आणि बोडस यांच्यापेक्षां त्यांचा राग माझ्यावरच अधिक टिकला. गडकरी माझ्याशीं बोलत नाहींसे जेंव्हां झाले त्यावेळीं त्यांचा गैरसमज घालविण्याचा मी प्रयत्न करीत होतो. आम्ही कां फुटलों यांची कारणें सांगून वस्तुस्थिति त्यांच्यापुढें मांडण्याची संधि

यावी यासाठीं मी बरेच प्रयत्न केले; पण आमची बाजू ऐकूनही घेण्याची तयारी दाखविली नाहीं. त्यामुळें नाइलाज होऊन मीही स्वस्थ बसलों. कधीं तरी, आज नाहीं उद्यां गडकऱ्यांना खरी हकीकत कळेल व त्यांचा राग नाहिसा होईल अशी मला आशा होती. आणि तसेंच झालें, त्यांच्या ' पुण्यप्रभाव ' या नाटकाचे बाबतींत किर्लोस्कर कंपनीच्या चालकांकडून त्याना जेव्हां प्रत्यक्ष बरें वाईट अनुभव येऊ लागले तसतसा त्याचा आमच्या वरील राग कमी होत चालला. पण इतके खरें कीं किर्लोस्करकंपनीबद्दल वाटणाऱ्या अभिमानांत ते कोणालाही हार जाणारे नव्हते. त्यांचा हा अभिमान पाहिला म्हणजे त्याचे कौतुक वाटे. कारण कंपनीच्या हिताहिताशीं गडकऱ्यांचा काडीचा ही संबंध नव्हता.

( २ )

## गैरसमज दूर झाल्यावर

पुढें गंधर्व कंपनींत असतांना त्यांची गांठ पडे तरी ते फारसे बोलत नसत. नंतर मी शिवराज संगित नाटक मंडळीं काढली. ही कंपनी काढली तेव्हां पहिला महिना मला बराच त्रास सोसावा लागला. कामामुळें व इतर कांहीं कारणानीं या महिन्यांत शारीरीक त्रासांपेक्षां मानासिक त्रास मला किती होई याची कल्पना गडकऱ्यांना झाली होती; यापूर्वीच माझ्याबद्दल त्यांच्या मनांत असलेला राग नाहींसा झाला होता तरी त्यांचे व माझे स्नेहीपणानें उठणें बसणें नव्हतें. पण ज्यावेळीं मी त्रासांत आहे असें त्यांना समजलें त्यावेळीं ते माझ्याकडे रोज सकाळ संध्याकाळ येऊन माझ्या तेथें बसत व मनसोक्त गोष्टी बोलत. यावेळीं माझी कंपनी पुण्यास होती. गडकरी येऊन रोज बसत व विनोदाच्या गप्पा गोष्टी करीत याचें कारण मला होणारा मानसिक त्रास हलका व्हावा. गडकऱ्यांच्या या स्वभावाबद्दल त्यांचे मला कौतुक वाटलें. ते त्यापूर्वी माझ्याशीं फारसें बोलत नसत तरी मी जेव्हां त्रासांत आहे असें समजलें तेव्हां ते मनमोकळपणानें मला बरें वाटण्यासाठीं विशेष काळजी घेऊं लागले. याच बैठकींत त्यांनीं " भावबंधन " या नाटकाच्या अनेक गोष्टी सांगितल्या.

( ३ )

## माझ्यासाठीं ' एकच पेला ' नाटक

माझ्या शिवराज कंपनीसाठीं त्यांना एकादें नाटक देण्याबद्दल मी विनंती केली. त्यावेळीं पुण्यप्रभाव खेळ करावयाचा हक्क दिला. पण त्यांचें एकादे नवें

नाटक पाहिजे होते. म्हणून मी नवें नाटक लिहीण्यास त्यांना सांगितलें; त्यांनीं 'एकचप्याला' हें नाटक आमच्या कंपनीकरतां देण्याचें कबूल केलें होतें. व तशा मजकुराचे त्यांचें पत्रही अद्याप माझ्याजवळ आहे. पण अनेक कारणांनीं या नाटकाचा योग जमून आला नाहीं. म्हणून 'तुळशीदास' या नांवाचें नाटक लिहिण्याचें ठरविलें. पण तेंही तसेंच राहिलें. गडकऱ्यांनीं 'तुळशीदास' या नाटकाचें जें कथानक त्यावेळीं सांगितलें त्याच कंथानकावर मी माझें 'तुळशीदास' हें नाटक लिहिलें आहें.

( ४ )

## गोविंदाचें सुदर्शन

आमच्या शिवराज नाटक कंपनींत एक कर्नाटकी मुलगा होता. तो जितका देखणा होता तितकाच चपल व हुशार होता. हा मुलगा गडकऱ्यांना फार आवडे; पण त्याचे कर्नाटकी उच्चार मात्र मास्तरांना पसंत नसत. म्हणून त्याला शुद्ध मराठी शिकविण्याबद्दल अनेकवार मला सांगितलें. गडकऱ्यांना एक दिवशीं आमच्या नाटक कंपनींत जेवण्यास येण्याचें आमंत्रण दिलें. दुपारीं जेवणाचीं वेळ झाली तरी गडकरी येईनात. माणूस बोलवावयास पाठविला. एक माणूस गेला तो परत आला तरी गडकरी आले नाहींत तेव्हां दुसरा मनुष्य पाठविला, तरीही ते आले नाहींत. शेवटीं त्या कर्नाटकी मुलाला पाठविले त्यावेळीं मात्र गडकऱ्यांनीं एक क्षणाचाही विलंब लावला नाहीं. ते ताबडतोब आले. बिऱ्हाडीं आल्यावर मी विचारलें "मास्तर, काय हा उशीर आणि बोलावणी तरी किती पाठवावी लागली" त्यावेळी ते म्हणाले "गोविंदाचे 'सुदर्शन' आल्यावर मी कसा घरीं रहाणार, ताबडतोब निघालो" गडकऱ्यांच्या या कोटीचे मला फार हसूं आले." त्यानंतर त्यांच्या आमच्या गांठी होत पण सांगण्यासारखे असें कांहीं आतांच आठवत नाहीं.

---

## श्री. विठ्ठल सिताराम गुर्जर यांजकडून

( १ )

### 'भावबंधना'ची कल्पना कशी सुचली

सन १९१७ सालच्या डिसेंबर महिन्यांत, आपलें नुकतेंच पूर्ण केलेलें 'एकच प्याला' हें नाटक गंधर्व नाटक मंडळीला वाचून दाखविण्याकरतां रा. गडकरी

हे मंडळींत येऊन राहिले होते. नाटकाचें वाचन वगैरे झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं—नाताळच्या सुटींत—रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे मामुल वहिवाटी-प्रमाणें सुटी घालविण्याकरतां, आपल्या चुलत बधूंकडे मुंबईला आले. याच वेळीं, त्यांच्या ‘ सहचारिणी ’ नाटकाच्या तालिमींनाहि सुरवात व्हावयाची असून नाटकाचा पद्यभाग तयार करावयाचा उद्योग रा. कोल्हटकरांच्या मागें होता. पद्यांच्या चाली वगैरे घ्यावयाला रा. कोल्हटकर मंडळीच्या बिऱ्हाडीं वारंवार येत व दिवसाचा बहुतेक भाग त्यांना तेथेंच घालवावा लागत असे. रा. कोल्हटकर व गडकरी या उभयतांमध्यें जरी गुरुशिष्यांचा संबंध होता तरी या वेळपर्यंत रा. गडकरी यांनीं ‘ सहचारिणी ’ नाटक वाचलें नव्हतें. मला मात्र तें वाचावयाची संधि अगोदरच मिळाली होती. गडकरी हे कांहींसे आळशी व कांहींसे भित्रे ( nervous ) असल्यामुळें, त्यांच्या मनांत असतांहि त्यांचें ‘ सहचारिणी ’चें वाचन लांबणीवर पडत चाललें होतें. कोल्हटकरांच्या नाटकापुढें आपलें नाटक फिकें पडेल कीं काय, ही भीति त्यांच्या मनाला वाटत होती. शेवटीं, माझ्या आग्रहावरून गडकऱ्यांनीं तें नाटक वाचावयाला हातीं घेतलें व एक दोन दिवसांत तें वाचूनहि टाकलें. वाचनाच्या वेळीं ते व मी बहुधा एकत्रच असूं व आम्हां उभयतांमध्यें नाटकाच्या गुणदोषांसंबंधानें विपुल चर्चाहि चाले; नाटकाच्या वाचनानें गडकऱ्यांच्या मनांतील भीति केव्हांच पार उडून गेली होती. नाटकाचा चवथा कीं पांचवा अंक वाचीत असतां ते मला म्हणाले “ छे, अण्णा ! तात्यांनीं या रंगरावाला आणि व्हिलनला अगदीं भलतेंच वळण दिलें, त्यामुळें नाटक रंगदार होणार नाहीं, अशी भीति मला वाटते. या दोन्ही पात्रांना निराळ्याच तऱ्हेनें रंगवायला पाहिजे होतें तात्यांनीं ! ”

त्या ‘तऱ्हे’बद्दल मीं विचारलें तेव्हां गडकऱ्यांनीं मला ती थोडक्यांत समजावून दिली. मी म्हणालों “ तर मग आपण तात्यांपाशीं याविषयीं चर्चा करूं. ”

यावर गडकरी कांहीं क्षण डोळे मिटून स्वस्थ बसले—कांहींच बोलले नाहींत. हें मला अंमळ चमत्कारिक वाटून मी म्हणालों “ हें काय हो, मास्तर ? ”

माझा हात धरून, अंग थरारल्यासारखें करून मास्तर म्हणाले “ थांबा अण्णा ! माझ्या मनांत या क्षणीं एका नव्याच प्लॉटचा ‘ जर्म ’ ( बीज ) पडला आहे. मीच या जर्मवर एक प्लॉट टाकतों. एका पक्क्या व्हिलनच्या

तावडींत एक भाबडा म्हातारा सांपडला आहे, या कल्पनेवर एक सुंदर आणि अत्यंत चटकदार कॉमेडी लिहितां येईल, असें मला वाटतें. ”

ही कल्पनाच ‘ भावबंधनाचा ’ पाया होय.

( २ )

## ‘ भावबंधन ’ अगोदरच कां लिहिलें

गडकऱ्यांना एखाद्या नाटकाची बीजभूत कल्पना सुचली, म्हणजे तिच्यावर ते ताबडतोब नाटक लिहावयाला सुरुवात करीत, असें कांहीं नाहीं. अशा किती तरी कल्पना त्यांच्यापाशीं पडून राहिल्या होत्या. सुमारें १९।२० नाटकांच्या बीजकल्पना त्यांनीं मला वेळोवेळीं सांगितल्याचें स्मरतें. यांपैकीं कित्येकांच्या पायांवर त्यांनीं संविधानकाच्या डौलदार सुंदर इमारतीहि बांधल्या होत्या. गडकऱ्यांचें महार्घ, तेजोमय नाट्यरत्न जें ‘ राजसंन्यास ’, त्याचे एक दोन सुंदर पैलू अगदीं संपूर्णपणें तयारहि होऊन पडले होते. अशा स्थितींत या नव्या हास्यरसप्रधान नाटकाची बीजकल्पना गडकऱ्यांना सुचली. इतर नाटकांच्या कल्पनांप्रमाणेंच या कल्पनेचीहि स्थिति होईल, तिची वाढ कांहीं होणार नाहीं, नाट्यकल्पनांच्या यादींत हीहि जाऊन पडेल, अशी माझी कल्पना होती. गडकरी अमुक वेळीं अमुक करतील अशा मी कल्पना बांधीत असें आणि त्या सहसा चुकत नसत; परंतु या वेळीं माझी कल्पना साफ चुकली. राजसंन्यास पुरें करावें असें आम्हां सर्व मित्रमंडळींचें टुमणें गडकऱ्यांच्या मागें नेहमीं लागलेलें असतांहि ते या वेळीं याच नाटकाच्या मागें लागले. याला दोनतीन कारणें होतीं. एक तर, या वेळीं गडकऱ्यांना पैशाची टंचाई विशेष जाणवूं लागली होती; ‘ एकच प्याला ’ नाटकाच्या ठरलेल्या मोबदल्यापैकीं जवळजवळ दोन तृतीयांश रकमेची त्यांनीं आगाऊच उचल केली असून खेळ रंगभूमीवर आल्याशिवाय बाकीची रक्कम त्यांना मिळण्यासारखी नव्हती. यामुळें गडकऱ्यांना त्यावेळीं एकादें नवें नाटक लिहिणें भागच होतें. गडकऱ्यांचें प्रत्येक नाटक बहुधा याच टंचाईच्या परिस्थितींत लिहिलें गेलें आहे, आणि मराठी भाषेच्या सौभाग्यवृद्धीच्या दृष्टीनें आम्हांला गडकऱ्यांची ही परिस्थिति अत्यंत संतोषदायकच होई !

( ३ )

## ‘राजसंन्यासा’वरील प्रेम

ही ‘ लाइट कॉमेडी ’ गडकऱ्यांनीं हातीं घ्यावयाला दुसरें एक महत्त्वाचें

कारण हें होतें कीं, ‘ सहचारिणी ’ हें त्यांच्या गुरूंचें हास्यरसप्रधान नाटक नुकतेंच लिहिलें गेलें होतें, व ‘ लाइट कॉमेडी ’ लिहिण्यांतहि आपण महाराष्ट्र नाटककारांत श्रेष्ठ पदवी मिळवूं, अशी गडकऱ्यांना फार ईर्षा वाटूं लागली होती. ‘ राजसंन्यास ’ नाटकाचे जवळजवळ पावणेदोन अंक या वेळीं लिहून तयार झाले होते, व तें पुरें करण्याचा आमचा गडकऱ्यांच्या मागें सारखा लकडा सुरू होता; परंतु हें नाटक त्यांना अत्यंत पवित्र व पूज्यतम वाटत असे. ‘ राजसंन्यास ’ ही आपल्या नाट्यचातुर्याची, लेखनकलेची परिसीमा व्हावी, असा गडकऱ्यांचा अत्यंत उत्कट हेतु होता. यामुळें अतिशय प्रसन्नतेची स्फूर्ति असल्याशिवाय त्या नाटकाला ते कधीं स्पर्शहि करीत नसत. ‘ राजसंन्यास ’ नाटकाकरितां महाराष्ट्रांतील एक दोन सुप्रसिद्ध नाटक मंडळ्यांनीं गडकऱ्यांना पांच पांच सहा सहा हजार रुपये देऊं केले होते. परंतु अशा अडचणीच्या प्रसंगीं, मनःस्थिति असावी तशी सुप्रसन्न व शांत नसतां, ‘ राजसंन्यास ’ कसेंबसें पुरें करून नाटकमंडळ्यांच्या तोंडावर फेंकून टाकणें हें निव्वळ पाप होय, अशी गडकऱ्यांची अंतःकरणपूर्वक समजूत असल्यामुळें एवढें दांडगें प्रलोभन त्यांनीं दूर सारलें व राजसंन्यासाला हात घातला नाहीं. एकादें नाटक लिहिणें या वेळीं गडकऱ्यांना अगदीं जरूर होतें व तेंहि थोड्याच दिवसांत लिहिलें पाहिजे होतें. अशा परिस्थितींत ही नवीन ‘ लाइट कॉमेडी ’ झटकन लिहून तयार होईल, असें गडकऱ्यांना वाटलें व त्या उद्योगाच्या तयारीला ते लागले.

( ४ )

## स्त्री संगीत मंडळीकरितां ‘ भावबंधन ’

या वेळीं मुंबईस ‘ सातारकर स्त्री संगीत मंडळी ’ नांवाची एक बायकांची नाटक मंडळी खेळ करीत असून तिचे नाट्यप्रयोग मुंबईला बरेच लोकप्रियहि झाले होते. या मंडळीच्या प्रयोगांना गडकरी वारंवार जात व ते त्यांना बरेच आवडतहि असत. या मंडळीच्या चालकांनीं गडकऱ्यांपाशीं त्यांच्या ‘पुण्यप्रभावा’च्या प्रयोगांची परवानगी मागितली व त्यांनीं ती उदार अंतःकरणानें दिलीहि. या निमित्तानें मंडळीच्या चालकांच्या व गडकऱ्यांच्या बऱ्याच वेळ भेटीगांठी पडल्या व एका प्रसंगीं ‘ आपल्या मंडळीकडे पाहून एकादें नवीन लहानसें नाटक लिहावें, ’ अशी त्यांनीं गडकऱ्यांची प्रार्थनाहि केली. यावेळीं ‘ भावबंधना’ची

कल्पना गडकऱ्यांच्या डोक्यांत घोळत होतीच. नेहमींच्या रीतीप्रमाणें पराकाष्ठेचें परिश्रम न करतां, मस्तकाला विशेष त्रास न देतां, या कल्पनेवर एकादें चटकदार लहानसें नाटक लिहून काढावें, व या गुणी मंडळीला द्यावें, असा' गडकऱ्यांचा प्रथम विचार होता; परंतु हा विचार पुढें प्रत्यक्ष अमलांत आला नाहीं.

डोक्याला शीण म्हणून द्यावयाचा नाहीं. नाटकासंबंधानें फारसे कसले श्रम म्हणून करावयाचे नाहींत, चटकन हें हास्यरसप्रधान नाटक पांचसांत दिवसांत लिहून या छोट्या पण गुणी मंडळीला द्यावयाचें व त्यांच्यापासून थोडासा मोबदला घेऊन तूर्तची अडचण वारावयाची, असा जरी गडकऱ्यांचा हेतु होता तरी ' मूळ स्वभाव जाईना ! ' हें या बाबतींतहि खरें ठरलें !

( ५ )

## नाटक तीन हजारांचें झालें

नाटक लिहितांना सर्व बाजूंनीं अत्यंत परिश्रम करावयाचे, आपणाकडून त्यांत कोठें तिळभर दोषाला जागा म्हणून राहूं द्यावयाची नाहीं, आपली नाट्यकृति सर्वांगसुंदर होण्याला जिवापाड मेहनत करावयाची, हा जो गडकऱ्यांचा ' स्वभाव ', तोच शेवटीं या वेळींहि उभा राहिला. तो त्यांना ' चट्कन् नाटक लिहावया ' ची वेठ वारूं देईना ! नाटकाचें संविधानक, पात्रें, त्यांचे स्वभाव, नाटकांतील प्रसंग, कृति ( Actions ) वगैरे वगैरे अनेक भानगडींची योग्य वाढ होऊं लागली. गडकऱ्यांचा प्रत्येक क्षण या गोष्टींकडे खर्च होऊं लागला. रात्रंदिवस त्यांना या नाटकावांचून कांहीं दिसेना, कांहीं रुचेना, कांहीं पचेना. गडकऱ्यांच्या इतर नाटकांत व या ' चट्कन् लिहून कंपनीच्या अंगावर फेंकून द्यावया 'च्या ' लाइट कॉमेडी ' त आतां कांहींच फरक राहिला नव्हता ! या वेळीं गडकरी मुंबईतच असल्यामुळें त्यांच्या निकट सान्निध्याचा लाभ मला मिळाला होता, व त्यांच्या या नवीन नाटकाच्या अनेक बाबतींसम्बन्धानें त्यांच्यांत व माझ्यांत बऱ्याच चर्चाहि चालत. या नाटकावर आपली अतोनात मेहनत चालली आहे, हें लक्षांत येतांच गडकरी मला दोनचारदां हास्यपूर्वक म्हणाले " अण्णा, नाटक आतां हजारपांचशेंचें राहिलें नाहीं ! हें चाललें तीन हजारांवर ! "

( ६ )

## बलवंत संगीत मंडळीकरितां

गडकऱ्यांच्या नाटकांवरच सर्वस्वी अवलंबून आपण नवी नाटक मंडळी

स्थापन करण्याच्या भानगडींत पडत आहों, ही गोष्ट जरी या नटमंडळींनीं त्यांना प्रत्यक्ष कळविली नव्हती. तरी तिची जाणीव गडकऱ्यांनां पूर्णपणें होती आणि याच धोरणानें त्यांनीं आपल्या या नवीन ' कॉमेडी ' ची–' भावबंधना ' ची आंखणी चालविली होती. या नवीन निघणाऱ्या ' मंडळी ' ला हें नवें नाटक आपणाला द्यावें लागेल, हें रा. गडकऱ्यांना पूर्णपणें ठाऊक होतें व तीं तीं पात्रें डोळ्यांसमोर ठेवून ते ' भावबंधना ' चें संविधानक, पात्रस्वभावपोषण, प्रवेश वगैरेंची मांडणी करीत होते. भूमिका घेणाऱ्या नटांच्या स्वभावधर्माला अनकूल अशाच पात्रांची योजना गडकरी आपल्या नाटकांत करीत होते; परंतु ही गोष्ट गडकऱ्यांनीं आपल्या एकदोघां अंतरंग मित्रांशिवाय दुसऱ्या कोणापाशींहि प्रकट केली नव्हती.

( ७ )

## गडकऱ्यांची महत्वाकांक्षा

या मंडळींनीं जीं जुनीं नाटकें करावयाचें ठरविलें होतें, त्यांत गडकऱ्यांचें पूर्ण यशस्वी झालेलें ' पुण्यप्रभाव ' हें नाटक होतेंच; परंतु त्यांची खरी भिस्त गडकऱ्यांच्या या नवीन नाटकावरच विशेष होती. पण हें नवें नाटक त्यांना मिळेल अशा 'रंग' दिसेना. या नटांनीं किर्लोस्कर मंडळींतून बाहेर पडतांना आपला सल्ला घेतला नाहीं, या एका क्षुल्लक गोष्टीवर गडकरी वांकून बसले ! गडकऱ्यांचा स्वभाव वस्तुतः अत्यंत प्रेमळ व दयाशील असतांहि बाह्यतः ते लहरी व विचित्र स्वभावाचे भासत, ते अशाच त्यांच्या वर्तनामुळें होय ! खरोखर म्हटलें तर कोल्हटकरादि नटमंडळी फुटून त्यांनीं ' नवी विटी नवें राज्य ' स्थापावें, अशी गडकऱ्यांची त्या वेळीं अगदीं अन्तःकरणपूर्वक इच्छा होती, हें मला माहीत आहे. त्या वेळीं गडकऱ्यांची यशस्वी नाटककार म्हणून जरी चहूंकडे कीर्ति झाली होती, तरी ते कोठल्याहि मोठ्या मंडळीच्या पूज्य ' देव ' पदीं अद्यापि विराजमान झाले नव्हते. गन्धर्व मंडळीच्या नाटककारांच्या मालिकेंत प्रथम पद आपणाला केव्हांहि मिळणें शक्य नाहीं, फार झालें तर आपण गन्धर्व मंडळीचें भूषण होऊं, जीवन होऊन बसणार नाहीं, हेंहि त्यांना ठाऊक होतें आणि हें प्रथम ' देव ' पद कोठल्याहि मोठ्या नाटक मंडळींत आपणाला मिळावें, अशी गडकऱ्यांची जीवनमहत्त्वकांक्षा होती. ही नवीन मंडळी स्थापन झाली, तर रा. खाडिलकर ज्याप्रमाणें गन्धर्व मंडळींत ' देव '

पदावर विराजमान आहेत त्याप्रमाणें आपणहि या मंडळींत तें स्थान पटकावूं, अशी त्यांची खात्री होती व म्हणूनच किर्लोस्कर मंडळींतून ही मंडळी फुटून त्यांची नवीन मंडळी स्थापन व्हावी, अशी गडकऱ्यांची मनःपूर्वक इच्छा होती. कोणाचा बोल आपणावर येऊं नये, एवढ्याच उद्देशानें ते कधीं मंडळी फोडण्याच्या प्रत्यक्ष खटपटींत पडले नाहींत इतकेंच! मंडळीच्या नामकरणासाठीं त्यांनीं 'लोकसेवक नाटक मंडळी,' 'साहित्य नाटक मंडळी' हीं नांवेंहि सुचवलीं होतीं व स्थापनेच्या समारंभालाहि ते प्रत्यक्ष हजर होते. मंडळीच्या दर्शनी पडद्या (ड्राप)च्या 'लक्ष्मी–सरस्वती'च्या चित्राची मार्मिक कल्पना व पडद्यावरील कालिदासाच्या श्रीदश्लोकाचें अवतरण रा. गडकऱ्यांनींच दिलें. मंडळीसाठीं 'राजलक्ष्मी' लिहावयालाहि मला त्यांनींच आग्रह केला. इतकी मंडळीविषयीं त्यांना कळकळ होती.

( ८ )

## गडकरी जिन्यावरून पडले

गडकऱ्यांचा स्वभाव कांहींसा अडेल व हट्टी होता, व वर लिहिल्याप्रमाणें ते एका क्षुल्लक कारणाकरतां अडून बसलेच. मीं व दुसऱ्या त्यांच्या अनेक मित्रांनीं त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; परंतु पहिल्यानें आम्हाला मुळींसुद्धां यश आलें नाहीं. बोरिवलीला मंडळीच्या बिऱ्हाडीं जावयाला देखील गडकरी कबूल होत नव्हते. शेवटीं आमच्या प्रयत्नांना एकदांचें यश आलें, व बलवंत मंडळीला आपलें पुण्यप्रभाव व हें नवीन नाटक देण्याचें त्यांनीं कबूल केलें.

इकडे गडकऱ्यांचें सर्व लक्ष्य नाटकाच्या वाढीकडे लागून राहिलें होतें. रात्रंदिवस त्यांना या नवीन नाटकाशिवाय कांहीं सुचत व दिसत नव्हतें. नाटकाच्या संविधानकाची रचना पूर्ण झाल्यावर एके दिवशीं संध्याकाळीं मी व गडकरी बोरिवलीला मंडळीच्या बिऱ्हाडीं गेलों. मंडळीला नव्या नाटकाचें संविधानक सांगण्याचा व त्यासंबंधानें थोडीबहुत चर्चा करण्याचा त्यांचा हेतु होता.

या दिवशीं एक अत्यंत विलक्षण गोष्ट घडून आली, ती तेथें सांगितल्यावांचून रहावत नाहीं. भोजनासाठीं म्हणून गडकरी व मी बंगल्याच्या वरील दिवाणखान्यांतून खालीं यावयाला निघालों. मी गडकऱ्यांच्या अगदीं बरोबर मागें होतों. जिन्याची पहिली पायरी उतरतांच गडकऱ्यांच्या पायांतला नवा जोडा सरकला व ते जिन्याच्या अगदीं तळापर्यंत घडघडत खालीं आले! आम्ही घाईघाईनें खालीं आलों, तों ते उठलेच होते. "मास्तर, लागलें कां कांहीं?"

असें मी विचारतों तोंच ते खिन्नपणें हंसून मला म्हणाले " लागलें नाहीं कुठें. परंतु तुम्हाला सांगून ठेवतों अण्णा, हें नाटक माझ्या हातून पुरें व्हायचें नाहीं. हें पुरें व्हायच्या पूर्वी मी मरणार ! " या त्यांच्या भविष्याबद्दल मी त्या वेळीं त्यांचा सडकून निषेध केला व भविष्याबद्दल मला त्या वेळीं विशेष कांहीं वाटलेंहि नाहीं. परंतु मोठ्या आश्चर्याची गोष्ट ही कीं, एका वर्षाच्या आंत तें दुष्ट भविष्य अक्षरशः खरें झालें ! या गोष्टीबद्दल अजूनहि राहून राहून मला अत्यंत आश्चर्य वाटतें.

## रा. पांडोबा क्षीरसागर ( रमाकांत नाटक मंडळी ) यांजकडून

( १ )

### [गड]कऱ्यांचें प्रेमळ अंतःकरण

[ग]डकऱ्यांची व माझी ओळख प्रथम किर्लोस्कर कंपनींत झाली. त्यांचा माझा [इतका] स्नेह जमला कीं, गडकरी होतां होईल तों कोणतीहि गोष्ट मला सांगि[तल्या]वांचून राहात नसत. पण त्यांचें पुण्यप्रभाव किर्लोस्कर कंपनीकडून येण्यापूर्वी [त्यांचा] माझ्यावर फारच राग झाला. ते एकदां रागावलें कीं, फारच रागा[व]याचें व बोलायला लागलें म्हणजे कांहीं दडवून ठेवावयाचें नाहीं, असा त्यांचा [स्व]भाव असे. रा. शंकरराव मुजुमदार यांच्याबद्दल ते एके दिवशीं शंकररावांची [...] दर्शविणारी गोष्ट बोलले. ती गोष्ट विषय निघाला असतां मी शंकररावांना सांगितली. शंकरराव तें विनोदवारी व हंसण्यावारी नेतील अशी माझी कल्पना होती. पण त्यांना राग आला, व त्या रागाच्या भरांत ते गडकऱ्यांना बोलले. [शं]कररावांना ती गोष्ट माझ्यामुळें समजली असल्यामुळें गडकरी माझ्याशीं बोले[न]ातसे होऊन त्यांचा व माझा स्नेह तुटला. त्यावेळीं मी किर्लोस्कर कंपनींत [पे]टीवाला होतो. गडकऱ्यांचें ' पुण्यप्रभाव ' बसत होतें. " हा पेटीवाला बदला, [हा] पेटीवर असल्यास माझें नाटक मीं देणार नाहीं. " असें म्हणून त्यांनीं [मा]झ्यावर शक्य तितका राग काढला. पुढें मी किर्लोस्कर कंपनीतून निघून रा. [...]े यांच्या शिवराज कंपनींत गेलों. त्या ठिकाणींहि गडकऱ्यांनीं ' हा पांडोबा [अ]सेल तर माझें नाटक मिळणार नाहीं ' असें म्हणाले. पुढें शिवराजकरतां [...]शीदास नाटक घेण्याचें ठरत असतां मीच कंपनींतून निघावयाचें ठरविलें. [त्या]वेळीं मी सहकुटुंब कंपनींत रहात असे. माझ्याकरतां गडकऱ्यांचें नाटक [हु]कसकटावयास नको म्हणून मीच कंपनींतून [जा]ण्याचा विचार केला. मी जेव्हां

कंपनींतून गडकऱ्यांकरतां जाणार असें कळलें तेव्हां गडकऱ्यांना फार वाईट वाटलें. 'माझ्याकरतां हा नोकरी सोडून घरीं बसणार' ही कल्पनाहि त्यांना सहन झाली नाहीं. दुसरे किंवा तिसरे दिवशीं त्यांची भेट गंधर्व नाटक कंपनींत झाली. बोडस आजारी असल्यामुळें माझ्याप्रमाणें तेही त्यांना भेटावयास आले होते. मला पाहतांच त्यांनीं त्यावेळपर्यंतचा अबोला सोडून पूर्वीचे सर्व विसरून जा असें ते म्हणाले; मलाही आनंद झाला. त्याच दिवशीं रात्रीं त्यांनीं मला जेवावयास बोलाविलें, आणि त्या वेळेपासून त्यांचा माझा पूर्ववत स्नेह जमला. आपल्याकरतां एक मनुष्य बेकार होणार या कल्पनेनेंच त्यांना माझ्याशीं अबोला राखल्याबद्दल पश्चात्ताप झाला. गडकऱ्यांचें अंतःकरण फुलापेक्षां कोमल होतें. त्यांच्या हळुवार अंतःकरणाच्या अशा अनेक गोष्टी सांगतां येतील.

3420

(२)

## गडकरी व शारदा

आम्ही फिरावयास जात असूं तेव्हां गडकरी नाटकाविषयीं माझ्याशीं वार बोलले असतील. देवल यांच्याबद्दल त्यांना आदर होता. तरीपण ...माणें ते शारदा नाटकांतील एक ढोबळ चुक एक दिवशीं त्यांनीं सांगितली. ते म्हणाले ...नीं देवलांची योग्यता मोठी आहे हें खरें असलें तरी शारदा नाटकांत त्यांनी ... मोठी घोडचुक केली आहे. शारदा हें नाटक जरठकुमारी विवाहाचा ...रो करण्यासाठीं लिहिलें आहे. या दृष्टीनें पहातां शारदा आणि वृद्ध श्रीमंत ...ांत लग्न याच तत्त्वावर कोदंडानें मोडावयास पाहिजे होतें. जरठकुमारी यांचा वि... होणें समाजोन्नतीच्या दृष्टीनें फार घातुक आहे असें त्यानें प्रतिपादन करून ...कारणानें लग्न मोडल्याचें नाटककारानें दाखवावयास पाहिजे होतें. ए...गोत्राची वधुवर असल्यानें शारदा व श्रीमंत यांचें लग्न मोडलें असें दाखवि...नीं देवलांनीं मोठीच चूक केली; ज्या हेतूनें नाटक लिहावयास घेतलें तो हेतु बाजूस राहून भलत्याच कारणानें लग्न मोडलें गेल्यामुळें नाटकाचा हेतु तर साध्य झाला नाहीं पण तें जितकें परिणामकारक झालें पाहिजे तितकेंही तें याच कारणानें झालें नाहीं.

(३)

## खाडिलकरांचा 'कीचकवध'

खाडिलकरांचें 'कीचकवध' हें नाटक फारच छान आहे. हें नाटक ...ी अंकास पायरी पायरीनें चढत जातें. त्यामुळें नाट्यप्रयोगास फारच रंग ...